# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय- जयंत पाटील
फडणवीसांनी दाखविला मुख्यमंत्री शिंदेंना आरसा

**5**
प्रबंध संपादकीय- दिलीप वळसे पाटील
साहेबांना वाढदिवसाची कामातून भेट देऊया!

**6**
संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे
संवादाची जागा हे अभ्यासाचे निवासस्थान!

**10**
राष्ट्रवादी काँग्रेसचे शिर्डी शिबीर, भाषणे-
१) शरद पवार-१०
२) जयंत पाटील-१६
३) अजित पवार-२०
४) छगन भुजबळ-२३
५) प्रफुल पटेल-२६
६) सुप्रिया सुळे-२८
७) सुनील तटकरे-३१
७) एकनाथ खडसे-३३
८) डॉ. जितेंद्र आव्हाड-३४
९) राजेश टोपे-३६
१०) धनंजय मुंडे-३८
११) सुभान अली शेख-४०
१२) कुमार केतकर- ४२
१३) मधुकर भावे-४५
१४) प्रा. जे.एफ. पाटील-४८
१५) अशोक वानखेडे-५०

**52**
शेजारील घडामोडी जागरुकता हवी
- अगस्त्य नाथ

**59**
महाराष्ट्राचा स्वाभिमान आणखी
किती डिवचणार???
- फिरस्ता

**64**
केंद्रीकरणाची अति..तेथे..??
- अनंत बागाईतकर

**72**
अशांत इराण आणि भारत
- जतिन देसाई

**76**
फासे उलटे पडू लागले
- व्यंकटेश केसरी

**80**
चंदावरकर, काँग्रेस आणि डिसेंबर
- प्रा.डॉ. गणेश राऊत

**88**
कार्यपालिका वि. न्यायपालिका
पुन्हा संघर्ष?
- त्रिनेत्र दास

**94**
कानोकानी (राजकीय किस्से)
- घंटाकर्ण

**102**
शेवटचे पान- ।। पाऊले चालती।।
-हेमन्त टकले





शारदाबाई पवार
जन्म-१२ डिसेंबर


सौ. प्रतिभाताई पवार
जन्म-१३ डिसेंबर

राष्ट्रवादी


**संचालक**
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने मीडिया आर अॅण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम),
मुंबई-४०००६७ येथे
छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला,
वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई-४०००२०
येथून अंक प्रकाशित केले.

अग्रदीप



# फडणवीसांनी दाखविला मुख्यमंत्री शिंदेंना आरसा

महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकार रोज नवनवीन घोषणांचा पाऊस पाडतोय. प्रत्यक्षात या नुसत्या ढगांच्या वांझोट्या गर्जना आहेत. जनतेच्या हाती यातले काहीही पडण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. कारण राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे. बरे झाले, या खडखडाटाविषयी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच भाष्य केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रोज वेगवेगळी देवदर्शने करीत असून नवस फेडण्याचे पुण्यकर्म जनतेच्या पैशातून पार पाडीत आहेत. सवंग लोकप्रियतेसाठी व लोकानुरंजनी राजकारणाच्या मागे लागलेले मुख्यमंत्री रोज हजारो कोटींच्या मदतीच्या व खिरापत वाटण्याच्या घोषणा करून लोकप्रिय होण्याच्या नादात आहेत. पैसे वाटले म्हणजे आपण जनतेची फार मोठी सेवा केली असा काहीसा गोड गैरसमज मुख्यमंत्र्यांचा झालेला दिसतो आहे. विशेष म्हणजे या घोषणा व लोकप्रियतेची मुक्ताफळे मंत्रीमंडळाला विश्वासात व विचारात न घेता मुख्यमंत्री मनमर्जीपणे वागून उधळत आहेत ही देवेंद्र फडणवीस यांच्या मनातली खरी खंत आहे. त्यामुळे शिंदे फार वेगाने काम करताहेत आणि भाजपचे नेते त्यामानाने सुस्त आहेत व १०५ आमदार असूनही ४० गद्दारांचे ओझे आपल्या पक्षाला सांभाळावे लागते आहे याचे शल्य व दुःख त्यांना रात्रंदिन सतावते आहे. म्हणून देवेंद्र यांनी स्पष्ट बोलून शिंदे यांना परखड आरसा दाखविला आहे. तिजोरीत काहीच नाही आणि रोज घोषणा कसल्या करता? त्या प्रत्यक्षात उतरविणे शक्य होणार आहे का? बरे झाले देवेंद्र खरे बोलले. खरे तर त्यांचा मूळ स्वभाव खोटे बोल आणि रेटून बोल असाच आहे. सगळ्या भाजप नेत्यांचे धोरण खोटे बोलून जनतेला मूर्ख बनविण्याचे आहे हे आपण मागील आठ वर्षांपासून पाहात आलो आहोत. अनुभवित आहोत. शिंदे-फडणवीस जोडी म्हणजे ठकाला भेटला महाठक अशीच आहे. त्यांच्या या चढाओढीत जनतेचे मात्र प्रचंड हाल चालू आहेत. ती संकटे व वेदनांच्या खाईत भरडून निघते आहे. महागाई, बेरोजगारी, आर्थिक विषमता प्रचंड वाढत आहे. गरिबी व दारिद्र्य रेषेखाली गेलेल्या लोकांची संख्या ८२ टक्क्यांच्या घरात गेली आहे. पण सरकारला त्याचे काहीही सोयरसुतक राहिलेले नाही. पिराचे पिराला पडले, फकिराचे बघतो कोण अशी त्यांची स्थिती झाली आहे.



या सरकारला फक्त ४० आमदारांचे पडले आहे. त्यांना कसे सांभाळायचे हा प्रश्न त्यांना रोज सतावतोय आणि या गद्दार आमदारांना ५० खोके मिळाल्यामुळे मतदारसंघातील त्यांचे कार्यकर्ते सतावताहेत. या आमदारांच्या मागे लागलेले त्यांच्या पक्षातले व बाजूचेच कार्यकर्ते आम्हालाही ५० खोक्यात वाटा मिळावा अशी मागणी करताहेत. हा वाटा देणार नसाल तर पुढच्या वेळी तुम्ही कसे निवडून येता तेच बघतो. विरोधकालाच निवडून आणतो अशा धमक्या प्रमुख कार्यकर्ते देऊ लागले आहेत असे ऐकू येते आहे. प्रत्यक्षात खरं खोटं माहित नाही. पण गद्दार आमदार त्यामुळे प्रचंड अस्वस्थ आहेत. ते गयावया, विनवणी करून कबुली देताहेत दोन-तीन खोकी मिळाली आहेत. पुढची खोकी अजून मिळालेली नाहीत आणि भाजपचे नेते आता ती द्यायला तयार नाहीत. म्हणजे सगळी खोकीही नाहीत आणि मंत्रीपदही नाही. उलट वरून चोर, गद्दार असल्या नामांकित पदव्या व उपाध्या मिळाल्यामुळे फुटीर आमदारांच्या नावलौकिकात प्रचंड भर पडली आहे. या नावलौकिकाचा भारच आता त्यांना पेलवेनासा झाला आहे. त्यामुळे त्यांची अवस्था 'कुत्ता ना घरका ना घाट का' अशी झाली आहे. सरकारमध्ये काहीही आलबेल राहिलेले नाही. हाताला लागेल ते ओढण्याच्या नादात मंत्री गुंतले आहेत. राज्य लुटण्यासाठी त्यांच्यातच प्रचंड चढाओढ लागली आहे. त्यामुळेच उद्योग दुसऱ्या राज्यात जाताहेत. भ्रष्टाचार व खंडणी बहाद्दरांचे हे सरकार आहे. त्यांच्यापासून कसली विकासाची अपेक्षा करणार?


## प्रबंध संपादकीय



# साहेबांना वाढदिवसाची भेट कामातून देऊया!

आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि आपल्या सर्वांचे मार्गदर्शक मा. शरदरावजी पवार साहेब यांनी ५ नोव्हेंबरला अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे 'वेध भविष्याचा' या मंथन शिबीरात जे भाषण करून आपल्या सर्वांना कामाची जी दिशा दाखविलेली आहे त्यावर आपण सर्व कार्यकर्त्यांनी गंभीरपणे विचार करण्याची व त्या दिशेने कार्यरत होण्याची आवश्यकता आहे. स्वतःची प्रकृती ठीक नसतानाही केवळ कार्यकर्त्यांची भेट घ्यावी आणि त्यांना कामाची दिशा देऊन मनोधैर्य वाढवावे या हेतूने डॉक्टरांची परवानगी नसतानाही काही तासांसाठी पवार साहेब शिर्डीला आले. येण्यापूर्वी संपूर्ण भाषण लिहून काढले. लिखीत स्वरुपात विचार आपल्यापुढे ठेवले. ही विचारांची शिदोरी पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला रोज भरीव काम करण्याची प्रेरणा देईल याविषयी माझ्या मनात शंका नाही. या भाषणाचे आपण व्यवस्थितपणे अवलोकन केले तर साहेबांच्या विचारांचे, जीवनकार्याचे आणि पुढच्या वाटचालीचे सार त्यात सूत्रबद्धपणे उतरलेले व उमटलेले आहे हे आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. येत्या १२ डिसेंबरला पवार साहेब वयाची ८२ वर्षे पूर्ण करून ८३ व्या वर्षात पदार्पण करणार आहेत आणि आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही आता पंचविशीकडे वाटचाल करण्यास सुरूवात झाली आहे. जून २०२४ मध्ये पक्षाच्या स्थापनेला २५ वर्षे होऊन आपण रौप्यमहोत्सव साजरा करणार आहोत. एखाद्या राजकीय पक्षाच्या आयुष्यात २५ वर्षे फार झाली असे म्हणता येत नाही. कारण कित्येक पक्षांना शंभर वर्षे होऊन गेलेली आहेत. त्यामुळे आपला पक्ष वयाने अजूनही लहान असला तरी २५ वर्षे ही फार कमी आहेत असे मानण्याचे कारण नाही. माणूस जेव्हा पंचविशीत येतो तेव्हा त्याला बऱ्यापैकी समज व प्रगल्भता आलेली आहे असेच आपण मानतो. तिच अवस्था पक्षाच्या बाबतीतही मानली पाहिजे असे मला वाटते. सुदैवाने आपल्या सर्वांना सुरूवातीपासूनच पवार साहेबांचे मार्गदर्शन व त्यांच्या विचारांचे बाळकडू मिळत आले आहे. त्यामुळे पक्षाची विचारधारा व वैचारिक बैठक फार पक्की व मजबूत झालेली आहे. कार्यकर्त्यांनाही या बैठकीतून कामाची दिशा व सूत्र निश्चितपणे उपलब्ध झालेले असल्यामुळे त्याच्या जीवनाला वाट सापडून लोकसेवेचा वसा प्राप्त झालेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा व वसा घेऊन आपण पुढे जात आहोत. बहुजन समाजाला संघटित करून नवी प्रेरणा देण्याचे काम यातून होते आहे. सर्वधर्मसमभाव, राज्यघटनेवर श्रद्धा, लोकशाही, समानता, स्वातंत्र्य व बंधुता आणि जातीधर्म निरपेक्ष राष्ट्रउभारणी ही आपल्या कार्याची प्रमुख सुत्रे आहेत. या सूत्रांना तडा देऊन ती उध्वस्त करण्याचे काम २०१४ पासून सत्तेवर आलेल्या जातीयवादी व धर्मांध मोदी सरकारने चालविले आहे. मोदी सरकारच्या कामकाजाचे व विचारांची चिरफाड पवार साहेबांनी शिर्डीच्या भाषणात फार स्पष्टपणे व उघडपणे केली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा आणि छुप्या विचारांचा बुरखा टराटरा फाडलेला आहे. पवार साहेबांनी जे सत्य या भाषणातून आपल्यापुढे मांडले आहे ते जनतेपर्यंत व समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याचे काम आपण सर्वांनी प्रामाणिकपणे करण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्याला घरोघरी जावे लागेल. पक्षाच्या कामासाठी वेळ द्यावा लागेल. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका २०२४ मध्ये होणार आहेत. आता जेमतेम एक-सव्वा वर्ष आपल्या हाती आहे. दिवस बघताबघता निघून जातील. तेव्हा गाफील राहून जमणार नाही. पवार साहेबांनी जो विचार व दिशा दाखविली आहे त्याच्या अंमलबजावणीसाठी आपण नवीन वर्षात कटिबद्ध होऊया आणि भाजपला सत्तेवरून खाली खेचण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याच्या दृष्टीने कार्यरत होऊया! तिच साहेबांना वाढदिवसाची योग्य भेट ठरेल !



## संपादकीय



# संवादाची जागा हे अभ्यासाचे निवासस्थान!

भारतीय राजकारणातले 'भीष्मपितामह' म्हणून आज श्री. शरद पवार यांच्याकडे पाहिले जाते. ते केवळ ५५ वर्षांहून अधिक काळ राजकारणात सक्रीय आहेत आणि निवडणुकीत त्यांचा कायम व आजपर्यंत विजयच होत आलेला आहे म्हणून नव्हे. सर्व पक्षातल्या राजकीय नेत्यांशी त्यांची घनिष्ट मैत्री तर आहेच पण या मैत्रीला मदतीची आणि विश्वासाची किनार आहे. आजपर्यंत अनेकांना त्यांनी मोकळ्या मनाने व कुठलीही परतफेडीची अपेक्षा न करता भरभरून मदत केलेली आहे. मुख्य म्हणजे त्याची कुठेही वाच्यता नाही. उजव्या हाताचे डाव्या हाताला देखील कळू दिलेले नाही. त्यांची वैचारिक बैठक फार पक्की आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या वैचारिक तालमीमध्ये त्यांची जडणघडण झालेली असल्यामुळे राष्ट्रहिताला त्यांच्या लेखी सर्वोच्च प्राधान्य असते. सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे कल्याण व राष्ट्रउन्नती डोळ्यासमोर ठेवून ते निर्णयांची उतरंड रचत गेले आहेत. हाच विचार समोर ठेवून तसा सल्ला व मार्गदर्शन त्यांनी बहुतेकांना केले आहे. त्यामुळे त्यांच्या सल्ला व मतांबाबत कधी कुणाच्या मनात शंकेची पाल ही चुकचुकली नाही. प्रश्न वा संकट कितीही बिकट किंवा गहिरे असू द्या, त्यांची यशस्वीपणे सोडवणूक करण्यात त्यांचा विलक्षण हातखंडा आहे. त्यामुळेच पवार साहेब हे सर्जनांचे सर्जन आहेत असे आजपर्यंत मानले गेले आहे आणि पुढेही मानले जाईल यात शंका नाही.

१९८३ पासून म्हणजे माझ्या महाविद्यालयीन विद्यार्थी दशेपासून मी शरद पवारांच्या सहवासात आहे. मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते, खासदार, केंद्रात मंत्री या सर्व पदांवर काम करताना मी त्यांना अत्यंत जवळून पाहिले आहे. पत्रकार या नात्याने त्यांच्या शेकडो-हजारो कार्यक्रमांना उपस्थित राहून त्या कार्यक्रमांचे वृत्त संकलन केले आहे. त्यावर लेख, स्फुटे व अग्रलेख लिहिले आहेत. अनेक विषयांवर त्यांच्याशी ऑन दी रेकॉर्ड आणि ऑफ दी रेकॉर्ड अशा मनमोकळ्या चर्चाही झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांची मते, विचारधारा व विचारांची दिशा यांचा काहीसा अंदाज वा मागमूस वा तर्क बांधणे शक्य होऊ शकते. पण याचा अर्थ तुम्ही पवार साहेबांना गृहीत धरू शकता असा होत नाही. त्यांच्या विचारांची गती आणि अभ्यासाची दृष्टी विलक्षण आहे. याला सोबत असणारे त्यांचे प्रसन्न निर्मळ हास्य मला महत्त्वाचे वाटते. ते जेव्हा खळाळून हसत समोरच्या व्यक्तीला मनापासून दाद देतात तेव्हा त्या दादेमागील आठवणी व अनुभवांचा झरा स्वच्छंदीपणाने वाहात असल्याचे जाणवल्याशिवाय राहात नाही. त्यांचा उपरोधिक एकच टोला भल्याभल्यांना घायाळ करतो आणि त्यांच्या सात पिढ्यांचा उद्धार करतो तेव्हा 'मेणाहूनी मऊ आम्ही विष्णूदास । कठिण वज्रास भेदू ऐसे ॥" या संतउक्तीची प्रचिती आल्याशिवाय राहात नाही. याचा अनुभव अनेक राजकारणी नेते, कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी आणि काही नाठाळांनीही बऱ्यापैकी घेतलेला आहे. त्याबाबतची अनेक उदाहरणे मी सांगू शकेन. पण ते सांगण्याची ही जागा नव्हे याची जाण असल्यामुळे मी उदाहरणे येथे सांगण्याचा मोह जाणीवपूर्वक टाळलेला आहे.

पवार साहेब केवळ स्पष्ट बोलत नाहीत तर नेमके आणि मार्मिक बोलतात. बऱ्याचदा ते समोरच्याचे सर्व बोलणे शांतपणे ऐकून घेतात पण त्यावर काहीही प्रतिक्रिया व्यक्त करीत नाहीत किंवा चेहऱ्यावर कोणतेही भाव दिसू देत नाहीत. त्यामुळे समोरचा माणूस बुचकळ्यात पडतो. आपले बोलणे साहेबांना आवडले की नाही याच विचार तंद्रीत तो बाहेर पडतो. पण थोड्या काळानंतर जी कार्यवाही व कारवाई झालेली असते त्यावरून पवार साहेबांचा प्रॉम्प्टपणा व विचार करण्याची पद्धती याचे दर्शन आपल्याला घडल्याशिवाय राहात नाही. काही वेळा ते जागेवरच निर्णय देतात. ते एक घाव दोन तुकडे अशा प्रकारचे असतात. हे तात्काळ निर्णय करायला कमालीचा अनुभव, विचार, अभ्यास, गृहपाठ तर लागतोच पण समोरच्या माणसाच्या अंतरंगात त्या क्षणी जी काही विचारांची स्पंदने चालू असतील ते ओळखून पकडण्याचे सामर्थ्य लागते. ते पवार साहेबांमध्ये इतके ओतप्रोत भरलेले आहे की समोरचा माणूस सहसा त्यांच्यापुढे खोटे बोलण्याचे धाडस करीत नाही. पण काही गणंग व नग याला अपवाद आहेतच. खोटे बोलणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे या भावनेने जे वागतात त्यांना

पवार सूडाचा फटका कसा लागतो हे पुरेपूर माहिती आहे. असे फटके खाल्लेले लोकही तुम्हांला आणि विशेषतः राजकीय पक्षात कार्यरत असणाऱ्यांना चांगले माहिती आहेत. त्यामुळे त्यांच्याही नावाचा बेलभंडारा मी येथे उधळत नाही. पण एका गोष्टीचा उल्लेख करण्याचा मोह मला अनावर करतो तो म्हणजे पवार साहेबांनी केलेला माणसांचा अभ्यास. तो इतका अचूक आणि परिपूर्ण असतो की काही दिवसांनंतर त्याचे महत्व पटते. योग्य जागी योग्य माणसे नेमून त्यांच्याकडून काम करवून घेण्याचे साहेबांचे जे कसब आहे ते अतुलनीय आणि कौतुक किती करावे असेच आहे! खरे तर, 'अभ्यास' हा शब्द साहेबांना पहाटे इतकाच प्रसन्न आहे. जगण्याचा ताजा श्वास म्हणजे अभ्यास. उगवत्या वाराला नवीन नवीन होणे म्हणजे अभ्यास. अभ्यास म्हणजे प्रयत्न, धडपड, चिकाटी, मेहनत, जिज्ञासा. अभ्यास हे मानवी मेंदूचे पॉलिश आहे. अभ्यासाने माणूस खरा प्रकटतो. अभ्यास हा सर्व आजारांवर आणि अवयवांवर मात करतो. '**असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास, तुका म्हणे**' ही संत तुकारामांची उक्ती पवार साहेबांना तंतोतंत लागू होते. चर्चा हा अभ्यासाचा मुक्त श्वास आहे हे साहेबांनी बरोबर जाणलेले असल्यामुळे ते भेटायला येणाऱ्या प्रत्येकाचे बोलणे शांतपणे ऐकून घेतात किंवा कुणी काही नवे संशोधन वा प्रयोग केला असेल तर साहेब तो पाहायला स्वतः तिथे जातात, मग ती व्यक्ती वयाने छोटी मोठी किंवा कुणी का असेना! एकंदरीत साहेबांच्या वागण्यावरून आपल्या असे लक्षात येते की त्यांनी संवादाची जागा हे अभ्यासाचे निवासस्थान बनविले आहे आणि घरातील कपाटांमध्ये खचाखच भरलेली पुस्तके हे अभ्यासाचे माहेरघर झाले आहे. त्यामुळे नव्या महस्त्रकाचे ध्येयवाक्य 'आधी अभ्यास, मग विकास' हेच झाले आहे. संत रामदासांनी देखील लिहून ठेवले आहे, "अभ्यासोनी प्रकट व्हावे, नाही तर झाकोनी असावे, प्रकट होऊनी नासावे, हे बरें नव्हे!"



देश व राज्याच्या विकासाचे धोरण आखून ते प्रभावीपणे राबविण्यासाठी राजकारणी लोकांना राजकारणाशिवाय अनेक अन्य विषयांचा (इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, साहित्य व संस्कृती, कृषी वगैरे) अभ्यास करावा लागतो. विविध ज्ञानशाखांमध्ये लीलया संचार करून ज्ञानाचे कण वेचावे लागतात. पवार साहेबांचा संचार तर राजकारणाबरोबरच विज्ञान, कला, क्रीडा, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कामगार, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन यांसह अनेक विषयांमध्ये चौफेर असतो. या सर्व विषयांचा बारकाईने अभ्यास करणे त्यांना कसे काय जमते हा आजही कुतूहलाचा ताजा विषय आहे. आधुनिकतेशी मैत्री करण्याची त्यांची वृत्ती विलक्षण आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा ते पूल आहेत. ते फार पारंपारिकतेच्या आहारीही जात नाहीत आणि आधुनिकतेला डोक्यावरही बसवित नाहीत. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वातले इंद्रधनुष्य अतिशय मोहक व आकर्षक आहे. नेमकी दाद कुठे द्यावी याबाबतीत ते खूप चाणाक्ष आहेत. उगवतीच्या रंगांकडे ते जितक्या प्रेमाने बघतात, तितक्याच आस्थेने ते अस्ताला जाणाऱ्या रंगांचेही स्वागत करतात. म्हणूनच त्यांचा रोजचा दिवस दिवाळी असतो.

प्रत्येक दिवशी काहीतरी नवीन करावे असे समर्थ रामदास आपल्याला सांगतात. त्याची आठवण पवार साहेब आपल्याला रोजच्या कृतीतून करून देतात. म्हणून ते कधीही थकलेले दिसत नाहीत आणि आपण चर्चा करीत राहतो. 'या वयात एवढा उत्साह त्यांना कुठून येतो?' प्रत्येकाच्या तोंडी हे वाक्य असते. याला मिश्किलीने उत्तर देताना साहेब म्हणतात, "मी काय म्हातारा थोडाच झालोय!" म्हातारपण कदाचित वयाने आलेले असेल पण मन आजही अगदी तरूण, टवटवीत, रोज नवे काही काम करण्याची उर्मी व आस बाळगणारे आणि अखंड समाजचिंतन व कल्याणकारी विचार करणारे असल्यामुळे वय त्यापुढे फिके पडते आणि जगण्याचे बळ देते. त्यामुळेच असाध्य रोगावर मात करून त्यांनी अनुभविलेली नव्या सूर्याची पहाट ही त्यांना नव्या युगाची नांदी वाटते. रोजच्या जीवन पायऱ्या चढत असताना हा प्रवास सुखकर असावा अशी सर्वांची आंतरिक इच्छा असणे स्वाभाविक आहे. पण ह्या पायऱ्या चढताना अडखळणे, घसरणे, पडणे, जखमी होणे हे ही अपेक्षित असते. त्या जखमांचे व्रण कधी कायमस्वरूपी

असतात तर काही वेळा फक्त खरचटते ! पण त्यातून उठून पुढे जायचे असते. दुसरी पायरी चढायचीच असते. कारण दुसरा दिवस उजाडलेला असतो. आपल्याबरोबर या पायऱ्या चढत असताना अनेकजण सोबत असतात. या सोबत्यांची स्वभाव वैशिष्ठ्ये निरनिराळी असतात. या वैशिष्ठ्यांशी जुळवून घेत त्यांच्याशी मैत्री करावी लागते. पवार साहेबांनी कोट्यावधी लोकांशी जीवाची मैत्री केली. त्यातील बहुतेकांना त्यांनी काही ना काही दिले. फार थोड्या लोकांनी पवार साहेबांना काही दिले (उदा. प्रेम, विश्वास, सहकार्य वगैरे) असेल. बरेच लोक मागणारेच होते आणि आजही मागणाऱ्यांचीच संख्या अधिक आहे देणाऱ्यांपेक्षा. पण याबद्दल साहेबांनी कधीही खंत वा खेद बाळगला नाही. उदारहस्ते व उदार मनाने ते वाटतच राहिले. अनेक स्वार्थी व लबाड लोकांनी संधीसाधूपणाने त्यांचा वापर करून घेतला आणि संकटसमयी पळून गेले. पण याचे शल्य व दुःख साहेबांनी कधी जाहीरपणाने दाखविले नाही. त्यांना दुःख झाले नसेल असे नाही. कारण तेही शेवटी माणूस आहेत. त्यांनाही मन आहे. उगाचच त्यांनी कधी दुःखाचे भांडवल केलेले नाही आणि सुखाचे सत्कार करून घेतले नाहीत. म्हणूनच साहित्य संमेलनातली त्यांची भाषणे ओंकारेश्वराला उगम पावणाऱ्या नर्मदेच्या शांत प्रवाहासारखी असतात. कृषी क्षेत्रातील त्यांचे चिंतन म्हणजे राजमहिंद्रीजवळ समुद्राच्या अंतरंगात जाणाऱ्या गोदावरीच्या विशाल पात्रासारखे असते. लोकसभा व राज्यसभेतील त्यांची भाषणे हरिद्वारच्या गंगाघाटासारखी असतात, तर प्रासंगिक भाषणांना हिमालयाची जरतारी किनार असते. जेव्हा ते स्वतःबद्दल बोलतात, लिहितात किंवा स्वानुभव सांगतात तेव्हा ते शरदाचे चांदणे 'शरद' होऊन अनुभवतात. मग तो काटेवाडीच्या मातीत खेळणारा बाल शरद असेल किंवा आपले राजकीय गुरू मा. यशवंतराव चव्हाणांबरोबर संवाद करणारा शरद असेल आणि प्रख्यात विद्वान व प्रकांड पंडीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींसमोर अर्जुनासारखा लक्ष्य ठेवणारा शरद असेल. ही त्यांची विविध भावरूपे मनाला प्रसन्न करतात. यातून त्यांनी जोडलेले असंख्य मित्र आणि त्यांचाशी मारलेल्या मनमोकळ्या गप्पा पाहिल्या, ऐकल्या, आठवल्या की व्यक्तित्वाची गोलाई त्यातून कळते.

ग. दि. माडगूळकरांसारख्या गीतकार कवी मित्राचे सभागृह बांधून अप्रतिम स्मारक ते बारामतीत उभारतात तर यशवंतराव चव्हाणांची आठवण जनतेला कायम राहावी म्हणून त्यांच्या नावाने नुसते प्रतिष्ठान काढून नाही तर जयंती-पुण्यतिथीला नामवंत व्यक्तींना राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार देवून गौरवितात. चव्हाण साहेबांचा कऱ्हाडचा 'विरंगुळा' बंगला म्युझियम म्हणून तर देवराष्ट्रचे घर स्मारक म्हणून विकसीत करतात हा केवढा मोठा ठेवा मार्गदर्शक म्हणून त्यांनी राष्ट्रासाठी निर्माण करून ठेवला आहे. शिक्षणासाठी कित्येक मुली दत्तक घेऊन कोट्यावधी रूपयांच्या देणग्या कितीतरी शिक्षण संस्थांना देवून पवार साहेबांनी मातृऋण फेडण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या आई शारदाबाई यांनी दिलेला चिरंजीव कर्तृत्वाचा वारसा आणि वडील गोविंदराव यांनी विणलेला कष्टाचा सोनेरी गोफ या दोघांनी मिळून आपल्या आयुष्याला जी ठोस दिशा दिली त्याची पुरेपूर जाणीव शरदरावांना आहे. त्यामुळेच गोरगरीब व संकटग्रस्तांच्या मदतीसाठी त्यांचा हात कायम पुढे असतो. इतरांना भरभरून मदत करताना त्यांचा हात कचरत नाही हे समाजाचे केवढे मोठे भाग्य आहे! त्यांचे एक मोठे वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे सुखदुःखाच्या चढउतारात शरदरावांची वृत्ती कायम संयत राहिली आहे. त्यांनी सारे काही सोसले आणि सारे काही पचविले. पण त्याबद्दल कधी बभ्रा केला नाही आणि त्याचे भांडवलही केले नाही.

कामात ते सतत एकाग्र झालेले असतात. सतत लागोपाठ माणसे भेटतच असतात. प्रत्येक मिनिटाचे नियोजन असते. क्षणार्धात विषय समजत असल्यामुळे कोणाला किती बोलू द्यायचे, किती वेळ बसू द्यायचे आणि बेलवर केव्हा हात ठेवून पुढचा माणूस आत घ्यायचा याचे अचूक गणित त्यांना साधलेले आहे. हा ही विषयातील एकाग्रतेशी संबंधित असलेला भाग आहे. त्यांना लाभलेली एकाग्रतेची देणगी ही महत्त्वाची शक्ती आहे. अनेक विषयांची व्यवधाने डोक्यात ठाण मांडून बसलेली असताना माणूस एकाग्र कसा होऊ शकतो हे अनेकांना पडलेले कोडे आहे. एकाग्र होणे ही ही सुंदर कला आहे. ती सगळ्यांनाच लाभत नाही. माणसामाणसातील भेद एकाग्रतेतून ओळखता येतो. माणसामाणसाची तुलना करून गुणवत्ता सहज ठरविता येते. माणसांची निवड हे काम तर साहेबांना रोजच करावे लागते. एकाग्रतेत मन आपले नियंत्रण करीत असते. शास्त्रीय संगीत ऐकायला एकाग्रता अधिक लागते. पवार साहेब, भीमसेन जोशी, किशोरी अमोणकर, कुमार गंधर्व किंवा मालिनीबाई राजूरकर व इतरांचे मधुर स्वर ऐकताना मन जे स्थिर करतात आणि त्या स्वरांमध्ये रंगून तल्लीन होतात त्यामुळे दिवसभराचा थकवा निघून जातो आणि पुन्हा सकाळी सात वाजताच घराचा दरवाजा भेटणाऱ्यांसाठी खुला झालेला असतो. पन्नास वर्षांहून अधिक काळ हा उपक्रम चालू आहे. मला मात्र एक प्रश्न कायम सतावतो तो म्हणजे एका विषयात एकाग्र झाल्यानंतर लगेच त्यातून बाहेर येऊन ते दुसऱ्या विषयात कसे एकाग्र होऊ शकतात? एकाग्रता आपल्या काबूत येऊ शकते काय? ते ती कशी आणतात? मन एकाग्र केल्यानंतर इच्छेनुसार ते काढून घेता आले पाहिजे.

ही अवस्था तापदायक आणि म्हणावी तितकी सोपी नाही. मानवी मूळ दुःखाचे कारण हेच आहे. एखादा विषय आवडला की, माणूस त्याच्या कच्छपी लागतो. त्यातून त्याला सोडवणे जिकीरीचे असते. म्हणून जितके एकाग्र होता आले पाहिजे तितकेच त्यापासून मुक्त होता आले पाहिजे. एखाद्या विषयात मन रमल्यावर दुसऱ्या क्षणात, त्या विषयापासून मन अलग करता आले पाहिजे. हा साहेबांचा गुण हेवा वाटावा अशा प्रकारचा आहे. अभ्यासने या दोन्हीही शक्ती त्यांना साधल्या आहेत. मनाची एकाग्रता हे शिक्षणाचे मुख्य सार आहे. केवळ माहिती गोळा करणे म्हणजे शिक्षण नव्हे. माहितीचे अभ्यासयुक्त व्यवस्थापन करून मानसिक एकाग्रता साधून स्वतंत्र चिंतनशीलतेची चांगली सवय जी साहेबांना जडली आहे त्यामुळे त्यांच्या बोलण्यात, भाषणात, वागण्यात नित्य नवा विचार दिसतो. तो ऐकावा, पहावा, भेटावा असे सतत वाटत राहते. मनाला कुठे अडवावे आणि कुठे सैल सोडावे याचे प्रत्यंतर साहेबांच्या भेटीतून येते. काय करायला पाहिजे आणि काय करायला नको याचे वळण लागते. म्हणून त्यांना पुन्हा पुन्हा भेटावे आणि सतत बोलत राहावे असे वाटते. त्यांच्या भेटण्याने, सहवासाने जगण्याचे किनारे तेजाची लेणी होतात. कर्तृत्त्वाचे सूर्य मनाच्या आकाशात स्वच्छपणे तळपतात. जाणिवांचे चंद्र प्रेमाच्या शीतल छाया देतात. चांदण्यांशी हळूवार हितगुज होते. वेळेला ऋतु फुटतात. रात्रीच्या चिंतनातून उद्याची अर्थगर्भ उषा हात जोडून स्वागताला उभी राहते. अभ्यासाच्या वाटा हसत खेळत आपल्यापाशी येतात. चांगल्या नियमांची मैत्री होते. माणूस खोलवर वाचता येतो. समुद्राच्या खोलीचा वेध लागतो. अथांग वृत्तीशी सलगी होते. ध्यानाची अरण्ये अभ्यासाला उर्जा देतात. नियम आपले स्नेही होतात. मन विवेकी आणि घट्ट होते. क्षुद्रता लोपते. उथळता संपते. पवार साहेबांशी खऱ्या अर्थाने व मनापासून एकरूप झालेल्या आणि त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला यातला काही ना काही अनुभव निश्चित मिळाला असेल!



८२ वर्षाच्या प्रवासामध्ये ते नेहमी अविचल राहिले आहेत. मात्र त्यांच्या मनाचा थांग पत्ता कधीही लागला नाही आणि आजही लागत नाही. जे मन सतत तेजाळलेले असते त्याचा तळ गाठता येत नाही. कारण अशा तेजाने केवळ डोळे दिपत नाहीत. आपण आत उतरलो की जगण्याची कातही टाकतो. त्यांचा प्रत्येक दिवस नवा असतो. भरती येणे आणि ओहोटी येणे हे अशा मनांच्या आकाशात सतत चालू असते. यामुळे आपण नक्की काय करायचे हे अशांना चांगले कळते. शरदरावांच्या जगण्याचा अर्थ कुणी काहीही काढो, परंतु एक गोष्ट नक्की नमूद करायला पाहिजे. वर्तमानातल्या प्रत्येक नव्या क्षणाला आणि नव्या अवकाशाला शरदराव जे सामोरे गेले त्यातच त्यांचे 'शरदपण' आहे. पवारांच्या समृद्ध भावमनाचा थोडाफार तळ दिसावा म्हणून मागील १५ वर्षांपासून त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आम्ही जाणीवपूर्वक संपादकीय त्यांच्यासंबंधी लिहितो. तसे पवार कुणालाही गवसलेले नाहीत. आम्हालाही ते पूर्ण समजलेत असा आमचा दावा नाही. कारण अथांग मनाच्या तळाशी ते नेहमी एकटे रमतात. ते पुढे काय करतील याचा कुणालाही थांगपत्ता नसतो. जितके त्यांच्याबद्दल अंदाज बांधावेत तितके ते कोसळतात कारण काय करावे हे त्यांना जितके माहित आहे त्यापेक्षा काय करू नये, याची त्यांना जास्त जाण आहे. हा जो जीवनाचा खेळ आहे ते तो नेहमीच मनापासून खेळतात. तुमची इच्छा असो वा नसो, तुम्हाला तो खेळ खेळावाच लागतो. हे जर त्रिवार सत्य असेल तर आपण तो खेळ मनापासून का खेळू नये? असा विचार प्रत्येकालाच करावा लागतो. निदान राजकारणातल्या माणसांसाठी तरी तो अपरिहार्य होऊन बसतो. पवारांच्या व्यक्तिमत्वातले खरे मर्म हे आहे असे वाटते. वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांना उत्तम दीर्घारोग्य लाभो अशी ईश्वराकडे प्रार्थनाही करतो. सर्वांना नमस्कार !

# पंतप्रधानांकडे सर्वसमावेशक विकासाची दृष्टी व व्यापकता नाही

## शरद पवार यांचे विचार

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिबिरास उपस्थित असणारे प्रदेशाध्यक्ष श्री. जयंतराव पाटील, विधीमंडळाचे विरोधी पक्ष नेते अजित पवार, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, दिलीपराव वळसे पाटील, एकनाथराव खडसे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने उपस्थित असणाऱ्या माझ्या कार्यकर्त्यांनो ! ह्या मंथनमेळाव्यात मी आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो.

माझ्या सहकाऱ्यांनो, शिर्डी या आध्यात्मिक तीर्थक्षेत्राचे आंतरराष्ट्रीय महत्व आपण सारे जाणता त्यामुळे मी त्या विषयी अधिक खोलात जात नाही. जगाच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक आपल्या अंत:करणातील सद्भावना व्यक्त करण्यासाठी दररोज या क्षेत्री येत असतात.

सुमारे ६०-७० वर्षांपूर्वीचे शिर्डी मला प्रकर्षाने आठवते. त्यावेळी ते एक लहानसे श्रद्धास्थान होते व मर्यादित संख्येने भाविक साईंच्या दर्शनासाठी येत. मी



# सध्याचे राज्यकर्ते संकुचित विचारांचे

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मंथन वेध भविष्याचा हे शिबीर, दि. ५ नोव्हेंबर,२०२२ रोजी शिर्डी येथे संपन्न झाले. या शिबिरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केलेले हे मार्गदर्शन. प्रकृती बरी नसतानाही दोन्ही हातांना पट्ट्या बांधून श्री. पवार हे शिबिराला उपस्थित राहिले. सुरुवातीला त्यांनी कार्यकर्त्यांशी स्वत: संवाद साधला. मात्र लिहून आणलेले भाषण दिलीप वळसे पाटील यांना वाचून दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री. वळसे पाटील यांनी वाचलेले हे भाषण...



वयाच्या १२ व्या वर्षी एक वर्षाकरीता माध्यमिक शिक्षणासाठी माझे वडिलबंधू आप्पासाहेब पवार यांच्या समवेत महात्मा गांधी विद्यालय , प्रवरानगर येथे आलो होतो. प्रवरानगर येथे विद्यार्थी दशेत असताना राज्यात गोवा मुक्ती आंदोलनाचे वारे वाहत होते. १९५४ मध्ये थोर स्वातंत्र्यसैनिक हिरवे गुरूजींनी महाराष्ट्र –गोवा सीमेवर पोर्तुगिजांविरूद्ध सत्याग्रह केला. शिरोडा–रेडी बंदर भागातून त्यांनी गोव्याच्या हद्दीत प्रवेश केल्यावर पोर्तुगिज पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला. वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी गोवा मुक्ती आंदोलनासाठी हिरवे गुरूजींनी प्राणाचे बलिदान दिले. याचे तीव्र पडसाद देशभर उमटले. माझ्या मनावर देखील याचा खोल परिणाम झाला. मी शाळेतील विद्यार्थी एक केले आणि प्रवरानगर शाळा बंद केली आणि गोवा मुक्ती आंदोलनास पाठिंबा व पोर्तुगिजांचा निषेध म्हणून रस्त्यावर उतरून मोर्चा काढला. यात ह्या भागातील खर्डे,

महात्मा गांधी वगळता पंडित जवाहरलाल नेहरू , सरदार वल्लभभाई पटेल , मौलान अबुल कलाम आझाद यांच्यासारखे अनेक ज्येष्ठ नेते अहमदनगर मधील भुईकोट किल्ल्यात बंदिवासात टाकले होते. पंडितजींनी ह्याच किल्ल्यात ‘डिस्कव्हरी ऑफ इंडिया’ हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. स्वातंत्र्य चळवळीत नगर जिल्ह्यातील नेत्यांचे देखील बहूमोल योगदान होते. देशभक्त अच्यूतराव पटवर्धन, त्यांचे बंधू रावसाहेब पटवर्धन यांनी महात्मा गांधीजींच्या हाकेला प्रतिसाद देऊन स्वातंत्र्यलढ्यात उडी घेऊन नवी चेतना निर्माण केली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अहमदनगर मधील वास्तव्य देखील पटवर्धनांच्या शेतमळ्यावर असे. साहजिकच जिल्ह्यात काँग्रेस–समाजवादी नेत्यांच्या विचारांचा प्रभाव राहिला. परंतु स्वातंत्र्यानंतर अहमदनगर जिल्ह्यात मात्र डाव्या विचारसरणीच्या लोकांचा दबदबा निर्माण झाला. कॉ.दत्ता



विखे, निर्मळ, कडू असे अनेक सहकारी विद्यार्थी सहभागी झाले होते. अशा रितीने प्रवरानगर परिसरातील हा संबंध कालखंड माझ्या व्यक्तीगत जीवनात दिशादर्शक ठरला. माझ्या जीवनातील हा पहिला मोर्चा माझ्या सार्वजनिक कार्याची खरी सुरूवात होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अहमदनगर जिल्ह्याला दैदिप्यमान ऐतिहासिक वारसा लाभला आहे. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानात लाखोंच्या संख्येने जनसमुदाय जमला आणि महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारला ‘चले जाव’ चा इशारा देऊन अखेरच्या मोठ्या स्वातंत्र्यलढ्याचे रणशिंग फुंकले. ब्रिटीश सरकारने मोठी धरपकड सुरू केली. महात्मा गांधीना पुण्याजवळील आगाखान पॅलेस येथे कारावासात टाकण्यात आले.

देशमुख, आण्णासाहेब शिंदे, रावसाहेब शिंदे , कॉ.पी.बी.कडू पाटील, पी.के. भापकर, हिराबाई भापकर, भाऊसाहेब थोरात, भाई सथ्था अशी अनेक मात्तब्बर मंडळी सर्वसामान्य शेतकरी वर्ग, शेतमजूर, कामगार यांचे प्रश्नांसाठी संघर्षाची भूमिका घेत होते. दक्षिण नगर भागात अखंड दुष्काळ असल्याने डाव्या विचारसरणीला पोषक वातावरण होते.

मात्र अशा राजकीय परिस्थितीत उत्तर नगर भागात साखर कारखानदारी उभी राहिली. १९३०–४० च्या दशकात अहमदनगर जिल्ह्यातील हरेगाव येथे युरोपियन तंत्रज्ञांच्या सहकार्याने पहिला खाजगी कारखाना उभा राहिला. परंतु मुठभर धनिकांच्या हातात इथली खाजगी साखर कारखानदारी होती. त्यापैकी करमसी शेठ सोमय्या यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. परंतु अहमदनगर जिल्ह्यातूनच साखर

उद्योगाला सहकाराचा नवा मार्ग दाखवण्याचे काम झाले. नगरच्या ह्या भागात सहकाराचे रोपटे पन्नासच्या दशकात लावले गेले. थोर अर्थतज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली प्रवरानगर लोणी येथे सहकारी तत्वावर देशातील पहिला साखर कारखाना सुरू झाला. डॉ. धनंजयराव गाडगीळ कारखान्याचे पहिले चेअरमन होते. त्यांनी हाती घेतलेल्या प्रकल्पाला पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, आण्णसाहेब शिंदे अशा स्थानिक मान्यवरांचे मोठे सहकार्य होते. ह्या शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन कारखाना उभारणीसाठी भागभांडवल गोळा केले. यशवंतराव चव्हाण त्यावेळी महाराष्ट्राचे नेतृत्व करीत होते. त्यांनी ह्या प्रकल्पाला बळ आणि पाठिंबा दिला. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या प्रोत्साहनामुळे संपुर्ण राज्यभर सहकारी कारखानदारीचे जाळे वेगाने पसरू लागले.



प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचे स्वागत करताना शेजारी छगन भुजबळ, प्रफुल पटेल, नरहरी झिरवळ, दिलीप वळसे पाटील, सुनील तटकरे, रामराजे निंबाळकर व फौजिया खान.

याचा परिणाम असा झाला कि नगर जिल्ह्यातील डाव्या विचारसरणीची नेते मंडळी देखील सहकाराच्या प्रवाहात सामील झाली. यशवंतरावांचा विचार पुढे नेण्यासाठी डॉ. आर.जी.काकडे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, बाबूराव तनपुरे, भाऊसाहेब थोरात हे दूरदृष्टीचे नेते आपापल्या भागात सहकाराच्या मार्गावर काम करू लागले. एकंदरीत नगर जिल्ह्यात सहकारामुळे वैचारिक परिवर्तन सुरू झाल्याचे चित्र दिसत होते. आज सहकाराचा विचार कितीतरी प्रमाणात वाढला आहे. नवीन आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून साखर निर्मिती बरोबरच वीजनिर्मिती, इथेनॉल निर्मिती, इतर प्रक्रीया उद्योग वाढीस लागले आहेत. सहकारी तत्वाचा आधार घेऊन साखर उद्योगाशिवाय दूध, कापूस अन्य क्षेत्रात राज्यभर प्रकल्प उभारले गेले आहेत. सहकाराच्या माध्यमातून विधायक दृष्टी असलेल्या कार्यकर्त्यांचे मोहोळ गावोगावी तयार झाले आहे. याचे श्रेय ह्या मंडळींना द्यावे लागेल.

यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलू लागला होता. परंतु १९६२ मध्ये देशासमोर अचानक चीनी आक्रमणाचे संकट उभे राहिले. यशवंतरावांना अस्वस्थ देशात आत्मविश्वास जागा करण्यासाठी दिल्लीला जावे लागले. महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीसाठी धावला. विशेष म्हणजे चीनने काही दिवसांत एकतर्फी युद्धविराम जाहिर केला. परंतु चीनी आक्रमणामुळे नेहरूजींच्या नेतृत्वावर आघात सुरू झाले. साहजिकच त्यांच्या मनावर देखील आघात झाला होता. त्यातून नेहरूजी सावरले नाहीत. दोनच वर्षात त्यांचा मृत्यू झाला. मात्र लालबहादूर शास्त्री आणि यशवंतराव यांनी पुन्हा देश सावरण्यास सुरूवात केली. रशियन राज्यकर्त्यांशी सुसंवाद साधण्यासाठी शास्त्रीजी आणि यशवंतराव ताश्कंद येथे गेले. तेथे यशस्वी द्विराष्ट्रीय करार केला परंतू शास्त्रीजींचा ताश्कंद येथेच आकस्मिक मृत्यू झाला.

शास्त्रीजींनंतर देशाला इंदिरा गांधीजींचे नेतृत्व लाभले. एक शक्तीशाली , देशाची प्रतिमा मजबूत करणारे करारी नेतृत्व म्हणून त्या जनमाणसासमोर आल्या. प्रत्येक क्षेत्रातील त्यांचे योगदान आपणास माहित आहेच. १९८४ मध्ये पंजाब समस्या हाताळताना त्यांनी घेतलेल्या भुमिकेमुळे त्यांची दुर्दैवी हत्या झाली. इंदिराजींनंतर राजीव गांधीवर देशातील जनतेने विश्वास दाखवला. राजीव गांधींच्या रूपाने आधुनिक विज्ञानाचा विचार घेऊन पुढे जाणारा युवा नेता देशाला मिळाला. परंतू त्यांची देखील श्रीलंकेतील तमीळप्रश्नावरून हत्या झाली. काही कालखंडानंतर पी.व्ही.नरसिंहराव यांच्या काळात देशात राजकीय स्थिरता आली. त्यावेळी माझ्याकडे देशाच्या संरक्षण

खात्याची जबाबदारी होती. याच सुमारास देशात अयोध्येच्या प्रश्नावरून सांप्रदायिक विचाराला खतपाणी घालून सामाजिक ऐक्यावर आघात करण्याचे काम काही शक्तींकडून होऊ लागले. बाबरी मशिद पाडली गेल्यानंतर देशातील सांप्रदायिक वातावरण अधिक गढूळ झाले. भारतीय जनता पक्षाची वाढ ह्याच विचारधारेच्या सोबत होत गेली.

१९९८मध्ये देशाची सत्ता भाजपाकडे आली. प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयींनी एक सुसंस्कृत नेता असा आपला लौकिक कायम ठेवला. त्यांनी प्रशासकिय निर्णय घटनेची विशिष्ट चौकट ओलांडून घेतले नाहीत. देशात राजकीय स्थिरता पुन्हा एकदा डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने दिली. २००४ ते १०१४ या कालखंडात त्यांनी भारताची आर्थिक घडी व्यवस्थित आणि मजबूत केली. माझ्याकडे या दरम्यान देशाच्या कृषिमंत्रीपदाची जबाबदारी होती. देशातील करोडो शेतकरी बांधव यांचे कष्ट, कृषि क्षेत्रातील शास्त्रज्ञ -संशोधक, कृषि विद्यापीठे, संशोधन संस्था यांच्या बहूमोल योगदानामुळे अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होऊन आपला देश केवळ स्वयंपुर्णच झाला नाही तर तो आघाडीचा निर्यातदार देश झाला. याच दरम्यान देशातील सहा ते सात राज्यांमध्ये भाजपाचा शिरकाव झाला होता. २०१४ मध्ये नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली मात्र भाजपाने केंद्रातील सत्ता हस्तगत केली. भाजपा सरकारच्या काळात देशात काय होतेय याची आपणाला कल्पना आहे.

संसदीय लोकशाहीमध्ये केंद्रात एक सत्ता आणि राज्यात दूसरी सत्ता असू शकते. केंद्र व राज्यातील नेतृत्वामधील धोरणांत अंतर असू शकते. केंद्रातील सत्तेने त्याचा मान राखावयाला हवा. आज अनेक राज्यांमध्ये केंद्रातील सत्तेच्या विचारांशी सहमती नसलेले सरकार आहे. केरळ, तामीळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा, ओडिशा, पश्चिम बंगाल, दिल्ली , पंजाब, बिहार, झारखंड, छत्तीसगड या राज्यांमध्ये भाजपाची सत्ता नाही. अगदी कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गोवा ह्या राज्यातील जनतेने देखील भाजपाला दूर ठेवले होते. परंतू केंद्रातील सत्ताधिशांनी केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करून, अवैधानिकरित्या विधीमंडळ सदस्य फोडून ह्या राज्यांमधील सत्ता हस्तगत केली. एकंदरीत गुजरात, उत्तर प्रदेश, आसाम, हरियाणा व ईशान्येकडील काही राज्ये वगळता देशातील जनतेने भाजपाला नाकारले आहे.

सामान्य माणसांना ई.डी., सि.बी.आय, आयकर विभाग, केंद्रीय निवडणूक आयोग, एन.आय.ए. , एन.सी.बी. वगैरे यंत्रणांची फारशी माहिती नव्हती. परंतू ह्या यंत्रणांच्या गैरवापरामुळे देशात सर्वत्र चर्चा सुरू आहे. देशाचे नेतृत्व चालवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे अशा घटकांनी सत्तेचा हव्यास सोडून देशाचा विचार करणे आवश्यक आहे. परंतू तसे न होता अनेक राज्यांच्या नेतृत्वांवर अनैतिक हल्ला केला जातो. राज्यातील सत्ता कायम राखणे व नवीन सत्तास्थान बळकावणे हाच काय त्यांचा अजेंडा ठरलेला आहे. जनतेचे मुलभूत प्रश्न घेऊन समाजातील सर्व घटकांशी सामंजस्य राखून सामूहिक विकास साधण्याचा प्रयत्न केंद्रातील सरकारकडून होत नाही.

प्रधानमंत्री पदाची शपथ घेताना भारतीय संविधानाशी खरी श्रद्धा व निष्ठा राखण्याची, आपल्या कर्तव्याचे पालन श्रद्धपूर्वक व शुद्ध अंत:करणाने करण्याची व कोणताही भय-पक्षपात, राग-अनुराग न बाळगता सर्व प्रकारच्या लोकांसाठी घटनेच्या व कायद्याच्या चौकटीत राहून कार्य करण्याची शपथ घेतली जाते.थोडक्यात प्रधानमंत्र्याने समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन सौख्य, शांती आणि प्रगतीच्या मार्गावर राष्ट्राला न्यायला हवे. प्रधानमंत्री पदावरील व्यक्तीकडे अशी सर्वसमावेशक विकासाची दृष्टी आणि विचारांची व्यापकता



असावयास हवी. परंतू दुर्दैवाने सध्या तसे दिसत नाही. एका राज्यातील प्रकल्प दुसऱ्या राज्याकडे घालवण्यात येत आहेत. वेदांता-फॉक्सकॉन नंतर टाटा-एअरबस सारखा भव्य प्रकल्प राज्यातून गुजरातकडे वळवण्यात आला. राज्यातील सध्याच्या सरकारच्या डोळयांदेखत हे प्रकल्प गेले ही लाजिरवाणी गोष्ट आहे. टाटा-एअरबसचा हवाई प्रकल्प हलवण्यापेक्षा केंद्रातील सरकारने देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाचे प्रकल्प कार्यक्षम कसे करता येईल याकडे लक्ष द्यायला हवे होते. चीन विरूद्ध युद्धात पराभव झाल्यानंतर देशातचे वायूदल शक्तीशाली करण्यासाठी रशियन तंत्रज्ञानाची मदत घेऊन मिग लढाऊ विमाने निर्मिती प्रकल्पासाठी भारतात तीन ठिकाणांचा विचार झाला. बंगलोर, नाशिक आणि लखनौ अशा तीन ठिकाणे हे प्रकल्प उभारण्यात आले. तत्कालिन नेतृत्वाने असा व्यापक विचार त्यावेळी केला होता. आज ह्या प्रकल्पांची अवस्था बिकट आहे. मिग विमाने तयार करण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळ उपलब्ध असताना ह्या प्रकल्पांकडे ऑर्डर्स नाहीत, नवीन काम नाही. प्रधानमंत्र्यांनी ह्या तिनही प्रकल्पांना उर्जितावस्था आणण्यासाठी कष्ट घेतले असते तर त्याचे मी स्वागत केले असते. सर्व मुलभूत सुविधा असताना प्रकल्पांच्या उपयुक्ततेचा विचार प्रधानमंत्री करत नसतील तर याची चर्चा देशात व्हावी लागेल.

प्रधानमंत्र्यांनी आपले अधिक लक्ष कमजोर होत चाललेल्या अर्थव्यवस्थेकडे आणि महागाईसारख्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकडे द्यायला हवे. सुदैवाने ह्या वर्षी देशात चांगला पाऊस पडला आहे. शेतकऱ्यांच्या घामातून आणि निसर्गाच्या कृपेने पीकांचे भरघोस उत्पादन झाले आहे. अन्नधान्याच्या बाबतीत देश केवळ स्वयंपुर्ण न राहता जगाच्या पाठीवरील अनेक देशातील भुकेची गरज भागवणारा देश ओळखला जाऊ लागला आहे. शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा विस्तार होऊन पुण्याजवळील हिंजवडी, नाशिक वगैरे भागात तरूण पिढीसाठी रोजगाराची नवी दालने उघडली गेली आहेत. राज्यातील आणि देशातील नेतृत्वाने यापासून बोध घ्यायला हवा की विकास घडवायचा असेल तर मर्यादीत विचार करायचा नसतो. देशातील महिला, कष्टकरी, शेतकरी, कामगार, आदिवासी, मागासवर्गीय अशा सगळ्या घटकांमध्ये देशाला समृद्ध करण्याची धमक आहे. मात्र त्यांना प्रोत्साहित करणारे सत्ता, धर्म, जात, पक्ष यांच्या पलिकडे जाऊन विचार करणारे नेतृत्व हवे. अशी विशालदृष्टी देशातील आणि राज्यातील नेतृत्वांमध्ये नाही.

महाराष्ट्रापूरता विचार करावयाचा झाल्यास सध्याचे राज्यकर्ते कुठे आहेत आणि काय करतायेत असा प्रश्न पडतो. सध्याच्या राज्यकर्त्यांच्या अनेक प्रसंगी व अनेक गोष्टींवर होणाऱ्या प्रतिक्रिया पाहिल्या तर त्यांचा विचार संकुचित स्वरूपाचा आहे हे प्रकर्षाने दिसून येते. हे चित्र समाधानकारक नाही. सध्या राज्यात अतीवृष्टी, ओला दुष्काळ,पीकाची नासाडी यांनी शेतकरी व जनता हवालदिल झाली आहे. दैनंदिन वृत्तपत्रांतून आणि माध्यमातून सातत्याने त्यांचे प्रश्न मांडले जात आहेत. पण त्या प्रश्नांकडे सध्याचे राज्यकर्ते लक्ष देत नाहीत. महाराष्ट्र राज्य हे देशाला दिशा देणारे राज्य आहे. महाराष्ट्र एक विचार , एक संस्कृती आहे. परंतू संकुचित विचारांचे राज्यकर्ते सत्तेवर आल्यावर राज्य अधोगतीला जाऊ शकते. परंतू काही झाले तरी तसे होऊ द्यायचे नाही हे आपणासमोर आव्हान आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आणि आंबेडकर विचारांचा वारसा घेऊन समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी कटीबद्ध असणारा पक्ष आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील लहानसहान कार्यकर्ते एकसंध झाल्यानंतर देशातील सांप्रदायिक विद्वेशाचे चित्र बदलू शकते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून पुरोगामी विचाराची पेरणी करून नवीन युवा पिढी तयार करणे व त्यातून एक मजबूत व विधायक नेतृत्वाचा संच तयार करणे ही राष्ट्रवादी पक्षातील सहकाऱ्यांची जबाबदारी आहे. उद्या येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संस्थांच्या निवडणूका आणि दोन वर्षांनी येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूका यात यश मिळवून राष्ट्रवादी काँग्रेस चित्र बदलू शकते. आपली एक संघटीत शक्ती उभी राहिली आणि विचारांची लढाई लढण्यासाठी सर्वस्व झोकून द्यायची तयारी ठेवली तर काहीही अशक्य नाही. कोणत्याही भिती-प्रलोभनांना बळी पडून पुरोगामी विचारांची कास सोडू नका. भारतीय संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी आपणाला सांप्रदायिक शक्तींना पराभूत करावेच लागेल. तरच समाजामध्ये सहिष्णूता, समता आणि बंधूता राहिल आणि देशात सर्वांगिण व सामुहिक प्रगती साधली जाईल. चला तर आपण कंबर कसून कामाला लागू या ! माझे सहकार्य आणि सदिच्छा आपल्या पाठिशी आहेतच.

शिर्डी येथे हे भव्य शिबीर आयोजित केल्याबद्दल सर्वश्री प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, अजितदादा पवार, छगन भुजबळ आदी नेते , पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे मी मनापासून कौतुक करतो. ह्या विचारमंथनात सहभागी झालेला प्रत्येकजण परत जाताना नवी उर्जा घेऊन जाईल आणि परिवर्तनाच्या कार्यात झोकून देईल याचा मला विश्वास आहे. शिबीराच्या यशस्वीतेसाठी कष्ट घेणाऱ्या प्रत्येकाचे मन:पूर्वक धन्यवाद. जयहिंद !

■■



# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष खंबीरपणाने महाराष्ट्रात उभा करूया

**प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील**

महाविकास आघाडीच्या माध्यमातून मागील अडीच वर्षाच्या काळात सत्तेत असताना आपण अनेक प्रश्न मार्गी लावले. अनेक कामे केली. ही कामे महाराष्ट्राच्या जनतेपर्यंत जाऊन सांगणं, आमचं सरकार असताना आमच्यामुळं जनतेला काय काय उपलब्धी झाली हे सांगणं हे राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने व्रत घेतलं पाहिजे ही माझी पहिल्यांदा आपल्या सगळ्यांना विनंती आहे.

आजच्या सरकारमध्ये मित्रांनो फारसं काही आलबेल नाही. अस्वस्थता आहे. १०५ आमदारांच्या मनात अस्वस्थता आहे, की आपल्याला या सरकारचा पूर्ण ताबा मिळालेला नाही आणि ४० जणांसाठी हे सरकार राबतंय ही भावना विधीमंडळातल्या अनेकांची आहे. आपलं सरकार गेलंय. त्यामुळे आता आपला पक्ष अधिक खंबीरपणानं महाराष्ट्रात उभा करण्याची आवश्यकता आहे. मी खात्रीपूर्वक सांगतो, की महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात कुठेही जावा, महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आदरणीय पवार साहेबांना आणि राष्ट्रवादीला विशेष स्थान आहे हे आपल्या सर्वांना माहित आहे. प्रत्येक गावात पवार साहेब आणि राष्ट्रवादीच्या पुढील भूमिकेची चर्चा होताना दिसते. समोरच्या पक्षातले सांगतात, की आई-वडिलांना शिव्या द्या, पण मोदी-शहांना शिव्या देऊ नका. ही भूमिका असणाऱ्यांच्या विरोधात आमची लढाई आहे.

अवकाळी पावसानं प्रचंड नुकसान झालेलं आहे. ओल्या दुष्काळाची आम्हा सगळ्यांची मागणी आहे. मी आपल्या सर्वांच्यावतीनं एक ठराव मांडतो, की महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी अतिवृष्टी झाली, प्रचंड नुकसान झालं, त्या सर्व ठिकाणी महाराष्ट्र सरकारनी ओला दुष्काळ ताबडतोब जाहीर करावा ही मागणी आपण सरकारकडे या ठरावाच्या रूपाने करूया. महाराष्ट्रातले उद्योग गुजरातला जायला लागले. आज आमचं राज्य प्रगतशील आहे ही आपल्या सर्वांची भूमिका होती. महाराष्ट्राबरोबर शेजारचं कुठलंही राज्य स्पर्धा करत नव्हतं. करू शकत नाही. कारण इथली व्यवस्थाच तेवढी उत्तम आहे. तरीही दुसऱ्याला घाबरून दुसऱ्या राज्यात जाणारे उद्योग आपण थांबवू शकत नाही. त्यासाठी प्रयत्न करत नाही हे आज आपल्या सर्वांच्या लक्षात येतं. पश्चिम बंगालमध्ये पूल पडल्यानंतर पंतप्रधान म्हणाले होते, की हा सरकार बदलाचा एक ईश्वरीय संकेत आहे. आता तोच ईश्वरीय संकेत गुजरातमध्येही दिसायला काही हरकत नाही.

आज अंधेरीच्या पोटनिवडणुकीमध्ये माघार घेण्याची नामुष्की आली. आम्ही महाराष्ट्राच्या संस्कृतीप्रमाणं माघार घेत असल्याचं स्पष्टीकरण देण्यात आलं. मग पंढरपूर, कोल्हापूर, नांदेडमधील निवडणुकीत ही संस्कृती कुठे गेली होती. सोयीचं असेल तसं वाजवायचं आणि आपण बोललेलंच वास्तव आहे

हा आत्मविश्वास असलेल्या लोकांच्याबरोबर आमची लढाई आहे. नव्या सरकारचे नव्या नवलाईचे दिवस आहेत. आमची काही तक्रार नाही. पवार साहेब, आपणही अनेक वर्षे सत्ता राबवली. पण संपूर्ण भारतवर्षात कुठेही घडले नसेल असे, जिल्हाधिकाऱ्याला दारू पिता का असे विचारणारा मंत्री या मंत्रिमंडळात आहे. त्यामुळं आमचं राज्य सरकार कोणत्या पातळीवर गेलेलं आहे हे महाराष्ट्राला आज लक्षात यायला लागलं आहे. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसकडून लोकांच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. आज राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या आमदारांच्या मतदारसंघांतील सगळ्या कामांना स्थगिती आहे. अनेक कामं रद्द केली जात आहे. पण, पवार साहेब, महाराष्ट्राच्या विधानसभेत आणि बाहेरही आपल्या आमदारांनी अतिशय चांगली कामगिरी केली. समोरून होणारा अन्याय लक्षात यायला लागल्यामुळे आपले सरळमार्गी लोकही आक्रमक होऊ लागले आहेत. आपली तरूण पिढी राष्ट्रवादीचा हा रथ महाराष्ट्रात पुढे नेल्याशिवाय राहणार नाही.

पुण्याची लोकं तर लय भारी. पुण्यामध्ये आमचे चंद्रकांतदादा पाटील गेले. तर तिथल्या आयोजकांनीच राष्ट्रवादीचं गाणं लावलं. त्यामुळं लोकांच्या मनात पवार साहेब, राष्ट्रवादी किती आहे हे सांगण्याचा मी छोटासा प्रयत्न करतोय. आज आपणा सर्वांना माझी विनंती आहे, की आपण आपला पक्ष ताकदीनं उभा करूया. गेले दोन दिवस आपल्याला अनेक मान्यवरांनी जे मार्गदर्शन केलं, त्यातनं एकच संदेश आपण महाराष्ट्रभर घेऊन जायचं आहे, की पुढच्या काळात सगळ्यात सक्षम, ताकदीचा, ग्रामीण भागातल्या सर्वसामान्यांच्या, शहरातील नागरिकांच्या हिताचा विचार करणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच आहे, हा विश्वास आपण महाराष्ट्रातल्या जनतेच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करूया.

आपल्या पक्षाच्या २३ वर्षांच्या काळात आदरणीय पवार साहेबांच्या पुढाकाराने राज्यात चारवेळा सरकार स्थापन करण्यात यश मिळालं. त्या काळात छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अहिल्याबाई होळकर या महापुरूषांच्या विचाराने चालण्याचा आपण प्रयत्न केला हे अभिमानानं सांगता येईल. खरं म्हणजे आज तळागाळापर्यंत आपला पक्ष मजबूत झालेला आहे. पुढील काळात २४ महिन्यांच्या कालखंडात राजकीय जडणघडणीला आकार देण्यासाठी पुरेसा आहे असं मला वाटलं. एक प्रबळ संधी यानिमित्तानं आपल्या सर्वांच्या हातात आलेली आहे. सुदैवानं २०२४ला आपल्या पक्षाचं रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. २५वर्षे



**छत्रपती शिवराय व शाहू, फुले, आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करताना जयंत पाटील, छगन भुजबळ, प्रफुल पटेल, अजित पवार व श्रीनिवास पाटील**

पूर्ण होत असताना मिळालेल्या सुवर्णसंधीचं सोनं करण्यासाठी महाराष्ट्रातल्या आदरणीय पवार साहेबांवर विश्वास असणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपापले मतभेद, आपापले प्रश्न, समस्या थोड्याशा बाजूला ठेऊन पक्ष मजबुतीसाठी जर आपण ताकदीनं काम करायला लागलो तर मला विश्वास आहे, की महाराष्ट्रातला सगळ्यात मोठा पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस झाल्याशिवाय राहणार नाही.

इंडिया टुडेच्या एका सर्व्हेमध्ये ७३ टक्के लोकांनी बेरोजगारी फार गंभीर असल्याचं सांगितलं. ६७ टक्के लोकांनी सांगितलं, की आपली आर्थिक स्थिती २०१४पासून ढासळत आहे. महागाई वाढत असल्याचं अनेकांचं मत आहे. ५१ टक्के लोकांना असं वाटतं, की हे सरकार श्रीमंतांचं समर्थन करणारं आहे. गरीबी, बेरोजगारी आणि आरोग्यावर कोणतीही प्रभावी योजना या सरकारला राबवता आलेली नाही. महागाई प्रचंड वाढलेली आहे. गॅस सिलिंडरवरील सबसिडी दिली जात नाही हे आपल्याला लोकांना जाऊन सांगावं लागेल. या सगळ्या गोष्टी लोकांच्यापर्यंत जाऊन पोहोचवल्या पाहिजेत. कारण, भारतीय जनता पक्षाच्या कामाने महाराष्ट्रातल्या आणि भारतातल्या लोकांना आज निराशेनं व्यापलेलं आहे आणि म्हणून आपल्या सर्वांना अर्थव्यवस्था असो, बेरोजगारी असो, संस्कृतीची जपणूक असो, महिलांची

सुरक्षा असो, राष्ट्रीय सुरक्षा असो सध्याच्या सरकारने या सगळ्या विषयांचा फज्जा उडवलेला आहे.

२०२४चं संभावित चित्र कसं असेल. आपण थोडं बारकाईनं बघा. उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या तीन राज्यांत भारतीय जनता पक्ष ५१ जागांच्या पुढं जाणार नाही असं तज्ज्ञांचं मत आहे. ओडिशा, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, केरळ या पट्ट्यात जवळपास शून्य जागा आहेत. त्यामुळं या पक्षाचं अस्तित्त्व ज्या ठिकाणी आहे, तिथंच परिस्थिती वेगळी होण्याची शक्यता आहे. त्यामुळं भारतीय जनता पक्ष लोकसभेत आता शंभर टक्के निवडूनच जाणार आहे ही जी मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न काही लोकं करतायंत, त्याला ही आकडेवारी छेद देणारी आहे.

महाराष्ट्रातल्या अलिकडच्या घडमोडी बघितल्या, आपलं सरकार गेल्यावर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या. नगरपंचायतीच्या निवडणुका झाल्या. त्यामध्ये आपल्या पक्षाने एक नंबरने जागा जिंकल्या. महाविकास आघाडीला भाजपपेक्षा चांगले यश मिळाले. आज सगळीकडे खोक्यांची चर्चा आहे. दोन आमदार एकमेकांत भांडतात. ५० खोके हा शब्द शेंबड्या पोरांनासुद्धा माहित झालेला आहे. ४ लाख बेरोजगारांना नोकऱ्या देणारा फॉक्सकॉनसारखा प्रकल्प राज्याच्या बाहेर गेला. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे पवार साहेब, भविष्यात राष्ट्रवादी काँग्रेस आपण भक्कमपणानं उभी करू शकतो. अडीच वर्षात महाराष्ट्रात दुजाभाव करण्याचं काम झालं. विधानपरिषदेच्या बारा जागांचा प्रश्न राज्यपालांनी सोडवला नाही. अडीच वर्षात केंद्रानीसुद्धा आमच्याशी दुजाभाव केला. तरीदेखील आम्ही महाराष्ट्रातल्या जनतेला कर्जमाफीसारखी योजनादेखील लागू केली. अजितदादांच्या माध्यमातून ५० हजारापर्यंत अनुदान देण्याची घोषणा करण्याचा निर्णयदेखील आमच्या सरकारने घेतलेला होता.

राज्यातील लोकसभेच्या जागांमध्ये आमची परिस्थिती बऱ्यापैकी चांगली आहे. अनेक ठिकाणी आम्ही चांगला प्रभाव निर्माण करू शकतो. विधानसभेमध्येही आमची परिस्थिती काही अडचणीची नाही. आगामी काळात जास्त ताकदीनं काम केलं तर महाराष्ट्रातल्या जनतेच्या आधारावर राष्ट्रवादीला पुढे जाण्याची संधी मिळणार आहे. मोठ्या संधीसाठी अधिक तयारी करावी लागते. अनेक प्रयत्न करावे लागतात. कठोर परिश्रमाला पर्याय नाही. कष्ट, प्रयत्न, ताकद ही आपल्या सगळ्यांनाच घ्यावी लागते असा एक लोकहितोपदेश आहे आणि राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी हे लक्षात घेतलं पाहिजे. राष्ट्रवादीच्या नेत्यांना त्रास दिला जात आहे. तरीदेखील आपला पक्ष आज जिद्दीनं उभा आहे. महाविकास आघाडीतला सर्वात महत्त्वाचा पक्ष राष्ट्रवादी आहे हे विरोधकांनाही चांगलंच माहीत आहे. त्यामुळं सर्वात जास्त हल्ला राष्ट्रवादीवर, पवार साहेबांवर, अजितदादांच्यावर होतो. आमच्या पक्षाच्या सगळ्या नेत्यांना टार्गेट करण्याचं काम केलं जातंय. कारण, राष्ट्रवादी एकमेव असा पक्ष आहे जो त्यांना आव्हान देऊ शकतो.

आम्ही सत्तेत असताना कामासाठी जवळ आलेले लोक आता थोडे लांब गेले. राजकारणात असं होत असतं. सरकार गेल्याची चिंता नाही. पण आपण एवढ्या ताकदीनं काम करू की आपण पुन्हा एकदा महाराष्ट्राचं चित्र पलटून दाखवण्याचं काम भविष्यकाळात करायची इच्छा बाळगू. आपली ओळख, आपला आदर्श, आपलं तत्त्व, त्यातला प्रामाणिकपणा याचा महाराष्ट्राला विश्वास बसला पाहिजे. आपली बांधिलकी स्पष्ट करूया. आपली स्पष्ट भूमिका लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद हा आपला मूळचा सिद्धांत आहे. त्यामुळं आम्हाला दुसऱ्या कुठल्या पक्षाकडून हिंदुत्व शिकण्याची गरज आहे असं वाटत नाही. आमचं हिंदुत्व हे शिवाजी महाराजांच्या विचारावर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदुत्वाचे जे धडे दिले, त्यात सर्वधर्मसमभाव आहे, सर्व जाती-धर्मातील लोक बरोबर घेऊन शिवाजी महाराजांनी रयतेचं राज्य निर्माण केलं आणि त्याच भूमिकेतून महाराष्ट्रात आज आदरणीय पवार साहेबांच्या विचारानं महाराष्ट्र चालवण्याचं काम आपण सर्वांनी करायचं आहे. त्यामुळं ताकदीनं आपण एकत्र राहिलं पाहिजे. मागील पंधरा वर्षांच्या सत्ताकाळात राष्ट्रवादीच्या कुठल्याही नेत्याने चुकीचं काम केलेलं नाही हा आत्मविश्वास बाळगा, कारण ही शरद पवार साहेबांची शिकवण आहे.

आपल्या पक्षामध्ये संवाद प्रणाली असली पाहिजे. म्हणून आपण प्रत्येक जिल्ह्याला निरीक्षक नेमलेले आहेत. आपण सगळ्यांनी ताकदीनं महाराष्ट्रातल्या जनतेच्या दारात जाण्याचं काम आणि निरीक्षकांना सन्मान देण्याचं काम करावं. निरीक्षकांना बरीच कामं दिलेली आहेत. त्यामध्ये आपण नियमित जनसंपर्क ठेवताय की नाही, लोकांच्यापर्यंत आपण जाताय की नाही, आपण विधानसभा क्षेत्रात कशा पद्धतीनं काम करतोय या सर्वांचं निरीक्षण त्यांनी करावं अशी आमची अपेक्षा असते. इथून पुढच्या काळात आपल्याला प्रत्येक तालुक्यामध्ये शिबिर घ्यायचे आहे. सगळ्या फ्रंटलची अशी शिबिर घेणार आहोत. मूल्यांकन करण्याची व्यवस्था आपल्या व्यवस्थेत असली पाहिजे. चार ते पाच दशके पवार साहेबांशी एकनिष्ठ असलेला कार्यकर्ता आणि त्याची पिढी गर्दीत हरवली जात आहे. त्यामुळे पक्षात काम करणाऱ्या अशा लोकांना हळूहळू वर आणण्याची व्यवस्था आपल्या पक्षात झाली पाहिजे. पक्षासाठी दीर्घकाळ काम केलेल्यांना संधी इथून पुढच्या

काळात दिली जात आहे. पक्षासाठी काम करताना मला संधी मिळणार आहे, न्याय मिळणार आहे हा विश्वास महाराष्ट्रातल्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात निर्माण झाला पाहिजे.

पवार साहेबांनी निर्माण केलेल्या विश्वासाला न्याय देण्याचं काम आपल्या सर्वांना करायचं आहे. पक्षाने एनसीपी ॲप तयार केले असून, त्याद्वारे तुम्ही काय करता याची माहिती त्यावर अपलोड करा. ही माहिती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाणार आहे. उद्देश हा आहे, की आपल्या कुटुंबातल्या प्रत्येक तरूण सदस्यावर लक्ष ठेवायचं, त्याच्याशी संवाद करायचा, उपक्रमात त्याला सहभागी करून घ्यायचं, त्याच्या प्रतिभेची चाचपणी करायची आणि त्याचबरोबर अकाऊंटीबिलिटी पक्षात आली पाहिजे ही व्यवस्था करायची. कुणीतरी उठतो आणि जयंत पाटलांना भेटतो, सुप्रियाताईंना भेटतो, अजितदादांना भेटतो म्हणून त्याला एखादं पद मिळतं ही मानसिकता आपल्या पक्षातून बाजूला केली पाहिजे. मेरिटनंच माणसाला वर येण्याची संधी मिळाली पाहिजे ही भूमिका घेऊ.



शिर्डी येथे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील झेंडावंदन करताना. शेजारी प्रफुल पटेल, अजित पवार, श्रीनिवास पाटील, धनंजय मुंडे व इतर नेते.

आपली संघटना ताकदीनं उभी करण्यासाठी सगळ्यांनी प्रयत्न करायचे आहेत. पवार साहेबांच्या मान्यतेनं पुढच्या काळात पक्षांतर्गत निवडणुका घेतल्या जातील. महाराष्ट्रभरात सभासद नोंदणीचा प्रयत्न आपण केला आहे. तालुका, जिल्हा, विभाग पातळीवर डिसेंबरमध्ये निवडणुका होतील आणि तालुक्यात, जिल्ह्यांत सातत्याने फिरणारा, लोकांपर्यंत जाणाऱ्या सभासदाला पद दिले जाईल आणि त्यामुळे २०२४ची निवडणूक फार अवघड आहे असं मला वाटत नाही. आपली युवक आणि महिला आघाडीही चांगलं काम करत आहे. प्रत्येकानं सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असलं पाहिजे आणि पक्षाला जे सोईचे असेल ते आणि आदरणीय पवार साहेबांचे विचार लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविले पाहिजेत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने बूथ कमिट्या मजबूत केल्या पाहिजेत. त्याद्वारे लोकांच्या जवळ जाण्याचा मार्ग सोपा होतो. आपला पक्ष सर्व समाजाचा आहे हे लोकांपर्यंत नेण्याचा अजेंडा हाती घेतला पाहिजे. केंद्र, राज्य सरकारचं अपयश शोधून लोकांपर्यंत पोहोचविले पाहिजे आणि त्यासाठी सोशल मीडियाचा वापर केला पाहिजे. आगामी काळात कार्यकर्त्यांसाठी सातत्याने प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आपण सर्वांनी ताकदीनं आणि संघटितपणे काम करावं अशी विनंती करतो.

आदरणीय पवार साहेबांच्या मनात कार्यकर्त्यांची किंमत किती मोठी आहे महाराष्ट्रातल्या जनतेला नेहमीच लक्षात आलंय. आम्ही पवार साहेबांना लहानपणापासून पाहात आलोय. त्यांची कारकिर्द, आचार-विचार यांचे आमच्या सर्वांवर संस्कार झालेले आहेत. कितीही मनाविरूद्ध घडलं तरी कार्यकर्त्याला झटकून देण्याचं काम ते कधी करत नाहीत. सर्वांना आपला वाटणारा आणि आपलं भवितव्य पवार साहेबांच्या भवितव्याशी निगडित करणारा एक मोठा समाज पवार साहेबांनी माणसं जोडून उभा केलेला आहे. पवार साहेबांची पुण्याई हे तुमचं-माझं सगळ्यात मोठं भांडवल आहे. पवार साहेबांनी आयुष्यभर कष्ट केले म्हणून महाराष्ट्र एकसंघपणानं आज इथं उभा आहे. आपण सगळ्यांनी प्रयत्न केले तर महाराष्ट्राला सर्वोत्तम पक्ष होईल.

■■



# स्थानिक स्वराज संस्थांत राष्ट्रवादीची सत्ता आणण्यासाठी कामाला लागावे

## विरोधी पक्षनेते अजित पवार

सबका मालिक एक..., श्रद्धा आणि सबुरी यासारखा संदेश देणाऱ्या, अध्यात्माच्या माध्यमातून लोकसेवेचा डोंगर उभा करणाऱ्या श्री साईबाबांच्या पवित्र शिर्डी नगरीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश शाखेतर्फे आयोजित राष्ट्रवादी मंथन-वेध भविष्याचा हे अभ्यास शिबिर होत आहे. दोन दिवसांच्या अभ्यास शिबिराला राज्यभरातून उपस्थित, पक्षाचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, पक्षाचा बॅकबोन, संघटनेचा मुख्य कणा असलेले कार्यकर्ते बंधू-भगिनी, पक्षाचे भविष्य ज्यांच्या हातात आहे, ते तरूण मित्र, पक्षाचे सर्व हितचिंतक, उपस्थित सर्व मान्यवरांचं सर्वात पहिल्यांदा मी मनापासून स्वागत करतो. आज कार्तिकी एकादशी आहे. कार्तिकी एकादशी निमित्तानं पंढरपूरच्या पांडुरंगाला, वारीच्या भक्ती परंपरेला वंदन करतो. समस्त वारकरी बांधवांना, आपल्या सर्वांना कार्तिकी एकादशीच्या निमित्तानं शुभेच्छा देतो. महाराष्ट्राच्या कल्याणासाठी मी पांडुरंगाला साकडं घालतो. हे बा-पांडुरंगा, महाराष्ट्रावर तुझी कृपा कायम ठेव, राज्याची भरभराट कर, शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला यश दे, प्रत्येक घरात सुख-शांती येऊ दे. धनधान्याची, दूधदुभत्याची समृद्धी होऊ दे, महागाई, बेरोजगारीचं राज्यावरचं संकट दूर कर, अशी प्रार्थना मी बा विठ्ठलाच्या चरणी करतो.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, सन्माननीय जयंत पाटील साहेबांच्या नेतृत्व, मार्गदर्शनाखाली हे शिबिर होत आहे. या शिबिराच्या नियोजन, आयोजन, समन्वयात योगदान दिलेले पक्षातले सर्व सहकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक बंधू-भगिनींची अभिनंदन करतो. आभार मानतो. धन्यवाद देतो. शिबिराच्या आजच्या पहिल्या दिवशी व दुसऱ्या दिवशी जे मान्यवर अभ्यासक, विश्लेषक या शिबिराला मार्गदर्शन करत आहेत, त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. राष्ट्रवादी कार्यकर्त्यांच्या जाणीवजागृतीसाठी आपण दिलेल्या योगदानाबद्दल धन्यवाद देतो. मंथन म्हटलं, की पुराणातली समुद्रमंथनाची गोष्ट आणि त्या मंथनातून निघालेल्या अमृत आणि विषाची कथा आठवण्याची शक्यता आहे. पुराणातल्या त्या समुद्रमंथनाशी राष्ट्रवादी काँग्रेसच्या या वैचारिक मंथनाचा काहीही संबंध नाही. आपलं मंथन हे विचारांचं मंथन आहे. या मंथनातून देशाच्या, राज्याच्या, पक्षाच्या भल्यासाठी चांगलं शोधण्याचा, खूप काही चांगलं करण्याचा हा प्रयत्न आहे. येणाऱ्या भविष्यकाळात पक्षवाढीसाठी, राज्याच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं काय केलं पाहिजे, पक्ष कार्यकर्त्यांची भूमिका कशी असली पाहिजे, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी कसं वागलं पाहिजे, कोणत्या पद्धतीनं विचार केला पाहिजे, सत्यशोधक विचारांची कास कशी धरली पाहिजे हे ठरवण्यासाठी हे मंथन शिबिर आहे.

सध्याच्या राजकीय, सामाजिक पार्श्वभूमीवर पक्षाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेऊन पक्षाच्या पुढच्या वाटचालीची दिशा ठरवण्यासाठी हे अभ्यास शिबिर महत्त्वाचं ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षाची ध्येय धोरणं माहित असली पाहिजेत. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, आर्थिक प्रश्नांकडं कार्यकर्त्यांनी चिकित्सक पद्धतीनं बघितलं पाहिजे. राष्ट्रवादीचा कार्यकर्ता संविधान आणि लोकशाहीच्या मूल्यांबाबत सजग असला पाहिजे. यासंबंधीची जाणीवनिर्मिती आणि जाणीवजागृतीसाठी हे मंथन शिबिर आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्यातल्या, देशातल्या प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्त्याला त्यांची जबाबदारी समजावून सांगण्यात आणि ती पार पाडण्याचं बळ देण्यात, प्रदेश राष्ट्रवादीनं आयोजित केलेलं हे राष्ट्रवादी मंथन-वेध भविष्याचा अभ्यास शिबिर निश्चितच यशस्वी होईल.

आहे. असं असलं तरी ही स्थगिती कधीही उठू शकते. निवडणुका एक-दोन महिन्यांत जाहीर होऊ शकतात. त्यासाठी कार्यकर्त्यांनी तयार राहिलं पाहिजे. मला आनंद आहे, की अनेक ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी कामाला सुरूवात केली आहे. ही आघाडी आणि वेग आपल्याला टिकवायचा आहे. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीतून पक्षाच्या गाव, शहर, तालुका, जिल्हा पातळीवरील अधिकाधिक कार्यकर्त्यांना सत्तेत येण्याची, लोकसेवा करण्याची संधी मिळत असते. स्थानिक स्वराज संस्थांवर निवडून आलेले लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते हेच स्थानिक सत्तेच्या माध्यमातून पक्षवाढीसाठी, पक्षाच्या बळकटीकरणासाठी ताकद देत असतात. याच कार्यकर्त्यांच्या माध्यमातून भविष्यातले आमदार, खासदार पक्षाला मिळत असतात. त्यातून पक्ष संघटन वाढते.



**अजित पवार दीपप्रज्वलन करून शिबीराचे उद्घाटन करताना, शेजारी प्रफुल पटेल, छगन भुजबळ, जयंत पाटील व इतर मान्यवर.**

या शिबिरात आपल्यासमोर बोलण्यासाठी राज्यातील आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुका हा विषय मला दिला आहे. अनेक कारणांसाठी हा विषय महत्त्वाचा आहे, असं मला वाटतं. येणाऱ्या काळात लवकरच राज्यातल्या २३ महानगरपालिका, २२१ नगरपालिका, २५ जिल्हा परिषदा, २८४ पंचायत समित्या आणि ७५००पेक्षा जास्त ग्रामपंचायींच्या निवडणुका होणार आहेत. त्या निवडणुकांची पूर्वतयारी या शिबिरातून आपल्याला करायची आहे. सर्वोच्च न्यायालयानं सद्यस्थितीत ग्रामपंचायती वगळता इतर स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांबाबत जैसे थे आदेश दिला

स्थानिक स्वराज संस्थांमधलं यशच येणाऱ्या काळात पक्षाची लोकसभा, विधानसभा निवडणुकीची वाट सोपी करणार आहेत, हे लक्षात घेऊन अधिकाधिक जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींवर राष्ट्रवादीची सत्ता आणि ग्रामपंचायतींत आपल्या विचारांची माणसं निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत. सन्माननीय प्रदेशाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली माझ्यासह पक्षाच्या जिल्हा, तालुका अध्यक्षांपासून बुथ-मतदार यादी लेवलपर्यंतच्या प्रत्येक कार्यकर्त्यानं आतापासून कामाला लागावे. मतदार यादी बुथ प्रमुख, पन्ना प्रमुख यांच्याशी स्थानिक नेतृत्वानं

संपर्कात राहावं. त्यांच्या अडचणी दूर करण्याचा, त्यांना ताकद देण्याचा प्रयत्न करावा.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी पंचायत राज व्यवस्था आणली. स्थानिक स्वराज संस्थांच्या माध्यमातून सत्तेचं विकेंद्रीकरण करण्याचं काम केलं. नंतरच्या काळात आदरणीय साहेबांच्या नेतृत्व, मार्गदर्शनात स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय आपण घेतला. हा निर्णय महिलांपर्यंत, घराघरात पोचवला पाहिजे. आज स्थानिक स्वराज संस्थांमध्ये ५० टक्के महिला निवडून येतात. त्या जागांवर राष्ट्रवादीच्या विचारांच्या उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रवादीनं केलेले कार्य घराघरात पोचवले पाहिजे. राज्याच्या ज्या मंत्रालयात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब, पवार साहेब, उद्धव ठाकरे साहेब, अगदी देवेंद्र फडणवीस साहेब यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांनी महिलांच्या अधिकार, मानसन्मानाचे अनेक निर्णय घेतले. महाराष्ट्राचं मंत्रालय जे आजपर्यंत पुरोगामी निर्णयांसाठी ओळखलं जायचं, त्याच मंत्रालयात एका महिला पत्रकाराला एक व्यक्ती, भारतमाता विधवा नाही, तुम्ही कुंकू-टिकली लाऊन या मगच मी बोलेन...अशा पद्धतीची भाषा वापरतो. हे गंभीर, निषेधार्ह आहे.

स्थानिक स्वराज संस्थांमध्ये ओबीसी बांधवांना आरक्षण मिळालं पाहिजे, ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका राहिली आहे. मंडल आयोगावेळी ओबीसी आरक्षणाची बाजू उचलून धरण्याचं काम आदरणीय पवार साहेब आणि भुजबळ साहेबांनी केलं होतं. मंडल आयोग ते बांठिया आयोग असा हा राष्ट्रवादीचा प्रवास कायम ओबीसी बांधवांच्या बाजूचा राहिला आहे. तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकारनं राज्यात बांठिया आयोग स्थापन करून त्यांच्या अहवालाच्या आधारे ओबीसी बांधवांना स्थानिक स्वराज संस्था निवडणुकांमध्ये आरक्षण मिळवून दिलं. आज भलतेच लोक त्याचं श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहेत. ज्यांनी आरक्षणाला कायम विरोध केला, ओबीसींच्या मंडल आयोगाला विरोध करणाऱ्या त्या ढोंगी लोकांचा बुरखा फाडण्याचं काम राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केलं पाहिजे.

स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका वेळेवर घेणं ही राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. हे खरं असलं तरी राज्य शासन आणि न्यायालयांनीही त्याबाबत गांभीर्यानं विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण राज्य निवडणूक आयोगाला त्यांची जबाबदारी पार पाडण्यासाठी या सगळ्यांकडून सहकार्य अपेक्षित असतं. मला वाटतं, की निवडणुका लांबवणं ही सध्याच्या शिंदे सरकारची गरज झाली आहे. त्यांना जनाधार नाही. लोकांची सहानुभूती महाविकास आघाडीकडे आहे, हे त्यांना चांगलेच ठाऊक आहे. शिवाय त्यांची चूकही त्यांना उमगली आहे. पण ते जाहीरपणे कबुल करू शकत नाहीत. सरकारं येतात-जातात. निवडणुकीत मतदारांनी विजयी कौल दिल्यावर सरकार येतं, ते खरं कर्तृत्त्व असतं. त्यात आनंद असतो किंवा पराभव झाला तरी तोही जनतेचा कौल असतो. पण गुवाहाटीला जाऊन सरकार पाडणं म्हणजे ही चोरवाट आहे. मुख्यमंत्रिपदाच्या मोबदल्यात राज्यात येऊ घातलेले चार मोठे प्रकल्प गुजरातला दिले गेले. इथल्या तरूणांना रोजगारापासून वंचित ठेवलं गेलं. हेच आपल्याला जनतेपर्यंत पोचवायचं आहे. या प्रकल्पांसाठी दिल्लीला जाऊन माननीय पंतप्रधान, माननीय संरक्षणमंत्री यांना भेटण्याचं, त्यांच्याकडं मागणी करण्याचं धाडसही राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री दाखवू शकत नाहीत, हे महाराष्ट्राचं दुर्दैव आहे. हे शिंदे सरकार जितकं सत्तेवर राहील, तितकं अधिक महाराष्ट्राचं, इथल्या जनतेचं नुकसान करत राहतील, ही राज्यातल्या जनतेची लोकभावना आहे.

राज्याच्या अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. महापूर आला. शेतकऱ्यांचं खरीपाचं पिक पूर्णपणे वाहून गेलं आहे. पशुधन वाहून गेलं. शेतजमिनी पिकासह खरवडून गेल्या आहेत. येणाऱ्या काही वर्षांत या जमिनींचं नुकसान भरून येणार नाही. लोकांच्या घराचं, दुकानाचं नुकसान झालं आहे. रब्बी हंगामात पेरणी झालेल्या पिकांचंही नुकसान झालं आहे. शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. कर्जाची परतफेड करणं शक्य नसल्यानं शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी काळी गेली आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांना आधार, दिलासा देण्यासाठी राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त भागात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी आपण केली. ओला दुष्काळ जाहीर झाला नाही, तर राज्यातला नुकसानग्रस्त शेतकरी पुन्हा उभा राहू शकणार नाही, हे वास्तव आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून खरीपाचं कर्ज माफ करावं, शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रूपये मदत करावी, अग्रीमसह शेतकऱ्यांना विमा भरपाई द्यावी. यासंदर्भात मी दिवाळीआधी मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन पत्र दिलं होतं. त्या मागणीचा अजूनही विचार झाला नाही. ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिवाळीत दिलासा देण्याची संधी राज्य सरकारनं गमावली हे राज्यातल्या शेतकऱ्यांचं आणि १३ कोटी जनतेचं दुर्दैव आहे. ही वस्तुस्थिती आपापल्या मतदारसंघातल्या मतदारांपर्यंत, नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचं काम आपल्याला करायचं आहे.

■■



# लहान लहान घटकांना सोबत घेऊन मजबुतीने पक्ष बांधणी करूया

**छगन भुजबळ**

सुरूवातीलाच या शिबिराच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतलेल्या जयंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन आणि आभार! मध्यंतरी मी वाचलं, की मनोहर भिडे, संभाजी नव्हे; कारण त्यांच्यात संभाजी, शिवाजी, संताजी, धनाजी अशी नावं नसतात. बहुजनांना गुंडाळण्यासाठी हे संभाजी भिडे वगैरे वगैरे. तर त्यांनी एका महिला पत्रकाराला कपाळावर कुंकू नाही तर मी बोलणार नाही असं सांगितलं. आता सावित्रीबाई फुलेंच्या कपाळावर एवढे भले मोठे कुंकू लावलेले असायचे. मग त्यांनी मुलींना शिकवण्यासाठी शाळा काढल्यानंतर का त्यांच्यावर दगडफेक केली. चिखल फेकला, शेणमारा केला. या लहान लहान गोष्टी नाहीयेत. या मुद्दाम घडवून आणल्या जातायंत. तुम्हाला महत्त्वाचा मुद्दा मनुवाद परत या देशामध्ये आणायचांय आणि त्यासाठीची हळूहळू ही जी सगळी चक्रं आहेत फिरतायंत. पण त्यांना मला सांगायचंय, अशा धर्मांध सत्तेच्या विरोधात लढण्याची ताकद आम्हाला आमचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज, फुले-शाहू-आंबेडकर यांच्यापासून मिळते आहे. तुम्ही कितीही प्रयत्न करा, पण समतेचं चक्र जे आहे, तुम्ही आता परत फिरवू शकणार नाही.

पवार साहेब नेहमीच विकासाचं राजकारण करतात आणि आपणही तसंच राजकारण करत आलो आहोत. मागच्या उद्धव ठाकरेंच्या सरकारमधील काहीजण गेले. त्यांनी सांगितलं, की राष्ट्रवादी चांगली वाढतेय. त्यामुळे एवढं तरी त्यांनी कबुल केलं, की राष्ट्रवादीचे नेते, मंत्री चांगले काम करत होते. पण आज देशामध्ये महागाई किती वाढलेली आहे. अर्थव्यवस्थेची वाट लागली आहे. कोळशाचं संकट आहे. या सगळ्यावरून तुमचं लक्ष विचलित करण्यासाठी हे सगळे प्रयत्न आहेत. यूपीएच्या काळात महागाईचा दर ४.७ टक्के होता. आज हा दर १४.५५ टक्के आहे. तुमच्या घरामध्ये रोज लागणाऱ्या गोष्टींचे दर २०० ते ३०० टक्क्यांनी वाढलेले आहेत. दिवाळीत अनेकांना खायला काही नव्हते. त्यांचा आनंदाचा शिधा कुणाच्या घरी पोहोचला की नाही माहिती नाही. या सगळ्यामध्ये कधी कधी देशात गमतीचे प्रश्न उभे राहतात. आता काय तर नोटेवर गणपती, लक्ष्मीचे फोटो

छापा. पण अरे नोटा तरी द्या हातामध्ये, मग कुणाचा फोटो छापायचा ते छापा.

आता सद्यपरिस्थितीवर काय बोललं ना तर ताबडतोब ईडीची बिडी पेटलीच म्हणून समजा. यंत्रणा लगेच कामाला लागते. २०१४पासून या देशामध्ये ईडीची चौकशी झालेल्या राजकीय नेत्यांचा अभ्यास जर केला, काँग्रेसच्या २४, तृणमूल काँग्रेस १९, राष्ट्रवादी २१, शिवसेना ८, द्रमुक ६, बिजू जनता दल ६, राजद ५, बसप ५, समाजवादी पक्ष ५, तेलुगु देशम ५, आप ३, इंडियन नॅशनल लोकदल ३, वायएसआर काँग्रेस ३, मार्क्सवादी २, नॅशनल कॉन्फरन्स २, पीडीपी २, अण्णा द्रमुक १, मनसे १, भारतीय समाज पार्टी १, तेलंगणा राष्ट्र समिती आणि अपक्ष २ यांच्यावर कारवाई झाली. यामध्ये एकही भाजपचा नेता नाही. धुतल्या तांदळासारखे राज्यकर्ते जर पाहायचे असतील तर ते तिकडे. यातले काहीजण सांगतात, की आम्ही दिल्लीला गेलो आणि सुटलो बाबा. आणि तिथून गुवाहाटीला गेलो. सगळा प्रश्न मिटला. ही स्वतंत्र यंत्रणा असल्याचं सांगतात. तरीही फक्त विरोधी पक्षावरच कारवाई होते. काय दांभिकपणा आहे. भाजपवर का कारवाई होत नाही आणि इकडचा तिकडे गेल्यानंतर कसा काय शुद्ध होतो. काय लाँड्री आहे का? राजकारणाची लढाई तुम्ही राजकारण्यारखी मैदानात लढा. पण हे शिखंडीसारखे यंत्रणांना पुढे करतात. आम्ही तर किती त्रास भोगला. पण मला त्यांना सांगायचंय, की हिसाब किताब हमसे ना पूछो अब ये जिंदगी, तुने सितम नहीं गिने, तो मैने भी जख्म नहीं गिने।

एसटीच्या विलिनीकरणावरून पवार साहेबांच्या घरावर मोर्चा काढला. दगड फेकले. मग आता तुमचे सरकार आहे तर का होत नाही एसटीचं विलिनीकरण. फक्त पवार साहेबांना टार्गेट करण्यासाठी तुम्हाला हे सगळं करायचं होतं. अनेक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर चालले आहेत. फॉक्सकॉन प्रकल्प गेला नाही, तर दिला. मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, की आपल्याला मोठा प्रकल्प देणार आहेत. दोन हजार कोटीचा दिला. म्हणजे त्यांनी फॉक्सकॉन नेला आणि आम्हाला पॉपकॉर्न दिला. टाटा-एअरबस प्रकल्पासाठी मी स्वत: रतन टाटांना पत्र लिहिले. सगळं होत असतानाच तोही गेला. लाखो-कोटीचे प्रकल्प नेले आणि आता आपल्याला चणे कुरमुरे देतायंत. मुंबई आणि महाराष्ट्रातील सर्व महत्त्वाच्या कंपन्या, प्रकल्प गुजरातला नेले जात आहेत. महाराष्ट्राचं महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला जातोय. पण एक लक्षात ठेवा, सेनापती बापटांनी म्हटलंय, की महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले. मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले, खरा वीर वैरी पराधिनतेचा महाराष्ट्र आधार या भारताचा. महाराष्ट्राला तुम्ही कमकुवत करू नका. गुजरात मॉडेलचा गवगवा केला जातो. चार दिवसांपूर्वी पाहिलं आपण. मोरबी पूल कोसळला. दीडशे लोकांना जीव गमवावा लागला. हे सगळे प्रश्न त्यांना लोकसभा, विधानसभेला विचारावे लागतील.

आश्वासनपूर्ती करता आली नाही म्हणून यूकेच्या पंतप्रधान लीझ ट्रस यांना राजीनामा द्यावा लागला. मी आठ वर्षे झाली, पंधरा लाख रूपयांची वाट बघतोय. दर वर्षाला दोन कोटी रोजगार मिळणार होते. सोळा कोटी मिळायला हवे होते आणि ७५ हजार मिळणार आहेत. काय थट्टा लावलेली आहे यांनी. इंग्लंडचे सध्याचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी भारताला दिशा देण्यासाठी कमकुवत झालेल्या अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी मनमोहन सिंग यांच्यासारख्या पंतप्रधानांची गरज असल्याचे म्हटले आहे. म्हणजे तुमची गरज नाही, असं ते म्हणतायंत. या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यासाठी आणि देशासाठी आपल्या सगळ्यांना लढावं लागेल.

मध्यंतरी संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांनी पाकव्याप्त काश्मिर आणि बलुचीस्तानही आम्हाला घ्यायचे आहे असं सांगितलं. मध्येच हे कसं काय आलं. मी म्हटलं, निवडणूक आली. त्या इंदिरा गांधींना तुम्ही एवढं बोलता, त्या इंदिरा गांधींनी एका फटक्यामध्ये एका पाकिस्तानचे दोन देश करून टाकले सोळा दिवसांमध्ये आणि हे आम्ही सर्जिकल स्ट्राईक केला म्हणून सांगतात. आता इथे पण सर्जिकल स्टाईक करणार आहात का. भारताचे पायलट अभिनंदन यांना पाकिस्तानने चार दिवसांत सोडून दिले. मला सांगा, साडे तीनशे नाही, एक जरी माणूस पाकिस्तानचा मेला असता, तर त्यांना सोडले असते का या पाकिस्तानने. आपण विचार करणार आहोत की नाही. काय चाललंय. आता पुन्हा बलुचिस्तानसारखे काहीतरी. बरं ते निवडणुकीच्या वेळेलाच काढायचं. सगळ्या गोष्टींचा अभ्यास करून आपल्याला लढावं लागेल. लोकांना सांगावं लागेल की खरं काय, खोटं काय. कशावर विश्वास ठेवायचा.

ओबीसीच्या बाबतीमध्ये अनेक जण बोलले. हे तर खरंच आहे, ओबीसींचं आरक्षण जे आहे, जे लागू झालं, अहो त्याच्यासाठी तर मी पक्ष सोडून इकडं आलो. आणि आल्यानंतर पवार साहेबांनी या जालनाच्याच मिटिंगमध्ये आम्हाला सांगितलं, की मी देणार. त्यांनी दिलं. राजकारणात दिलं, शिक्षणात दिलं, नोकरीत दिलं. २७ऐवजी ३० टक्के दिलं. धनगर समाजाच्या माझ्या बांधवांना सांगायचंय, की पवार साहेबांनी याच्यामधून खास वेगळं काढलं आरक्षण आणि २७ टक्क्यामधून धनगर समाजाला दिलं. व्हीजीएनटीला वेगळं काढलं त्या २७ टक्क्यामधून आणि त्यांना दिलं. ठिक आहे, त्यांना गरज होती. आपण द्यायला पाहिजे. पवार साहेबांनी दिलं. आता १७ टक्के आहे. हे ओबीसी आरक्षणसुद्धा संपवण्याची तयारी. ते तिकडं कोणतरी कोर्टात गेलं. बीजेपीचाच माणूस गेला. कोर्टानं सांगितलं, ट्रिपल

टेस्ट आणा, नाहीतर आरक्षण गेलं. अरे, गेलं ना आरक्षण. मग आम्ही पण असं केलं, की मध्य प्रदेशची दुसरी निवडणूक येणार होती. आम्ही त्यांच्याविरूद्ध कोर्टात गेलो, की आता यांना ट्रिपल टेस्ट करायला सांगा म्हणून. कोर्ट तेच. त्यांनी मध्य प्रदेशला ट्रिपल टेस्ट करायला सांगितलं. अडकले. मग परत आठ-दहा दिवसांनी कोर्टात गेले आणि सांगितलं, की आम्ही हे करतो, ते करतो आणि आरक्षण मिळालं. आम्ही तो बांठिया कमिशन नेमला. या कमिशनचं काम तेवढं सोपं नव्हतं. लक्ष्य आहे ते वेगळं आहे. ओबीसी, आदिवासी या सगळ्यांवर आहे. आणि म्हणून मला आपल्याला एवढीच विनंती करायची आहे, पुढच्या या सगळ्या भविष्यामध्ये या सगळ्या संकटांना सामोरं जाण्यासाठी, आपले हक्क शाबूत ठेवण्यासाठी, लोकशाहीचं आणि संविधानाचं संरक्षण करण्यासाठी आपल्याला ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत एक एक विजय मिळवावा लागेल. शेवटी आपलं बॅरोमीटर काय आहे. तुमचा पक्ष शक्तीमान आहे की नाही हे ठरतं कशावरून. किती




मला आपल्याला सांगायचंय, ओबीसी असतील, शेड्युल्ड कास्ट असतील, शेड्युल्ड ट्राईब असतील, लहान लहान घटकांना आपल्याला बरोबर घ्यावं लागेल. लक्षात ठेवा, ५४ टक्के ओबीसी आहेत. २०-२१ टक्के दलित, आदिवासी आहेत. याचा अर्थ कमीत कमी ७४ टक्के लोक या लहान लहान घटकांचे आहेत. या सगळ्यांना जोपर्यंत आपण बरोबर घेत नाही, बीजेपीनं त्यांच्यावर लक्ष ठेवलेलं आहे. मुर्मूंना राष्ट्रपती केलं आहे. ओबीसीच्या लोकांनाही पदे दिली आहेत. बावनकुळे आता बोलायला लागलेत. काहीही बोलायला लागलेत. बोला, तुमचं राज्य आहे. पण खास त्यांचं लोक निवडून आले याच्यावर. त्यामुळं सगळ्यांना बरोबर घेऊन आपल्याला काम करायचंय. घाबरण्याचं कारण नाही. याच्यापुढं हल्ले वाढतील. आमिषं दाखवली जातील. भीती दाखवली जाईल. पण लक्षात ठेवा, पवार साहेबांसारखं नेतृत्व तुम्हाला मिळालेलं आहे. असं नेतृत्व हिंदुस्थानात कोणाला मिळालेलं नाही. आपण मजबुतीनं उभे राहिलो तर लक्षात ठेवा, कौन कहता हैं कामयाबी किस्मत तय करती हैं, अगर इरादों में दम हों, तो मंजिले भी झुका करती हैं....

धन्यवाद!




# राष्ट्रवादीच्या जागा वाढविण्यावर भर देण्याची आवश्यकता

प्रफुल पटेल

२०१४पासून देशामधील राजकीय परिस्थिती बघितली तर, एक आगळीवेगळी परिस्थिती आहे. कारण, राजीव गांधी यांच्या सरकारनंतर २०१४पर्यंत भारताच्या सगळ्या सरकारांमध्ये अनेक पक्षांचा समावेश होता. त्यामुळे एकच विचारधारा कधी बनली नाही. अटल बिहारी वाजपेयींसारखं विशाल नेतृत्व असतानासुद्धा बीजेपीला १८०च्या आसपास जागा मिळाल्या होत्या. त्यांचं सरकार आणण्यामध्ये लालकृष्ण अडवानींची भूमिका महत्त्वाची ठरली होती. त्यांनी रामजन्मभूमीचा मुद्दा हातामध्ये घेऊ रथयात्रा काढली आणि एक वातावरणनिर्मिती केली. पुढे मशिद पाडण्यात आली आणि त्यातून पहिल्यांदा भाजपची सत्ता देशात आली. हे सांगण्याचं कारण म्हणजे, त्यावेळचे भाजपचे सरकार आणि आत्ताचे भाजप सरकार यामध्ये खूप मोठं अंतर आहे. वाजपेयी सगळ्यांना बरोबर घेऊन जाणारे नेते होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर असलेले ममता बॅनर्जी, चंद्राबाबू नायडू, फारूक अब्दुल्ला, नितीश कुमार यांच्यासारखे नेते आज भाजपच्या विरोधात आहेत. २०१४नंतर मात्र, आपण त्यांचे विरोधक असलो तरी एक गोष्ट मान्य करावी लागेल, की लोकांचे विचार कॅप्चर करण्यामध्ये ते कुठेतरी यशस्वी झाले आहेत. ते आपल्याला पटत नसेल, फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराच्या विपरित जरी असेल, पण एक आहे, हळूहळू ते लोकांना आकर्षित करण्यामध्ये यशस्वी झाले आहेत. खोटं बोलत असतील, काम करत नसतील, आपण योग्यरितीनं अनेक टीका करू शकतो. पण, काही ना काही लोकांच्या मनामध्ये परिवर्तन झालेलं आहे हे समजून घेऊन आपल्याला सुद्धा पुढं जावं लागणार आहे.

आपल्याला काळाप्रमाणे नवीन रस्ता निवडला पाहिजे. काहीतरी माध्यम निवडलं पाहिजे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. शरद पवार साहेब निश्चितच मोठे नेते आहेत. भारतात कुठेही गेलं आणि महाराष्ट्राचं नाव काढलं तर पवार साहेबांचं नाव निघाल्याशिवाय राहत नाही. सत्ता असो किंवा नसो, पवार साहेबांची चर्चा होतच राहते. संसदेमध्ये सुद्धा पंतप्रधानांपासून भारताला कुठलाही नेता पवार साहेबांकडे जाऊन नमस्कार करून विचारपूस केल्याशिवाय पुढे जात नाही. ही पवार साहेबांची उंची आहे. ख्याती आहे आणि हे काही त्यांनी सहज मिळवलेलं नाहीये. त्याच्यामागे ६० वर्षांचा त्यांचा त्याग, तपस्या, त्यांचे कार्य, विचार हे लोकांसमोर आहेत म्हणून पवार साहेब आज एवढ्या उंचीवर आहेत. १९९९मध्ये पवार साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, त्यावेळी महाराष्ट्रभर एक प्रकारे तुफान आले होते. त्यावेळच्या रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतरच्या निवडणुकीत आपण यशही मिळवलं होतं. पण कुठे ना कुठे त्याचं कन्व्हर्जन

झालं नाही. परिणामी आपण काँग्रेसबरोबर गेलो. युतीबद्दल हरकत नाही. पण युती करत असताना आपण आपलं स्थान परिवर्तीत करण्यामध्ये कुठेतरी कमी पडलो, त्याच्यात काही शंका नाही. आपल्यामुळे महाविकास आघाडी सरकार स्थापन झाले. पवार साहेबच त्याचे जनक आहेत. पवार साहेबांसारखे नेतृत्व, चांगले विचार, आदर्श हे घेऊनसुद्धा आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्रामध्ये एक नंबरची पार्टी का झाली नाही याविषयी आपण सगळ्यांनी आत्मचिंतन करण्याचा विषय आहे. म्हणून या मंथन कार्यक्रमात आपल्या पक्षाचा उद्याचा काळ कसा असावा, महाराष्ट्रात आपला पक्ष एक नंबरचा बनविण्याची चर्चा झाली पाहिजे.

एक गोष्ट लक्षात आणून द्यायचीय, की विदर्भातल्या ६० जागा आणि मुंबई, ठाणे, पालघर या भागातील ६० जागा म्हणजे या दोनच परिसरात १२० जागा आहेत. धुळे, नंदूरबार जर तुम्ही बघितलं, त्याला जोडलं तर जवळपास १३० जागा होतात. या १३० जागांमधील मुंबई-ठाण्याच्या परिसरात आपल्याकडे फक्त ४ जागा आहेत आणि विदर्भामध्ये फक्त सहा जागा आहेत. म्हणजे १३०पैकी आपल्याकडे फक्त दहा जागा आहेत. उरलेल्या १५८ जागांपैकी आपल्याकडे ४४ जागा आहेत. म्हणायचं तात्पर्य एवढंच आहे, की जोपर्यंत आपण या दोन भागांमध्ये जास्त लक्ष घालत नाही, तोपर्यंत यश मिळणार नाही. या सगळ्या गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे. जर खरोखर आपण आपल्या पक्षाला एक नंबरचा पक्ष म्हणून पाहू इच्छितो, तर आपल्याला या सगळ्या गोष्टींचा विचार करावा लागणार आहे. येणाऱ्या काळामध्ये जयंतराव आणि बाकीच्या सगळ्या सहकाऱ्यांनी या १३० जागांपैकी युती झाली तरी जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा प्रयत्न करावा लागेल.

आज बघितलं तर आपल्याला चंद्रपूर जिल्ह्यात झिरो जागा. आता चंद्रपूर जिल्ह्यात आपण गेलो तर तेथील माणसाला प्रगतीचा मार्ग कोणता आहे, आपल्याशी जोडल्या गेलेल्या माणसाला जिल्हा परिषदेच्या पलिकडे जाण्याचा मार्ग आहे का, तर नाही. आज नागपूरमध्ये शहरात आपण एकही जागा लढवत नाही. म्हणून अशा गोष्टींवरही आपल्याला येणाऱ्या काळामध्ये भर देण्याची गरज आहे आणि जर हे केलं तर याचा परिणाम निश्चित उद्या महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला एक नंबरचा पक्ष करण्यामध्ये आपल्याला कुठेही अडचण राहणार नाही.



मित्रांनो, दोन दिवसांपासून अनेक मान्यवरांची भाषणे झालेली आहेत. सगळ्यांचं उद्दीष्ट एकच होतं, की आपल्या पक्षाला आपण बळकट कसं करायचं. २०१४नंतर भारताचं राजकारण एकदम वेगळं झालेलं आहे. त्याच्या अगोदरचं राजकारण १९९०नंतर २०१४पर्यंत जे काय राजकारण होतं, आणि जे राजकारण आहे, ते राजकारण करायला काय सोपं आणि साधं समजू नका. याचा मुकाबला जर तुम्हाला करायचा असेल, तर तुम्हाला लढा देण्याच्या भूमिकेतूनच सामोरं जावं लागणार आहे. नाहीतर आपण कुठेही त्यांच्यासमोर टिकणार नाही, ही पण महत्त्वाची सूचना मी तुम्हाला देऊ इच्छितो. ■■



# राजकारण व मीडियाचं नातं प्रलोभनं आणि धाकाचं असू नये

**सुप्रिया सुळे**

पक्षानं मला सोशल मीडिया, मीडिया आणि आपलं नातं हा विषय दिलेला आहे. सगळ्यांचा एक समज आता राज्यात झालेला आहे, की आपण फक्त लढण्यासाठी सत्तेत कोण येतंय याच्यासाठीच पक्ष असतात. आपण पॉलिसी मेकर्स कमी राहिलेलो आहोत आणि आपण टेलिव्हिजन एंटरटेनर्स जास्त झालो आहोत असं माझं मत व्हायला लागलंय. मी त्याच्यासाठी राजकारणात आलेली नाही. मी राजकारणात एखादी चांगली पॉलिसी करावी आणि त्या माध्यमातून या भारतात एक चांगलं सामाजिक परिवर्तन व्हावं याच्यासाठी मी राजकारणात आले आणि याच्यासाठी मी संसदेत काम करते. साहेब आणि प्रफुल्लभाई तर सीनियर आहेत. पण मी, फौजियाताई आणि वंदनाताई संसदेत पॉलिसीसाठीच काम करतो. टीका करायची त्यावेळी जरूर टीका करतो, पण आम्ही पॉलिसी लेवलवर बोलत असतो आणि याच्यासाठी आम्ही खासदारकी लढतो. भोंगे बंद करण्यासारखा एखादा निर्णय घेत असताना त्याचा व्यापक विचार केला पाहिजे. पण तसे होत नाही. याची जाणीव आणि भान आपण आपल्या पक्षामध्ये ठेवलं पाहिजे.

स्मार्ट सिटी जेव्हा पहिल्यांदा लाँच झाली, तेव्हा सगळ्यात जास्त आग्रह वंदनाताईंचा होता, की पुणे आणि पिंपरी-चिंचवडला स्मार्ट सिटीमध्ये घ्या. कारण वंदनाताईंचा असा गैरसमज झाला होता, की त्यांना वाटलं, की संपूर्ण पुणे स्मार्ट होणार आहे. पॉलिसी जेव्हा त्यांची वाचली, तेव्हा आमच्या लक्षात आलं, की स्मार्ट सिटी म्हणजे शहर स्मार्ट होत नाही, तर त्याच्यातला ४० हजार लोकांचा एक ब्लॉक स्मार्ट होतो आणि या केंद्र सरकारनी गेल्या आठ वर्षांत ५० हजार कोटी रूपये हे फक्त स्मार्ट सिटीसाठी घालवलेत, आणि ५० हजार कोटी रूपये लहान शहरांसाठीच्या अमृत सिटीसाठी, म्हणजे एक लाख कोटी रूपये त्यांनी इन्फ्रास्ट्रक्चरसाठी घालवलेत. त्याचं ऑडिट कोणीतरी केलं पाहिजे, की हे एक लाख कोटी रूपये नक्की कुठे गेले. स्मार्ट आणि अमृत सिटीबद्दल केवळ आपण बोलतोय. त्यांच्यापैकी कुणी बोलत नाही हे लक्षात घ्या.

बूथ कमिटीचं काम पक्षानं पुन्हा एकदा पूर्ण ताकदीनं घेतलं पाहिजे. मुळशी तालुक्यात आम्ही ही ॲक्टिव्हिटी केली. महादेव कोंढरेंनी सर्व प्रशिक्षण घेऊन शंभर टक्के बूथचं काम केलेलं आहे. रामाला विसरल म्हणून तुम्ही इलेक्शन हरला असं म्हटलं गेलं. पण मला हे स्पष्ट करायचंय, की आपण रामाला कधीच विसरलेलो नाही. राम हा आपल्या आयुष्यातला, मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. रामकृष्ण हरी म्हटल्याशिवाय या महाराष्ट्रातल्या कुणाचीही सकाळ सुरू होत नाही. रामाला विसरलो म्हणून आपण निवडणूक हरलो

नाही, तर टूजी स्कॅम, कोल स्कॅममुळे देशामध्ये यूपीए सरकारची जी बदनामी झाली, त्याच्यामुळं आपण इलेक्शन हरलो. हा पक्ष जमिनदारांचा आहे असा उल्लेख याठिकाणी केला गेला. मला हे मान्य नाही. हा पक्ष या राज्यातल्या कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आहे हे आपल्याला स्वत:ला पटलं पाहिजे. कुणाच्या जर चांगल्या शिक्षण संस्था आहेत, तर त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आहेत, सगळ्यात चांगल्या सहकार चळवळीतले कारखाने कोण चालवतं, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चालवतो. या एशियातली सगळ्यात चांगली बँक सहकार चळवळीत कोण चालवत असेल तर ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चालवतो. आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा असा पक्ष आहे, देशातली सगळ्यात चांगली जिल्हा परिषद जर कोण चालवत असेल तर तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. हे मी म्हणत नाही तर हा देशाचा डेटा सांगतोय. या देशात सगळ्यात चांगला आरोग्य मंत्री म्हणून कुणाची ओळख असेल तर ती माझे बंधू राजेश टोपेंची आहे हे आम्ही सगळ्यांनी दिल्लीला पाहिलंय.

या देशात कोविडमध्ये सगळ्यात चांगलं अर्थकारण कुठल्या राज्यानी केलं असेल, तर त्या नेत्याचं नाव अजित पवार हे केंद्र सरकार म्हणतंय हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. त्याच्यामुळं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर एखादी कमेंट झाली असेल कमी जास्त, पण या वास्तवतेचं आपण पण भान ठेवलं पाहिजे, की हाय परफॉर्मिंग एमएलए, मंत्री कुठले आहेत, तर हे मी म्हणत नाही, आपले विरोधकही म्हणतात, तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. आपण लेजिस्टेटर आहोत. आम्ही एंटरटेनर नाही आहोत. मीडियाशी बोलतानाही आपण ही गोष्ट सातत्यानं बघतो, की मीडियासाठी आपण रिॲक्टिव्ह असतो. प्रत्येक गोष्टीला उत्तर द्यायचं हा आग्रह कशाला. आपण काय मक्ता घेतलांय का २४ तास त्यांचं चॅनेल चालवायचा. आणि अनेक वेळा मला असं वाटतं, की प्रलोभन आणि धाक, राजकारण्यांचं आणि मीडियाचं एक खूप वेगळं नातं असतं, त्याचं कारण असं, की कॉनफ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट होऊ शकतो अनेक वेळेला, आपले संबंध हे त्यांच्याशी चांगले असलेच पाहिजेत. त्यांनीही आपल्यावर टीका केली पाहिजे आणि वेळप्रसंगी आपण पण फार काही त्यांच्यासाठी करावं असा आग्रह का. त्यांनी त्यांचं काम करावं, आपण आपलं काम करावं.

आदरणीय पवार साहेबांची आणि गोविंदराव तळवलकरांची मैत्री ही उभ्या महाराष्ट्राने पाहिलेली आहे. पण अनेक वेळा त्याच गोविंदराव तळवलकरांनी प्रचंड टीका ही पवार साहेबांवर केली आहे हेही उभ्या महाराष्ट्राने पाहिलेलं आहे. त्यामुळं राजकारण आणि मीडिया याचं नातं हे डायलॉगचं असावं पण त्याच्यात प्रलोभन आणि धाक असू नये. आजकाल अनेक वेळा असं वाटतं, की प्रलोभन आणि धाक या गोष्टी कुठेतरी, आज जे सत्तेत आहेत, त्यांच्याबद्दल सातत्यानं येतायंत असं माझ्या वाचनात आलंय. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी एक जेवण ठेवलं होतं आणि तिथं त्यांनी दीडशे पत्रकारांना प्रत्येकी पन्नास हजार रूपयांची कूपन्स, व्हाऊचर्स यासारखं गीफ्ट दिले. या बातमीचा कागद पाहून मी सांगतेय. खरं खोटं मला माहिती नाही. पण त्याचं स्पष्टीकरण कुणाकडून आलेलं नाही. त्याच्यामुळं हे त्या पन्नास खोक्यांसारखं व्हायला लागलंय. पन्नास खोक्यांचा आरोप कोणीतरी केला, त्याच्यावर कुणी म्हटलंच नाही, की आम्ही घेतले नाहीत. वर एक मंत्री असं म्हणाले, की तुम्हाला हवे आहेत का. मग तुम्ही घेतले असाल तरच म्हणाल ना की तुम्हाला हवे आहेत का. म्हणजे आज लोकांमध्ये हे ईस्टाब्लिश झालं आहे, की यांनी पन्नास खोके घेतले आहेत. कारण ते कुणी नाही म्हणत नाहीत. एक वर्तमानपत्र सोडलं तरी कुठल्याही वर्तमानपत्रानं पन्नास हजाराच्या गीफ्टची बातमी नाकारलेली नाही.

आता धाकाचं उदाहरण मी तुम्हाला देते. सुप्रिम कोर्टानं केरळतला एक जर्नलिस्ट आहे, सिदी कपन म्हणून. ते यूपीला जात असताना त्यांना अटक झाली. ते काहीतरी चुकीचं काम करतायंत असं म्हणत त्यांना अटक झाली. ते कोर्टात गेले. कोर्टात केस जिंकले. पण तरीही त्यांना जामीन मिळाला नाही. सुप्रिम कोर्टानं विचारलं, की हे जर जर्नलिस्ट आहेत, तर त्यांना का बेल मिळत नाहीये. याचं उत्तर कुणाकडंच नाही. उत्तर प्रदेशच्या सरकारनं काहीही उत्तर दिलेलं नाही. अशीच जर या देशात परिस्थिती राहिली तर पुढच्या देशासाठी आपली लढाई ही मला वाटतं जास्त जोरानं आपण केली पाहिजे. आणखी एक गोष्ट, भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षांनी काल आपल्या एका भाषणात आमचा पक्ष आता महिलांचा एक मोठा पक्ष बनणार आहे, कारण महाविकास आघाडीतील अनेक महिला नेत्या आपल्या पक्षात येत असल्याचं म्हटलं आहे. याचा अर्थ त्यांच्या पक्षात गुणवत्ताच नाही. जी काही आहे, ती राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेस पक्षातून आयात केलेली आहे हे स्पष्ट होते. भारतीय जनता पक्षाच्या थिंक टँकबद्दल बोललं जातं, मग संसदेत पहिल्या पाच खासदारांमध्ये त्यांचा एकही खासदार का येऊ नये. एवढं ट्रेनिंग देवूनही आऊटपूट काहीच नाही. आमच्या पक्षात ट्रेनिंग घेतलेले लोक त्यांच्याकडं जातात. म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं ट्रेनिंग अर्थातच हे त्यांच्या ट्रेनिंगपेक्षा जास्त इफेक्टिव्ह आणि चांगलं आहे. ते त्यांचा पक्ष विचारधारेवर नाही तर आपल्या ट्रेनिंगवर वाढवतायंत.

सोशल मीडियाचं सगळ्यात चांगलं उदाहरण आपल्या पक्षामध्ये जे दोन लोक निवडून आले संघर्षाच्या काळात ते म्हणजे संजय बनसोडे आणि बाबासाहेब पाटील. बाबासाहेब

पाटलांचा सोशल मीडिया हा अप्रतिम आहे. दोघांनीही सोशल मीडियाचा चांगला वापर केला. विरोधात बसायला सगळे एवढे का घाबरतात मला समजत नाही. अनेक वर्षे सत्तेत राहिल्यानंतर सत्ता आल्यानंतरच यश मिळू शकतं असं कोण म्हणलं. आदरणीय पवार साहेब ५५ वर्षे राजकारणात आहेत. पन्नास टक्के काळ त्यांचा विरोधात गेला. तरीही त्यांची लोकप्रियता तुम्ही जर बघितली, तर ते विरोधी पक्षात असताना जास्त लोकप्रिय असतात हे उभ्या महाराष्ट्रानी पाहिलेलं आहे. त्याच्यामुळं मीडियाचा फार बागुलबुवा करू नये आणि प्रत्येक गोष्टीवर आपण बोललंच पाहिजे असा आग्रह कशासाठी? आपला काहीच संबंध नसलेल्या गोष्टींवर आपण रिॲक्शन द्यायची काय गरज आहे. थोडासा आपला जॉब आपण लक्षात घेतला पाहिजे. आपण पॉलिसी मेकर्स आहोत आणि ही ओळख कायम ठेवली पाहिजे. आपण आपला गोल सेट केला पाहिजे. मी माझ्या भाषणात काय बोलणार हे मी ठरवणार, ते नाही ठरवणार. पार्लमेंट आणि असेंब्लीमध्ये काय चालवणार हे ते नाही ठरवणार. आम्ही ठरवणार. कारण आता असं झालंय, की ते अजेंडा सेट करतात आणि आपण त्याच्यात नाचत बसतो. त्याच्यामुळं या सगळ्या गोष्टींचा व्यापक विचार पक्षानं केला पाहिजे. सोशल मीडियाचं काम प्रत्येकजण आपापल्यापरिनं चांगलं करतायंत. पण त्याचा बागुलबुवा करू नका. सोशल मीडियानं निवडणुका जिंकता येत असतील तर इलॉन मस्कनं संपूर्ण देश कंट्रोल केला असता. चुकीची माहिती, त्याच्यावर बोलणं हे अर्थातच केलं पाहिजे. प्रत्येक बातमी चेक केली पाहिजे. टूजी आणि कोल स्कॅममध्ये काहीही निष्पन्न झालं नाही. तशीच गोष्ट नवाबभाई आणि अनिल देशमुखांच्या बाबतीत झाली आहे. पण लढेंगे और जितेंगे. कितीही संघर्ष करायला लागला तरी चालेल. तुम्ही एखाद्यावर आरोप करता त्यावेळी त्याचं कुटुंब कुठल्या परिस्थितीतून जातं याची जाणीव ठेवली पाहिजे. इतकं असंवेदनशील राजकारण करू नये. ज्यावेळी तुम्ही सत्तेत याल तेव्हा सगळ्यांना वाटेल की ही बदलायचं आहे आणि या बदलासाठी आपल्याला लढावं लागणार आहे. लढण्याची तयारी आणि ताकद ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनगटात आहे.


शिबीराच्या आयोजनाबद्दल आदिती नलावडे यांचा पुष्पगुच्छ देऊन शरद पवार सत्कार करताना, शेजारी नगर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष कपिल पवार.

खोक्याच्या राजकारणानं आपल्याला अडकवलं आहे. या खोक्यांचं हे राजकारण नाहीये. त्यामुळं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडं फार अपेक्षेनं राज्य बघतंय. आपली संघटना कशी वाढेल, आपली ताकद कशी वाढेल, आपण केलेलं काम, आपलं मेरिट याच्यावर आपण निवडणूक लढवूया. पुन्हा एकदा महाराष्ट्रात कै. यशवंतराव चव्हाणांच्या मनातला जो महाराष्ट्र आहे, पुन्हा आपल्याला आणायचांय. आपली फार नाचक्की चालली आहे आणि ती फक्त यांच्या वागण्यामुळे. कै. यशवंतराव चव्हाण यांनी या खोक्यांसाठी मंगल कलश आणला नव्हता. तो या मायबाप महाराष्ट्रातल्या जनतेत चांगला बदल घडवण्यासाठी आणला होता. तोच वारसा या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आहे. त्यामुळं तोच विचार पुढं ठेवून आजपासून राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद मेरिटवर आणि केलेल्या कामावर आणि चव्हाण साहेबांच्या नावावर, त्यांचं काम घेऊन आपल्याला पुढं जायचं आहे. मला विश्वास आहे, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेत पण येईल आणि सर्वसामान्य मायबाप जनतेची सेवा करून महाराष्ट्र देशात एक नंबरचं राज्य कसं येईल एवढं नक्कीच आपण करू.

■■




# २०२४ मध्ये विधानसभेसह लोकसभाही राष्ट्रवादी काँग्रेसचे लक्ष्य

**खासदार सुनील तटकरे**

राजकारणामध्ये सातत्यानं स्थित्यंतरं होत असतात. परिवर्तन हा राजकारणाचा गाभा आहेच. जयंतराव, आपले शिबिर वेध भविष्याचा, भविष्याचा वेध कसा घ्यायचा हे पवार साहेबांकडून शिकावं. १९६२ ते १९७८ या काळात त्यांनी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून वाटचाल करत मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचले. त्यानंतर केंद्रात मंत्रिपदापर्यंत मजल मारली. एका राजकीय व्यक्तीचा वेगवेगळ्या पद्धतीचा प्रवास ज्यावेळेला सर्वजण पाहत असतात, त्यावेळी त्यांनी केलेलं अजोड असं कार्य त्यानिमित्तानं आपल्याला पहायला मिळू शकतं.

याठिकाणी अनेक महनीय व्यक्तींनी विविध विषयांचा परामर्श केला. त्यामध्ये महिलांच्या बाबतीत अधिक सतर्क राहिलं पाहिजे, असं सांगण्यात आलं. महिलांच्या मतदानाबाबत पक्षानं अधिक जागरूक राहिलं पाहिजे. मला याठिकाणी आवर्जून उल्लेख करावासा वाटतो, की देशात पहिल्यांदा महिला धोरण जर कुणी आणलं असेल, तर तुमचे आणि माझे नेते आदरणीय पवार साहेबांनी ९२-९३ सालामध्ये आणलं. महिलांना ३० टक्के आरक्षणाच्या माध्यमातून ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिकेमध्ये आरक्षण या देशामध्ये पहिल्या प्रथम कुणी दिलं असेल तर आदणीय पवार साहेबांच्या कालावधीमध्ये दिलं गेलं. मला याठिकाणी अतिशय अभिमानपूर्वक उल्लेख करावासा वाटतो, की सुप्रियाताई केवळ शरद पवार साहेबांच्या लेक आहेत म्हणून नव्हे, तर आज आमच्या देशाच्या संसदेमध्ये अतिशय उत्तमपद्धतीनं भाषण करतात. उत्कृष्ट संसदपटू म्हणून अनेकवेळा त्यांना त्याठिकाणी पुरस्कार मिळाला. मीसुद्धा महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये २५ वर्षे काम केलंय, अनेकवेळा बोलण्याचा प्रसंग आला. लोकसभेमध्ये सुद्धा सुप्रियाताई मला बोला असं सांगत असतात, पण मी सांगतो, की ताई तुम्ही बोललं पाहिजे. आजच्या लोकसभेमध्ये भाषणं कुणाची ऐकायची असा माझ्यासारख्या कार्यकर्त्याच्यापुढं प्रश्न पडतो, त्यावेळी सुप्रिताताई बोलायला कधी उठतात याची मी आवर्जुन वाट बघत असतो. कारण, योग्य पद्धतीची मांडणी करत मांडलेले विचार ऐकण्यासाठी सभागृहातील सदस्य आवर्जुन थांबत असतात. फौजियाताई, वंदनाताईही बोलतात. देशातल्या महिला भगिनींची कारकिर्द आम्हाला त्याठिकाणी पहायला मिळतेय.

राज्यामध्ये सुद्धा महिला आयोग स्थापन झाला, त्यालासुद्धा अनेक वर्षे झाली. पण आज आपल्या रूपालीताई चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून आज आयोगसुद्धा किती उत्तम पद्धतीनं काम करू शकतो हे

आपल्याला त्याठिकाणी पहायला मिळतंय. मला असं वाटतं, की पवार साहेबांनी महिलांसाठी केलेलं काम आणि त्या कार्यातून ज्यांना ज्यांना त्याठिकाणी संधी मिळाली, त्यांनी त्यांनी आपापल्या पद्धतीनं दाखवलेली भूमिका ही तुमच्या आणि माझ्यासाठी अत्यंत स्फूर्तीदायी ठरू शकते.

काल मंडल कमिशनचा उल्लेख केला गेला. आपल्या पक्षावर सातत्यानं असा शिक्का मारण्याचा प्रयत्न केला गेला, की आपला पक्ष मराठ्यांचा पक्ष आहे. पण, मला आवर्जुन याठिकाणी सांगायचंय, मी ज्या समाजामधून जन्माला आलो, मी वंचितातला सुद्धा किंचित आहे. वीस लाख लोकांच्या मतदानातून मी निवडून येत असताना दोन हजार मतंसुद्धा ज्या समाजाची नाहीत, त्या समाजाचा मी आहे, तरीसुद्धा या देशाचे नेते आदरणीय पवार साहेबांच्या वलयामुळे मोदी नावाच्या तुफानी लाटेमध्ये मला २०१९ सालामध्ये लोकसभेमध्ये जाता आलं हे सुनील तटकरेच्या कर्तृत्वापेक्षा पवार साहेबांनी दिलेली संधी ही अत्यंत मोठी आहे, हे मला याठिकाणी आवर्जुन सांगायचंय.

१९९९ सालामध्ये राज्यामध्ये आपलं सरकार आलं. त्यावेळी मला रत्नागिरी जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाची संधी दिली. संधी दिल्याच्यानंतर काम केलं पाहिजे या भूमिकेतून आम्ही काम करत आलो. २००४ला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कोकणामध्ये चार आमदार झाले, २००९ला सहा झाले, विधानपरिषदेमध्ये आपण तीन आमदार आणू शकलो. छगन भुजबळ साहेब १९९५ला पराभूत झाले. त्यानंतर ते नाशिकला गेले. त्याठिकाणी पवार साहेबांनी त्यांना विधापरिषदेवर संधी दिली. एका लढवय्या नेत्याप्रमाणे त्यांनी त्यानंतर विधानपरिषदेत विरोधी पक्षनेत्याची भूमिका बजावली आणि त्यानंतर २००९मध्ये आपण सत्तेवर आलो हे विसरून चालणार नाही. संधी मिळाल्यानंतर काम होते.

अशा कालखंडात काम करत असताना आपल्यासमोर आव्हानंही फार मोठी आहेत. आज आपण सत्तेमध्ये नाही. स्वाभाविकपणे भविष्यात आपण राजकारणामध्ये टिकू शकू की नाही अशी शंका प्रत्येकाच्या मनात येईल. पण आजचं हे आपलं मंथन अतिशय योग्य वेळेला सुरू आहे. श्रद्धा आणि सबुरीचा मूलमंत्र ज्या ठिकाणाहून मिळतो, त्या शिर्डीत आपण बसलेलो आहोत. अशावेळेला भविष्याचा वेध आदरणीय पवार साहेबांच्या त्यांच्या पन्नास वर्षांच्या राजकीय जीवनामध्ये घेतला, त्यामुळं उद्याचं भविष्य काय आहे याचा विचार तुम्ही नी मी करण्याच्यापेक्षा उद्या मजबुतीनं या सिद्धांतावर आपण कसं उभं राहू शकतो या विचाराची कास धरणं अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. ते करायचं असेल तर शेवटी मजबुतीनं उभं राहणं आवश्यक आहे.

२०२४ सालामध्ये पक्षाला २५ वर्षे पूर्ण होतील. २०२४ सालामध्ये लोकसभेच्या निवडणुका येतील. विधानसभेच्या निवडणुका येतील. याच्याअगोदर स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका आहेत. एक असा निर्णय आपण याठिकाणी घेतला पाहिजे, की भविष्याचा वेध जसा आपण घेत आहोत, असं आपण लक्ष्य ठरवलं पाहिजे २०२४ हे लक्ष्य ठेऊन आतापासून जर का आपण कामाला लागू तर २०२४ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचंच आहे ही भूमिका घेऊन आपल्याला सर्वांना याठिकाणाहून जायचं आहे. हा विचाराचा संकल्प करून आत्मविश्वास मनामध्ये घेऊन काम करण्याची योग्य पद्धतीनं खबरदारी त्याठिकाणी घेतली तर अनेक गोष्टी त्याठिकाणी आपण मिळवू शकतो आहोत.

राज्यामध्ये महाविकास आघाडीचं सरकार आलं. उद्धवजी त्याठिकाणी मुख्यमंत्री होते. तुमचे नी माझे नेते अजितदादा पवार राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री होते. एका बाजूनं केंद्र सरकारनं आपली आर्थिक कोंडी केली. तरीही अजितदादांमुळे महाराष्ट्रातील सर्व पक्षाच्या आमदारांना पाच कोटींचा निधी मिळत होता. आज सत्तेमध्ये बदल झालांय. निराशेचं वातावरण आहे. पण आपल्याला या गोष्टीची चिंता करण्याची आवश्यकता नाही. गेला महिनाभर राज्यामध्ये ज्या पद्धतीनं कारभार सुरू आहे, त्यावरून स्पष्ट आहे, की २०२४ हे साल तुमचं आणि माझंच आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं आहे. आत्मविश्वास मनामध्ये कायम ठेऊन कुठल्याही गोष्टीची तमा न बाळगता येणाऱ्या परिणामांना सामोरे जाण्याची हिम्मत आपण सर्वांनी मिळून दाखवणं अत्यंत आवश्यक आहे. विद्यमान सरकार स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका जाणीवपूर्वक पुढं ढकलण्याचा प्रयत्न करतंय. खोके, ओकेवरून लोकांमध्ये प्रचंड प्रमाणात चीड आहे. अशावेळेला अजितदादा आणि आपल्या पक्षाने केलेली कामे लोकांपर्यंत पोहोचवा. आणखी एक ते दीड वर्षाने आपण पुन्हा नव्या उमेदीनं त्याठिकाणी जाऊ शकतो. पवार साहेबांच्या उत्तुंग नेतृत्वाखाली आपण यशस्वीपणे वाटचाल करू शकतो. या शिबिराच्या मंथनाच्या माध्यमातून भविष्याचा वेध घेत असताना २०२४चं लक्ष्य जर कुठलं असेल, तर विधानसभा हे तर आमचं लक्ष्य आहेच, पण देशाची संसद हेसुद्धा आमचं लक्ष्य आहे, असा आत्मविश्वास घेऊन आपण सर्वांनी मिळून कामाला लागावं एवढीच कळकळीची विनंती आजच्या या कार्यक्रमाच्यानिमित्तानं करतो.

■■



# राष्ट्रवादीच्या मजबुतीसाठी संघटना बांधणी महत्त्वाची

**एकनाथ खडसे**

पक्षाच्या दृष्टिकोनातून विस्तार झाला पाहिजे आणि पक्ष मजबूत झाला पाहिजे, त्यासाठी काय केलं पाहिजे याबाबत प्रत्येकाच्या भाषणात उल्लेख आला. संघटनेशिवाय पक्षाची मजबुती नाही. निवडणुका वाऱ्यावर जिंकता येत नाहीत. पवार साहेबांची हवा आहे, पावसामध्ये भाषण केल्यामुळे दहा जागा वाढल्या हे जरी खरं असलं तरी, सध्या सरकारच्या विरोधात वातावरण आहे. महागाई प्रचंड वाढलेली आहे. भ्रष्टाचार प्रचंड बोकाळलेला आहे. एजन्सीचा गैरवापर होतोय. वेगवेगळ्या माध्यमातून सरकारनं या देशात दहशतीचं वातावरण तयार केलं आहे. त्यामुळं आता आपल्याला निवडणुका सोप्या जातील असं समजता कामा नये. कितीही परिस्थिती अनुकूल असली तरी जोपर्यंत संघटना ग्रामपातळीपर्यंत, वाड्या-वस्तीपर्यंत, समाजातल्या सर्व घटकांपर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत संघटनेला अपेक्षित असं यश मिळत नाही. मी भाजपमध्ये काम केलं आहे. भटा-बामणांचा पक्ष म्हणून उल्लेख केलेल्या या पक्षाचा विस्तार गावपातळीपर्यंत झाला, याचं कारण संघटना. त्यांनी हळूहळू संघटनेवर जोर दिला.

सुप्रियाताईंनी मघाशी सांगितल्याप्रमाणे बूथवर लक्ष दिलं पाहिजे. ही संघटना वाढवायची असेल तर पक्षाची सदस्य नोंदणी गावपातळीपर्यंत झाली पाहिजे. जळगाव जिल्ह्यात आम्ही प्रयत्न करतोय. आजपर्यंत चाळीस हजार सदस्य झाले आहेत. गावपातळीपर्यंत सदस्य झाल्यानंतर त्यांच्या माध्यमातून मग वन बूथ थर्टी यूथ योजना आम्ही राबवली. जळगाव जिल्ह्यात आम्ही सुरूवात केली आहे, की एका बूथवर ३० तरी सक्रीय सदस्य असले पाहिजेत. तशी सुरूवात करा. तीस नाही झाले तरी चालतील, दहा करा, पण ते सक्रीय असले पाहिजेत. निव्वळ सक्रीय नव्हे, तर त्याच्यामध्ये समाजातल्या प्रत्येक स्तरातला घटक असला पाहिजे. गावपातळीवर ज्यावेळी बूथ रचना होईल आणि त्यामध्ये जेव्हा विविध धर्माचे, पंथाचे लोक असतील तर मग ती संघटना गावपातळीवर मजबूत होईल. त्यानंतर मग त्यांना ट्रेनिंग देणं, गावपातळीवरच्या रचना करणं, गावपातळीवर अध्यक्षाची निवड करणं, महिला आघाडीची अध्यक्षा करणं, ३५ आघाड्या आहेत आणि असं ठरवलं की दहा आघाड्यांचे आपण प्रमुख केले आणि दहा आघाड्यांचे पंधरा सदस्य त्याठिकाणी नियुक्त केले, तर यामध्ये विविध जातीचे लोक असतात. त्यातून सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग होतो आणि तो आपण केलाच पाहिजे.

प्रत्येक समितीची बैठक महिन्यातून एकवेळ तरी झाली पाहिजे. बूथची रचना झाली की तालुक्याची रचना केली पाहिजे. ही रचना झाल्यानंतर तालुक्याचे अध्यक्ष आहेत, आघाड्या आहेत. अनेक जिल्हा सरचिटणीस, कार्याध्यक्षांना पक्षाने आपल्याला काय जबाबदाऱ्या दिल्या आहेत हे सांगता येत नाही. कोणताही पदाधिकारी नियुक्त करत असताना त्या पदाला त्यानं न्याय दिलाच पाहिजे. तर त्या पदावर राहण्याचा नैतिक अधिकार त्याला आहे. हे धरुन आपण

चाललं पाहिजे. पक्षानं दिलेला कार्यक्रम, आंदोलनाचं काम जबाबदारीनं पार पाडलं पाहिजे. पक्षाने आदेश दिला म्हणून कार्यक्रम केले, निदर्शनं केली. याला अर्थ नाही. आंदोलनं अशी झाली पाहिजेत, की त्याचा दबाव बसला पाहिजे. नावापुरते कार्यक्रम होता कामा नये. प्रभाव असला पाहिजे आणि त्यादृष्टिनं कार्यकर्त्यांनी कामाला लागलं पाहिजे. स्वत:हून काही कार्यक्रम, आंदोलनं केली पाहिजेत. स्थानिक समस्यांवर आंदोलनं झाली पाहिजेत. आपण चर्चा करण्यामध्ये कमी पडतो. सरकारला बदनाम करायचं असेल तर महागाई आहे, भ्रष्टाचार आहे, अनेक प्रकरणं आहेत यावर रान उठवलं पाहिजे. एक विषय हाती आला, की सतरा ठिकाणी बडवला पाहिजे. आता खोक्याचा विषय आहे. शंभर मुखांनी एका दिशेने बोलाल त्यावेळी बदनामी होईल. वातावरण तयार होईल.

पक्षामध्ये सुसंवाद असला पाहिजे. विसंवाद असता कामा नये. पक्षानं आदेश दिला तर मग एका दिशेने चला. गटबाजी असल्यास पक्ष कधीच पुढं जाणार नाही. यामुळं पक्षाचा विस्तार होणार नाही. प्रत्येकानं आपल्या आघाडीचं काम जबाबदारीने केली पाहिजे. प्रवास, संपर्क, संवाद महत्त्वाचा आहे आणि त्याचा संघटनेला उपयोग होईल. पक्ष मजबूत करायच्यादृष्टिनं संघटनेशिवाय पर्याय नाही. माननीय शरद पवार साहेबांसारखा उत्तुंग नेता, दूरदृष्टीचा नेता आपल्याकडं आहे, ज्याला महाराष्ट्रातच नव्हे तर अखख्या भारतात त्याचा सन्मान आहे, मान आहे. योग्य पद्धतीनं पक्षबांधणी केली नसल्यामुळं अडचणी येत आहेत. सर्व क्षेत्रापर्यंत आपण जोपर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत पवार साहेबांचं स्वप्न साकार होणार नाही.




# सत्ताधाऱ्यांकडून समाजात दुफळी माजवण्याचं काम सुरु आहे

**डॉ. जितेंद्र आव्हाड**

अल्पसंख्याक विभाग आणि गृहनिर्माण या दोन विषयांवर बोलण्यासाठी मला बोलवलेलं आहे. प्राचीन लोकशाही कुठे आली असा एक प्रश्न काल उपस्थित करण्यात आला होता. तर या भारतातले पहिले बंडखोर संत बसवेश्वर महाराज यांनी लिंगायत समाजाची जेव्हा स्थापना केली, तेव्हा स्त्रियांचं आरक्षण आणि कलेक्टिव्ह थिंकिंग म्हणजे सामुदायिक विचार करणं आणि त्यातनं लोकशाही निर्माण करणं हे पहिल्यांदा जगाच्या पाठीवर जर कोणी सांगितलं असेल तर ते बसवेश्वर आण्णांनी सांगितलं.

मायनॉरिटीज म्हटलं तर याचा जन्म स्वातंत्र्यानंतरचा आहे. मायनॉरिटीज किंवा अल्पसंख्याक म्हटलं, की आपण मुसलमान असं समजतो. पण फक्त मुसलमान नाही, तर इतर अनेक धर्म आहेत, शिख आहेत, ख्रिश्चन आहेत, पारशी आहेत, अनेक धर्म आहेत, जे मायनॉरिटीजमध्ये गणले जातात. पण गेल्या काही वर्षांमध्ये मायनॉरिटीज म्हणजे मुसलमान आणि बहुसंख्याक म्हणजे हिंदू असं एक वर्गीकरण या देशामध्ये सुरू झालंय. मी अल्पसंख्याक मंत्री असताना माझ्या हातून अल्पसंख्याक समाजाचं जर कुठलं मोठं काम झालं असेल, शिक्षण, स्कॉलरशीप, शादीखाना हे सगळं होत राहतं, पण सर्वात महत्त्वाच्या होत्या त्या त्यांच्या जमिनी. ज्या




वक्फअंतर्गत नोंदणी झालेल्या होत्या. मी त्या मंत्रालयाचा ताबा घेतल्यानंतर पवार साहेबांशी चर्चा केली आणि वक्फ जमिनींच्या कायमचा सातबाऱ्यावरती वक्फ अशी नोंद करावी, जेणेकरून कोणालाही त्या जमिनी विकता येणार नाही असा एक कायदा महाराष्ट्रात अंमलात आणला.

आज देशात आणि महाराष्ट्रात अनेक वक्फ जमिनी धनाढ्यांनी ताब्यात घेतलेल्या आहेत. त्याला या कायद्यानं आळा बसणार आहे. आज देशात जे चालू आहे, खास करून उत्तर भारतामध्ये या देशाला पोषक नाहीये. ज्या पद्धतीनं बिल्किस बानोवरती बलात्कार करणाऱ्यांना सोडण्यात आलं आणि त्याला राज्य तसेच केंद्र शासनानी परवानगी दिली आणि त्याच्यात एक वाक्य आहे, की ज्यांनी हे केलं त्यांना जगण्याचा अधिकार आहे. प्रश्न उलटा विचारला पाहिजे, की बिल्किस बानोच्या घरातल्या चौदा जणांना मारण्यात आलं, त्याच्यात दीड ते अडीच्या वर्षाच्या तिच्या मुलीला जाळण्यात आलं, मग या चौदा जणांना जगण्याचा अधिकार होता का नव्हता. पण अशा पद्धतीनं धर्म मध्ये आणून, ते ब्राह्मण आहेत, असं चुकीचं वागूच शकत नाहीत अशी वाक्यं उच्चारून अशा गुन्हेगारांना आपण संरक्षण देणार असू तर समाजात दुफळी माजल्याशिवाय राहणार नाही. संविधानाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा दिली होती आणि जर संविधानाचा आपण आदर करतो शासन म्हणून, आणि शासनामध्ये येताना शपथ घेतो, की मी या संविधानाची रक्षा करीन तर त्या रक्षा करणाऱ्यांनी बिल्किस बानोच्या प्रकरणात असं वागणं योग्य नव्हतं हे ठामपणानं राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी उघडपणानं सांगावं लागेल.

मुसलमानांनी मुसलमानांची बाजू घेतल्यानंतर त्याला धार्मिक रंग येतो. पण आपल्यासारख्या धर्मनिरपेक्ष विचारांचा पाठपुरावा करणाऱ्या लोकांनी जर ही बाजू घेतली तर त्याला नक्कीच महत्त्व प्राप्त होतं. महिन्यातला एक दिवस तरी असा येतो, की या देशातल्या मुसलमानांना तुमच्या या देशावरील प्रेमाचा दाखला दाखवा असा एक प्रश्न उभा राहतो. मुसलमानांनी पण या ट्रॅपमध्ये आले नाही पाहिजे. अहो, दिलाय ना एकदा. फाळणीच्या वेळी जिनांनी आपल्यासाठी स्वतंत्र देशाची स्थापना केल्यामुळे तुम्ही माझ्याबरोबर चला असे सांगितले, त्यावेळी आमचे या मातृभूमीवर प्रेम आहे असं सांगत करोडो मुसलमान या देशात राहिले. याच्यापेक्षा दुसरं मोठं सर्टिफिकेट मुसलमानांनी देशप्रेमाचं काय द्यावं.

मी म्हाडामध्ये असताना साहेबांनी सांगितलं, की अल्पसंख्याक समाजाला दहा टक्के आरक्षण म्हाडाच्या प्रत्येक कॉलनीत दिलं पाहिजे. मुंबईचा रंग हा बहुरंग आहे. प्रत्येक समाजाची लोकं गुण्यागोविंदानं राहत होती. आता आपण मुस्लिमबहुल भाग विचारात घेतो. मुसलमान असुरक्षित झाला आहे. पण, माझा मतदारसंघ असलेल्या मुंब्र्यात सुरक्षित वाटत असल्यामुळे महाराष्ट्रातून मुसलमान याठिकाणी येत आहेत. पुढचा विचार केला, तर या देशामध्ये जात समुहांची घरं निर्माण होतायंत, हे विसरून चालणार नाही. अजूनही आरक्षणाशिवाय दलितांना मुंबईत घरं मिळतायंत का हा विचार प्रत्येकानी करायला हवा. मी मुंबई याच्यासाठी सांगतोय, कारण मुंबई ही महाराष्ट्राचा चेहरा आहे. जे मुंबईत घडतं, त्याची देशात प्रतिक्रिया उमटते. म्हाडाचा विचार केला, तर मुंबईतल्या सर्वात जास्त जागा म्हाडाच्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चाळीतल्या दोन खोल्यांमध्ये राहून शोषितांच्या उद्धाराचं काम केलं. जगात ज्या ज्या ठिकाणी शोषण केलं जाईल, तिथं तिथं डॉ. आंबेडकरांचं नाव घेतलं जाईल. कारण शोषणाविरुद्ध जगामध्ये एवढ्या ताकदीनं उभा राहिलेला दुसरा माणूस कुणीही नाही. त्याचं नाव फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे.

जे काल आपण ऐकलं, की नेहरू, गांधी आणि आंबेडकर यांना वेगळं करून चालणार नाही. हे सत्य आहे. संविधानाची मसुदा समिती ज्यावेळी निर्माण करण्यात येत होती, त्यावेळी समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकरांना करा हे महात्मा गांधींनी नेहरूंना सांगितलं होतं. ज्यानं शोषण अनुभवलं आहे, शोषणाविरुद्ध लढा दिला आहे, तोच भारताचं संविधान लिहू शकतो असं महात्मा गांधी म्हणाले होते. जगभरातल्या संविधानांचा, धर्म पुस्तकांचा अभ्यास करून डॉ. आंबेडकरांनी भारताचं संविधान लिहिलं आणि आजच्या घडीला जगातलं सर्वश्रेष्ठ संविधान कुठलं असेल तर ते भारताचं संविधान आहे. ■■



# राष्ट्रवादीचा कार्यकर्ता आरोग्यदूत व्हावा

**राजेश टोपे**

आरोग्य संस्था आणि त्यासमोरील आव्हानं या विषयावर मला विचार व्यक्त करायला सांगितले आहे. आपण राजकारण करतो आहोत आणि राजकारणातून आपल्याला समाजाची सेवा करायची आहे. राजकारण पवार साहेबांच्या विचारातून सांगायचं म्हटलं, तर राजकारण हे समाजकारणाचं उत्तम साधन आहे यादृष्टीनं आपण राजकारणाकडं पाहतो. आणि म्हणूनच आपलं ब्रीदवाक्य जे आहे, की ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण आणि म्हणून आरोग्यसेवा हीसुद्धा एक खऱ्या अर्थानी समाजसेवेतलाच एक महत्त्वाचा भाग आहे. म्हणून माझं आज आपल्या सगळ्यांना एवढंच सांगणं आहे, की राजकारणात यशस्वी होण्यासाठी अनेक आपले लोकसुद्धा, आरोग्याच्या क्षेत्राची मदत घेवून लोकप्रियता मिळवतात, मतदान मिळवतात, आणि खूप मोठ्या पद्धतीनं यशस्वी होतात. महत्त्वाचं म्हणजे आरोग्य सेवेचा उपयोग सुद्धा आपण राजकारणाच्यादृष्टीनं करून घेतला पाहिजे. उद्या सगळ्या स्थानिक स्वराज संस्थांमध्ये आपल्याला निवडणुका लढवायच्यात, आमदारकीच्या असतील, खासदारकीच्या असतील या सगळ्यामध्ये आरोग्य सेवेतलं कार्य हे निश्चितप्रकारे अविस्मरणीय कार्य असतं. लोकांना आरोग्य क्षेत्रात केलेली मदत कधीही विसरली जात नाही.

आरोग्य सेवेला थोडं दुय्यम महत्त्व राज्य सरकारमध्ये दिलं जातं. परंतु, कोरोनानी बऱ्यापैकी डोळे उघडवले. केंद्र सरकारपासून राज्य सरकारांपर्यंत अनेकांनी आरोग्य क्षेत्राकडे अधिक लक्ष द्यायला सुरूवात केली. उद्याच्या निवडणुकीला आपण सक्षमपणे सामोरे जात असताना कोरोनामध्ये महाविकास आघाडीनं केलेलं कार्य ओझरतं एवढ्याचसाठी याठिकाणी सांगेन, की साधारणपणे डब्ल्यूएचओ असेल, केंद्र सरकार असेल, नीती आयोगानं महाविकास आघाडी सरकारला योग्य पद्धतीनं काम झाल्याचं प्रशस्तीपत्र दिले आहे. आरोग्य सेवेचा मोठ्या प्रमाणात विस्तार केला गेला. पायाभूत सुविधा वाढवल्या. हे काम आपण लोकांपर्यंत पोहोचवलं पाहिजे. मला आनंद याचा आहे, की आदरणीय पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य माणसाच्या खिशाला कात्री लागू नये या दृष्टिकोनातून आपण विशेष प्रयत्न केले. हॉस्पिटलपासून मास्कपर्यंत सर्व गोष्टींचे दर कमी ठेवून लोकांचे पैसे वाचविले. इतर राज्यांनीही आपला आदर्श घेवून काम केलं.

साधारण फोर एच्या माध्यमातून आरोग्य सेवेचं काम केलं जातं. यामध्ये परवडणारी आरोग्य सेवा देणे, सहजरित्या उपलब्ध होणे, मान्य होणारी आणि योग्य दर्जा असणारी सेवा देण्याचं काम केलं जातं. सगळ्यांच्या दृष्टिकोनातून आपल्याला खर्च लागू नये असा काळजीचा विषय असतो. देशातील साडेतीन ते पाच टक्के लोक दरवर्षी दारिद्र्यरेषेखाली लोटले जातात. याला कारण म्हणजे आरोग्य सेवेवर होणारा अधिकचा खर्च, म्हणजेच आऊट ऑफ पॉकेट खर्च. त्यासाठी उपाय म्हणजे राज्य सरकारांनी, केंद्र सरकारने यामध्ये अधिक खर्च केला पाहिजे, जेणेकरून जनतेच्या खिशातला अधिकचा खर्च वाचेल. देशाचा जवळपास ५५, तर महाराष्ट्राचा ५० टक्के खर्च आऊट ऑफ पॉकेट आहे. अन्य देशांमध्ये हे खर्च तेवढे नाहीत. कमी आहेत. केरळ, तमिळनाडूमध्येही कमी आहेत. त्यामुळं सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातलं सर्वात मोठं आव्हान कुठलं

असेल तर आपल्याला स्वत:च्या पॉकेट एक्सपेन्शनचा खर्च आरोग्य सेवेचा कमी केला पाहिजे. आदरणीय अजितदादा उपमुख्यमंत्री होते आणि त्यांच्याकडं अर्थखात्याची जबाबदारी असल्यामुळं आरोग्य सेवेतील फोर एच्या दृष्टिकोनातून काम करायला खूपच मोलाची मदत झाली. दोन-अडीच वर्षाच्या काळात आम्ही जे काम केलं त्यामुळं ताट तयार आहे म्हणजे सगळ्या गोष्टी उपलब्ध झाल्या आहेत. प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे, माझ्या गावात उपकेंद्र असावं, माझ्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र असावं, शहरी भागातल्या प्रत्येकाला वाटतं, की आपल्या भागात अर्बन प्रायमरी केंद्र असावं या सगळ्यांसाठीची व्यवस्था साडेसात हजार कोटी रूपये हुडकोकडून दोन टक्के व्याजानं आपण घेतले असून, आगामी काळात मंजूर झालेल्या या कामांना आता कुठेही अडचण राहणार नाही. ही व्यवस्था आपल्या सरकारनं केली. पण हे सांगितलं पाहिजे. आता काय होईल तर या कामांची उद्‌घाटने आताचे सरकार करेल. पण ही कामं आपण केली आहेत यासंबंधीची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली पाहिजे. आरोग्य सेवेतला मनुष्यबळाचाही प्रश्न मार्गी लागला असून, आज कुठेही रिक्त जागा राहिलेली नाही.

लोकांचा आरोग्य सेवेवरील खर्च कमी करण्यासाठी अनेक योजना आहेत. तुम्ही त्याची अंमलबजावणी करावी. याचा लाभ सर्व निवडणुकांमध्ये झाल्याशिवाय राहणार नाही. उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी सगळ्यांची मोफत तपासणी केली जाते. कम्युनिटी हेल्थ ऑफिसर हा तीन गावांसाठीच्या एका उपकेंद्रावर डॉक्टर असतो. त्याचा उपयोग करून घ्या. २४ तासांत रिपोर्ट येतात. दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे, गव्हर्मेंटच्या कुठल्याही हॉस्पिटलमध्ये मोफत औषधे असतात. कुठेही पैसे भरण्याची गरज नाही. तिसरी गोष्ट, आपण जे निर्णय घेतलेले आहेत ते जे लोकांना सांगण्याच्या दृष्टिकोनातून आहेत. आतापर्यंत रक्त हे पैसे भरूनच मिळत होतं सरकारी दवाखान्यांमध्ये सुद्धा. पण मला आठवतंय, की कोरोनाच्या काळात साहेबांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर घेतलं होतं, आणि त्यादिवशी आम्ही घोषणा केली, की इथून पुढं कुठल्याही सरकारी दवाखान्यामध्ये रक्ताला पैसे घेतले जाणार नाहीत. मोफत रक्त देण्याची व्यवस्था केली. सगळ्या डायग्नॉसिसची सेवा आतापर्यंत जिल्हा किंवा विभागाच्या ठिकाणीच मिळायची. आता जिल्हा, तालुका पातळीवरील ५० खाटांच्या दवाखान्यांमध्ये डायलेसिस असेल, सीटी स्कॅन असेल, एमआरआय असेल या सर्व सेवा सरकारी दवाखान्यांमध्ये असणार. यासाठी खर्चाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. हॉस्पिटल्सची संख्या मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली. वैद्यकीय सेवा आणि वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीत आपल्या सरकारने अनेक चांगले निर्णय राबविले. अशा आपण केलेल्या गोष्टीही सांगितल्या पाहिजेत. आरोग्य सेवेच्या बाबतीत कोणतीही नवीन गोष्ट कळाली, की आपण ती लगेच करण्याच्या दृष्टिकोनातून व्यवस्था करत होतो. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून ताईंच्या पुढाकारानं एक मोठं वर्कशॉप झालं होतं, आणि सगळ्यात लोकप्रिय योजना आहे. तुमच्या माहितीसाठी सांगतो, १७०० कोटी रूपये आपण एका चेकनी यूनायटेड इंडिया इन्श्यूरन्स कंपनीला देतो आणि हेल्थ इन्श्यूरन्सच्या माध्यमातून ९७७ गोष्टींवर याचा लाभ होतो. जर तुम्हाला राजकारणात यशस्वी व्हायचं असेल, तर या गोष्टींची माहिती असलीच पाहिजे. जिल्हा तसेच तालुका समन्वयकांचे फोन नंबर आपल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडे असले पाहिजेत. दीड लाख रूपये खर्चापर्यंतच्या सगळ्या गोष्टी मोफत करून घेतल्या पाहिजेत. लोकांना त्याचा लाभ करून दिला पाहिजे.

३० वर्षाच्या वरील सर्व लोकांसाठी आता नॉन कम्युनिकेबल डिसीसेज म्हणजे यामध्ये डायबेटिस येतो, रक्तदाब, हृदयाशी संबंधित आजार येतात, अर्धांगवायू, कॅन्सर या सगळ्यांची माहिती आपल्या सर्वांना असलीच पाहिजे आणि त्याच्यावरील उपायही जाणून घेतले पाहिजेत. या सगळ्या आजारांवरील तपासण्या आणि उपचार सरकारी दवाखान्यांमध्ये मोफत आहेत. कॅन्सर डिटेक्शनच्या व्हॅन आपण प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंत उपलब्ध करून दिली आहे. आपल्या सरकारने हे निर्णय घेतले आहेत आणि ते लोकांपर्यंत पोहोचवलं पाहिजे. आपल्या प्रत्येक कार्यकर्त्यानं ही जागृती केली पाहिजे. त्याचा परिणाम आपल्या मतदानावर झाल्याशिवाय राहणार नाही. अवयवदान हासुद्धा एक महत्त्वाचा विषय आहे. सात अवयवांच्या माध्यमातून ब्रेन डेड झालेले सात जीव वाचविता येवू शकतात. ऑर्गन काढण्यासाठीची सेंटर्स आम्ही वाढवली. ट्रान्सप्लांट करण्याची केंद्रे वाढवली. खूप मोठ्या पद्धतीनं या क्षेत्रामध्ये काम करता येवू शकतं. अवयव प्रत्यारोपणामध्ये महाराष्ट्र आता देशात एक नंबरचं राज्य ठरलं आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा दहा कलमी कार्यक्रम आहे. तो आपण लक्षात घेतला पाहिजे. मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्रासाठी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यानं काम करण्याची आवश्यकता आहे. रक्तदानासाठीही आपल्या पक्षानं लक्ष घातलं पाहिजे. महिलांमधील गंभीर आजार म्हणजे ॲनिमिया. त्यासाठी ॲनिमियामुक्त महाराष्ट्र. टीबीमुक्त महाराष्ट्र, मुलं आणि महिलांचे मानसिक आरोग्य, नॉन कम्युनिकेबल डिसीज, दिव्यांगांना प्रमाणपत्र मिळवून देणे, राष्ट्रीय बाल सुरक्षा अभियान, धर्मादाय हॉस्पिटल्सची यादी जवळ बाळगणे, महात्मा जोतिबा फुले आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेची माहिती घेणे अशा गोष्टी राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी प्राधान्याने समजून घेतल्या पाहिजेत आणि राष्ट्रवादी पक्षाचा आरोग्य दूत अशी पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याची ओळख निर्माण व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

■■



# सर्व महाराष्ट्र साहेबांच्या मागे उभा करण्याचा संकल्प करूया

**धनंजय मुंडे**

हे राज्याचे अधिवेशन आहे. अतिशय मजेशीर परिस्थितीमध्ये होत आहे. तीन महिन्यांपूर्वी आपण सत्तेत होतो. तीन महिन्यांनंतर आपण विरोधी पक्षात आहोत. ज्यावेळेस सत्तेत होतो, त्यावेळेस सत्ता कशी आली याचा विचार करत होतो. त्याच्याअगोदर निवडणूक कशी झाली याचा विचार करत होतो. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा असं घडलं असेल, की महाराष्ट्राच्या जनतेनी २४ तारखेला महाराष्ट्राचा कौल दिला. तो कौल होता भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या युतीला. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढली आणि आपण विरोधी पक्ष म्हणून काम करणार अशी आपली मानसिकता होती. पण जसं मराठवाड्यात म्हण आहे, की होत्याचं नव्हतं आणि नव्हत्याचं होतं होणं, ती मराठवाड्याची खरी म्हण जर देशाच्या लोकशाहीमध्ये महाराष्ट्रात जर कुणी खरी करून दाखवली असेल, तर मला अभिमानानं सांगावसं वाटतं, आदरणीय पवार साहेबांनी या महाराष्ट्रात होत्याचं नव्हतं आणि नव्हत्याचं होतं करून दाखवलं. म्हणून अडीच वर्षाची आपल्याला लॉटरी लागली. ही वस्तुस्थिती आहे.

त्या गोष्टीचा राग, संताप अडीच वर्षे ज्या १२० आमदारांना सोबत घेऊन भारतीय जनता पार्टी सहन करत होती ते कधी ना कधी बाहेर येणार हे कळत होतं. शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्रानं तीन महिन्यापूर्वी झालेला सत्तातरांचा एकंदर घटनाक्रम पाहिला तर माझ्यासारखा एक छत्रपती शिवाजी महाराजांचा अनुयायी, पुरोगामी महाराष्ट्रात काम करणारा राष्ट्रवादी काँग्रेसचा एक कार्यकर्ता, ज्यावेळेस इतिहास बघतो छत्रपती शिवाजी महाराजांचा त्यावेळी हा इतिहास सांगतो, की जर स्वराज्य टिकवायचं असेल, तर भलेही गुजरातचं सुरत लुटलं तरी चालेल. पण आपलं स्वराज्य टिकलं पाहिजे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी आम्हाला शिकवलं आणि आज तीन महिन्यापूर्वी एक घटनाक्रम असा झाला, की ज्यामध्ये शिवसेना फोडून म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचं शिव फोडून महाराष्ट्राच्या सिंहासनावर बसण्यासाठी अख्खा महाराष्ट्र पूर्णपणानं सुरतेला जाऊन लोटांगण घातलं. याच्यासारखी महाराष्ट्राच्या इतिहासात दुसरी कुठलीही दुर्दैवी घटना नाही. काल काहीजणांच्या भाषणांमध्ये केंद्र सरकार कसं चाललंय हे सांगितलं. एक लक्षात घ्या, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्याबाबतीत जर आज विचार केला, तर त्यांच्याकडं जे मास्टरकार्ड अनेक वर्षांपासून या देशाच्या राजकारणात ते खेळण्यासाठी वापरत होते, ते मास्टरकार्ड आता राहिलेलं नाही. राम मंदिर झालंय, ३७० झालंय, आता राहिलंय फक्त एक्स्ट्रिम हिंदुत्व आणि यामध्ये कुठल्या ना कुठल्या कारणावरून दोन धर्मामध्ये वाद चालू ठेवायचे आणि आपल्या राजकारणाची पोळी भाजायची. आज जे मोदी साहेबांचं आणि भारतीय जनता पार्टीचं राजकारण चालू आहे ते राजकारण यासाठी नाही, त्यांना पर्सेप्शन काय करायचंय यासाठी नाही, तर स्वातंत्र्यापूर्वीच्या निवडणुकीमध्ये ज्या भारतीय जनता पार्टीचं आणि संघाचं कुणीच नव्हतं तो इतिहास त्यांना पूर्णपणानं जाळून टाकायचांय. स्वातंत्र्यानंतर या स्वतंत्र भारताच्या उभारणीमध्ये ज्यांनी ज्यांनी आपलं योगदान आणि आपल्या देहाची आहुती दिली, त्यांचासुद्धा इतिहास जाळून टाकायचांय. भविष्यात हा भारत यांच्यामुळंच घडला, यापूर्वी कुणाचंही योगदान नाही या पद्धतीनं त्यांचं राजकारण चालू आहे. हा विषय माझ्या मनात येतो, त्यावेळी

मातब्बर शायर राहत इंदौरी साहेबांचा एक शेर आठवतो, आज जे चाललंय त्यानुसार, ये सब धुवाँ हैं, आसमान थोडी हैं, लगेगी आग तो आयेंगे घर कई जब्दमें, वहाँ पर हमारा मकान थोडी हैं. मैं जानता हूँ की दुष्मन भी कम नहीं हैं, लेकीन हमारी तरह हथेली पे उनकी जान थोडी हैं, जो आज साहेबी मस्नत हैं, कल नहीं होंगे, किरायेदार हैं, जाती मकान थोडी हैं, सभी का खून हैं शामील यहाँ के मिट्टी में, किसी के बाप का ये हिंदुस्ताँ थोडी हैं. कदाचित कालच्या एकूण वक्त्यांमध्ये जर त्यांचं सर्व भाषण संकलन करून चार ओळीत मांडायचं असेल, तर ते फक्त राहत इंदौरी साहेबांच्या या शायरीमधूनच आपण मांडू शकतो. मजेशीर चाललंय. राज्यामध्ये सरकार तर असं मजेशीर आहे, मध्ये दिवाळी साजरी झाली. अनेक आमदार शेतकऱ्यांच्या बांधावर होते. शेतकऱ्याचा कापूस गुडघ्याएवढ्या पाण्याखाली होता. अख्खी जमीन पाण्याखाली होती, अतिवृष्टी झाली, पूर आला होता. शेतकऱ्याच्यासमोर एवढं मोठं संकट होतं, की त्या संकटात वाटलं होतं, की नव्यानं आलेलं हे ईडीचं सरकार काहीतरी करील. पण त्यांनी घोषणा केली. मिळालं काहीच नाही. शेतकऱ्याची दिवाळी सुखात गेली नाही. पण शेतकऱ्याच्या प्रति ज्या प्रतिनिधीच्या मनात कळवळा आहे, त्यांनीसुद्धा दिवाळी सुखानं साजरी केली नाही. म्हणून आजच्या या राज्य अधिवेशनामध्ये माझी हात जोडून कळकळीची विनंती आहे, की खऱ्या अर्थानं या महाराष्ट्रातल्या नवीन सरकारला जर इशारा द्यायचा असेल, तर या शिर्डीच्या साईबाबाच्या या पवित्र ठिकाणावरून आपण देऊ, की ओला दुष्काळ जाहीर करा. जोपर्यंत करत नाहीत, तोपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षसुद्धा स्वस्थ बसणार नाही आणि गरज पडली तर तुम्हाला रस्त्यावरसुद्धा फिरू देणार नाही.

संघर्ष पुन्हा करावा लागणार आहे. फॉक्सकॉन का गेलं. त्याच्याबद्दल खरं काय, खोटं काय हे दादांनी पण भाषणात सांगितल्या. फॉक्सकॉनचे दोन प्रकल्प होते. एका प्रकल्पाची घोषणा तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी केली होती आणि हा प्रकल्प येणार आणि ॲपलचा मोबाईल काढणार असं सांगितलं होतं. ते फॉक्सकॉन परत गेलं. त्याच्यानंतर वेदांताच्या सोबत फॉक्सकॉन आलं, त्याच्यामध्ये दादांनी काही गोष्टी सांगितल्या. पण वस्तुस्थिती ही आहे, किती पैसा आपल्या राज्यात येणार होता, ते जरी बाजूला सारलं, तरी माझ्यासारख्या एका तरूणाला वाटतं, की कमीत कमी महाराष्ट्रातल्या दीड लाख आमच्या मुला-मुलींना तिथं नोकरी लागली असती. आज महाराष्ट्रातला तो युवक, ती युवती त्या नोकरीपासून मुकली आहे. म्हणून या बेरोजगारीच्या संदर्भातसुद्धा याच अधिवेशनामध्ये ठराव करावा, आणि जोपर्यंत दीड लाख नोकऱ्या हे राज्यातलं सरकार देत नाही, तोपर्यंत राज्यातल्या सरकारला राष्ट्रवादी युवक काँग्रेस कुठल्याही मंत्र्याला रस्त्यावर फिरू देणार नाही. याबाबतसुद्धा संघर्षाची भूमिका आपल्याला घ्यावी लागणार आहे.

शेवटी आपण शिर्डीतून काय घेऊन जाणार आहोत. बाबाचा प्रसाद, आशीर्वाद घेतला. दोन दिवस आपण सोबत राहिलो. प्रकल्प कुणामुळे गेले यावर भविष्यात चर्चा होईलच. पण या सगळ्या परिस्थितीमध्ये राज्यात फक्त चाळीस आमदार सरकार चालवत आहेत आणि हे चाळीस आमदार सुरतेहून गुवाहाटीला आणि गुवाहाटीवरून गोवामार्गे जे मुंबईत आले ते. त्याच्या पलिकडं आज काही नाहीये. मला तर कळालं की काल मुख्यमंत्र्यांच्या सगळ्या बैठका रद्द झाल्या आणि मुख्यमंत्री ठाण्याकडे गेले. म्हटलं पुन्हा ठाण्यामार्गे सुरतेला जातायंत की काय. पण आलबेल चाललेलं नाही एवढं तरी आपल्या सगळ्यांना माहिती आहे. जर हे आलबेल चाललं नसेल, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला या महाराष्ट्रातल्या १२ कोटी जनतेसाठी या सरकारच्या विरोधात येणाऱ्या प्रत्येक काळात त्यांनी जे जे केलं नाही त्याच्याविरोधात रस्त्यावर यावं लागेल, लढावं लागेल तरच खऱ्या अर्थानं आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते समजू. मी काही दिवसांपूर्वी दिल्लीला गेलो होतो. दिल्लीतल्या अनेक भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांशी माझे संबंध आहेत. साहेबांवर प्रचंड प्रेम. त्यांनी मला विचारलं, की धनंजय तुम्ही पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करत आहात. ते एवढे मोठे नेते आहेत, की त्यांच्या नावाने दिल्लीही हलते. तर त्यांच्यामागे संपूर्ण महाराष्ट्र उभा का राहत नाही. ज्या पद्धतीनं स्टॅलिनच्या मागे तमिळनाडू उभा राहतो, पटनाईकांच्या मागे ओडिशा उभा राहतो, ममतांच्या मागे पश्चिम बंगाल उभा राहतो, त्या पद्धतीनं पवार साहेबांच्या मागे महाराष्ट्र उभा का राहत नाही. याच देही आणि याच डोळी आपल्याला जर हे सत्य करून दाखवायचं असेल, तर २०२४चा या विधानसभेचा वर्ल्डकप आपल्यासमोर आहे. आपण हे स्वप्न साहेबांसाठी पूर्ण करून दाखवू. हा संकल्प, ही शपथ या शिर्डीच्या पवित्र मातीतून घेऊन आपण जाऊ, तरच काहीतरी आहे. आपल्या आपल्या भागात जाऊन आपल्याला सांगावं लागेल, एवढंच नाही तर हा महाराष्ट्र पूर्णपणानं आदरणीय पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठीमागं उभा करणं आणि शंभरच्या पुढं जागा आणून महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होऊन दिल्लीश्वराला दाखवणं हा आपण आज खऱ्या अर्थानं संकल्प केला पाहिजे. महाराष्ट्रातले लोकसुद्धा सांगतात, की हे खोक्यामुळं सरकार आलेलं आहे. दुसरं कुठलंही कारण नाही, आणि एकदम ओके आहे. आज जरी तुम्ही ओके म्हणत असाल, तरी मला असं वाटतं, की हे सरकार आणखीही ओके नाही. महाराष्ट्रातल्या जनतेच्या मनात तर बिलकुल हे सरकार ओके नाही. त्याचा फायदा नक्कीच आपण राजकीय पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं घेतला पाहिजे. संकल्प करा, की साहेबांच्या डोळ्यादेखत उभा महाराष्ट्र हा साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठीमागं आहे ही शपथ घेऊनच आपण या ठिकाणाहून निघावं. ही विनंती करतो.

■■



# हिंदू-मुस्लिमांमध्ये समन्वयाचे काम राष्ट्रवादी पक्षच करु शकतो

**सुभान अली शेख**

आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या या मंथन शिबिरात माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला मुस्लिम समाजाचे प्रश्न वास्तविकपणे मांडण्याची जी संधी दिली त्याबद्दल मी त्यांचं मनस्वी आभार मानतो, की हे फक्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच घडू शकते, की एक सामान्य कार्यकर्ता येऊन, तळागाळातला कार्यकर्ता येऊन त्याच्या समाजाच्या भूमिका मांडू शकतो. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. हनुमान चालीसा या धार्मिक उपासनेचा वापर राजकीय हेतूनं काही पक्ष करत होते. त्याच काळात औरंगाबाद, पुण्यात काही वाहनांमध्ये हत्यारं सापडली होती आणि तेव्हा अल्पसंख्याक समाजामध्ये एक भीती होती, की आता कसं होणार. दंगली घडतील काय. तेव्हा महाविकास आघाडी सरकारमधील गृहमंत्री यांनी ज्या पद्धतीनं हे प्रकरण हाताळलं त्यासाठी मी समाजाच्यावतीनं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं आभार व्यक्त करतो. सध्याच्या सरकारने ज्यावेळी धार्मिक स्थळांवरील लाऊडस्पिकर बंद करण्याचा निर्णय घेतला गेला, त्यावेळी शिर्डीतील मुस्लिम समाजाने प्रशासनाकडं जाऊन आम्ही भोंगे बंद करतो, पण साईबाबांची काकड आरती बंद करू नका अशी विनंती केली. त्याबद्दल मी येथील हिंदू आणि मुस्लिम समाजातील लोकांचं अभिनंदन करतो. महाराष्ट्रातल्या मराठी मुस्लिमांची ही जी भूमिका होती, समाजात समन्वय निर्माण करण्याची त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे, त्याबद्दल मराठी मुस्लिमांचं अभिनंदन केलं पाहिजे.

मुस्लिम समस्या हा विषय मला दिलेला आहे. बहुजन चळवळीतून मी येथे आलो आहे. आपल्या महामानवांच्या विचारांचं समाज आणि राज्य आलं पाहिजे यासाठी आमचा प्रयत्न आहे. काही लोक राजकारणात धर्माचा वापर समाजात तेढ निर्माण करण्यासाठी करतात. पण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी धर्माचा वापर, धर्माचे उपदेश, महापुरूषांचे उपदेश समाजाला जोडण्यासाठी करते. तोडण्यासाठी करत नाही. मला त्या लोकांना सांगायचं आहे, की तुम्ही धर्माचा वापर समाजात तेढ निर्माण करण्यासाठी करू नका. कारण वाराणशी येथील संकटमोचन हनुमान मंदिराचे जे महंत आहेत, त्यांनी सांगितलं, की धार्मिक आचरण ही व्यक्तीगत बाब आहे. रस्त्यावर येऊन प्रकट करण्याची बाब नाही. त्यांना याचं दु:ख झालं.

मुस्लिमांच्या समस्या समजून घ्याव्या लागतील. दोन्ही समाजात समन्वय निर्माण झाला पाहिजे या दृष्टिकोनातून हा विषय मांडण्याची संधी मला जयंत पाटील साहेबांनी दिली. बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक यामध्ये समाज विभागला जातो. अल्पसंख्याक आणि मुस्लिम ही वेगळी परिभाषा आहे. मुस्लिम मायनॉरिटी अफेअर्स आणि मुस्लिम अफेअर्स इथं गोंधळ होतो. धार्मिक अस्मितेचे जे विवादित मुद्दे आहेत ही मुस्लिमांची समस्या आहे असं दाखवलं जातं. मंदिर-मस्जिद, हिंदू-मुस्लिम, लव्ह जिहाद, घरवापसी या मुस्लिमांच्या समाज म्हणून समस्या नाहीत. असं असतं तर बहुसंख्याकांच्या सामाजिक समस्या म्हणून याच

मुद्यांचा वापर झाला असता. पण बहुसंख्याकांचे जे मुद्दे आहेत, गुजरातमध्ये पाटीदार, महाराष्ट्रामध्ये मराठा समाज आरक्षणासाठी संघर्ष करतोय. शेतकरी नुकसानभरपाई मिळावी म्हणून आंदोलन करतायंत. बेरोजगार रोजगारासाठी आंदोलन करतायंत. म्हणजे बहुसंख्याक अॅज अ हिंदू जर त्यांचा अस्मितेचा मुद्दा असला तरी, पण समाज म्हणून त्यांच्या समस्या वेगळ्या आहेत. तसंच मुस्लिम समाजाचं.

अल्पसंख्याक धर्म म्हणून जर तो मुस्लिम असला तरी समाज म्हणून त्याच्या समस्या वेगळ्या आहेत. वेगवेगळ्या आयोगातून त्या समोर आल्या आहेत. सुरूवातीला आम्ही शिक्षण, आरक्षण या समस्या मांडायचो. पण आता क्रम बदलला आहे. मुस्लिमांच्या संविधानिक अधिकारासाठी मागणी करण्यात येत होती. पण आज त्या मुस्लिमांच्या सुरक्षेची मागणी करावी लागत आहे. मुस्लिम समाज संरक्षण मागतोय. भारतीय जनता पार्टीचं सरकार आल्यानंतर ज्या घटना घडत आहेत, त्यामध्ये मुस्लिमांना टार्गेट केलं जात आहे. मॉब लिंचिंग होत आहे. खोट्या गुन्ह्यांमध्ये त्यांना अडकवण्यात येत आहे. शिक्षण, आरक्षण तर मिळालंच पाहिजे. पण आम्ही सुरक्षित असलो पाहिजे याची जर कुणी शाश्वती देत असेल तर किती बरं होईल. मी राष्ट्रवादी पक्षाची घटना वाचलेली आहे. संविधानिक अधिकाराची जर सुरक्षा करायची असेल तर राष्ट्रवादी ती करू शकते. ही पार्टी या संविधानावर निष्ठा ठेवते आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी ती वचनबद्ध आहे. अल्पसंख्याक असो किंवा बहुसंख्याक असो, ज्या संविधान अधिकाराच्या रक्षणाची तुम्ही चर्चा करत आहात तर ते तुमचे अधिकार मिळवून देण्याचं काम फक्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच करू शकते. कर्मवीर भाऊराव पाटलांनी जी देशभक्तीची व्याख्या आम्हाला दिलेली आहे, ते म्हणतात, देशावर प्रेम करणं म्हणजे देशातील दगड-धोंड्यांवर प्रेम करणं नाही तर देशात राहणाऱ्या माणसावर प्रेम करणं आहे. ही आमची श्रद्धा आहे बांधवांनो. ६ ते १४ वर्षे वयोगटातील २५ टक्के मुस्लिम मुलं शाळेतच जात नाहीत आणि हा मुस्लिम समाजाचा शैक्षणिक स्तर आहे. गेले तर मध्येच शाळा सोडून देतात. ड्रॉपआऊटचं प्रमाणे ३५ ते ४० टक्के आहे. २५पैकी एक मुलगा पदवीधरापर्यंत जातो. म्हणजे चार टक्के पदवीधर होतात आणि केवळ २ टक्के पीजी होतात. मुस्लिम धार्मिक आहेत. शिक्षणाबद्दल उदासिन आहेत असं बोललं जातं. असं अजिबात नाही. लोकनीतीचा प्रॅक्टिसिंग रिलीजनवर एक सर्व्हे आहे. त्यामध्ये त्यांनी ३० टक्के हिंदू, २९ टक्के मुस्लिम, ४५ टक्के ख्रिश्चन, ३५ टक्के शिख लोक धार्मिक आचरण करतात असं म्हटलं आहे. काहीसे धार्मिकमध्ये ५९ टक्के हिंदू आणि ५७ टक्के मुस्लिम लोक आहेत. मुस्लिम लोक फार कट्टर आहेत हे मीडियावर दाखवले जाते. संविधानानं मुस्लिम समाजाला समानतेचा अधिकार दिला आहे. समान विकास, धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. पण याचं समर्थन कसं करायचं यावरून बहुसंख्याकांची कुठेतरी फसगत होतेय असं मला वाटतं. अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न आणि विकास बहुजन समाजाशी समन्वय ठेवल्याशिवाय सुटू शकत नाहीत आणि बहुसंख्याक समाजाची प्रगती अल्पसंख्याक समाजाला सोबत घेतल्याशिवाय होत नाही हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. भारतीय समाज हा एक शरीर आहे आणि या शरीरातल्या एका भागाचा विकास होत नसेल तर त्या शरीराचा विकास होतोय असं आपण म्हणत नाही. त्याला आपण अपंग म्हणतो. तसं जर भारतातल्या सगळ्या जाती-धर्माचा एकत्रित विकास झाला तर त्यालाच विकास म्हणता येईल.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात मुस्लिम लोकांना धार्मिक स्वातंत्र्य होतं. तसं आज आहे का? आपली जर संविधानावर निष्ठा असेल, मुस्लिम समाजातील महिलेने स्वत:हून हिजाब परिधान करण्याचा निर्णय घेतला असेल तर आपण त्याला संविधानाचा आदर म्हणून त्या आस्थेचा आदर केला पाहिजे. धार्मिक आचरणाला का पायबंद घातला जात आहे. त्याला संविधानाने स्वातंत्र्य दिले आहे ना. दोन्ही समाजामध्ये समन्वय निर्माण झाला पाहिजे. मुस्लिम समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केले जात नाही. मुस्लिम समाज कुणाशीही कमिटेड नाहीये, तो फक्त शांतता आणि संविधानाची रक्षा करणारा आणि कायद्याचं राज्य आणणारा असा कोणता पक्ष असेल तर त्यांच्यासोबत येण्यासाठी तयार आहे. गरज आहे त्यांना सांगायची की आदरणीय पवार साहेबांनी १९९९मध्ये हे कमिटमेंट केलेलं आहे, की संविधानामध्ये ज्या ज्या घटकाला जे जे अधिकार मिळाले आहेत, ते अधिकार मिळवून देणं हे राष्ट्रवादी पक्षाचं कर्तव्य आहे. याद्वारे आपण मुस्लिम समाजाला जोडू शकतो.

■■



# हिंदू-मुस्लिम द्वेषाचे वातावरण तयार करून भाजप सत्तेत

**खासदार कुमार केतकर**

२००४मध्ये संयुक्त आघाडीचं सरकार सत्तेमध्ये आलं आणि डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान झाले. २००४मध्ये जे बहुमत संयुक्त आघाडीला मिळालं होतं, त्याच्यापेक्षा जास्त बहुमत २००९मध्ये संयुक्त आघाडीला मिळालं आणि ते सरकार पुन्हा आलं. मग असं काय घडलं, ज्या सद्यस्थितीबद्दल आपण बोलतोय, त्या सद्यस्थितीचा याला संदर्भ आहे, २००४ला बहुमत असून, २००९ला बहुमत असूनसुद्धा एकदम २०१४मध्ये एवढा मोठा खड्डा आपल्या बहुमतात का पडला, कशामुळे पडला आणि इतके जर आपण अलोकप्रिय होतो, आणि इतकं जर मोठ्या प्रमाणात यूपीए सरकार भ्रष्ट होतं, तर मग ते २००४ आणि २००९मध्ये इतक्या बहुमतानं कसं निवडून आलं. याचा थोडक्यात अर्थ असा, की ज्या काही खऱ्या खोट्या घटना असतील, त्याच्याबद्दलचा अतिशोयक्तपूर्ण प्रचंड प्रचार करून एक यंत्रणा हातात घेऊन, मला तर विचाराल तर नरेंद्र मोदींचं २०१४चं बहुमत आणि त्यांची राजवट ही सरळ बहुमतानं आलेली नाही.

प्रत्यक्षात पाहिलं तर त्यांना ३१ टक्के मतं आणि २८२ जागा मिळालेल्या होत्या, पण याचाच अर्थ असा, की त्यावेळेलासुद्धा ६९ टक्के लोकांनी मोदींना किंवा मोदीप्रणित भाजपला मते दिली नव्हती. मोदीप्रणित भाजपला असं म्हणण्याचं कारण हे, की भाजप १९९८-९९लाही सत्तेत होती आणि २००४मध्ये मात्र ती हरली. १९९८-९९मध्ये त्यांच्याकडं फक्त १८२ जागा होत्या आणि मतं फक्त २३ टक्के होती. तरीसुद्धा वाजपेयी पंतप्रधान झाले होते. २००४मध्ये त्यांनी असा प्रचार केला होता, की एका बाजूला वाजपेयींसारखं उत्तुंग, तेजस्वी व्यक्तिमत्त्व आणि दुसऱ्या बाजूला संयुक्त आघाडी, जी कनवाळू आहे, ज्यांच्याकडं निश्चित नेता नाही, ज्यांचा निश्चित पंतप्रधान नाही आणि ज्या महिलेचं नाव ते घेतायंत पुढारी म्हणून त्या महिलेला देशही धड माहिती नाही आणि हिंदी भाषाही येत नाही. प्रत्यक्षात काय घडलं ते आपल्याला माहिती आहे.

२००४मध्ये त्या उत्तुंग व्यक्तिमत्वाचा आणि त्यांच्या पक्षाचा दारूण पराभव झाला. त्याच्यानंतर डॉ. मनमोहनसिंग यांनी सगळ्या खात्यांमध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेतले. असं असतानासुद्धा जे काही भ्रष्टाचाराचे आरोप खरे-खोटे, अतिशोयक्तीपूर्ण करण्यात आले ते २०१०पासून करण्यात आले. ज्यावेळी मी म्हणतो, की ते कट कारस्थानानी घडलं, त्याचं कारण असं आहे, की त्याचवेळेला काही आंतरराष्ट्रीय शक्तींच्या माध्यमातनं इजिप्तनं एक प्रचंड आंदोलन घडवण्यात आलं. दोन वर्षातच तिथली राजवट लयाला घालवली गेली आणि त्यानंतर झालेल्या निवडणुकीत आंदोलनातली किंवा त्यांच्या मदतीनं सत्तेवर आलेल्या लोकांना सहा महिनेसुद्धा धड राज्य करत आलं नाही. या थेरीचं नाव रिजीम चेंज असं आहे. म्हणजे जी शक्ती, विचारसरणी आणि धोरणं आपल्याला मान्य नाही असं काही देशांना वाटतं ते देश ही विचारसरणी पूर्णपणे दूर करण्यासाठी जे धोरण वापरतात त्याचं नाव रिजीम चेंज असं आहे. त्याप्रमाणं इजिप्त, इराक, लिबिया अशा पद्धतीने त्यांनी त्यांचे हितसंबंध

जपण्यासाठी, खनिज तेलासाठी जगभर रिजीम चेंज केला. त्यांचा डोळा आता भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेवर होता. भारतात १३५ कोटी लोकसंख्येपैकी ६० टक्के लोक मध्यमवर्गीय आहेत आणि हे मार्केट जर आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी आपल्या विचारसरणीची आणि धोरणाची सत्ता असली पाहिजे असं मानणारे जे देश आहेत त्या लोकांनी हा रिजीम चेंज करायचा ठरवला होता. यूपीए सरकारच्या धोरणांमुळे आपल्याला भारतावरती व्यापारी सत्ता चालवता येणार नाही हे त्यांना माहित होते. भारतावर राज्य केलेल्या ईस्ट इंडिया कंपनीचंच हे आधुनिक रूप आहे.

जर त्यांच्या व्यापारी धोरणानुसार एखाद्या राज्यात सत्ता येत नसेल तर ते हत्याकांडही घडवून आणू शकतात. आपल्याकडे पुलवामाचं प्रकरण २०१९च्या निवडणुकीच्या जरासं आधी घडलं. त्याच्यामध्ये आपले ४० ते ४२ जवान ठार मारले गेले. त्याच्याआधारे जणू काही राष्ट्र धोक्यात आहे असं भासवून आपल्या पंतप्रधानांनी बालकोटमध्ये हल्ला करून ३५० पाकिस्तानी मारल्याचं सांगितलं. त्याचा पुरावा कोणीच दिला नाही. जणू काय आपण पाकिस्तानवर हल्ला केल्याच्या तोऱ्यात मोदींनी २०१९च्या निवडणुका लढवल्या. एवढी मोठी सुरक्षा भेदून पुलवामा घडलं. पुलवामा घडवून आणलं की घडलं या दोन्ही बाबतीत सरकार गुन्हेगार आहे. भाजपनेच नेमलेल्या गव्हर्नरने याची चौकशी झाली पाहिजे असं सांगितलं. पण ती कधी झाली नाही. मुद्दा असा, की २०१९च्या निवडणुकीपूर्वीची वर्तमानपत्रं किंवा ओपिनियन पोल पाहा, त्यामध्ये मोदींना बहुमत मिळणं जवळजवळ शक्य नसल्याचे दाखवत होते. पुलवामा आणि बालकोट हल्ल्यानंतर २०१४मध्ये २८२ जागा मिळालेल्या भाजपला खात्री नसताना ३०३ जाग मिळाल्या. याचा अर्थ दोन होतात, की पुलवामा आणि बालकोट हल्ला हा कटकारस्थानाचा भाग होता आणि दुसरं या ३०३ जागा मिळवण्यासाठी षडयंत्र राबवलं गेलं होतं. निवडणुकीनंतर मतदारसंघनिहाय स्थितीसंदर्भात निवडणूक आयोगातर्फे जाहीर करण्यात येणारी पूर्ण माहिती अजूनही उपलब्ध करण्यात आलेली नाही. यावरूनच हा विजय घडवून आणल्याचं स्पष्ट होतं. २०१४मध्ये जो आपण रिजीम चेंज घडवून आणला होता, तो २०१९मध्ये गडबडण्याची शक्यता वाटल्याने त्यांनी पुलवामा, बालाकोट, निवडणुका आणि तो डेटा अशी ती चेन आहे. हा आरोप खोटा असेल तर त्यांनी सगळी आकडेवारी द्यावी. सरकारसुद्धा या आंतरराष्ट्रीय कटकारस्थानाचा एक घटक आहे. यूपीएमध्ये लोक एकत्र येऊ नयेत हासुद्धा या कटाचा भाग आहे. हा सगळा कटकारस्थानाचा कारखाना २००९पासून सुरू झाला.



ते असं भासवतात, की सगळ्या देशाचा त्यांना पाठिंबा आहे आणि भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस किंवा एनडीए आणि यूपीए या दोनच राष्ट्रीय आघाड्या आहेत. तेसुद्धा खरं उदाहरण नाही. कारण, केरळ, तेलंगणा, आंध्र, पाँडिचेरी, बंगाल, पंजाब, तामिळनाडूमध्ये भाजपचे अस्तित्वच नाही. नॉर्थ ईस्टमध्ये निवडून आलेल्या लोकांना खरेदी करून राज्ये स्थापन केली. असं असताना तुम्ही राष्ट्रीय पक्ष किंवा राष्ट्रीय आघाडी म्हणूच शकत नाही. दक्षिणेकडील राज्यांत त्यांना नव्यानं घरं बांधायची आहेत. त्यामुळे केवळ गुजरातमध्येच प्रकल्प जात नाहीत, तर काही प्रकल्प तामिळनाडू, तेलंगणा आणि आंध्रमध्ये देतायंत. कारण त्यांना असं वाटतंय, की दक्षिणेकडून जर दगा मिळाला, तर पुन्हा आपलं सरकार यायला अडचण होईल. याचा अंदाज त्यांच्याकडचे दुसरे चाणक्य म्हणून स्वत:ला मानतात ते आरएसएसचे मोहन भागवत अधूनमधून सरकारविरोधी सूर लावतात, की जे सरकारविरोधी आहेत त्यांनासुद्धा वाटतं, की मोहन भागवतांचं मत बदललं. पण ते तसं नसतं. त्यांचा एक सूर कायम आहे आणि तो त्यांनी सातत्यानं ठेवला आहे. २००८पर्यंत प्रत्येक वर्तमानपत्रात इस्लामी दहशतवाद्यांसंदर्भात एकतरी बातमी पहिल्या पानावर असायची. आता त्या बातम्या येत नाही. कारण त्या बातम्यांचं उद्दीष्ट पूर्ण झालं आहे. कटकारस्थान करणाऱ्यांचा मुख्यत: देशात इस्लामविरोधी वातावरण तयार करायचं होतं आणि त्याद्वारे लोकांवर पकड मिळवायची हा त्यांच्या रणनीतीचा भाग होता.

तुम्ही पाहिलंत तर मोदी समर्थकही सांगतात, की आम्हाला मोदींचे विकासाचे धोरण, नोटबंदी, जीएसटीसारखे निर्णय पसंत नाहीत. पण, पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी आम्हाला मोदी हवे आहेत. काँग्रेस आणि यूपीएने मुसलमानांचे खूप लाड केले आहेत. आम्हाला मोदींचे विचार आवडत नाहीत. पण मुसलमानांना धडा शिकवण्यासाठी ते एकमेव नेते आहेत. हिंदू-मुस्लिम तणाव वाढविण्याबाबतचा कटाचा भाग त्यांनी

पूर्ण केलेला आहे. मोदी सरकारनं ज्या प्रकारचा खर्च आणि नियोजन आणि व्यवस्थापन ते रेग्युलर आर्मी, नेव्ही, एअरफोर्सवर करतात, त्याच प्रकारचं नियोजन, व्यवस्थापन आणि खर्च हा ट्रोलिंग आर्मी म्हणजेच सोशल मीडियावर करतायंत. लोकांच्या मनात द्वेष निर्माण केल्यानंतर बाकी राजकारण नाही केलं तर चालतं हे त्यांना माहित झालं आहे. त्यामुळं तरूण पोरं पेट्रोल कितीही महाग झालं तरी चालेल पण पाकिस्तानला धडा शिकवल्याशिवाय आम्ही मोदींना सोडणार नाही असं उत्साहानं टीव्हीवर सांगत होती. त्यांनी तरूणांच्या डोक्यामध्ये जो व्हायरस सोडला आहे, की ते तुमच्या पाठीमागं येणारच नाहीत.


२०१४च्या निवडणुकीपूर्वी सर्वत्र संयुक्त आघाडी सरकारला ३५०पर्यंत जागा मिळतील अशी चर्चा सुरू असताना पंतप्रधानपदासाठी शरद पवार, मुलायमसिंह यादव, मायावती अशी नावेही घेतली जात होती. पण आपला विजय निश्चित असल्याचा भास निर्माण झाल्यामुळे संयुक्त आघाडीत एक प्रकारचा राजकीय आळस निर्माण झाला आणि त्या व्हॅक्युमचा फायदा उठवत त्यामध्ये हिंदू-मुस्लिम राजकारण घुसवण्यात आलं. मोदींनी आपल्या प्रचारात याचाच वापर करून सत्ता मिळवली. २०१२पासून तरूण वर्ग एकदम हिंदू-मुस्लिमांविषयी बोलू लागला. याचं कारण सोशल मीडियामध्ये प्रचंड गुंतवणूक करून त्यांनी तरूण मुलं घेतली सॉफ्टवेअर इंजिनिअर्समधली. एक-एक लाख रूपये पगार देऊन त्यांना ट्रेनिंग दिलं जातं, की ट्रोलिंग कसं करायचं, खोट्या बातम्या कशा तयार करायच्या. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण अशा कोणाहीविरूद्ध खोट्या नाट्या गोष्टी व्हॉट्सॲपवरती प्रसूत करायच्या आणि त्याच्या आधारे मन कलुषित करण्याचे प्रयत्न झाले. स्वातंत्र्य चळवळीत आरएसएस किवा मोदींच्या पक्षातलं कोणीच नव्हतं. पण या चळवळीचा इतिहास बिघडवून टाकण्यात आला. आरएएसने ब्रिटिशांना कशा प्रकारे मदत केली हे आता उघड झालं आहे. स्वातंत्र्य चळवळ ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मोदींच्या नेतृत्वाबद्दल भारतीय जनता पक्षात जेवढा असंतोष आहे, तेवढा कुठल्याच पक्षात पाहायला मिळणार नाही. त्यांनी एक प्रकारचे दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. यासाठी समाजामध्ये सातत्याने हिंदू-मुस्लिम द्वेषाचं वातावरण ठेवण्याचं शस्त्र त्यांना मिळालं आहे. आता पुन्हा भारत जोडो यात्रेमुळे त्यांना भीती वाटायला लागली आहे. त्यामुळे त्यांनी यात्रेची बदनामी सुरू केली आहे. नफरत छोडो आणि महागाई, बेरोजगारी यांसारखे मुद्दे यात्रेत असल्यामुळे त्याला सर्वांचाच मोठा प्रतिसाद मिळत आहे. यूपीएतील पक्षांना एकत्र येऊ न देण्यासाठी तपास यंत्रणांचा गैरवापर केला जात आहे. मीडिया यंत्रणाही ताब्यात घेतली आहे. त्यांच्याविरूद्ध बातम्या दिल्या जात नाहीत. मोदींना प्रोटेक्ट करण्याचं काम सुरू आहे. २०२४च्या पार्श्वभूमीवर आता समान नागरी कायद्याचा प्रश्न पुढे आणला आहे. असं म्हणतात, की पाण्यामध्ये राहून माशाशी वैर करू नये. हे खरं असलं तरी तो जर खायला आला तर वैर करणं भाग आहे. आपली अवस्था आत्ता ती आहे. आपल्यातील विभागणी, हितसंबंध आणि उणिवा लक्षात घेऊन तो राज्यावर येतोय. आत्ता आपण म्हणू शकतो, की तो याला त्रास देतोय, त्याला त्रास देतोय, ज्यावेळी आपल्या दाराशी येईल तो शत्रू, त्यावेळी आपल्याला वाटेल की आपण विचार करायला हवा होता. त्यांना माहित आहे, की आपल्याला सिंपल मेजॉरिटी मिळाली की आपण बुलडोझर चालवू शकतो, आपल्या घरावर बुलडोझर यायच्या आत आपल्याला जागं व्हायला पाहिजे आणि ते झालो नाही तर बुलडोझर आल्यावर आपण जागे राहायला जीवंत नसणार. धन्यवाद!

■■



**राहूल गांधींच्या 'भारत जोडो' यात्रेत खासदार सुप्रियाताई सुळे व डॉ. जितेंद्र आव्हाड सहभागी झाले होते.**



# महाराष्ट्राची मजबुतीनं बांधणी करण्याची गरज

**मधुकर भावे**

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि त्यानंतरची महाराष्ट्राची बांधणी असा व्यापक विषय मला दिलेला आहे. हे शिबिर शिर्डीत होत आहे आणि याठिकाणी श्रद्धा आणि सबुरी हे दोन शब्द महत्त्वाचे आहेत. श्रद्धा कशाची? तर हा महाराष्ट्र गांधी, नेहरू, यशवंतराव, पवार साहेब यांच्या विचारांनी पुन्हा एकदा पुरोगामी पद्धतीनं, मजबुतीनं उभा करावा याविषयावर श्रद्धा ठेऊन कार्यकर्ता उभा आहे म्हणून ती श्रद्धा आहे आणि त्याकरता जो लागणारा काळ आहे, त्याकरता जी लागणारी मेहनत आहे, प्रयत्न आहेत, त्याच्याकरता भूमिका घेऊन पुरोगामी विचारांवर घट्ट राहून भूमिका घेण्याची तयारी आहे, त्याच्याकरता लागणारा वेळ ही सबुरी आहे. त्यामुळे श्रद्धा आणि सबुरी हे या शिर्डीतून बाहेर जाताना आपल्याला मे २०२४ आणि ऑक्टोबर २०२४ या दोन्हीचा मुकाबला करण्याचा प्रयत्न साधायचा आहे आणि तो प्रयत्न या शिबिरात होईल असं मी मानतो.

संयुक्त महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्राची जी पुढची बांधणी आहे, त्यासंबंधीचे उल्लेख मला करायचे आहेत. तीन संदर्भ महत्त्वाचे असून, ते आपण डोळ्यासमोर ठेवले पाहिजेत. येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला महाराष्ट्राचा पुरोगामीपणा संबंध देशाला दाखवायचांय. म्हणून उमेदवार कोण, त्याची जात काय या विषयाची चर्चा न करता एक वातावरण असं तयार करा, की संयुक्त महाराष्ट्राच्यावेळी वातावरण तयार झालं होतं. लोकांनी उमेदवार पाहिला नाही, जात पाहिली नाही, पक्ष पाहिला नाही. फक्त संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, या एका घोषणेला साथ देणाऱ्या उमेदवाराला लोकांनी निवडून दिलं. असं वातावरण आपण ज्यादिवशी तयार करू, त्यावेळी जगातली कुठलीही शक्ती महाराष्ट्राला पराभूत करू शकणार नाही. कार्यकर्ते, लोकांना हे पटवून द्या. आज महाराष्ट्राची मानसिकता तयार झाली आहे. परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही. फक्त कार्यकर्त्यांनी हिमतीनं उठलं पाहिजे. चळवळीतनं माणसं जेव्हा उभी राहतात आणि एक रान पेटवल्यासारखं वातावरण आपण तयार करू शकतो.

२०१४ सालापासूनची महागाई, बेकारी, दोन कोटी रोजगाराची घोषणा, प्रचंड प्रमाणात फसवणूक, खोटी आश्वासनं, खोटी चर्चा. या सगळ्याचा परामर्श करून गावागावात कार्यकर्त्यांच्या टीम करा, नुसतं हे शिबिर घेऊन भागणार नाही. एक शिबिर आठवतं. महाबळेश्वरमधील १९६१च्या शिबिरात तीनपट लोक होते. तीन दिवसांचं शिबिर. राजकीय कार्यकर्ता तयार होण्यासाठी दहा ते पंधरा वर्षे काम करावं लागतं. महाबळेश्वराच्या शिबिरात असा कार्यकर्ता तयार झाला. नेत्यांची भाषणं, त्यांनी केलेली विषयाची मांडणी आणि त्यातून तयार झालेला कार्यकर्ता हे सगळं पाहयला मिळालं. म्हणून उद्याच्या महाराष्ट्रात चुकीच्या लोकांकडे आपण पुन्हा राज्य देणार आहोत का हा प्रश्न मनाला विचारा.

काय राज्य आहे आजचं? एका मंत्र्यानं उपसचिवाला काम सांगितलं होतं आणि ते झालं नाही. त्यावर उपसचिवाने जीआर आडवा येत असल्याचं सांगताच तो मंत्री जीआरला घेऊन ये मी



मुंबईतील हुतात्मा चौकात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या वेळी झालेली प्रचंड गर्दी.

त्याला सांगतो असं म्हणाला. हाफकीन इन्स्टिट्यूटचा प्रॉब्लेम होता, तर त्या हाफकीनला घेऊन ये, मी चर्चा करतो असं म्हणतात. कोण, कुठे, कोणत्या जागेवर बसलेत. कोणाचा कोणाला पायपोस नाही. महाराष्ट्राची जी परंपरा होती, मंत्रीमंडळ होते, निर्णय होते, ते अठरा कायदे महाराष्ट्रात होते, जे या महाराष्ट्राने मंजूर केले आणि ते या देशाने स्वीकारलेले कायदे आहेत. तो हा महाराष्ट्र आहे. भाषिक राज्य होताना या महाराष्ट्राला एकट्याला लढावं लागलं. सगळ्या देशाला भाषावार प्रांतरचना मिळाली. याचा निर्णय केवळ ६० साली झाला नाही. पंडित नेहरूंच्या अगोदर महात्मा गांधींनी १९२१च्या नागपूरमधील अधिवेशनात भाषिक राज्यांचा ठराव मांडला आणि सांगितलं, की भाषिक राज्यं एकत्र केल्यानंतर ग्रामीण आणि शहरी भागाचा संवाद चालू राहील. म्हणून भाषिक राज्य आवश्यक आहे. पुढच्या २८ सालच्या अधिवेशनात पंडित नेहरूंनी भाषिक राज्यांचं समर्थन केलं होतं.

मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार हे महाराष्ट्रातल्या मराठी माणसाला सहन होणं शक्यच नव्हतं आणि त्यातूनच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहिली ती ५५-५६मध्ये आणि त्याच काळात गोवा मुक्तीचीही चळवळ उभी राहिली. गोवा मुक्तीच्या चळवळीचा सगळा भार महाराष्ट्राच्याच खांद्यावर होता. पुण्यातूनच सत्याग्रहींची तुकडी पाठवली जात होती. एकीकडे गोव्यासाठी आणि दुसरीकडे संयुक्त महाराष्ट्रासाठी महाराष्ट्र लढत होता असा एक वेगळा संगम पाहायला मिळाला. १९५७ साली संयुक्त महाराष्ट्र समितीचा दिल्लीत मोर्चा निघाला. महाराष्ट्रातून एक लाख लेकुरवाळ्या बायका गेल्या होत्या. आज त्या माणसांना काय मिळालं नाही, त्यांनी काय मागितलं नाही. शाहीर अमर शेख, गव्हाणकर, आत्माराम पाटील, गजाभाऊ या सगळ्या माणसांनी चळवळ अंगावर घेतली. कंदिलाच्या उजेडात लाखभर माणसांपर्यंत पोहोचेल असा शाहीर शेख यांचा जाग मराठाचा आवाज. अंगावर काटा यायचा. चिंतामणराव देशमुखांनी मुंबईत झालेल्या गोळीबाराच्या निषेधार्थ अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर चळवळीला मोठं बळ मिळालं. त्याचवेळी १५ नोव्हेंबर ५६ला आचार्य अत्रे यांनी सुरू केलेल्या मराठा वर्तमानपत्रामुळे दुसरी ताकद मिळाली. सेनापती बापट यांनी नाव सुचवले होते.

पण त्या काळात काँग्रेसला अप्रियपणा येण्याचं कारण म्हणजे मोरारजी देसाई यांनी स्वीकारलेल्या भूमिका. गोळीबारात १०५ माणसं मारली गेली आणि त्यामुळं महाराष्ट्र पेटून उठला होता. दिसेल त्याला गोळी मारली. त्यामध्ये ७३ कामगार आणि शेतकरी होते. त्यातूनच १ नोव्हेंबर १९५६ला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. मला गोळीबार करून राज्य चालवायचं नाही, या यशवंतरावांच्या एका वाक्याने लोकांचा संताप अर्ध्यावर आला. त्या काळापासूनच महाराष्ट्राच्या बांधणीची सुरूवात झाली. विरोधी पक्षांचं सहकार्य मिळालं. आज विरोधी पक्ष म्हणजे शत्रू. याच्याविरूद्ध आपण बोलणार आहोत की नाही. हे घाणेरडं वातावरण महाराष्ट्रात कोण निर्माण करतंय. एका राष्ट्रीय

पक्षाचा अध्यक्ष जाहीरपणे सांगतो, की पुढच्या निवडणुकीत देशात विरोधी पक्ष शिल्लक राहणार नाही. फक्त भाजपचं राज्य निर्माण होईल. मग कोणत्या लोकशाहीची चर्चा आपण करतोय. कोणत्या हुकुमशाहीकडे आपण चाललेलो आहोत हे प्रश्न विचारा. दुर्दैवानं आज प्रश्न विचारले जात नाहीत. आम्ही पत्रकारांनीही नांग्या टाकलेल्या आहेत. बहसंख्य वृत्तपत्रं आज भाजपच्या नावावर पाणी भरतायंत. बहुसंख्य वाहिन्या भाजपच्या नळावर पाणी भरतायंत. भरू द्या. लोक उघड्या डोळ्यांनी सगळं पाहतायंत आणि ज्यावेळी माणूस शांत असतो त्यावेळी तो अधिक धोकादायक होतो.

आज महाराष्ट्रातली माणसं गप्प बसली आहेत. निवडणुकीची वाट पाहतायंत, ज्या दिवशी निवडणूक होईल त्यावेळी हा संतप्त झालेला माणूस आपली प्रतिक्रिया व्यक्त केल्याशिवाय राहणार नाही आणि हे लोकांना सांगितलं पाहिजे, की तुम्ही बोला. रस्त्यावर या. म्हणणं मांडा. पण, ईडी, बिडी, थ्रीडी अशी सगळं साधनं वापरून आज देशात जो धिंगाणा चालू आहे हे लोकशाहीच्या सरकारला शोभणारं नाहीये. या महाराष्ट्राची जी बांधणी झाली, ती पूर्ण विस्कटून टाकण्याचा कार्यक्रम सुरू झाला आहे. यशवंतरावांपासून काय बांधणी झाली, तर महाराष्ट्रात आणि देशात ज्या जिल्हा परिषदा निर्माण झाल्या, त्याची सुरूवात महाराष्ट्रात झाली. गुजरातमध्ये एक वर्ष आधी जिल्हा परिषद अस्तित्त्वात आली. पण त्याचा अध्यक्ष कलेक्टर होता. यशवंतरावांना हे मान्य नव्हतं. त्यांनी लोकांमधून निवडून आलेला अध्यक्ष असावा असं सांगितलं आणि १३ मार्च १९६२ रोजी महाराष्ट्रात लोकांमधून निवडून आलेला अध्यक्ष जिल्हा परिषदेवर बसवला. जिल्हा परिषदेची संकल्पना महाराष्ट्राने स्वीकारली आणि देशामध्ये रूजवली. एमआयडीसी, रोजगार हमी केवढी बांधणी आहे महाराष्ट्राची.

रोजगार हमीसाठी तर पैसे उभे करण्यासाठी विरोधी पक्षांनी कर बसवण्याचा सल्ला दिला. जगाच्या पाठीवर असे उदाहरण सापडणार नाही. हा महाराष्ट्र आहे. तुला संपवून टाकतो, बघून घेतो ही भाषा नव्हती त्यावेळी. विधानसभेत एकमेकांवर तुटून पडणारे विरोधी पक्षाचे नेते कँटिनमध्ये सत्ताधारींच्या खांद्यावर हात टाकून जाताना आम्ही बघितले आहेत. आज महाराष्ट्र त्यापासून खूप लांब चाललेला आहे. देशात एक तोडफोड कंपनी तयार झालीय. त्या कंपनीचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर दिल्लीत आणि कार्यकारी अधिकारी मुंबईत सागर बंगल्यात बसतात. सरकार पाडण्याचं काम लोकांचं आहे. तुम्ही कसं पाडता. कीव येते या राजकारणाची. महाराष्ट्रात आज गलिच्छ पद्धतीचं राजकारण सुरू आहे. या सगळ्या परिस्थितीचा विचार करून तरूणांना एक वेगळी दिशा देण्याची गरज आहे. आज एक नाराजी लोकांमध्ये आलेली आहे. आपल्याला काय करायचंय अशा विचारांची माणसं जागोजागी भेटतात. म्हणून आपल्या प्रत्येकाची ही जबाबदारी आहे, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जशी एका दिवसांत झाली नाही, तशीच आपल्यालाही ही सगळी बांधणी एका दिवसात करता येणार नाही. जयंतराव, तुम्ही तालुका पातळीवर शिबिरं घ्या. कार्यकर्त्याला विश्वासात घ्या, त्याला बोलू द्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लढा दिलेलीच लोकं पुढे नेते झाले आणि त्यांनी महाराष्ट्राची बांधणी केली. अशा शिबिरातूनच, मंथनातूनच नेते तयार होत असतात. तुम्ही सगळे जण खूप मेहनत घेत आहात. एका शब्दावर देशातला कुणीही माणूस उभा राहू शकेल असे पवार साहेबांसारखे नेतृत्व तुमच्याकडे आहे. देशातले ९० टक्के लोक प्रामाणिक आहेत. आम्ही त्यांना १०टक्केसुद्धा जागा देत नाही वृत्तपत्रात आणि १० टक्के चुकीच्या लोकांना जागा असते. हे चित्र ज्यावेळी बदलेल त्यादिवशी आम्ही महाराष्ट्रातलं वातावरण बदलायला सुरूवात करू शकतो. देशात वाढणारी महागाई, बेरोजगारी लोकांपुढं मांडा. धार्मिक उन्माद वाढवला जात आहे. वातावरण बिघडवून त्याचा राजकीय फायदा उठवण्याचं काम होतंय. पण आपण बोलत नाही. हा एका पक्षाचा प्रश्न नाही. हा लोकशाहीचा, संविधानाचा आणि उद्या हा देश कुणाच्या हाती राहणार या सगळ्या प्रश्नांची उत्तरं याच्याशी निगडित आहेत. म्हणून बोललं पाहिजे. सगळा देश ५०-६०वर्षांच्या त्यागावर उभा राहिलांय. गांधीजींना नथूच्या एका गोळीनं मारता आलं. पण गांधी विचार नाही मारता आले. गांधी, नेहरू तत्त्वज्ञान मरूच शकत नाही.

विचारांची दिशा बदलण्याची गरज आहे. हुरळून जाऊ नका, डोक्यावर घेऊ नका, निराश होऊ नका हे तीन मंत्र आचरणात आणले पाहिजेत. अजितदादा तुम्ही पुढाकार घ्या. तुमचा धाक आहे. कामाचा उरक आहे. कार्यकर्ते, नेत्यांना स्वत:च्या जाहिराती छापण्यापासून परावृत्त करून महापुरूषांच्या अभिवादनाचे पोस्टर लावायला उद्युक्त करा. देशाशी मी काय देणं लागतोय की नाही, कुठे चाललोय आपण आज. रूपया तळात गेला. आता आपले सगळे प्रकल्प गुजरातमध्ये चाललेत. त्यांच्याकडं एक प्रकल्प आहे ना. ५० आमदारांचं पुनर्वसन हा त्यांचा प्रकल्पच आहे. पण बोलत नाही कुणी. शाहीर शेखसारख्या अनेक माणसांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी आपली हयात घालवली. धार्मिक उन्माद एक दिवस आपला देश बुडवून टाकेल. त्याच्यापासून वाचवण्याचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. खूप मोठी माणसं होऊन गेली या देशात. त्यांनी घडवलेला महाराष्ट्र आपल्याला तुटू द्यायचा नाही, फुटू द्यायचा नाही. पुन्हा उभा करायचांय. तो उभा करण्याची ताकद तुमच्या पक्षामध्ये आहे. काँग्रेसलाही मी विनंती करेन. वेगळं लढण्याची भाषा आत्ता करू नका. शत्रू मोठा आहे. संघशक्तीचं बळ दाखवण्याची गरज आहे. एकजूट दाखवा. उद्या कुणी कितीही कोंबडं झाकून ठेवलं तरी पुरोगामी महाराष्ट्राचा सूर्य उगवणार आहे.

■■



# आर्थिक आघाडीवर देशात अत्यंत भयावह परिस्थिती

**प्रा. जे. एफ. पाटील**

अर्थकारणाची मांडणी करताना राजकारणापासून लांब जाता येत नाही. यासाठी संविधानाची जी मर्यादा आहे तीच मर्यादा प्रमाण मानली पाहिजे. आर्थिक धोरणाची जगभर सारखीच उद्दीष्टं असतात. आर्थिक धोरण अशा पद्धतीनं राबवावं, की ज्यामुळं त्या राष्ट्राची, समाजाची, व्यवस्थेची वृद्धी होईल. समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला, स्त्री-पुरूषाला रोजगाराची समान संधी मिळेल. देशाची किंमत पातळी ही अन्याय करणार नाही एवढ्याच वेगानं वाढेल. कायद्यानुसार सलग तीन तिमाही भाववाढीचा दर निश्चित केलेल्या ६ टक्के दरापेक्षा जास्त असेल, तर संबंधित समितीनं आणि रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनं सरकारला याचं स्पष्टीकरण तसेच भाववाढ नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना करावी लागेल, किती काळात हे करता येईल या सगळ्याचा अहवाल सादर करायचा असतो. पहिल्या तीन तिमाहीच्यानंतर हे झालं नाही. कोविडच्या भयंकर साथीत रिझर्व्ह बँकेला जे काही गरजेचे वाटले ते त्यांनी केलं त्यामुळे त्याकडं दुर्लक्ष करायला हरकत नाही असं स्पष्टीकरण देण्यात आलं. अलिकडेच मॉनिटरी पॉलिसी कमिटीची मिटिंग झाली आणि रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनी सांगितलं, की आम्ही सरकारला दिलेलं उत्तर खासगी आहे आणि ते जाहीर करता येणार नाही. पारदर्शी व्यवहाराचा दावा केला जात असताना समाजातील प्रत्येक नागरिकाला या देशात नेमकं चुकलं कुठं हे कळण्याचा मुलभूत हक्क आहे.

अशा अवस्थेमध्ये भाववाढ मर्यादित करणं हे आर्थिक धोरणाचं एक महत्त्वाचं उद्दिष्ट असतं. त्यानंतर तिसरं महत्त्वाचं उद्दीष्ट म्हणजे पूर्ण रोजगार. तुमच्या देशाच्या आर्थिक धोरणामुळं समाजातल्या प्रत्येक स्त्री-पुरूषाला प्रचलित वेतन दरावर त्याची काम करण्याची इच्छा असेल तर गुणवत्तेनुसार काम मिळालंच पाहिजे. शेवटचा जो निकष आहे, तो आंतरराष्ट्रीय पातळीवरचा आहे. शक्यतो अशा पद्धतीनं आर्थिक धोरण राबवावं, की देशाच्या चलनाचं अवमूल्यन करण्याची वेळ येणार नाही अशा पद्धतीची व्यवस्था राबवावी. हे निकष पाहता आत्ताचं चित्र काय आहे? पहिलं ग्रोथ रेटचा उल्लेख आहे. बऱ्यापैकी वृद्धी दर आहे. मधल्या काळात ९ टक्क्यांपर्यंत आपण पोहोचलो होतो. काही वर्षापूर्वी दोन आकडी वृद्धी दराची शक्यता व्यक्त केली जात होती. आता हा ग्रोथ रेट बराच कमी झाला आहे आणि आता तो वाढेल याची शक्यता स्पष्टपणे दिसत नाही. असं का व्हावं याचं आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. वृद्धी दराच्या निकषावर सध्याचं आर्थिक धोरण फारसं यशस्वी झालंय असं म्हणता येत नाही.

भाववाढ आम्हाला चार टक्क्यांच्या रेंजमध्ये ठेवता आली नाही. अलिकडच्या तीन तिमाहीमध्ये ते ठेवता आलं नाही आणि तरीदेखील आम्ही जे स्पष्टीकरण देतो ते सर्वसामान्य माणसाला उपलब्ध होईल अशी मात्र व्यवस्था करत नाही. माझ्यादृष्टीनं रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनी दिलेलं स्पष्टीकरण लोकशाही व्यवस्थेला विसंगत अशा पद्धतीचं आहे. रोजगाराच्या प्रश्नाकडं सर्वांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सध्या दिल्लीपासून मुंबईपर्यंत नियुक्तीची पत्रं देण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात

चालू आहे. आम्ही रोजगार निर्माण करतोय असा भास निर्माण करण्याचा प्रयत्न होतोय. यातनं खरोखरच कुणाला रोजगार दिले, केव्हाचे रोजगार दिले, त्याच्या तारखा काय, हे कोणालाच माहित नाहीये. पण प्रचार मात्र मोठ्या थाटानं केला जातोय. अशा पद्धतीनं रोजगार निर्माण होत नाही आणि हे आत्ताच का करतायंत, पुढच्या वर्षभरातलं चित्र आपल्या बाजूनं यावं अशा पद्धतीची भावना असावी.

पण, वास्तव काय आहे? २०२१ची जनगणना झालेली नाही. काही कारण नाही. प्रचार दौरे, परदेश दौरे थांबले होते का आणि देशाचं धोरण ठरवण्याच्यादृष्टीनं लोकसंख्या मोजायचे काम अत्यंत महत्त्वाचे असताना ते मात्र थांबलं. २०११नंतर या देशातलं सांख्यिकीचं संकलन हे जवळजवळ थांबलं. का? तर ज्यांनी करायचं त्यांच्यादृष्टीनं ते गैरसोयीचं आहे असं काहीतरी होतंय अशी चर्चा अर्थतज्ज्ञांमध्ये आहे. लोकसंख्या, बेरोजगारी, रोजगार, कामगार बळ, श्रमशक्तीमध्ये महिलांचा सहभाग किती आहे हे सगळं मोजायचं थांबलं. वस्तुस्थिती अशी आहे, की बेरोजगारीचा प्रश्न महाभयानक आहे. काही कल्पना मांडणं आवश्यक आहे. लोकसंख्येचा आकडा फार मोठा असतो. या


देशात महागाई किती प्रचंड वाढली आहे हे दाखविणारे चित्र.

लोकसंख्येचा साधारणत: आपल्या देशातला आकडा ४० ते ४५ टक्क्यापर्यंतची लोकसंख्या ही श्रमशक्ती असते. परदेशात हे प्रमाण ५५ ते ६५ टक्क्यांपर्यंत असतं. मुळात पहिला प्रश्न असा उपस्थित करावा लागेल, की भारतामध्ये लेबर फोर्सचा हा आकडा ४०-४२ टक्क्यांवर का थांबतो. याचा अभ्यास करून जबाबदारीनं धोरण ठरवण्याची आवश्यकता आहे.

विशेषत: गेल्या दहा वर्षांमध्ये या देशातल्या लेबर फोर्सची व्याख्या अशी आहे, की कामावर असलेले आणि कामाच्या शोधात असलेले या दोघांची बेरीज केल्यानंतर जो आकडा येतो, त्या आकड्याचं त्या वयोगटातील लोकसंख्येशी असलेलं प्रमाण म्हणजे लेबर फोर्स. त्यातला दुसरा भाग लक्षात घ्या. कामावर असलेल नशिबवान आहेत. कामाच्या शोधात असलेले नशिबवान नाहीत. पण ते प्रयत्न करतायंत हे समाजाच्यादृष्टिनं चांगलं आहे. गेल्या दहा वर्षांत कामावर असणाऱ्यांचं प्रमाण कमी झालं आणि कामाचा शोध घेणाऱ्यांचंही प्रमाण कमी झालं. कामावरील लोकसंख्या कमी होणं एकवेळ परवडेल, पण कामाचा शोध घेण्याची इच्छा नसणारी माणसं ही वाढणं हे समाजासाठी चांगलं नाही. अत्यंत घातक आहे. याचा अतिशय काळजीपूर्वक विचार करण्याची गरज आहे. मी कितीही भटकलो तरी मला रोजगार मिळत नाही अशी मानसिकता तयार होऊ लागली आहे. ही पराभूत मानसिकता समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जात नाही. त्यादृष्टीनं याचाही विचार करण्याची गरज आहे.

२०११च्या जनगणनेनुसार १२१ कोटी लोकसंख्येच्या देशात साधारण ४ कोटीपेक्षा जास्त लोक बेरोजगार आहेत. ज्या देशाच्या अर्थव्यवस्थेत ४ कोटीपेक्षा जास्त कामाच्या वयाचे, इच्छा असलेले लोक बेरोजगार राहतात ती अर्थव्यवस्था कुठेतरी, काहीतरी गफलत करतेय असंच मानलं पाहिजे आणि त्याच्याकडं अत्यंत प्रमाणिकपणानं लक्ष दिलं पाहिजे.

आनंदाची बाब म्हणजे, अशा प्रश्नांची पहिली जाणीव किंवा दखल देशात पहिल्यांदा महाराष्ट्राने घेतली. १९७०च्या दशकात दुष्काळाच्या काळामध्ये वि. स. पागे यांनी रोजगार हमी राबवण्याचा निर्णय घेतला. अशा मौलिक, मुलभूत निर्णयासाठी खरं तर त्यांना नोबेल पुरस्कार मिळायला हवा होता. रोजगार हा परीस शब्द आहे. रोजगार माणसाला काम देतो, उत्पन्न देतो आणि अनेक माणसांसाठी पुरवठा तयार करतो. माणसाला रोजगार असणं हे खरं स्वातंत्र्य. व्यक्तीगत स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य या सगळ्या पात्रतेच्या निकषावर रोजगाराचा प्रश्न हा माझ्यादृष्टीनं अत्यंत महत्त्वाचा आहे. यापुढील काळात नागरी रोजगार हमी योजनेचा विचार शक्य तेवढ्या लवकर अमलात आणला गेला पाहिजे.

देशाच्या सध्याच्या बँकिंग व्यवस्थेचा विचार केल्यास अनेक प्रश्नचिन्हे आहेत. बँकांच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. भारत सरकारनं गेल्या आठवड्यात सेंट्रल बँक डिजिटल करन्सी नावाचं एक नवीन प्रकरण सुरू केलंय. काही वर्षांपूर्वी नोटबंदीमुळं जे झालं तेच या प्रकरणात होण्याची शक्यता आहे आणि याचा हेतू सरळ आहे असं मला वाटत नाही. काहीतरी वेगळे व्यवहार केल्यानंतर ते मागं घेतलं जाईल असं वाटतं. आभासी चलन हा सगळा खेळ सट्टेबाजारवाले, जुगारी लोकांचा आहे. सर्वसामान्यांचा व्यवहार नाही. तो सार्वजनिक व्यवहार होऊ नये अशी माझी इच्छा आहे.

■■



# ‘जायेगा तो मोदी ही...’ या संकल्पनेवर विरोधकांनी एकत्र येऊन लढावे

**अशोक वानखेडे**

एखादी निवडणूक समोर आल्यावर भाजपकडून नरेंद्र मोदी यांचा चेहरा पुढे केला जातो. परंतु आता त्याच चेहऱ्यावर आपल्याला प्रश्न उपस्थित करायला हवेत आणि गावपातळीपर्यंत घेऊन गेले पाहिजेत. प्रत्येक पक्षाची विचारधारा वेगवेगळी असू शकते. मात्र, २०१४ सालापासून राजकारणातली माणुसकी ही संकल्पना निघून गेली. सत्ता स्थापन करण्यासाठी कुठल्याही थराला लोक जात आहेत. भाजप पक्षात प्रवेश करण्यासाठी एखाद्या व्यक्तीमागे ईडी, सीबीआयची चौकशी असणे किंवा एखादा घोटाळा करणे गरजेचे आहे.

सुप्रियाताई ज्यावेळी लोकसभेत बोलताना भाजपच्या स्मृती इराणीसारख्यांना गप्प बसवतात आणि नंतर मीडियामध्ये त्याची चर्चा होते, त्यावेळी मराठी म्हणून अभिमान वाटतो. अतिशय तार्किक मुद्दे मांडतात. ज्यावेळी शरद पवार पावसात भिजून भाषण देतात, नाशिकपासून सोलापूरपर्यंत रात्रीच्यावेळी रोड शो करतात, त्यावेळी त्यांना मराठा वॉरियर्स म्हणून संबोधले जाते, त्यावेळी भूषणावह वाटते. देशाच्या राजकारणात शरद पवार ही महाराष्ट्राची ताकद आहे. देशात भाजपविरहित कोणत्याही राजकीय पक्षाला काही प्रश्न केला तर ते पवार साहेबांकडे बोट करून ते काय विचार करतात असे विचारतात. ही आपली ताकद आहे. त्यामुळं पवार साहेबांना ताकद देण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. २०२४च्या निवडणुकीत विरोधकांना संधी आहे.

सध्याच्या वर्तमानातील सर्वाधिक कमकुवत पक्ष कोण असेल तर नरेंद्र मोदी आणि भाजप पक्ष आहे. २०१४ साली नरेंद्र मोदी यांनी जिंकलेल्या जागा आणि २०१९मध्ये कमी झालेल्या जागा पाहिल्या तर हे लक्षात येईल. त्यामुळं महाविकास आघाडी २०२४मध्ये जर एकत्र लढली, तर २०२४च्या निवडणुकीत महाराष्ट्रात भाजप एकेरी आकड्यात निवडून येईल. आगामी काळात आपण सर्वांनी महाराष्ट्रातल्या प्रश्नांसोबत राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नही विचारात घ्यायला हवेत. २०२४च्या निवडणुकीमध्ये भाजपच्या जागा कमी झाल्या तर त्यांच्यामध्ये विद्रोह होईल. भाजपमध्ये लोक धुसमुसत आहेत. तुम्ही जरी महाराष्ट्रात निवडणूक लढवत असला, तरी राष्ट्रीय पातळीच्या मुद्यांवर मोदी सरकारची पोलखोल केली पाहिजे. त्याच्याशिवाय लोकांनी जी अफीम खाल्ली आहे, तो आयेगा तो मोदी ही....ती उतरणार नाही. त्या उलट नवीन टॅगलाईन, जायेगा तो मोदी ही... ही संकल्पना जनमाणसांत रूजवली पाहिजे.

देश स्वतंत्र झाल्यानंतर २०१४पर्यंत देशावर ५४ लाख कोटी कर्ज होते. ते एकट्या मोदींनी आठ वर्षात १४० लाख कोटी केलं. सरकार कमवत असलेल्या एका रूपयातील ४३ पैसे कर्ज

फेडण्यासाठी व्याजावर खर्च होतात. २०२४-२५मध्ये हा आकडा ७३पैशांवर जाईल. एवढे पैसे व्याज चुकवण्यासाठी खर्च केले तर त्यानंतर खर्चासाठी तुमच्याकडे किती पैसे राहतील आणि मग जेव्हा तुम्ही योजना घोषीत करता त्याच्यासाठी कुठून पैसे आणणार. अर्थव्यवस्थेत वारेमाप घोषणा केल्या जातात, पण कुठे किती पैसे दिले याचा हिशोबच दिला जात नाही. स्मार्ट सिटीचं पुढं काय झालंच नाही. कोविडच्या काळात तर मोठं आर्थिक नुकसान झालं. आगामी काळात आपली वाटचाल श्रीलंकेच्या दिशेने सुरू आहे हे लक्षात ठेवा. आपली अर्थव्यवस्था मोठ्या संकटात आहे. हे सरकार केवळ आकड्यांचा जुगाड करून सत्य लपवत आहे. ते सत्य बाहेर आणण्याची गरज आहे. मोदी सरकार कर्ज उपलब्ध करून देशाची अर्थव्यवस्था कशी व्यवस्थित आहे असं दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु, यामध्ये मोठी तफावत असून, देशाचं नुकसान होत आहे.




महागाईचा दर सातत्यानं वाढत आहे. कोरोना, आंतरराष्ट्रीय किंमती सांगून लोकांची दिशाभूत करायची. डॉलरच्या तुलनेत रूपयाची घसरण होत आहे आणि त्यासाठी विकसित देशांची उदाहरणं देतात. पण त्या देशांचे चलन घसरले, तरी त्यांची निर्यात जास्त असल्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते हे त्या मूर्खांना कोण सांगणार. भारताचे आयातीचे प्रमाण जास्त असल्यामुळे द्राक्षेवाल्यांना निर्यातपोटी जास्त पैसे मिळत असले तरी आपण तेल आयात करतो त्याने आपलं तेल काढलं आहे हे कोण बोलणार. रोजगारीचे प्रमाण पहा. राजस्थानमध्ये शिपाई पदाच्या चार जागांसाठी चार लाख अर्ज आले. त्यामध्ये बीटेक, एमटेकचे शिक्षण घेतलेलेही होते. आपल्या देशात नोकरी करू इच्छित असलेले आणि नोकरी मागून कंटाळलेले यामध्ये कंटाळलेल्या लोकांचा आकडा मोठा आहे. तो सेक्टर कधी नक्षली होईल, विद्रोही होईल, लुटमार करेल हे सांगता येत नाही. अयोध्येत दिवाळीला ६० हजार लिटर तेल वापरून दिव्यांचा विश्वविक्रम केला. पण उरलेले तेल लुटण्यासाठी गावंच्या गावं आले होते. ही वस्तुस्थिती आहे. ही समोर आणायला पाहिजे. हे नग्न चित्र आहे ते समोर आणा. राष्ट्रीय मुद्यांवर चर्चा घडवून आणा.




एक लक्षात ठेवा, महाराष्ट्रात एकही उद्योग यापुढं येणार नाही. जोपर्यंत वरती डाकू बसले आहेत व राज्यात गद्दार किल्लेदार बसले आहेत, त्यामुळं महाराष्ट्रातून उद्योग प्रकल्प गेले. सेमी कंडक्टर प्रकल्प आला असता तर महाराष्ट्राला चांगलं उत्पन्न मिळालं असतं व रोजगारही मोठ्या प्रमाणात मिळाला असता. टाटा एअरबस कंपनीचाही प्रकल्प महत्त्वाचा होता. त्याऐवजी दोन हजार कोटीचा इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर प्रकल्प दिला गेला. तो प्रकल्प आपल्याकडं असणाऱ्या एमआयडीसीच्या धर्तीवर आहे. अशा प्रकारे धूळफेक केली जात आहे. जीएसटी कलेक्शनमध्ये गुजरात महाराष्ट्राच्या अर्ध्यावरही नाही. जेव्हा विमानं विकली जातील, तेव्हा किती जीएसटी जमा होईल. हे भविष्याचं प्लॅनिंग भाजपवाले करत आहेत. राष्ट्रवादीनेही संघटन वाढविण्यावर भर दिला पाहिजे. महिलांच्या वोट बँकेवर लक्ष द्यावं लागेल. त्यांचं मत ठाम असतं. नवीन लोकांना संधी द्या. पाखरं येऊ नये म्हणून आपण जे शेतात लावतो ना, ते मोदी आहेत, त्यांना घाबरण्याची गरज नाही. जर जिंकायचं असेल, तर येणाऱ्या २०२४च्या निवडणुकीत जायेगा तो मोदी ही...या संकल्पनेवर सर्व विरोधकांनी एकत्र येऊन लढावे, तरच हे चित्र बदलेल. ■■

# शेजारील घडामोडी







पाकिस्तानातील राजकीय अस्थिरता कायम आहे. तर आणखी एक शेजारी चीनने संरक्षण सुसज्जतेवर वाढता भर देण्याचे धोरण अवलंबिले आहे. चीनचे सर्वेसर्वा शि जिन पिंग यांनी तर चिनी सेनेला कोणत्याही संकटाचा मुकाबला करण्यासाठी सुसज्ज राहण्यास सांगितले आहे.

त्याचबरोबर नवनवीन शस्त्रास्त्रांची निर्मितीही सुरु केली आहे. नेमक्या याच परिस्थितीत

# जागरुकता हवी

**अगस्त्य नाथ**





चीनमध्ये करोनाची आणखी लाट आली आहे आणि सरकारने निर्बंध लादण्यास सुरुवात केल्यानंतर सामान्य नागरिक त्याविरोधात रस्त्यावर उतरल्याच्या बातम्या येत आहेत. अर्थात हा प्रक्षोभ रोखण्यासाठी यावेळी बळाचा वापर करण्यात आला नसल्याचे कळते. त्याऐवजी ताज्या बातम्यांनुसार लोकांना पटतील, रुचतील एवढेच निर्बंध राखण्याचे धोरण आखण्यात आल्याचे समजते. अर्थात ही चीनची अंतर्गत बाब झाली. परंतु सध्या चीनचा मित्रदेश रशिया युक्रेनबरोबरच्या संघर्षात अडकलेला असल्याने चीनला स्वबळावरच अमेरिका व युरोपीय राष्ट्रांच्या आघाडीचा मुकाबला करावा लागणार आहे. त्यामुळेच चीनच्या आक्रमकतेमध्ये भर पडली आहे. यामुळेच पाकिस्तानातील सेनानेतृत्वातील नवा बदल आणि चीनची वाढती आक्रमकता या पार्श्वभूमीवर भारताला

गाफील न राहता विलक्षण जागरूक रहावे लागणार आहे.

पाकिस्तानात सेना नेतृत्वात बदल झाला आहे. गेली सहा वर्षे सेनाप्रमुख असलेले कमर जावेद बाजवा हे निवृत्त झाले आणि २९ नोव्हेंबर रोजी सय्यद असीम मुनिर अहमद यांनी सर्वशक्तिमान अशा पाकिस्तानी सेनेच्या प्रमुखपदाची जबाबदारी हाती घेतली. पाकिस्तानातील सेनाप्रमुख कोण असतात याकडे जगाचे लक्ष असते कारण पाकिस्तानात सेना आणि आयएसआय ही गुप्तचर संस्था यांचे सरकारवर देखील वर्चस्व असते. सरकारच्या ध्येयधोरणांवर त्यांचा प्रभाव असतो. विशेषतः भारताबरोबरच्या संबंधांमध्ये सेनेची भूमिका निर्णायक असते. याखेरीज काश्मीरबाबतचे धोरण, पाकिस्तान अंतर्गत इस्लामी कट्टरपंथीयांना किती प्रमाणात महत्व द्यायचे वगैरे धोरणात्मक निर्णय हे सेना व आयएसआय यांच्याकडूनच केले जातात. पाकिस्तानात राजकीय अस्थिरता व उलथापालथ सुरु आहे. त्याचबरोबर पाकिस्तानची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली आहे. या पार्श्वभूमीवर मुनिर यांनी सूत्रे हाती घेतली आहेत. त्यामुळे त्यांचे सर्वाधिक प्राधान्य हे देशांतर्गत परिस्थिती हाताळण्यास असणार आहे. दुसरीकडे पाकिस्तानातील स्थानिक तालिबानी संघटना 'तहरिक इ तालिबान पाकिस्तान' या संघटनेने गेली काही वर्षे देशांतर्गत हल्ले व घातपाती कृत्ये थांबविण्याचा निर्णय आता मागे घेत असल्याचा इशाराही दिला आहे. त्यामुळे त्या आव्हानाची दखल देखील त्यांना घ्यावी लागणार आहे. त्याचबरोबर पाकिस्तानी सेनेने थेट राजकारणात न पडण्याबाबत जी भूमिका गेल्या काही वर्षांपासून अमलात आणलेली आहे ती देखील यापुढील काळात यशस्वीपणे पुढे नेण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असेल. त्याचबरोबर भारताबरोबरचे संबंध कसे राखायचे याची रूपरेषाही त्यांना आखावी लागेल.



याच्याच जोडीला पाकिस्तान-चीन, पाकिस्तान - अमेरिका आणि पाकिस्तान व अफगाणिस्तानातील तालिबानी राजवट यांच्याबरोबरच्या संबंधांचाही त्यांना आढावा घ्यावा लागेल. थोडक्यात जनरल मुनिर यांच्यापुढे अनेक आव्हाने आहेत.

निवृत्त सेनाप्रमुख जनरल बाजवा यांना पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्या काळात नेमण्यात आले होते. परंतु नंतरच्या काळात त्यांच्या संबंधात बिघाड झाला व त्याचे मुख्य कारण नवाझ यांची भारताला अनुकूल असलेली भूमिका हे होते. नवाझ यांच्या भारताबरोबर मैत्रीसंबंध प्रस्थापित करण्यास अनुकूल भूमिकेमुळे पाकिस्तानी सेनेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक होते व त्यामुळेच नवाझ शरीफ आणि सेनेदरम्यानचे संबंध तणावले गेले. नवाझ यांना पंतप्रधान आणि नंतर पाकिस्तानातून हद्दपार करण्यामागे बाजवा व सेनेची भूमिका मोठी होती. नंतर पंतप्रधान झालेल्या इम्रानखान यांच्याबरोबर बाजवा यांचे संबंध सुरुवातीला चांगले राहिले परंतु तेही फारकाळ टिकू शकले नाहीत कारण



सय्यद असीम मुनीर अहमद



नदीम अंजुम



जनरल बाजवा



इम्रानखान यांनी सेनेला पाहिजे तसे महत्व देणे बंद केले. त्यानंतर आयएसआय या गुप्तचर संस्थेच्या सरसंचालकपदी इम्रानखान यांनी त्यांच्या मर्जीतल्या अधिकाऱ्याची निवड करुनही बाजवा व सेनेची नाराजी ओढवून घेतली होती. त्यामुळे दिवसेंदिवस इम्रानखान आणि सेना यांच्यातील दुरावा वाढत गेला. त्यात भ्रष्टाचाराचे आरोप त्यांच्याविरुध्दही होऊ लागले होते आणि पाकिस्तानी न्यायालयाने त्यांना पंतप्रधानपदावरुन हटविण्याचा निर्णय दिला. इम्रानखान यांनी त्यांच्या पदच्युतीसाठी न्यायालय आणि सेनेची हातमिळवणी कारणीभूत असल्याचा आरोप केला होता. एवढेच नव्हे तर त्यांनी काढलेल्या यात्रेमध्ये त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यालाही त्यांनी सेनेला जबाबदार धरले होते. थोडक्यात सेना व इम्रान यांच्यातील संबंध तणावलेलेच राहिले आहेत. न्यायालयीन आदेशानुसार इम्रान यांना राजीनामा द्यावा लागल्यानंतर सर्व विरोधी पक्षांचे संयुक्त सरकार पाकिस्तानात स्थापन झाले व नवाझ यांचे बंधू शाहबाज यांच्या नेतृत्वाखाली ते स्थापन झाले. या सरकारनेच मुनिर यांची सेनाप्रमुखपदी नियुक्ति केली आहे. या नियुक्तीला नवाझ शरीफ यांची संमती घेण्यात आल्याचे समजते.

मुनिर यांची लष्करी कामगिरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते आयएसआयचे प्रमुख होते. तसेच मिलिटरी इंटेलिजन्स म्हणजे लष्करी गुप्तचर विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर सेना प्रमुख होणारे ते पहिलेच अधिकारी आहेत. मुनिर यांची नेमणूक हा एक प्रकारे इम्रानखान यांनाही एक झटका मानला जातो. याचे कारणही आहे. मुनिर आयएसआयचे संचालक झाले पण त्यांची तेथील कारकिर्द केवळ आठ महिन्यांची राहिली. गुप्तचर विभागाचे प्रमुख या नात्याने त्यांनी पंतप्रधान असलेल्या इम्रानखान यांना त्यांची पत्नी बुशरा बी यांचे निकटवर्ति मोठा भ्रष्टाचार करीत असल्याचे स्पष्ट सांगितले होते. त्यामुळे इम्रानखान नाराज होणे स्वाभाविकच होते आणि त्यावेळी त्यांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या जागी इम्रान यांचे निकटवर्ति म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फैज हमीद यांची नेमणूक करण्यात आली. परंतु इम्रान यांच्यानंतर त्यांनाही जावे लागले व त्यांच्या जागी लेफ्टनंट जनरल नदीम अंजुम यांची नियुक्ति करण्यात आली. ते अमेरिकेचे निकटवर्ति मानले जातात आणि जर मुनिर यांनी अंजुम यांना कायम ठेवल्यास पाकिस्तान सेना आणि अमेरिकेदरम्यानचे संबंध चांगले राहू शकतात असे निरीक्षकांचे म्हणणे आहे. याचे कारण स्वतः मुनिर यांचा अमेरिकेबरोबर फारसा थेट असा संपर्क झालेला नाही. त्यामुळे नदीम अंजुम हे अमेरिकन लॉबीचे असल्याने मुनिर यांना अमेरिकेबरोबरचे संबंध सुरळीत ठेवण्यास मदत होणार आहे. पाकिस्तानातील अंतर्गत राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर आहे. इम्रानखान यांनी पुन्हा



पंतप्रधानपद आणि सत्ता मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न चालवले आहेत. त्यासाठी प्रसंगी ते कट्टरपंथी इस्लामी गटांबरोबर देखील हातमिळवणी करु पहात आहेत. त्यामुळे यापुढील काळात सेनेला इम्रानखान यांना रोखावे लागणार आहे. मात्र सेनेने थेट किंवा प्रत्यक्ष स्वरुपात राजकारणात भूमिका न बजावण्याची भूमिका घेतलेली असल्याने इम्रानखान यांच्याबाबत सेनेला केवळ सतर्कता बाळगण्याचे धोरण अमलात आणावे लागणार आहे. मात्र इम्रानखान यांनी मर्यादा ओलांडल्यास त्यांचा बंदोबस्त करण्यात सेना मागेपुढे पाहणार नाही हेही तितकेच खरे आहे आणि नेमकी हीच कसरत मुनिर यांना करावी लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जनरल मुनिर हे पहिलेच सेनाप्रमुख आहेत की ज्यांचे सर्व लष्करी शिक्षण व प्रशिक्षण हे पाकिस्तानात झाले आहे. पाकिस्तानच्या यापूर्वीच्या बहुतेक सेनाप्रमुखांनी अमेरिका किंवा ब्रिटनमधील लष्करी केंद्रात प्रशिक्षण घेतलेले होते. हे देखील मुनिर यांचे एक वैशिष्ट्य मानावे लागते. त्यामुळेच त्यांना अमेरिका आणि चीन यांच्याबरोबर संबंध राखण्यासाठी भरपूर गृहपाठ करावा लागणार आहे.

मुनिर हे भारतासाठी कसे राहतील हा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे. अशी माहिती दिली जाते की पुलवामा हल्ल्याची योजना ते आयएसआयचे संचालक असताना तयार करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष घटना होईपर्यंत त्यांची बदली झाली होती. ते एक अत्यंत सचोटीचे अधिकारी म्हणून ओळखले जातात. गिलगिट-बाल्टिस्तान विभागाचे ते सेनाप्रमुख होते. ही बाब भारताच्या दृष्टीने विशेष महत्वाची राहील. सध्या पाकव्याप्त काश्मीरचा भाग घेण्याची भाषा पुन्हा बोलली जाऊ लागली आहे. गिलगिट बाल्टिस्तानचा समावेश त्यामध्ये होतो. त्यामुळे त्यांच्या नेमणुकीमुळे या भागाची बारीकसारीक तपशीलवार माहिती



एफ-१६ विमाने

असलेली व्यक्ती सेनाप्रमुख झाली आहे हे लक्षात ठेवावे लागेल. मुनिर हे अत्यंत धार्मिक असल्याचे सांगण्यात येते. त्यांच्या बाबतीत एका माहितीचा विशेष उल्लेख केला जातो. त्यांनी कुराण हा धर्मग्रंथ मुखोद्गत म्हणजे पूर्ण पाठ केलेला आहे. त्यामुळे सैनिकी वर्तुळात त्यांना 'मुल्ला मुनिर' म्हणून उल्लेख केला जातो. मुनिर यांना पाकिस्तान-भारत संबंधांची आणि विशेषतः सेना आणि रणनीतीच्या दृष्टीने या संबंधांचे त्यांचे आकलन चांगले आहे. गिलगिट बाल्टिस्तान किंवा पंजाब सीमेला लागून असलेल्या गुर्जांवाला सेनाविभागाची जबाबदारी त्यांनी सांभाळली याचाच अर्थ त्यांना भारताबरोबरच्या सामरिक संबंधांची पूर्ण कल्पना आहे कारण हे दोन्ही विभाग भारताशीच प्रामुख्याने संबंधित आहेत. त्यामुळेच ते भारताबाबत फारकाही सौम्य भूमिका ठेवतील असे नाही आणि कोणताच पाकिस्तानी सेनाप्रमुख भारताबाबत सौम्य भूमिका ठेवण्याचा विचार करु शकत नाही हे वास्तव आहे. मात्र याचा अर्थ जनरल बाजवा सेनाप्रमुख असताना त्यांच्या पुढाकारने त्यांनी भारताबरोबर शस्त्रसंधी किंवा संघर्ष विराम करार केला आणि तो बहुतांशाने यशस्वीपणे अमलात आणला गेला. पाकिस्तानची आर्थिक हालाखी पाहता पाकिस्तानी सेना भारताविरुध्द साहसवादी भूमिका घेऊ शकणार नाही आणि त्यामुळे कदाचित संघर्षविराम यापुढेही चालू राहील. त्याचबरोबर पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय पातळीवरुन आर्थिक मदतीची नितांत आवश्यकता आहे. पाकिस्तानला त्यांच्या हवाईदलातील एफ-१६ विमानांच्या देखभाल व सुधारणा व बदलासाठी अमेरिकेकडून मदत



गिलगिट बाल्टिस्तान

हवी होती की जो बायडेन प्रशासनाने नुकतीच खुली केली आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तानने दहशतवादी कारवायांना आळा घालणे त्या कारवायांना साधनसामग्रीची व आर्थिक मदत न करण्याबाबत पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय संघटनांनी घातलेल्या अटींचे पालन केल्यामुळे 'फिनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स' या आंतरराष्ट्रीय देखरेख संघटनेने पाकिस्तानविरुध्दच्या हरकती मागे घेतल्या आहेत. दहशतवादास आर्थिक मदत देण्याबाबतच्या संदर्भात देखरेख करण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेने गेली काही वर्षे पाकिस्तानवर तसा ठपका ठेवून त्यांना दहशतवादास आर्थिक मदत करणाऱ्या देशांच्या यादीत समावेश केला होता. आता त्यांनी पाकिस्तानला त्यातून वगळले आहे.. त्यामुळे मुनिर यांच्या दृष्टीने ही जमेची बाब आहे. त्याचबरोबर त्यांच्या नेमणुकीला नवाझ शरीफ यांचा पाठिंबा असल्याची बाब उघड झालेली आहे. परंतु नवाझ यांची भारताबाबतची सौम्य भूमिका लक्षात घेऊन मुनिर यांना त्या भूमिकेनुसार चालणे अवघड जाईल व त्यामुळेच ते कदाचित भारताबाबत कठोर भूमिका घेऊ शकतात आणि त्यामुळे त्यांच्या यापुढील निर्णयांकडे लक्ष ठेवावे लागणार आहे. भारत-पाकिस्तान दरम्यान सध्या सुरु असलेला संघर्षविराम किंवा तुलनात्मक शांतता ही जोपर्यंत चालू आहे तो पर्यंत ती ग्राह्य धरायची. कारण दोन्ही देशांदरम्यानच्या संबंधांचा इतिहास पाहता कोणत्या क्षणी काय बदल होईल किंवा संघर्षविरामाचा भंग होऊन एखादी जरी संघर्षाची घटना घडली तर 'पहिले पाढे पंचावन्न' नुसार संबंधातील तणाव वाढत जाईल. मुनिर ही तारेवरची कसरत कशी करतात याकडेच लक्ष ठेवावे लागेल. वर म्हटल्याप्रमाणे भारताबाबत मुनिर हे फार सौम्य भूमिका घेऊ शकतील काय याबाबत प्रश्नचिन्ह आहे. याचे कारण भारताने काही प्रसंगात पाकिस्तानबाबत जी साहसवादी पावले उचलली त्यामुळे पाकिस्तानी सैन्याच्या काही गटात नाराजी होती. विशेषतः पाकिस्तानी हद्दीत जाऊन दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्याच्या प्रकारांची तीव्र प्रतिक्रिया झालेली होती. त्यावेळी पाकिस्तानने प्रत्युत्तर देण्याचे टाळले होते. मुनिर हे तो वारसा पुढे चालवतील याची शाश्वती नाही व त्यामुळेच काही काळ तरी त्यांच्यावर लक्ष ठेवावे लागेल. बालाकोट मोहिमेच्या सुमारास भारतीय वैमानिकांनी पाकिस्तानी विमानांना भारतीय हद्दीतून पिटाळून लावण्यासाठी केलेल्या मोहिमेत एक भारतीय वैमानिक अभिनंदन वर्थमानचे विमान पाकिस्तानी हद्दीत कोसळले व त्याला पाकिस्तानी सैन्याने ताब्यात घेतले होते. परंतु त्याच्या सुटकेबाबत मुनिर यांची भूमिका प्रमुख होती असेही सांगितले जाते. त्यामुळे मुनिर हे व्यावहारिक भूमिका घेणारे आहेत अशी त्यांची प्रतिमा असली तरी पाकिस्तानी जनमानसातील पाकिस्तानी सेनेच्या प्रतिमा सुधारण्याच्या प्रक्रियेसाठी त्यांना भारताविरुध्द प्रसंगी कडक भूमिका घ्यावी लागेल असे तज्ञांचे म्हणणे आहे. विशेषतः पाकव्याप्त काश्मीर पुन्हा मिळविण्याच्या ज्या घोषणा केल्या जात आहेत त्याबाबत मुनिर यांची प्रतिक्रिया कशी असेल याकडे विशेष लक्ष ठेवावे लागणार आहे. काही तज्ञांनी त्यांच्या कारकिर्दीत काश्मीरमधील दहशतवादी कारवाया वाढू शकतील असा कयास



बांधलेला आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे मुनिर यांची खरी कसोटी पाकिस्तानी जनमानसातील पाकिस्तानी सेनेची छबी सुधारणे, पाकिस्तानी राजकीय वर्ग – सरकार आणि पाक सेना यांच्यातील संबंधांचा समतोल व संतुलन पुन्हा निर्माण करणे, तेहरिक इ तालिबान पाकिस्तान(टीटीपी) व अन्य दहशतवादी संघटनांचा बंदोबस्त करुन जनसामान्यांना दिलासा देणे, अफगाणिस्तानात पाकिस्तानविरोधी दहशतवादी कारवाया वाढत असताना त्याबाबत तालिबान राजवटीबरोबर बोलणी करणे (तालिबान राजवट ही पाकिस्तानबाबत फारशी सकारात्मक भूमिका ठेवणारी नाही. त्यांना पाकिस्तानातही त्यांच्याप्रमाणेच कट्टरपंथी मूलतत्ववादी इस्लामी राजवट हवी आहे व त्यामुळेच टीटीपीला ते फूसही देतात) तसेच तालिबानच्या मध्यस्थीने टीटीपी बरोबर बोलणी करणे अशा विविध महत्वाच्या मुद्यांना प्राधान्य द्यावे लागणार आहे. देशांतर्गत आव्हानेच क्लिष्ट व गुंतागुंतीची असल्याने त्यांना भारताकडे किती लक्ष देता येईल ही बाबही ध्यानात ठेवावी लागेल. पाकिस्तानात सध्या राजकीय असंतोष आणि आर्थिक हालाखीतून जात आहे. त्यामुळे पाकिस्तानची घडी पूर्ववत व्यवस्थित करणे हे तेथील राज्यकर्त्यांसमोरचे मुख्य आव्हान आहे. त्यामुळे भारताला दुखावण्याची भूमिका तूर्तास तरी घेणे त्यांना परवडणारे नसेल.



चीनमध्ये ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात चिनी कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन झाले. दर पाच वर्षांनी होणाऱ्या या अधिवेशनात चीनच्या पुढील पाच वर्षांच्या धोरणांबाबत विचार केला जातो. चीनच्या भावी धोरणांचा भर कशावर असेल याची साधारण जाणीव या अधिवेशनाद्वारे होते. ऑक्टोबरमध्ये झालेल्या अधिवेशनात शि जिनपिंग यांना चीनचे अध्यक्षपद तसेच चिनी कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख म्हणून त्यांची इच्छा असेपर्यंत भूषविण्याबाबत संमती देण्यात आली. यामुळे आता शि जिनपिंग हे खऱ्या अर्थाने चीनचे सर्वेसर्वा झाले आहेत. सर्वशक्तिमान अशा केंद्रीय सेना आयोगाचे प्रमुखपदही त्यांनी स्वतःकडेच ठेवलेले आहे. त्यामुळेच त्या नात्याने बोलताना त्यांनी अलीकडेच चिनी सेनेला कोणत्याही संकटाचा मुकाबला करण्यासाठी सुसज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. हे आवाहन त्यांनी कुणाला उद्देशुन केले आहे हा प्रश्न पडण्याचे कारण नाही. भारत हा चीनचा शेजारी प्रतिस्पर्धी देश असल्याने त्यांच्या या आवाहनात भारताचा समावेश होतो हे उघड आहे. पूर्व लडाखमधून अद्याप चीनने पूर्णत्वाने माघार घेतलेली नाही किंवा सैनिकांचे संख्याबळही कमी केलेले नाही. त्यामुळे चीनचा लष्करी धोका आजही कायम आहे. त्यामुळेच भारतीय सेनाप्रमुख व इतरही सेनाधिकाऱ्यांनी चीन बाबत विशेष सावधगिरी बाळगण्याबाबत सातत्याने इशारे दिलेले आहेत. चीनने गेल्या काही वर्षांपासून अमेरिका आणि त्यांच्या नेतृत्वाखालील युरोपीय देश तसेच पूर्वेकडील जपान, ऑस्ट्रेलिया यांच्यासारखे देश यांची जी आघाडी आहे त्यांचा आर्थिक, राजनैतिक पातळीवर विरोध सुरु केला आहे. भारत हा अमेरिकी व युरोपीय देशांबरोबर सहकार्य करणारा देश असल्याची चीनची धारणा आहे. भारताने चीनबरोबर केवळ द्विपक्षीय पातळीवर संबंध राखावेत आणि अमेरिका व युरोपीय राष्ट्रांच्या प्रभावाखाली राहू नये अशी चीनची अपेक्षा आहे.

अर्थात भारताचे परराष्ट्र संबंध विषयक धोरण ठरविण्याचा अधिकार चीनला नाही. मात्र भारतीय नेतृत्वाने देखील चीन हा सीमेला लागून असलेला शेजारी देश असल्याने त्या दृष्टिकोनातून चीनबरोबरच्या संबंधांची आखणी करणे आवश्यक आहे. अमेरिका व युरोप, ऑस्ट्रेलिया-जपान यांची दलाली करण्याचे भारताला कारण नाही याची जाणीव ठेवून चीनशी संबंध सुधारण्याची आवश्यकता आहे. सध्या चीनला रशियाची पाहिजे तेवढी साथ मिळत नसल्याने चीनला स्वबळावर अमेरिका व युरोपीय राष्ट्रसमूहाचा मुकाबला करावा लागत आहे. अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया आणि जपान-तैवान याद्वारे आपल्याला वेढण्याचा प्रयत्न केला जात असल्याची चीनची धारणा आहे. त्यामुळे भारताने त्यात सहभागी न होता आपल्याशी सुरळीत संबंध राखावे अशी चीनची अपेक्षा आहे. परंतु तसे न घडल्यास चीन आक्रमक होऊ शकते याचे भान भारतीय राज्यकर्त्यांना राखावे लागेल. चीन हा शेजारी आहे व बाकीची राष्ट्रे चीनपासून फार दूर आहेत हे वास्तवही ध्यानात घेऊन चीनशी संबंध सुरळीत करणे आणि अविचारी साहसवाद न दाखविणे हे भारताच्या हिताचे राहणार आहे. म्हणूनच या दोन शेजाऱ्यांबाबत आगामी काळात सावधगिरी बाळगावी लागेल.

■■

# महाराष्ट्राचा स्वाभिमान आणखी किती डिवचणार???







महाराष्ट्रातले उद्योग गुजरातला पळवून नेल्यानंतर देवेंद्रपंत फडणवीसांना एक विधान करुन त्यांचे मन किती विशाल व उदार आहे हे दाखविण्याचा केविलवाणा नव्हे तर लोचट प्रकार केला होता. म्हणे, गुजरात भारतातच आहे ना? आणि गुजरातमध्ये एखादा प्रकल्प गेला तर बिघडले कुठे? देवेंद्रपंत किती हुशार आहेत किनई?? काय युक्तिवाद केला? अहो देवेंद्रपंत मग त्याच न्यायाने तुमच्या परिवारातल्या कर्नाटकी भाऊबंदांनी महाराष्ट्राच्या सोलापूर, जत येथील गावांवर हक्क सांगून ती कर्नाटकाला मिळण्याची जी पुडी सोडली आहे ती पण तुम्ही मान्य कराल! कारण तुम्हीच म्हणता ना, उद्योग गुजरातला गेले म्हणून काय झाले? भारतातच आहेत ना? मग आता महाराष्ट्राची ही गावेही कर्नाटकात जाऊ द्या! वर तुम्ही तुमचे लोचट युक्तिवाद करीतच रहाल आणि म्हणाल, अरे ही गावे कर्नाटकातच गेलीत ना? म्हणजे भारतातच आहेत ना? भारताबाहेर तर गेली नाही ना?

जाता जाता

फिरस्ता

महाराष्ट्राला केंद्रामधल्या जोडगोळीने निशाण्यावर ठेवले आहे. त्यांना महाराष्ट्र नकोसा झाला आहे आणि म्हणून ते वेगवेगळ्या मार्गांनी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला, अस्मितेला ललकारत सुटले आहे. महाराष्ट्राचा किती द्वेष करतील हो? महाराष्ट्राचे उद्योग पळवून नेतच आहेत, यांचे हस्तक (त्यांना राज्यपाल म्हणणे हा त्या पदाचा अवमान ठरेल) असलेले कृष्णटोपीधारी भगतसिंग कोश्यारी यांनी राज्यपालपदाची अप्रतिष्ठा करीत आतापर्यंत महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची प्रतीके असलेल्यांची मानखंडना करण्याची मालिकाच लावली आहे. त्यांच्या तावडीतून महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले हे सुटले नाहीत. आता तर त्यांनी साक्षात महाराष्ट्राच्या अस्मितेचे सर्वोच्च प्रतीक असलेल्या छत्रपति शिवरायांवरच थेट हल्ला केला. शिवाजी व त्यांचे विचार आता जुनाट झाल्याचे ते बरळले. बरळल्यानंतर देखील त्यांनी महाराष्ट्राची अद्याप माफी मागितलेली नाही.



शंका यानिमित्ताने उत्पन्न झाल्याखेरीज रहात नाही.
जी कारणे आहेत ती राजकीय आहेत. कर्नाटकाने हा वाद उकरुन काढण्याचे एकमेव कारण म्हणजे कर्नाटकात भाजपची
अशी काही वाट लागलेली आहे की पुढील वर्षी म्हणजे येत्या काही महिन्यातच तेथे होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत
त्यांचा पराभव होण्याची ठळक लक्षणे दिसत आहेत. बसवराज बोम्मई हे राजकीयदृष्ट्या वजनदार नेते नाहीत. ते अत्यंत हलके नेते आहेत. येद्युरप्पा यांच्या जागी त्यांची मुख्यमंत्रीपदी नेमणूक करण्यात आली खरी परंतु त्यांना ते पद सांभाळाता आलेले नाही. त्यात भाजपमधील निष्ठावंतांनी बोम्मई यांना मुख्यमंत्री म्हणून मानायलाच नाकारले होते.
कर्नाटकात आपले राजकीय आसन स्थिर होत नसल्याचे पाहून बोम्मई साहेबांनी मग त्यांच्या पक्ष-परिवाराचे सर्वात आवडते अस्त्र - हिंदू विरुध्द मुस्लिम संघर्षाचे - उपसले. परंतु तेही फारसे प्रभावी ठरु शकले नाही. त्यांच्या सरकारवर भ्रष्टाचाराचे भरपूर आरोप होऊ लागले आणि त्याचा बचाव करण्यातही त्यांना अपयश आले. कर्नाटकात सध्या शुध्द राजकीय अनागोंदी आहे. त्यामुळे एक अखेरचा हुकमी राजकीय पत्ता म्हणून त्यांनी कर्नाटकी अस्मितेचा मुद्दा अक्षरशः उकरुन काढला आहे.
त्याचा प्रयोग त्यांनी महाराष्ट्रावर केला आहे.
केंद्रात महाराष्ट्रद्वेष्ट्या जोडगोळीलाही हा नवा वाद रंजक वाटणे स्वाभाविक होते.
महाराष्ट्राला आणखी एका कारणावरुन बेजार करण्याची ही आयती संधी कशी गमवायची? मग त्यांनीही त्याला ढील द्यायला सुरुवात केली.
सीमावादाचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे आणि आता हा वाद उकरुन काढू नये एवढा साधा सल्ला कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना देण्याचे काम जोडगोळीपैकी केंद्रीय गृहमंत्री असलेल्या छोट्या साहेबांना करता आलेले नाही. म्हणजेच त्यांची या प्रकाराला फूस असावी असा निष्कर्ष काढायला जागा आहे. इतक्या वर्षात निर्माण न झालेले मुद्दे आता नेमके कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीच्या आसपासच उकरण्यामागील हेतु

अहो, कृष्णटोपीधारी, मुळात तुमची छत्रपतींबद्दल बोलण्याची पात्रता तरी आहे काय? तुम्हाला त्यांच्याबद्दल कितपत माहिती आहे? एका घटनात्मक पदाची लॉटरी तुम्हाला दिल्लीतल्या जोडगोळीमुळे लागली आहे आणि लगेच ब्रह्मज्ञानी झाल्याचा आव आणू लागला आहात? स्वतःची पात्रता तरी माणसाने ओळखून असावे! पण, छे, नाहीच! एकामागून एक महाराष्ट्राच्या मानबिंदूंचे हा खुजा माणूस अपमान करीत सुटला आहे आणि दुर्दैव म्हणजे अजुनही हे खुजे महोदय पदासीन आहेत! हे महाराष्ट्राच्या मराठी जनतेचे दुर्दैव आहे.
आमच्या लहानपणी 'हेमा आणि सात बुटके' नावाचे बालनाट्य होते. ते चांगले होते.
आता वेगळ्या प्रकारचा आशय व अर्थ असलेले 'हेमा आणि अनेक बुटके' असे नाटक देशात २०१४पासून सुरु करण्यात आले आहे.
आपल्या आजुबाजुला इतकी छोटी, खुजी माणसे महत्वाच्या पदावर नेमायची की आपण स्वतः त्यांच्यात मोठे असल्याचे भासावे असा हा प्रकार आहे. ही मनोवृत्तीच खुजी आहे. जो माणूस तोलामोलाच्या माणसांमध्ये मिसळू शकत नाही आणि केवळ तोंडपुज्या चाटुकरांच्या संगतीत रमतो तो स्वतःच खुजा असतो. अशा माणसात पुरुषार्थाचा अभाव असतो, त्यामुळे महाराष्ट्रातही राज्यपालपदी अशाच एखाद्या खुज्याला नेमले गेले आहे हे लक्षात घ्यावे लागेल.
महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे यासंबंधीचे सर्व वाद निर्माण होण्याची आवश्यकता नाही. तरीही हे वाद उकरुन का काढले जात आहेत असा एक प्रश्न किंवा

काय?
एकच हेतु आहे तो म्हणजे महाराष्ट्राचा छळ करायचा आणि त्या छळावर कर्नाटकातील राजकीय पोळी भाजून घ्यायची.
कर्नाटकने हा वाद जाणीवपूर्वक चिघळविण्याचा प्रकार सुरु केला आहे. त्यामुळेच आता अचानक त्यांना सोलापुरात कर्नाटक भवन उभारण्याची आवश्यकता वाटू लागली आहे. हा प्रकार म्हणजे खाजवून खरूज काढण्याचा आहे.
बेळगावात महाराष्ट्र एकीकरण समितीने वर्षानुवर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांवर ताबा ठेवलेला होता. त्यावेळी महाराष्ट्राने असले वाद चिघळविण्याचे प्रकार केले नव्हते. कायदेशीर मार्गाने महाराष्ट्राने आपल्या मागण्या नेहमीच मांडल्या.
वेळोवेळच्या कर्नाटकातील सरकारांनी देखील अशा रीतीने थेट महाराष्ट्राच्या गावांवर हक्क सांगितला नव्हता. ही सरकारे प्रामुख्याने काँग्रेस आणि जनता पक्ष किंवा जनता दलाची होती. हा वाद चिघळविण्याचा प्रकार फक्त भाजपचे सरकार आल्यानंतर सुरु झाला. २०१२ मध्ये कर्नाटकात भाजपचे सरकार होते. जगदीश शेट्टार मुख्यमंत्री होते आणि त्यांनी बेळगावला कर्नाटकाची उपराजधानी म्हणून दर्जा जाहीर केला आणि तेथेही विधिमंडळाचे अधिवेशन घेण्यासाठी विधानभवन उभारण्याचा प्रारंभ केला.
हा मुद्दा महत्वाचा आहे कारण अशी बुध्दी किंवा विचार आधीच्या कोणत्याही कर्नाटकी मुख्यमंत्र्याला सुचला नव्हता. याचा स्पष्ट अर्थ हा आहे की भाजप आणि संघपरिवार केवळ फाटाफुटीचे अनुसरण करणारी विचारसरणी आहे. अन्यथा भाजपच्याच मुख्यमंत्र्याला हा विचार सुचण्याचे कारण काय?
फाटाफुटीची विचारसरणी!
महाराष्ट्रापासून मुंबईला वेगळे करण्याचे डाव देखील ही मंडळी खेळत आहेत. मुंबईतले एक उचापतखोर माजी खासदार मुंबईला केंद्रशासित करण्यासंबंधीचे काही अहवाल घेऊन फिरत असतात. त्यांनी तर म्हणे केंद्रीय गृहमंत्रालयासमोर या अहवालाचे सादरीकरणही केले होते. हे अहवाल त्यांच्याच काही चाटुकार आणि पिछलग्गु अशा तथाकथित तज्ञांनी केलेले असावेत.
महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळेस मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी झाली हे गुजरातला मान्य नव्हते. मुंबईवर गुजरातने हक्क सांगितला होता. परंतु ते घडले नाही आणि तो सल आजही कायम आहे. याठिकाणी तुम्हाला महामहिम काळीटोपीधारी राज्यपालांनी मुंबईबद्दल जे महान उद्गार काढले ते आठवतील. मुंबईची भरभराट, समृध्दी यात मराठी लोकांचा हात किती आहे याबद्दल त्यांनी शंका व्यक्त केली. गुजराती आणि राजस्थानी लोक नसते तर मुंबई देशाची आर्थिक राजधानी झालीच नसती असे ही महान व्यक्ती म्हणाली होती. आता यात गुजराती मंडळींचा झालेला उल्लेख पाहता हे काळीटोपीधारी कुणाच्या सांगण्यावरुन बोलतात हेही ध्यानात यावे. त्यामुळे केंद्रात जी जोडगोळी आहे त्यांच्या मनात मुंबईबद्दल कोणत्या प्रकारचे विचार आहेत हे यावरुन ध्यानात यावे.
राज्यपाल हे केंद्राचे राज्यातील प्रतिनिधी असतात. परंतु २०१४ नंतर केंद्राचे राजकीय हस्तक या पदावर नेमले जातात.
हे झाले मुंबईचे! भाजपच्या जाहीरनाम्यांमध्ये स्वतंत्र-वेगळ्या विदर्भ राज्याच्या स्थापनेचा मुद्दा सातत्याने समाविष्ट झालेला आहे. म्हणजे ज्याप्रमाणे मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा डाव खेळला जात आहे तोच प्रकार विदर्भाचा आहे. विदर्भाचे वेगळे राज्य करुन महाराष्ट्राची शकले करण्याचे आणि त्याद्वारे महाराष्ट्राचे देशातील स्थान नष्ट करण्याचे हे कारस्थान आहे.
मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचा आग्रह नव्हे तर दुराग्रह कशासाठी? याचे कारण मुंबईचे महत्व टप्प्याटप्प्याने कमी करणे हे आहे. त्यामुळेच २०१४ला सत्तेत आल्याबरोबर पंतप्रधानांनी पहिला आघात केला. आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्रकल्प त्यांनी तातडीने अहमदाबाद - गांधीनगर येथे हलविला. हे करताना त्यांनी कोणतीही लज्जा बाळगली नाही. तसेच प्रकार त्यांनी आता गुजरात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केले आणि दोन-तीन महत्वाचे प्रकल्प चोरुन गुजरातला नेले. याचे कारण ते देशाचे पंतप्रधान नसून अद्याप गुजरातचेच पंतप्रधान आहेत. गुजरात विधानसभा निवडणुकीचा प्रचार ते स्वतःच मुख्यमंत्री असल्यासारखा करीत आहेत याला राजकीय आगतिकता म्हणायची की आत्मकेंद्रित व अहंकारी मनोवृत्तीचा नमूना?
थोडक्यात महाराष्ट्राच्या द्वेषाने पछाडलेले आणि पेटलेले लोक आहेत आणि महाराष्ट्राला प्रथम स्थानावरुन खाली खेचण्यासाठी वाटेल तो आटापिटा, धडपड करीत आहेत.
आणखी एका उदाहरणाचाही दाखला द्यावा लागेल.
मुंबईवरील हल्ल्यानंतर समुद्रमार्गे होणाऱ्या हल्ल्याचे प्रयत्न रोखण्यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने मुंबईजवळ विशेष सुरक्षादलासाठी छावणी उभारण्याचा निर्णय केला होता. २०१४ मध्ये सत्ताबदल झाल्यानंतर लगोलग हा प्रकल्प गुजरातला हलविण्यात आला. विशेष म्हणजे महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पासाठी लागणारी जागा देखील निश्चित केली होती. परंतु केंद्रात सत्तेत आलेल्यांना ते सहन झाले नाही आणि त्यांनी तत्काळ हा महाराष्ट्रात होणारा प्रकल्प चक्क चोरला! या काळात राज्यात मुख्यमंत्री देवेंद्रपंताच्या नेतृत्वाखालचे सरकार सत्तेत होते. त्यांनी हा प्रकार मुकाट्याने सहन केला. आताही जेव्हा दोन मोठे प्रकल्प आणि इतरही काही प्रकल्प गुजरातला पळवून नेण्यात आले तेव्हा सरकार देवेंद्रपंतांचेच आहे. ते

नावाला उपमुख्यमंत्री असले तरी तेच ‘खरे मुख्यमंत्री’ आहेत आणि मुख्यमंत्री असलेले निव्वळ नामधारी आहेत. त्यामुळेच दिल्लीच्या जोडगोळीने महाराष्ट्रातील प्रकल्पांची बिनधास्त पळवापळवी सुरु केली.

तर आता आपण काळीटोपीधारींनी छत्रपति शिवरायांबद्दल काढलेल्या उद्‌गारांची दखल घेऊ.

शिवरायांचे विचार या पुराणमतवाद्यांना जुनाट वाटणार कारण ते सर्वसमावेशक होते आणि रयतेला बरोबर घेऊन जाणारे होते. त्यांच्या विचारसरणीत भेदभाव व पक्षपाताला थारा नव्हता. महाराष्ट्रातील सर्व अठरापगड जातींना बरोबर घेऊन त्यांनी जुलमी सत्ताधीशांविरुध्द लढा उभारला होता. आता काळीटोपीधारींच्या विचारसरणीचा पायाच भेदभाव आणि पक्षपात आहे. त्यामध्ये अल्पसंख्यक, कमकुवत वर्गांना स्थान नाही. बहुसंख्यकवादावर व कट्टरतेवर आधारित त्यांची विचारसरणी आहे व त्यामुळेच त्यांना शिवरायांची विचारसरणी जुनाट वाटणारच!

शिवरायांच्याबद्दल अनुदार उद्‌गार काढल्याबद्दल काळीटोपीधारींचा सार्वत्रिक निषेध झाला खरा परंतु त्यांना महाराष्ट्रातून हाकला, बदला ही मागणी मान्य करायला दिल्लीपति तयार नाहीत. त्यांनी महाराष्ट्राच्या नाकावर टिच्चुन त्यांना पदावर कायम ठेवले आहे. ही देखील महाराष्ट्राची एकप्रकारे मानहानि – मानखंडना आहे. या महाशयांना महाराष्ट्रातून बदलेपर्यंत त्यांच्याविरोधातील मोहिम चालविण्याचे शिवप्रेमींनी ठरविले आहे आणि त्याला सर्व मराठी लोकांनी पाठिंबा दिलेला आहे.

एवढे होऊनही या काळीटोपीधारींच्या समर्थकांना किंचितशी देखील खजीलपणाची भावना झालेली नाही.

कोल्हापूरहून पुण्यात येऊन एका महिलेने सातत्याने विजय मिळविलेल्या सुरक्षित मतदारसंघातून निवडून येण्याचा ‘पुरुषार्थ’ गाजविणाऱ्या एका नेत्याने त्यांच्याच पक्षाचे नेते आणि शिवरायांचे वंशज खासदार उदयनराजे यांना पाठिंबा देण्याऐवजी त्यांनी आता नमते घ्यावे, शांत व्हावे अशी सूचना केली आहे. हे कोल्हापूरचे दिग्गज नेते आहेत ते केंद्रातल्या गृहमंत्र्यांचे मर्जीतले आहेत. या दिग्गज नेत्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदही हवे आहे. पण शिवरायांची मानहानि करणाऱ्या उद्‌गारांबद्दल त्यांना यत्किंचितही चीड किंवा राग आलेला नाही. यावरुन शिवाजी महाराजांबद्दल त्यांच्या मनात किती आदर आहे हे लक्षात यावे.

ही सगळी गडबड सुरु झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातले सुप्रसिध्द नकलाकार वांदरलाल पोपटही जागे झाले.

सध्या त्यांना दिल्लीतील जोडगोळीकडून सुपारी मिळालेली आहे. त्यामुळे ते आता काळीटोपीधारींऐवजी शरद पवार, उध्दव ठाकरे आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांवर तुटून पडलेले दिसतात. शरद पवार आणि त्यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाद्वारे महाराष्ट्रात जातींवर आधारित राजकारणाला प्रारंभ झाला असा शोध त्यांनी लावला आहे.

आता वांदरलाल पोपट हे फारमोठे समाजशास्त्रज्ञ असल्याचा आव आणून बोलताना दिसतात. त्यामुळे त्यांना महाराष्ट्राच्या राजकारणात जात हा घटक कधीच नव्हता आणि तो राष्ट्रवादी पक्षामुळे सुरु झाला असा नवा साक्षात्कार झालेला दिसतो. आता नकलाकारऐवजी समाजशास्त्री वांदरलाल पोपट असा त्यांचा उल्लेख करावा लागेल असे दिसते. वांदरलाल काय किंवा ते ज्या काळीटोपी-खाकीतुमानधाऱ्यांकडून प्रेरणा घेतात त्यांना हिंदू धर्म कळलेला नसावा. मुळात हा धर्म नसून ती जीवनपध्दती आहे आणि भारतीय समाज सर्वार्थाने जात नावाच्या वर्गवारीत अडकलेला आहे. त्यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातिनिर्मूलनाचा सिध्दांत मांडला होता आणि अनेक प्रागतिक समाजशास्त्र्यांनी जातिनिर्मूलनावर भर दिला होता. पण हा अठरापगड जातींचा समुदाय एका धर्मात बांधण्याचा प्रयत्न कधीच यशस्वी होणार नाही कारण जातिव्यवस्थेची उतरंड जोपर्यंत मोडली जात नाही तोपर्यंत धर्माच्या चौकटीत या समाजाला बसविणे अवघड आहे.



हिंदुत्वाच्या नावाखाली केवळ वरवरची एकता साधण्यात आली तरी जातींमध्ये विखुरलेल्या समाजात त्यानंतर जातिप्राबल्यामुळे जाति-वर्चस्वाची लढाई व संघर्ष सुरु होतात. म्हणून या सर्व जातीसमूहांना एकत्र घेऊन वाटचाल करणे आणि राजकारण करणे ही एक सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया असते आणि त्यातून जातींमधील सौहार्दाची प्रक्रिया सुरु होत



असते. त्यालाच सामाजिक न्यायाच्या शक्तींची एकजूटही म्हटले जाते. याला जातींचे राजकारण म्हणणे हा निव्वळ निर्बुध्द उथळपणा झाला. वांदरलाल पोपट यांनी एकदा भारतातल्या उत्तरेकडच्या राज्यांचा अभ्यासदौरा करावा आणि जात म्हणजे काय असते, जातींचा वरचष्मा म्हणजे काय असते याचे आकलन करावे म्हणजे ते असले उथळ विचार बोलून दाखविणार नाहीत. उत्तर प्रदेशात मुलायमसिंग, मायावती-कांशीराम, बिहारमध्ये लालूप्रसाद व नीतीशकुमार यांनी सामाजिक न्यायासाठी संघर्ष करुन मागासवर्गीयांना समाजात बरोबरीचे स्थान मिळवून दिले. उत्तरेतील सामाजिक न्यायाच्या शक्तींचे हे नेते चौधरी चरणसिंग यांचे अनुयायित्व मानतात. जाट समाजाला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी चरणसिंग, छोटूलाल, यासारख्या नेत्यांनी प्रयत्न केले. परंतु ज्यांनी अभ्यासच केलेला नाही त्यांना सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया कळणार कशी? नुसत्या इतिहासकारांच्या भेटी घेऊन आपण फार मोठे बुध्दीमंत झाल्याचा आव आणणे हे फार सोपे असते. परंतु खोलात जाऊन अध्ययन करणे आणि स्वतः त्याचे आकलन करणे यातून मनुष्याला ज्ञानप्राप्ती होते. त्यामुळे वांदरलाल पोपट यांनी हे करावे असे आमचे त्यांना आवाहन आहे. टाळीबजाव भाषणे आणि नकला करण्यास फार ज्ञान लागत नाही. असे चाळे कुणीही करु शकते. गंभीर राजकारणी होण्यासाठी गृहपाठही गांभीर्याने करणे अपेक्षित असते. परंतु परनिंदा किंवा दुसऱ्याच्या नावाने बोटे मोडणे, नावे ठेवणे ही सवय वांदरलाल पोपट यांनी बहुधा ब्रह्मांडनायकांकडून उचलली असावी. ते ज्याप्रमाणे इतरांना नावे ठेवणे, निंदा करणे - म्हणजे नेहरू कसे चूक होते वगैरे - दुसऱ्यांबद्दल खोट्यानाट्या गोष्टी पसरविण्याचे खेळ किंवा नौटंकी करीत असतात त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून वांदरलाल चालत असावेत. शिवरायांना नावे ठेवणाऱ्या काळीटोपीधाऱ्यांच्या वागण्यावरुन लक्ष इतरत्र वळविण्यासाठी आणि भाजप-संघपरिवाराला वाचविण्यासाठी वांदरलाल पोपट आता शरद पवारांवर निशाणा साधत आहेत. त्यांनी तो साधावा पण आपल्याला वापरुन घेतले जात आहे हे जेव्हा वांदरलालांना कळेल तेव्हा त्यांची अवस्था माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारखी झाली असेल. याचे कारण भाजप व संघपरिवाराची वाढ किंवा त्यांना आलेली सूज ही कृत्रिम आहे. इतर राजकीय पक्ष फोडून त्यांनी स्वतःचा पक्ष वाढविला आहे. तसेच ज्या राज्यात जो प्रादेशिक किंवा स्थानिक पक्ष प्रबळ असेल त्यांच्या पाठकुळी बसून (पिग्गि बॅकिंग) त्यांनी राजकारण करुन स्वतःला मोठे केले आहे आणि थोडीफार ताकद येताच ज्यांची मदत घेतली त्यांनाच नष्ट करुन टाकले आहे. महाराष्ट्रात त्यांनी मूळच्या शिवसेनेचा असाच वापर केला आणि मग त्यात फूट पाडली. त्यामुळे एकनाथ शिंदे यांचे भवितव्य किती चमकदार आहे हे वांदरलाल यांनी समजून घ्यावे आणि वेळीच सावध व्हावे. वांदरलाल यांनी हे असले धंदे करण्यापेक्षा त्यांच्या पक्षाच्या नावात जे महाराष्ट्र नाव आहे त्या महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला नख लावण्याचे जे प्रकार सुरु झाले आहेत त्याविरुध्द आवाज उठविल्यास त्यांना अधिक पाठिंबा मिळेल.

महाराष्ट्राच्या स्वाभिमान व अस्मितेवर आघात सुरु आहेत. हे हल्ले करणारे दिल्लीपति कोण आणि कुठचे आहेत हे लक्षात घेऊन त्यांच्या मनात महाराष्ट्र, मुंबई व मराठी माणूस यांच्याबद्दल द्वेष, आसूया, मत्सर का आहे हे लक्षात घ्यावे. महाराष्ट्राला कंगाल करणे, महाराष्ट्राचे तुकडे करणे आणि महाराष्ट्राचे महत्व नष्ट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. हे सहन करायचे की याचा प्रतिकार करायचा हे महाराष्ट्रातील समस्त मराठी लोकांनी ठरवायचे आहे.

गुजरातच्या निवडणूक प्रचारात बोलताना महान ब्रह्मांडनायकांनी देशात गुजराती लोकांविरुध्द मुद्दाम प्रचार व बदनामी सुरु असल्याचे सांगून गुजराती अस्मितेला कुरवाळण्याचा व जागविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ते स्वतः आणि त्यांच्या हस्तकांमार्फत महाराष्ट्र आणि मराठी माणसांच्या अस्मितेवर - स्वाभिमानावर सातत्याने आघात करण्याचे काम होते तेव्हा ते मूक-बधीर का होतात? असला एकतर्फी कांगावखोरपणा आता बंद करण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राची मानखंडना, मानभंग करणाऱ्यांचा प्रतिकार करण्याची वेळ आली आहे!

■■




**एस. एल. शकधर**
१८ जून १९७७ ते १७ जून १९८२

**आरव्हीएस पेरीशास्त्री**
१ जानेवारी १९८६ ते २५ नोव्हेंबर १९९०

**टी. एन. शेषन**
१२ डिसेंबर १९९० ते ११ डिसेंबर १९९६

# केंद्रीकरणाची अति...तेथे...???


**अनंत बागाईतकर**

मराठीत 'अति तेथे माति' अशी म्हण प्रचलित आहे. त्याचा प्रत्यय हळूहळू येऊ लागला आहे. लोकशाही संस्थांच्या मोडतोडीबरोबरच त्या संस्थांवर आपल्याच विचारांच्या-आपल्यालाच कह्यात राहणाऱ्यांची लाचार-भरती करण्याचे जे प्रकार २०१४ नंतर सुरु झाले. ते इतके अति झाले की आता त्याला न्यायालयात आव्हान देण्याची पाळी सुजाण-सुबुध्द मंडळींवर आली. निवडणूक आयोग ही लोकशाही व्यवस्थेतील एक अतिशय महत्वाची, कळीची अशी घटनात्मक संस्था आहे. देशात निःपक्ष, निकोप व खुल्या पध्दतीने निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्यघटनेने त्यांच्यावर दिलेली आहे. त्यांची निःपक्षता राखण्यासाठी राज्यघटनेने त्यांना म्हणजेच निवडणूक आयुक्तांना विशेष असे अधिकारही प्रदान केलेले आहेत. त्यामुळेच एस.एल.शकधर, आरव्हीएस पेरीशास्त्री, टी.एन. शेषन यांच्यासारख्या स्वतंत्र बाण्याच्या निवडणूक आयुक्तांनी आपल्या पदाचा आणि कामगिरीचा ठसा उमटविलेला आढळतो. शेषन यांनी राजकीय पक्षांमध्ये अशी काही दहशत उत्पन्न केली होती की त्यांना 'टेरर शेषन'(टी फॉर टेरर) म्हटले जात. अर्थात मिळालेल्या


अधिकारांचा क्वचितप्रसंगी त्यांनी काहीसा अवाजवी वापरही केला परंतु देशाचा मुख्य निवडणूक आयुक्त हा सरकारच्या हातातील बाहुले नाही किंवा सरकारच्या तालावर नाचणाराही नाही हे सिध्द करतानाच त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या घटनात्मक अधिकारांना जे कार्यकारी किंवा व्यावहारिक महत्व प्राप्त करुन दिले ती त्यांची कामगिरी निश्चितच उल्लेखनीय मानली जाते. त्यामुळेच त्यांच्या नंतरच्या निवडणूक आयुक्तांना त्याचा मोठा लाभ प्राप्त झाला.

निवडणूक आयुक्तांनी त्यांना मिळालेल्या राज्यघटनादत्त अधिकारांचा वापर सुरु केल्यानंतर राजकीय मंडळी म्हणजेच राजकीय पक्ष खडबडून जागे होणे अपेक्षितच होते. निवडणूक आयोगाला फारकाळ ढिले सोडून चालणार नाही याची जाणीव राजकीय वर्गाला झाली होती. त्यातूनच एक सदस्य निवडणूक आयोगाऐवजी तीन-सदस्य निवडणूक आयोगाच्या निर्मितीची कल्पना मांडली गेली. तोपर्यंत भारतात एकच मुख्य निवडणूक आयुक्त असे. परंतु तीन सदस्य आयोग स्थापन केल्यास आणि बहुमताने निर्णय प्रक्रिया अमलात आणल्यास मुख्य निवडणूक आयुक्तांची दादागिरी चालू शकणार नाही असा होरा यामागे होता. त्यानुसार सर्वप्रथम राजीव गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात ऑक्टोबर-१९८९ मध्ये याबाबतची घटनादुरुस्ती करुन निवडणूक आयोगात एकाहून अधिक निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा करण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर हे बदल केल्याने त्यावेळी काँग्रेसवर आणि सरकारवर सडकून टीका झाली. नोव्हेंबरमध्येच लोकसभा निवडणुका होऊन केंद्रात सत्ताबदल झाला आणि काँग्रेसचा पराभव होऊन विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधान झाले. त्यांच्या सरकारने वरील बदल अमलात न आणता नियमात फेरफार करुन पुन्हा एक सदस्य निवडणूक आयोगाची प्रथा सुरु केली. अर्थात विश्वनाथ प्रतापसिंग आणि नंतरचे चंद्रशेखर यांचे सरकार अल्पजीवि ठरले. १९९१ मध्ये पुन्हा लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या. राजीव गांधी यांची दुर्दैवी हत्या झाली. काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या आणि पीव्ही नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. १९९० मध्येच शेषन यांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक झाली होती. १९९१ची सार्वत्रिक निवडणूक त्यांच्याच देखरेखीखाली झाली होती. परंतु नंतरच्या काळात शेषन यांनी मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून स्वतंत्र बाणा दाखविण्यास सुरुवात केल्यानंतर राजकीय वर्गाने त्यांचे पंख कापण्याचा निर्णय केला. १९९३ मध्ये तीन सदस्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेवर पुन्हा शिक्कामोर्तब करुन शेषन यांच्या बरोबरीने अन्य दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. राज्यघटनेतील तरतुदीनुसार देशाचे राष्ट्रपति निवडणूक आयुक्तांची नेमणूक करतात. अर्थात यामध्ये त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळाची शिफारस विचारात घ्यावी लागते. राज्यघटनेच्या ३२४(२) कलमात याबाबत तरतूद आहे. ३२४ कलमातच निवडणूक आयुक्तांच्या अधिकारांचा उल्लेखही आहे. प्रामुख्याने देशातील निवडणुकांचे आयोजन, व्यवस्थापन व देखरेख ही स्थूल मानाने आयोगाची मुख्य जबाबदारी आहे. १९९३ मधील निर्णयानुसार तिन्ही निवडणूक आयुक्तांचा दर्जा समान ठेवण्यात आला. तिघांचे अधिकारही समान ठेवण्यात आले. निर्णयासाठी बहुमताचा निकष निश्चित करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे तिघांमधील ज्येष्ठाला मुख्य निवडणूक आयुक्त मानण्याचा प्रघात पाळला जातो.


निवडणूक आयोगाच्या निःपक्षतेच्या मुद्यावरुन करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या टिप्पण्या, मतप्रदर्शन व निरीक्षणांमुळे हा मुद्दा



राजीव गांधी



चंद्रशेखर



व्ही. पी. सिंग



पी. व्ही. नरसिंहराव

विशेष चर्चेत आला आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयुक्तांच्या नेमणूक प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. मे महिन्यापासून निवडणूक आयुक्तांचे एक पद रिक्त होते. हिमाचल व गुजरातच्या निवडणुकांची प्रक्रिया चालू असतानाच अत्यंत घाईघाईने तिसऱ्या आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. ती वादग्रस्त ठरलेली आहे कारण सेवेतील एका नोकरशहास राजीनामा द्यायला लावून अक्षरशः चोवीस तासांच्या आत त्याची निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने या भरती-प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत आणि सरकारला जाब विचारला आहे. अरुण गोयल हे पंजाब केडरचे आयएएस म्हणजेच सनदी अधिकारी होते. अवजड उद्योग विभागाचे ते शंका उपस्थित करुन चक्क त्या नेमणूक प्रक्रियेची माहिती विचारताना संबंधित फायलीही न्यायालयापुढे सादर करण्याची सूचना केंद्र सरकारला केली आहे. २०२५ मध्ये गोयल हे मुख्य निवडणूक आयुक्त होऊ शकतात. सध्या राजीवकुमार हे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत आणि अनूपचंद्र पांडे हे दुसरे निवडणूक आयुक्त आहेत. गोयल यांच्या शंकास्पद नेमणुकीने आयोगाबद्दल उपस्थित होणाऱ्या विविध प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत. याचे कारण गेल्या काही काळात निवडणूक आयोगाचे आचरण हे निव्वळ सरकारी खात्याप्रमाणे आणि सरकारच्या तालावर नाचणारे असे झाले होते. सत्तापक्षाला उघडउघड आणि कोडग्यासारखे झुकते माप देणे आणि विरोधी पक्षांविरुध्द मात्र नियमांचा बडगा उगारण्याचे धंदे निवडणूक



अरुण गोयल राजीव कुमार अनुपचंद्र पांडे

सचिव होते. त्यांना स्वेच्छानिवृत्ती घेण्यास लावण्यात आली आणि दुसऱ्याच दिवशी त्यांची निवडणूक आयुक्तपदी नेमणूक करण्यात आली. मे महिन्यापासून तिसऱ्या निवडणूक आयुक्तांचे पद रिकामे होते. १९ नोव्हेंबर रोजी गोयल यांची त्या पदावर नेमणूक करण्यात आली. चोवीस तासात त्यांच्या नेमणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या घाईगडबडीमागील गौडबंगाल उलगडलेले नाही आणि त्याबाबतच न्यायालयाने प्रश्न व आयोगाने कोणतीही लज्जा किंवा शरम न पाळता सुरु केले होते. त्यामुळेच एकंदरीतच त्यांच्या निःपक्षतेबद्दल भलेमोठे प्रश्नचिन्ह निर्माण होणे अत्यंत स्वाभाविक होते.

निवडणूक आयोगाच्या पक्षपाती आचरणाचे प्रकार २०१४ पासून वाढीस लागलेले आढळतात. भेदभावाचे हे आचरण निश्चितपणे आयोगाच्या प्रतिष्ठा व नावलौकिकाला साजेसे नाही. विशेष म्हणजे आयोगाच्या कामकाजातील



हेलिकॅप्टरमधून उतरविण्यात आलेली पैशाची काळी ट्रंक



सरकारी व मुख्यतः राजकीय स्वरुपाचा हस्तक्षेप इतका ठळक आणि उघड होता की एखाद्या अशिक्षित माणसालाही त्यांचे पक्षपाती वर्तन लक्षात यावे. हिमाचल प्रदेश आणि गुजरातच्या विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर करतानाच आयोगाने केलेला पक्षपातीपणा सर्वांच्याच समोर आहे. हिमाचल प्रदेश आणि गुजरात विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेणे अपेक्षित असताना निवडणूक आयोगाने दोन्ही राज्यांच्या निवडणुकांची स्वतंत्र वेगवेगळी वेळापत्रके जाहीर केली. कारण उघड आणि स्पष्ट होते की पंतप्रधानांना गुजरातसाठी काही योजनांची घोषणा करायची होती आणि त्यासाठी गुजरातच्या निवडणुकांचे वेगळे वेळापत्रक जाहीर करुन त्यांना तशी संधी देण्यात आली. एकीकडे हे महान पंतप्रधान एकाचवेळी गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या सर्व निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या बाता मारत फिरत असतात. प्रत्यक्षातील त्यांचे आचरण उलटेच असते. यामध्ये मुद्दा निवडणूक आयोगाचा आहे की आयोगाने केवळ सत्तापक्षाला सोयीचे जावे म्हणून अशा रीतीने निवडणुकांची वेगवेगळी वेळापत्रके जाहीर करुन त्यास बळी पडणे कितपत औचित्याला धरुन आहे? त्यामुळेच विशेष करुन २०१४ नंतर निवडणूक आयोगाचे आचरण हे निःपक्ष राहिले नसल्याची अनेक उदाहरणे समोर आलेली आहेत. २०१९ मध्ये ओडीशा विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी तेथील एक निवडणूक अधिकारी महंमद मोहसीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी केल्याबद्दल त्यांना निलंबित करण्यात आले होते.

'एसपीजी'(स्पेशल प्रोटेक्शन ग्रूप) सुरक्षा असलेल्या अतिविशिष्ट नेत्यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी न करण्याचा नियम असल्याकडे बोट दाखवून मोहसीन यांना निलंबित करण्यात आले. परंतु काही खुलाश्यांसाठी निवडणूक अधिकाऱ्यांना अशा तपासण्या करण्याचे अधिकार असतात.याच निवडणुकीच्या वेळी ओडीशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याही हेलिकॉप्टरच्या तपासण्या करण्यात आलेल्या होत्या. या अधिकाऱ्याकडे पंतप्रधानांच्या हेलिकॉप्टरमधून रोकड नेण्याची तक्रार आलेली होती आणि केवळ त्या आधारे त्याने ही तपासणी



महंमद मोहसीन

केली होती. त्याबाबतची कागदपत्रे त्याने एसपीजी अधिकाऱ्यांना सादर केली होती व त्यांनी तशी परवानगीही दिली होती. मात्र मागाहून खुनशीपणे त्या अधिकाऱ्याला एक अगाध नियम दाखवून निलंबित करण्यात आले. काही माजी केंद्रीय सचिवांनी यासंदर्भात निवडणूक आयोगाला पत्र लिहून नाराजी कळविली होती आणि निवडणुकीमध्ये कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्याला संरक्षण देण्यात आयोगाने जबाबदारी पार पाडलेली नसल्याबद्दल निषेध नोंदविला होता. कर्नाटकातील चित्रदुर्ग येथील जाहीर सभेसाठी पंतप्रधान गेलेले असताना त्यांच्या हेलिकॉप्टरमधून एक मोठी काळी ट्रंक-पेटी बाहेर नेतानाची दृष्ये गाजली होती. कर्नाटकातील गेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी हा ट्रंकेचा वाद पेटला होता. काँग्रेस पक्षाने याबाबत निवडणूक आयोगाकडे रीतसर तक्रार केलेली होती. अर्थातच पंतप्रधानांच्या विरुध्दच्या तक्रारीची दखलही






अशोक लव्हासा



सुनील अरोरा



सुशील चंद्रा

घेण्याचे सौजन्य आयोगाने दाखविले नाही हे ओघाने आलेच.

अशी अनेक उदाहरणे देता येतील. २०१९च्याच लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील विविध निवडणूक प्रचार सभांमध्ये बोलताना पंतप्रधानांनी पुलवामा येथे हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतिसाठी मते मागितली होती. युवकांनी या हुतात्म्यांचे स्मरण करुन आणि बालाकोट येथील दहशतवाद्यांच्या तळावर हल्ला करणाऱ्या शूरवीरांसाठी आपली मते भाजपला देण्याचे आवाहन त्यांनी केले होते. हा सरळसरळ निवडणूक आचारसंहितेचा भंग होता कारण भारतीय सेना, लष्कर आणि त्यांच्याशी निगडित मुद्यांचा निवडणूक प्रचारात वापर न करण्याचा आचारसंहितेत दंडक घालण्यात आलेला आहे. मात्र पंतप्रधानांना मते मागण्याच्या नादात या दंडकाचे विस्मरण झाले असावे. याबाबतही निवडणूक आयोगाकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या आणि त्यावरुन मोठा वादही निर्माण झाला होता. निवडणूक आयोगाला या तक्रारी व वादाची दखल घ्यावी लागली होती. महाराष्ट्राचे तत्कालीन निवडणूक प्रमुख आणि उस्मानाबाद जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक आयोगाकडे या तक्रारी रीतसर पाठवितनाच पंतप्रधानांकडून आचारसंहितेचा भंग झाल्याचे स्पष्ट म्हटले होते. परंतु निवडणूक आयोगाने

महिनाभर त्या अहवालाची दखलच घेतली नाही. याच दौऱ्यात त्यांनी हिंदू-मुस्लिमांचाही उल्लेख करुन मते मागण्याचा प्रकार केला होता. परंतु निवडणूक अधिकाऱ्यांचा अहवाल मिळूनही निवडणूक आयोगाला त्याची त्वरित दखल घ्यावीशी वाटली नव्हती.

यावेळच्या तीन निवडणूक आयुक्तांमध्ये असोक लव्हासा यांचा समावेश होता. सुनील अरोरा मुख्य निवडणूक आयुक्त होते व सुशील चंद्रा हे दुसरे आयुक्त होते. असोक लव्हासा यांनी हा आचारसंहितेचा भंग असल्याचे मत नोंदवले होते. परंतु बहुमताने चालणाऱ्या निवडणूक आयोगात सुनील अरोरा आणि सुशील चंद्रा यांनी पंतप्रधानांना 'स्वच्छता प्रमाणपत्र'(क्लीन चिट) देण्याचा निर्णय केला आणि लव्हासा यांचा केवळ कागदी विरोध राहिला. गृहमंत्री अमित शहा यांच्या संदर्भातही निवडणूक आचारसंहिता भंगाच्या तक्रारी होत्या व त्यातही तथ्य असल्याचे आणि त्या कारवाईपात्र असल्याचे मत लव्हासा यांनी नोंदविलेले होते. परंतु पक्षपात व भेदभावाने ओतप्रोत भरलेल्या निवडणूक आयोगाने लव्हासा यांच्या विरोधी मताची दखल न घेता केवळ बहुमताने या नेत्यांना 'स्वच्छता प्रमाणपत्र' प्रदान करुन टाकले. हा प्रकार येथेच थांबत नाही. यानंतर पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांच्या विरोधात मत नोंदविणाऱ्या लव्हासा यांच्या मागे ईडी, सीबीआयचा ससेमिरा लावला गेला. लव्हासा यांच्या उत्पन्नाच्या, संपत्ती व मालमत्तेच्या चौकश्या व तपास सुरु करण्यात आल्या. यामध्ये लव्हासा यांच्या पत्नीच्या मागे देखील तपासयंत्रणांचा ससेमिरा लावण्यात आला. हे कमी काय म्हणून प्रशासकीय सेवेत वरिष्ठ पदावर असलेल्या त्यांच्या मुलीचा देखील या संस्थांनी पिच्छा पुरविण्यास सुरुवात केली. ही मुलगी जम्मू-काश्मीरमध्ये प्रशासकीय सेवेत वरिष्ठ पदावर काम करीत होती. लव्हासा यांना तडकाफडकी काढणे शक्य नसल्याने त्यांचा छळ सुरु करण्यात आला. अखेर त्यांना आशियाई विकास



बँकेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेमण्यात येऊन त्यांना निवडणूक आयुक्तपदावरुन मुदतीपूर्वीच निवृत्त करण्यात आले. अत्यंत निगरगट्टपणे या गोष्टी घडल्या व घडविण्यात आल्या. अशा निष्ठूर व्यवस्थेशी एकटे लव्हासा लढणे शक्यच नव्हते. त्यांनी आशियाई विकास बँकेचे पद स्वीकारुन निवडणूक आयुक्तपद सोडले. हे उदाहरण तपशीलाने देण्याचे कारण एवढेच की निवडणूक आयोग कुणाच्या तालावर नाचत आहे याची कल्पना यावी. वर्तमान राज्यकर्त्यांनी ईडी आणि सीबीआय, एनआयए यासारख्या केंद्रीय यंत्रणांचे रुपांतर एखाद्या शस्त्रात केले आहे. जो त्यांच्या विरोधात जाईल त्याच्या विरुध्द या यंत्रणांना सोडायचे. म्हणजेच या प्रकारामागील सूत्रधार कोण आहेत हे एखादा अडाणी माणूसही ओळखू शकेल. परंतु आता दहशत अशी निर्माण करण्यात आली आहे की कुणी विरोधात जाण्याचे धाडसच करणार नाही. त्यामुळेच आता निःपक्षतेच्या मुद्यावरुन सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला केलेल्या प्रश्नांना महत्व प्राप्त झाले आहे. निवडणूक आयोगच पक्षपाती असेल तर या देशातील निवडणुका खुल्या, निकोप, निःपक्ष पध्दतीने होऊच शकणार नाहीत व त्यादृष्टीने सध्या न्यायालयात सुरु असलेल्या यासंबंधीच्या प्रकरणाचे महत्व मोठे आहे.

न्यायालयात या प्रकरणाचा जो निर्णय व्हायचा तो होईल. परंतु निवडणूक आयोगाच्या निःपक्षतेबद्दल उपस्थित झालेल्या शंका, त्याची अनेक उदाहरणे ही भारतीय लोकशाही व्यवस्थेला फारशी शोभादायक नाहीत. २०१४ पूर्वी देखील काही निवडणूक आयुक्तांनी पक्षपाती आचरण केल्याची उदाहरणे सापडू शकतील परंतु त्यावेळी त्याची दखल घेतली जाऊन तोडगा काढण्यात येत असे. त्याचबरोबर त्याकाळात राज्यघटना, निवडणूक आचारसंहिता, कायदेपालन, नियमपालन याची थोडीफार तरी जाणीव ठेवली जात असे. आता कोणतीही चाड नसलेले राजकीय नेतृत्व असल्याने त्यांनी राज्यघटना, कायदे, लोकशाही संकेत व प्रथा या सर्वांना केवळ धाब्यावरच बसवलेले नाही तर त्यांची पायमल्ली सुरु केली आहे. प्रतिकूल मत नोंदविणाऱ्या निवडणूक आयुक्ताच्या विरोधात जर खुनशीपणे ससेमिरा लावला जात असेल तर या सर्व खुणा भारतातल्या लोकशाही व्यवस्थेच्या ऱ्हासाच्या आहेत हे स्पष्टपणे दिसू लागले आहे. याचिकेवरील सुनावणीत माननीय न्यायालयाने 'प्रसंगी निवडणूक आयोगाने (म्हणजेच आयुक्तांनी) पंतप्रधानांच्या विरोधात देखील भूमिका घेणे अपेक्षित आहे' असे मत नोंदविले आहे. न्यायालयाचे हे



मतप्रदर्शन स्वागतार्ह आहे परंतु ते अतिआदर्शवादी आहे. म्हणूनच असोक लव्हासा यांच्या उदाहरणाचा उल्लेख केला. एखाद्या आयुक्ताने प्रतिकूल मत नोंदविल्यास त्याला कसे पछाडून टाकले गेले याचे ते उदाहरण आहे. त्यामुळे केवळ तात्विक चर्चा करुन या समस्येवर तोडगा निघणार नाही. निवडणूक आयुक्तांच्या नेमणूक प्रक्रियेवर टिप्पणी करताना न्यायालयाने ती अधिक निःपक्ष व्हावी आणि निवडणूक आयोगाला पुरेसे स्वातंत्र्य व स्वायत्तता मिळण्याच्या दृष्टीने त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींचा समावेश असावा असेही सुचविले आहे. काहींच्या मते पंतप्रधान, संसदेतील विरोधी पक्षनेता, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति यांच्या निवड समितीमुळे ही प्रक्रिया तुलनेने अधिक चांगली होईल असे मत व्यक्त केले आहे. परंतु पुन्हा प्रश्न येतो तो सचोटीचा. या निवड समितीत पंतप्रधान असल्यानंतर त्यांनी एखाद्या नावाचा प्रस्ताव केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति त्यास विरोध करु शकतील काय? तेवढे धाडस ते दाखवू शकतील काय? तसेच काहींनी यासंदर्भात निवडणूक आयुक्तांना निश्चित सेवा कालावधी किंवा मुदत ठरविण्यात यावी ज्यामुळे त्यांचे काम काही प्रमाणात का होईना स्वायत्त होऊ शकेल अशी एक सूचनाही केली आहे. थोडक्यात राजकीय सत्तेचा हस्तक्षेप कमीतकमी राहून निवडणूक आयुक्तांची नेमणूक व्हावी ही अपेक्षा आहे व त्या संदर्भात काही तोडगा निघू शकतो काय हा प्रश्न आहे. अर्थात याठिकाणी सीबीआय किंवा सीव्हीसी(सतर्कता - दक्षता आयोग) प्रमुखांच्या नेमणुकीत पंतप्रधान, लोकसभेचे पीठासीन अध्यक्ष, विरोधी पक्षनेते यांच्या निवड समितीकडून निर्णय केला जातो. त्यात विरोधी पक्षनेत्याने प्रतिकूल मत नोंदविले तरी लोकसभा अध्यक्ष व पंतप्रधान हे एकाच पक्षाचे असल्याने निर्णय त्यांच्याच बाजुने होतो हे आता एव्हाना सिध्द झाले आहे आणि ही यंत्रणाही निरर्थक ठरत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळेच बदलत्या राजकीय परिस्थितीत या संस्था-संघटना व यंत्रणांची स्वायत्तता टिकवायची असेल तर यापुढे जाऊन एखादा उपाय शोधण्याची वेळ आली आहे.




यासंदर्भात काही अभ्यासकांनी आणखी एका मुद्याकडे लक्ष वेधले आहे. तो मुद्दा आहे निवडणूक रोखे पध्दती किंवा इंग्रजीत ज्याला 'इलेक्टोरल बाँड' म्हटले जाते त्याचा. ही एक अत्यंत अपारदर्शक, एकांगी आणि केवळ सत्तापक्षाला अनुकूल अशी योजना मोदी सरकारने लागू केली आहे. यामध्ये बड्या उद्योगांना हे निवडणूक बाँड खरेदी करण्याची आणि त्यांच्या पसंतीच्या राजकीय पक्षाला ते हस्तांतरित करण्याची सर्वसाधारण योजना आहे. आतापर्यंतच्या माहितीनुसार सर्वाधिक बाँड हे सत्तापक्षाला म्हणजेच भाजपला मिळालेले आहेत. त्यामुळे ही योजना म्हणजे एक निव्वळ चलाखी असल्याचे मत अनेक तज्ञांनी व्यक्त केले आहे. सत्तापक्षालाच नेहमी पैसा व देणग्या जास्त मिळणार हे उघड सत्य असताना असल्या चलाख्या करण्याची गरज नसल्याचे त्यांचे मत आहे. या योजनेला देखील न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. आणि अभ्यासक व निरीक्षकांच्या म्हणण्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने त्यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. निवडणूक पध्दतीमधील दोष खरोखरच दूर करण्याची भूमिका असेल तर देणग्यांच्या संदर्भातील या चलाखीबाबत निर्णय करण्याची वेळ आली आहे. निवडणूक आयुक्तांच्या नेमणुका हा त्यातील एक मुद्दा आहे. परंतु निवडणूक प्रणाली - व्यवस्था किंवा यंत्रणाच दोषरहित करायची असेल तर निवडणूक बाँड सारख्या चलाखीच्या योजनांबाबत वास्तववादी आणि धाडसी भूमिका न्यायालयाने घेण्याची अपेक्षा आहे. केवळ निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकावर लक्ष केंद्रित करुन महत्वाच्या मुद्याकडे न्यायालयाने दुर्लक्ष करु नये हीच अपेक्षा ! राजकीय सत्तेच्या केंद्रीकरणातून ही विकृती जन्माला आली आहे आणि तिच्यावर इलाज करण्याची वेळ आली आहे. केंद्रीकरणाच्या 'अति'तून देशाची, लोकशाहीची, लोकशाही संस्थांची, राज्यघटनेची 'माती' होऊ नये यासाठी भूमिका घेण्याची ही वेळ आहे!

■■



# अशांत इराण आणि भारत

**जतिन देसाई**

इराण अशांत आहे. सप्टेंबर महिन्यापासून सुरू झालेलं हिजाब विरोधी आंदोलन राजधानी तेहरान पुरतं मर्यादित राहिलं नसून संपूर्ण इराणमध्ये पसरलं आहे. १९७९ मध्ये झालेल्या 'इस्लामिक क्रांती' नंतर काही वेळा धार्मिक कट्टरता आणि धार्मिक कायद्यांच्या विरोधात इराणात आंदोलने झाली पण ती आंदोलने कट्टरपंथी राज्यकर्त्यांनी दडपशाहीचा वापर करून चिरडून टाकली. मात्र या वेळेचं चित्र वेगळं आहे. आताचं आंदोलन चिरडून टाकणे सोपे नाही. इराणच्या पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आणि मारहाणीत ४७५ हून अधिक लोक मेली आहेत. २०,००० हून अधिक जण तुरुंगात आहेत. इस्लामिक कायदे आणि त्यामुळे येणाऱ्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आल्यामुळे लोक हैरान झाली आहेत. महत्त्वाचं म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर इराणचं प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक खेळाडूंनी आपल्या कृतीतून हिजाब विरोधी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. इराणच्या सर्वोच्च धार्मिक नेते अयातुल्ला खामेनी यांची भाची फरीदा




मुरादखानी हिला देखील पकडण्यात आले आहे. अनेक इराणी अभिनेते, अभिनेत्रीने पण आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. जगभरातून लोक या आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. भारताने मात्र या आंदोलनाबद्दल, अजून तरी, काही भूमिका घेतलेली नाही.

महसा अमिनी नावाच्या २२ वर्षाच्या एका तरुण कुर्दीश मुलीला तेहरान येथे तिने हिजाब व्यवस्थित घातल्या नसल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी १६ सप्टेंबरला पकडलं. तीन दिवसानंतर तिचा मृत्यू झाला. पोलिसांचं म्हणणं होतं की हृदयविकाराच्या धक्क्याने तिचा मृत्यू झाला. पण संपूर्ण इराणचा या गोष्टीवर विश्वास नाही. त्यांचं म्हणणं आहे की पोलिसांच्या अत्याचारामुळे महसाचा मृत्यू झाला. हजारोंच्या संख्येने रस्त्यावर उतरून इराणी जनतेने महसाची हत्या करण्यात आली असल्याचं म्हटलं. अनेक तरुण मुलींनी स्वतःचे केस कापून हिजाबच्या शक्तीच्या विरोधात आंदोलन केली. त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय स्तरावर झाला. जगभरात अनेक महिलांनी स्वतःचे केस कापून इराणच्या

महिलेसोबत आपण असल्याची भावना व्यक्त केली. भारतात पण अनेक महिलांनी स्वतःचे केस कापले आणि इराणच्या हिजाब विरोधी आंदोलनाला आपला पाठिंबा जाहीर केला. संपूर्ण जगाचं लक्ष आज इराणकडे आहे. फरीदा यांनी एका व्हिडिओत म्हटलं, " जगभरातील मुक्त नागरिक, तुम्ही आमच्या सोबत राहा आणि इराणच्या हत्यारी सरकारशी सर्व संपर्क तोडण्याचं तुमच्या सरकारला सांगा. " या व्हिडिओत फरीदानी पुढे म्हटलं, " इराणची सरकार कुठल्याही धार्मिक सिद्धांताशी प्रामाणिक नाही. त्यांना स्वतःकडे सत्ता कायम ठेवण्याशिवाय दुसरं काही कळत नाही. " फ्रान्समध्ये राहणाऱ्या फरीदाच्या भाऊने हा व्हिडिओ प्रसारित केला. फरीदाचे दिवंगत वडील विरोधी पक्षाचे महत्त्वाचे नेते होते. त्याने खामेनी यांच्या बहिणीशी लग्न केले होते. फरीदाचा भाऊ देखील इराणच्या कट्टरपंथी राज्यकर्त्यांच्या विरोधात आहे.

महसा ही कुर्दीश होती. कुर्दीश लोकांवर इराणमध्ये अन्याय होत आहे. कुर्दीश लोक इराण, इराक, तुर्कस्तान आणि सीरियात विखुरली गेली आहेत. या चारही देशात त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्यांच्याकडे संशयाने पाहिलं जातं. व्यापक कुर्दीस्तानची मागणी अनेक वर्षापासून होत आहे. पख्तुन किंवा पठाण लोक पाकिस्तान आणि अफगाणिस्तानात विखुरली आहेत. कुर्दीश लोकांची परिस्थिती पण सारखी आहे. महसा एक महिला होती आणि ते सर्वात महत्त्वाचं होतं. इराण सरकारने तिची हत्या केली. संपूर्ण इराण आज महसाची आठवण करून तिला सलाम करत आहे. हिजाब आणि इतर बंधनामुळे लोकांमध्ये असंतोष आधीच होता. महसाच्या हत्येनंतर तो असंतोष मोठ्या प्रमाणात व्यक्त होऊ लागला. वर्ल्डकप मध्ये इराणच्या फुटबॉल टीमने त्यांच्या मॅचच्या आधी राष्ट्रगीत म्हणण्याचं टाळलं. कोट्यावधी लोक वर्ल्ड कप पाहतात आणि त्यांच्या या धाडसी पावलामुळे इराणमध्ये नेमकं काय चाललं आहे ते तात्काळ जगभर पोहचलं. सगळ्यांनी इराणच्या फुटबॉल टीमचं कौतुक केलं. विरोध करण्याचे वेगवेगळे मार्ग असतात. मौन राहून प्रभावीपणे विरोध करता येतो ते इराणच्या फुटबॉल टीमने सिद्ध केलं.

खरंतर इराण एक स्वतंत्र, उदारमतवादी राष्ट्र होतं. तिथे महिलांवर बंधन नव्हती. इराणी चित्रपटात हा उदारमतवाद, इराणची संस्कृती दिसते. तिथे महिला कुठल्याही प्रकारच्या बंधनाशिवाय फिरू शकत होत्या. अनेक महिला आधी पण हिजाबचा वापर करत असे. परंतु त्याचं प्रमाण खूप कमी होतं. १९३६ मध्ये रेझा शहा पेहलवी नावाच्या राजाने जाहीर ठिकाणी हिजाब घालण्यावर बंदी घातलेली. १९७९ मध्ये 'इस्लामिक क्रांती' झाली आणि त्याचे सर्वोच्च धार्मिक नेता अयातुल्ला खोमेनी यांनी ७ मार्च १९७९ ला सर्व महिलांनी हिजाब घालणं अत्यावश्यक असल्याचं जाहीर केलं. दुसऱ्या दिवशी आंतरराष्ट्रीय महिला दिवस होता. हजारोंच्या संख्येने महिलांनी हिजाबच्या सूचनेच्या विरोधात निदर्शने केली. हिजाब बंधनकारक असल्याचा कायदा १९८३ मध्ये करण्यात आला. १९७९ पूर्वी महिलांना मिळत असलेलं स्वातंत्र्य कट्टरपंथी राज्यकर्त्यांनी काढली.

काही वर्षांपूर्वी तेहरानला जात असताना मला आलेला एक मजेदार अनुभव मुद्दामहून सांगितला पाहिजे. माझ्यापुढे काही तरुण इराणी मुली बसल्या होत्या. त्यांच्या बोलण्यातून त्या अमेरिका किंवा युरोप येथे स्थायिक झाल्या असाव्यात असं वाटत होतं. 'आपण थोड्या वेळात तेहरान येथे उतरणार आहोत' अशी माहिती एअर होस्टेस यांनी दिली. पाश्चात्य कपड्यात या तरुण मुली होत्या. लगेच त्या सर्वांनी त्यांच्या बॅगा काढल्या आणि



त्यातून बुरखे काढले. त्यांचं 'परिवर्तन' पाहून त्या आणि आम्ही सर्वजण हसायला लागलो. मुद्दा आहे तो म्हणजे कोणी कुठले कपडे घालावे किंवा कोणी काय खावं हे ठरविण्याचा अधिकार सरकार किंवा अन्य कोणालाही असता कामा नये. हिजाब घालावा किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार संबंधित महिलांना असला पाहिजे. धर्माच्या नावाने महिलांवर बंधन घातली जातात. इराणमध्ये सुरू असलेला हिजाब विरोधी आंदोलन मात्र हिजाबपूरता मर्यादित नाही. लोकं धार्मिक सत्तेला कंटाळले आहेत. त्यांना 'इस्लामिक प्रजासत्ताक' नको. त्यांना हवी आहे लोकशाही. कुर्द लोक राहत असलेल्या प्रदेशात व इतरत्र आंदोलन पसरलं आहे. त्यांना हवं आहे स्वातंत्र्य.

अयातुल्ला खामेनी यांचा विश्वासू इब्राहिम राईसी गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत अध्यक्ष म्हणून निवडून आले. राईसी विचाराने कट्टर आहेत. अमेरिकेने तर २०१९ मध्ये राईसीवर

निर्बंध लादलेले. १९८८ मध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय कैद्यांच्या करण्यात आलेल्या हत्येबद्दल अमेरिकेने राईसी यांचा समावेश काळ्यायादीत केला आहे. न्यायाधीश असताना राईसी यांनी अनेकांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली होती. २०१७ च्या निवडणुकीत 'सुधारणावादी' हसन रोहानी यांनी त्यांचा पराभव केला होता. २०१५ मध्ये इराणने अमेरिकासह एक बहुपक्षीय अणू करार केला होता. त्यामुळे इराणला काही प्रमाणात निर्बंधातून सूट मिळाली होती. परंतु २०१८ मध्ये अमेरिकेच्या तेव्हाच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला त्या करारातून बाहेर काढलं. राईसी यांच परराष्ट्र धोरण चीन आणि रशियाच्या बाजूने आहे. निर्बंध असताना देखील इराणकडून चीन तेल आयात करत आहे. भारताने इराणकडून तेल आयात करणे बंद केलं आहे.

संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगासमोर इराण येथे निदर्शकांवर करण्यात येत असलेल्या अत्याचाराची चौकशी करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय सत्यशोधक समिती बनवण्याचा प्रस्ताव अलीकडे आला होता. ४७ सभासद असलेल्या राष्ट्रांपैकी अमेरिका, ब्रिटन, जपानसह २५ राष्ट्रांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केलं. तर चीन, पाकिस्तान, व्हेनेझुएलासह ६ राष्ट्रांनी प्रस्तावाच्या विरोधात मतदान केलं. भारतासह १६ राष्ट्रांनी तटस्थ राहण्याची भूमिका घेतली. अलीकडच्या काळात भारताने बऱ्याच वेळा तटस्थ राहण्याचं पसंत केलं आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या संदर्भात भारताने रशियाच्या विरोधात भूमिका घेण्याचं सतत टाळलं आहे. इराणने मोठ्या प्रमाणात ड्रोण रशियाला विकले आहेत. रशिया त्याचा उपयोग युक्रेनमध्ये करत आहे. इराणच्या ड्रोणच्या क्षमतेमुळे प्रादेशिकस्तरावर सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सौदी अरेबियावर हल्ले करण्यासाठी इराणचा पाठिंबा असलेल्या येमेनच्या हाऊथी बंडखोराने यापूर्वी ड्रोण वापरले आहेत. इराण आणि रशिया सोबत भारताचे जुने आणि जवळचे संबंध आहेत. रशियाकडून भारत मोठ्या प्रमाणात शस्त्राची खरेदी करतं. तर इराण या मुस्लिम राष्ट्राशी भारताचे विशेष संबंध आहेत. इतर अनेक मुस्लिम राष्ट्रांपेक्षा इराण आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगळी भूमिका घेत असते. इराण काश्मीरचा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर उपस्थित करत नाही. ट्रम्पने इराणवर निर्बंध लादण्यापूर्वी भारत मोठ्या प्रमाणात इराणकडून तेल आयात करत असे. २०१९ मध्ये भारताने आयात करणं बंद केलं. २०१८-१९ मध्ये भारताने इराणहून १२.११ अब्ज डॉलर एवढ्या किमतीचं क्रूड तेल आयात केलं होतं. अलीकडे इराणचे उप परराष्ट्रमंत्री अली बाघेरी भारतात आले होते आणि त्यांनी भारताला ऊर्जासाठी आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याची तयारी दाखवली. इराणहून परत क्रूड तेल आयात करण्याचा विचार भारत सरकार करत आहे. भारत आणि इराण मध्ये जुने व्यापारी संबंध आहेत. भारताने ३.५ अब्ज डॉलरहून अधिक खर्च करून इराणच्या चाबहार येथे बंदर तयार केलं आहे. चीनच्या मदतीने पाकिस्तानने विकसित केलेल्या ग्वादर बंदर येथून मात्र ७० नॉटिकल बाईक एवढ्या अंतरावर आहे. चीनच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी चाबहारची भारताला मदत होईल. मुळात इराण होऊन अफगाणिस्तान आणि तिथून मध्य आशियात पोहोचण्याचा चाबहारच्या मागे उद्देश होता.

इराणशी असलेले जवळचे संबंध लक्षात घेतले तरी इराणच्या एकूण परिस्थितीबद्दल आणि सरकारकडून अहिंसक निदर्शकांवर होत असलेल्या अत्याचाराबद्दल भारताने किमान चिंता तरी व्यक्त केली पाहिजे होती. कदाचित कर्नाटकातील काही कॉलेजमध्ये मुस्लिम मुलींना हिजाब घालण्यावर बंदी घालण्याचा निर्णय सरकारनी स्पष्ट भूमिका न घेण्यामागे असू शकतो. मुळातच, हिजाब घालण्यावर किंवा न घालण्यावर बंदी असता कामा नये. निर्णय घेण्याचा स्वातंत्र्य त्या त्या मुलीवर सोडलं पाहिजे. आपण हे मान्य केलं पाहिजे की शिक्षणाने निर्माण होणाऱ्या जाणीव



जागृतीमुळे मुस्लिम मुली हळूहळू बुरखा आणि हिजाबच्या बाहेर पडतील.

आंतरराष्ट्रीय स्तरावर एका मित्र देशाने काही चुकीचं केलं तर दुसऱ्या देशाने त्याच्या लक्षात आणून दिलं तर त्यात काही चूकीचे नाही. त्याबद्दल काही न बोलणं हेच मुळात चुकीच आहे. हिजाब विरोधी आंदोलन चिरडण्यासाठी दहशत, अत्याचार व पोलीस बळाचा वापर न करण्याची किमान सल्ला देता येईल. आंदोलन करणाऱ्यांशी किमान चर्चा करावी तेवढं तर भारताला निश्चितच सांगता येऊ शकेल. एवढं सांगितल्याने इराणशी असलेले आपले ऐतिहासिक आणि जवळच्या संबंधावर काही परिणाम होणार नाही. शेवटी राज्यकर्ते आणि लोकांमध्ये आपण फरक केला पाहिजे. इराणी जनतेला वाटलं पाहिजे की भारताने आपल्या बाजूने काही गोष्टी इराणच्या कट्टरपंथी सरकारला ऐकवली आहेत.

■■



# फासे उलटे पडू लागले

व्यंकटेश केसरी

गुजरात-हिमाचल प्रदेश विधान सभा निवडणुकांचे निकाल कसेही लागले तरी त्यानंतर देशातले राजकीय समीकरण बदलणार हे नक्की. राजकीय पक्षांना त्यांच्या धोरणात बदल करावा लागेल आणि  जे करणार नाहीत ते एकाकी पडतील. आगामी लोकसभा निडणुकीत टार्गेट स्पष्ट असेल तर स्ट्रॅटेजि आपोआप बनेल आणि त्यात गडबड झाली तर पुढचे सारे गडबडेल.पुढचे १५ महिने निवडणुकांचे आहेत. दक्षिणेतले कर्नाटक, तेलंगणा तर हिंदी भाषिक प्रदेशात म्हणजे मध्य प्रदेश, राजस्थान , छत्तीसगढ या राज्यात निवणुकांचे वारे वाहू लागले आहे आणि लोकसभेच्या निवडणुकीसोबतच आंध्र प्रदेश, ओडिशाच्या निवडणुकाही लागतील. याच काळात पुढची समीकरणे दिसू लागतील. .

भाजपचे 'चाणक्य' व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्या पक्षाला तेलंगणा, तामिळनाडू, ओडिशा,पश्चिम बंगाल व बिहार मधून लोकसभेत ताकत मिळेल असा दावा केला आहे याचा अर्थ त्यांनी भाजपची ताकत उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, आसाम,हरियाणा, उत्तराखंड, येथे अबाधित राहील असे गृहीत धरले आहे. राजकारणात याला "फाजील आत्मविश्वास " असे म्हणतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसरी टर्म हवी आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली हा पक्ष लोक सभेची निवडणूक लढवेल , ते च भाजपचा पंतप्रधान पदाचा चेहरा असेल असे स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु भाजपला कर्नाटक,महाराष्ट्र व पश्चिम बंगालमध्ये चकवा बसेल असा राजधानी दिल्लीतल्या राजकीय निरीक्षकांचा अंदाज आहे. याशिवाय बिहार, पंजाब, झारखंड येथे

भाजपचे हुकमी कार्ड चालत नाही.

परंतु हे नेहमीचेच विश्लेषण दिसत असले तरी मोदी सरकार व भाजपचा पर्दाफाश आता न्यायालयीन प्रणाली, सिव्हिल सोसायटी मार्फत होताना दिसतो. न्यायालयाचे निवाडे सरकारच्या विरोधात भले अजून गेले नसले तरी सुनावणीच्या दरम्यान विचारण्यात आलेल्या प्रश्नांवरून सरकारच्या विश्वासार्हतेला तडा गेला आहे. यामुळे मध्यम वर्गावर भाजप, तिचा राष्ट्रवाद, हिंदुत्व याची पडलेली भुरळ विरळ व्हायला वेळ लागणार नाही. निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांच्या झालेल्या नियुक्ती प्रक्रियेवरून सरकारची हातचलाखी चव्हाट्यावर आली आहे तर निवडणूक ताकत निवडणूक आयोगाकडे आहे काय ? हे प्रश्न निर्माण झाले आहेत.

हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्याचा निकाल जेंव्हा लागेल तंव्हा लागू दे पण पुढील वर्षभरात अनेक राज्यात विधानसभेच्या निवडणुका होतील ,त्या कशा होतील यावर निवडणूक आयोगाची विश्वासार्हता अवलंबून आहे. केंद्र सरकार, सर्वोच्च न्यायालय , निवणूक आयोग यांच्यातले वाढते तणाव, ईडी, केंद्रीय गुप्तचर विभाग, आयकर इत्यादी कायदयाचा राजकीय विरोधकांविरुद्ध करण्यात येत असलेला वापर , त्यातून झालेले सत्तांतर हे भाजपच्या मतदारांना पटत नाही,



हरिश साळवी

किरण रिजुजु



आयोगाच्या निष्पक्षतेवर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी एन शेषन यांची सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने मुक्तकंठाने केलेली प्रशंसा विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्त व त्यांच्या सहकाऱ्यांना झोम्बली तर आश्चर्य वाटणार नाही. शेषन यांच्या प्रमाणे या आयोगाचा धाक सरकार, सत्ताधारी पक्ष यांना वाटत नाही कारण निवडणूक आयुक्तांच्या निवडीची प्रक्रिया पारदर्शी नाही , परिणामतः " जी हुजूर "असणाऱ्यांची नियुक्ती होती असा समज लोकात वाढतो आहे. इलेक्टोरल बॉण्ड्स, इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन याबद्दल लोक, राजकीय पक्ष साशंक आहेत. निवडणुकात वापरला जाणारा पैसा, सत्तेचा दुरुपयोग यांना चाप लावण्याची क्षमता निवडणूक आयोगाकडे नाही, पंतप्रधानांना प्रसंगी जाब विचारण्याची नैतिक "सही दिशा, स्पष्ट नीती" ची भाषा करणारे सत्तेत येण्यासाठी हात चलाखी करतात, साम, दाम , दंड, भेदाचा उघड वापर करतात हे संघ परिवार व भाजपच्या सहानुभूतीदारांना कळू लागले आहे पण गैर भाजप पक्षांची अवस्था "कळते पण वळत नाही "अशी आहे.

केंद्रीय कायदा मंत्री किरण रिजिजू यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलिजियम पद्धतीवर जाहीरपणे टीका केली आहे. ही पद्धत पारदर्शी नाही, नायमूर्ती हे न्यायमूर्तींची निवड कशी करू शकतात? हे अजब आहे, जगात अशी पद्धती नाही. त्यांच्या नियुक्तीचा अधिकार सरकारचा आहे पण तो या कॉलिजियमने कोणत्या अधिकाराखाली घेतला असा सवाल ते सरकारतर्फे करत आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. २०२४ साली नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान झाले तर ही कॉलिजियम पद्धत बरखास्त होऊ



## अयोध्या मॉडेल लई भारी

**"अयोध्या मॉडेल " शिवाय आपण कोणतीही निवडणूक जिंकू शकत नाही हे आता भाजपला कळून चुकले आहे. गुजरातच्या रणसंग्रामात त्यांना अयोध्या आणावी लागली, त्याने या पक्षाच्या व नेत्यांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. फक्त विकासाची कामे, विकासाच्या घोषणा, विकासाचे प्रकल्प यांमुळे सत्ता टिकवता येणार नसल्याने उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री व पंतप्रधानपदाची इच्छुक योगी आदित्यनाथ यांना गुजरात, हिमाचल प्रदेश निवडणूक प्रचारात फिरवणे हे भाजपची, मोदी–अमित शहांची मजबुरी आहे असा अलिखित मेसेज देशभरात गेला आहे. योगी आता आगामी विधानसभा निवडणूक प्रचारासाठी कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणात जाणार हे आता स्पष्ट झाले आहे. गुजरात शिवाय भाजपशासित इतर राज्ये विकासाचे मॉडेल का होऊ शकत नाहीत यावर भाजप, तिचे घोषित, अघोषित प्रवक्ते, भक्त मात्र मौन पाळत असतात.**

शकते. कार्यपालिका, न्यायपालिका यांच्यातील वाढत तणाव, प्रभावहीन निवडणूक आयोग, मुख्यमंत्री व राज्यपाल (केरळ, दिल्ली,पंजाब, पश्चिम बंगाल ) यांच्यातील शीत युद्ध , विरोधी पक्षांच्या सरकारशी संघर्ष करण्याची केंद्राची मानसिकता अशा वातावरणात निवडणुका होऊ घातल्या आहेत. याच्या फायदा विरोधी पक्षांना किती होईल या पेक्षा हे सत्ताधारी भाजपचे किती नुकसान करेल यावर पुढचे राजकारण, सत्ताकारण अवलंबून राहणार आहे. या शिवाय या १५ महिन्यात काही न्यायालयीन निकाल सरकारच्या विरोधात गेले तर त्याचा राजकीय फटका भाजपला बसू शकतो. आणि न्यायालयाने ताणले तर सी व्ही सी, आर टी आय, बाकीच्या स्वायत्त संस्था सक्रिय होऊ शकतात. बेल अभावी तुरुंगात डांबलेल्यांना आता आशा वाटेल. राजकीय पर्याय नेहमी राजकीय पक्षांतूनच मिळतात असे नाही, लोकांनी ठरविले तर सत्तांतर झाल्याचे अनेक दाखले इतिहासात सापडतात.

पंजाब मध्ये सत्ता आल्यानंतर आम आदमी पार्टीच्या डोक्यात हवा गेली आहे तर गुजरात मध्ये या पार्टीने हवा निर्माण केल्याने नेते हवेतच आहेत. आता पुढचा मुकाबला नरेंद्र मोदी विरुद्ध अरविंद केजरीवाल यांच्यात होणार अशी भाषा सुरु झाली आहे. भाजपला पर्याय "आप" असल्याच्या भीतीने केंद्रीय यंत्रणेने "आप" च्या नाड्या आवळायला सुरुवात केली आहे.

विरोधी पक्षांचे ऐक्य संसदेत दिसेल किंवा दिसणार नाही पण निवणुकीनंतर चमत्कार झाल्याचे उदाहरण १९९६ ( देवेगौडा पंतप्रधान झाले), २००४ साली काँग्रेस प्रणित आघाडीचे अल्पमतातले सरकार बनले, पूर्ण काळ चालले आनंद महाराष्ट्रात २०१९ साली महाविकास आघाडी झाली, ती अडीच वर्षे चालली , ईडीचा वापर झाला नसता तर पूर्ण काळ हे सरकार







चालले असते. तेंव्हा अशा चमत्कारांना पुढच्या काळात बराच वाव आहे,

## नरेंद्र मोदींचे खरे एकलव्य अरविंद केजरीवाल

दिल्लीच्या विकास मॉडेलने गुजरातमध्ये वातावरण निर्मिती केली .दिल्ली म्हणजे स्वर्ग नाही. राजधानीतले प्रदूषण, गुन्हेगारी, अस्वच्छता,आरोग्य,कचरा व्यवस्थापन याचा डंका देशभर वाजत असतो. पण मोहल्ला क्लिनिक, सरकारी शाळांचा दर्जा,३०० युनिट मोफत वीज,महिलांना मोफत शहर बस सेवा -- यांनी आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी माहौल बनविला असून हाच पक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला हरविणार असल्याचा प्रचार सुरु केला आहे. मोदी आणि केजरीवाल यांच्या कार्य पद्धतीत बरेच साम्य आहे. दोघांनीही आपण आपल्या पक्षापेक्षा (भाजप, आप) मोठे आहोत अशी प्रतिमा यशस्वीपणे निर्माण केली आहे. दोघांनाही त्याच्यापेक्षा मोठा नेता त्यांच्या पक्षात चालत नाही. जे मोठे होते त्यांना छोटे केले गेले आणि जे झाले नाहीत त्यांना अडगळीत टाकण्यात आले किंवा बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला. दोघांचेही मीडिया व्यवस्थापन तगडे आहे. मार्केटिंग अद्भुत आहे. आपण अण्णा आंदोलनातून आलो आहोत असे एकेकाळी केजरीवाल म्हणायचे पण ते अण्णा हजारे आता विस्मृतीत गेले आहेत.

नरेंद्र मोदी यांना भाजपचे लोक, भक्त "विश्व गुरु," " विश्व नायक " असे म्हणतात तर राजधानीतील राजकीय वर्तुळात केजरीवाल यांना " छोटा मोदी " म्हणून ओळखले जाते. मोदी यांची राजकीय विचारसरणी, हिंदुत्व याच्याबद्दल त्यांच्या टीकाकारांना संशय नाही पण केजरीवाल यांना विचारसरणीच नाही. कल्याणकारी कार्यक्रमांचे गाजर दाखवून त्यांना पंतप्रधान व्हायचे हे त्यांचे स्वप्न २०१४ पासूनचे आहे म्हणूनच त्यांनी वाराणसी लोक सभेची सीट मोदी यांच्या विरोधात लढविली होती. २०२४ ला पुन्हा ते मोदी यांच्या विरोधात निवडणूक लढणार काय ते पुढच्या काळात कळेलच..

एकेकाळी आम आमी पक्षाचे नेते-कार्यकर्ते "मै हूं आम आदमी पार्टी " असे लिहिलेली पांढरी टोपी घालायचे पण सत्तेत आल्यानंतर ती टोपी गायब झाली. " आप" हा कदाचित पहिला पक्ष असेल ज्याचे कधी अधिवेशन झाल्याचे आठवत नाही.गम्मत म्हणजे भाजप नेत्यांच्या, मंत्र्यांच्या डोक्यांवर हल्ली दिसणारी टोपी अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी , नानाजी देशमुख, दिन दयाळ उपाध्याय यांच्या युगात कधी तळपली नाही. गुजरात आणि दिल्लीतील मुख्यमंत्री पदाचा वापर करून मोदी व केजरीवाल यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रतिमानिर्मिती केली. गोध्रा, त्यानंतर उसळलेली गुजरात मधील हिंदी-मुस्लिम दंगल याने मोदींची प्रतिमा "रथ यात्री " लाल कृष्ण आडवाणी यांच्यापेक्षा कट्टर बनली ,शिवाय संघाचा पाठिंबाही त्यांना मिळाला. केजरीवाल अजूनही चाचपडत आहेत. मोदी यांची नक्कल, अनुकरण करणारे भाजप मध्ये भरपूर आहेत पण त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून पुढे जाणारे खरे एकलव्य मात्र अरविंद केजरीवाल आहेत याबद्दल कोणाच्या मनात आता शंका नाही.

■■

**ना**रायण गणेश चंदावरकर यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व मुंबई इलाख्यात २ डिसेंबर १८५५ रोजी होनावर (उत्तर कॅनरा) येथे झाला. त्यांचे घराणे सुखवस्तू असल्यामुळे त्यांचे बालपण आनंदात गेले. त्यांचे बालपण निसर्ग सौंदर्याने नटलेल्या कारवार मध्ये व्यतीत झाले. वयाच्या चौदाव्या वर्षी ते मुंबईत आले. त्यांना मुंबईत आणण्यासाठी त्यांचे एक नातेवाईक शामराव विठ्ठल यांनी मुख्य भूमिका बजावली.

मुंबईत आल्यावर नारायण रावांचे शिक्षण सेंट मेरी (माझगाव) शाळेत झाले. १८७१ मध्ये ते मुंबईतील प्रख्यात अशा एल्फिन्स्टन हायस्कूल मधून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. मॅट्रिक्स शिक्षण संपल्यावर ते विख्यात अशा एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी.ए. अर्थात पदवीधर झाले. १८७६ मध्ये पदवीधर झाल्यावर १८८१ मध्ये कायद्याचे पदवीधर झाले. याच कालखंडात ते काही काळ एल्फिन्स्टन महाविद्यालयात दक्षिणा फेलो म्हणून कार्यरत होते.

या सगळ्या कालखंडात त्यांच्यावर मातोश्री पार्वतीबाई

# ना.ग.चंदावरकर,



**डिसेंबर महिना अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासात महत्त्वाचा आहे. २ डिसेंबर १८५५ रोजी काँग्रेसच्या आजीव सभासदांपैकी एक नारायण गणेश चंदावरकर यांचा जन्म झाला. त्यांच्या जन्माला १६७ वर्षे पूर्ण होत आहेत. २८ डिसेंबर १८८५ या दिवशी मुंबईत काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरले. या घटनेला १६७ वर्षे पूर्ण होत आहेत. डिसेंबर १९३६ मध्ये काँग्रेसचे ग्रामीण भागातील पहिले अधिवेशन फैजपूर येथे भरले. त्याला ८६ वर्षे पूर्ण होत आहेत. अशा या तीन महत्त्वाच्या घटनांचा आढावा आपण घेणार आहोत.**



यांचा विशेष प्रभाव होता. आजोबा विठ्ठलराव कैकिणी यांचाही प्रभाव त्यांच्यावर पडला. वाढत्या वयात या दोघांच्या प्रभावाखाली नारायणरावांनी दमदार वाटचाल केली. सेंट मेरी शाळेत फादर विली यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर गाढ प्रभाव, आयुष्यभरासाठी पडला. या शिक्षकाच्या दैनंदिन वागणुकीतून नारायणरावांनी अनेक गोष्टी उचलल्या. स्वतःच्या हुशारीने आणि गुणांच्या जोरावर ते एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या 'सप्तर्षी' (सात तपस्वी) मध्ये समाविष्ट झाले. अन्य तालेवार लोकांची नावे बघितली तर आपल्या लक्षात या 'सप्तर्षी' गटाचे महत्व येईल. या गटात रा.गो.भांडारकर, परमानंद, न्या.म.गो.रानडे,तेलंग कृ.त्रिं.,फिरोजशहा मेहता इत्यादी समावेश होता. यातील रा.गो.भांडारकर यांना ते आदराने 'माझे महर्षी' म्हणायचे. १८७५ मध्ये नारायणरावांचा विवाह मथुरा सिरूर यांच्याशी झाला. लग्नानंतर त्यांनी पत्नीचे नाव लक्ष्मीबाई ठेवले. या दांपत्यास दोन मुले व दोन मुली झाल्या.

१८७८ मध्ये चंदावरकर यांच्या आयुष्यात एक उत्तम संधी

# काँग्रेस आणि डिसेंबर

प्रा.डॉ.गणेश राऊत




चालून आली. 'इंदूप्रकाश' या द्वैभाषिक पत्राचे इंग्रजी विभागाचे संपादक म्हणून काम करणार का? अशी विचारणा तेलंग यांनी नारायणरावांस केली. चंदावरकर यांनी ही जबाबदारी नुसतीच घेतली नाही तर पुढील दहा वर्षे सांभाळली. वयाच्या २३व्या वर्षी इंग्रजी पत्राचे संपादक होणे सोपे नव्हते. आपल्या संपादक पदाच्या कार्यकिर्दीत त्यांनी या पत्राला एक दर्जा प्राप्त करून दिला. विद्वानांच्या वर्तुळात त्यांची दखल घेतली जाऊ लागली. प्रथम दर्जाच्या साप्ताहिकात या पत्राची गणना होऊ लागली.

संपादकपदाच्या काळातही त्यांचे वकीलीकडे दुर्लक्ष झाले नव्हते. एक यशस्वी कायदे पंडित म्हणून त्यांनी समाजात वजन प्राप्त केले होते. याचे चांगले फळ त्यांना इंग्लंड दौऱ्याच्या निमित्ताने मिळाले. १८८५ मध्ये त्यांना आयुष्यात प्रथमच परदेशात जाण्याची संधी मिळाली. लोकशाहीची जननी असणाऱ्या इंग्लंडमध्ये त्यांची त्रिसदस्यीय आयोगाचे सदस्य म्हणून निवड झाली. हा त्यांच्या आयुष्यातला एक महत्त्वाचा क्षण होता. इंग्लंड मधील निवडणुकीच्या काळात भारताबद्दल जागृती करणे, तेथील लोकमताचा कानोसा घेणे यासाठी त्यांनी प्रथमच विलायतेला प्रयाण केले. इंग्लंडमध्ये हा आयोग ९० दिवस राहीला. हे तीन महिने भरगच्च कार्यक्रमांचे होते. नवे-नवे शिकायला मिळणारे हे दिवस चंदावरकर आयुष्यभर विसरले नाहीत. या त्यांच्या कार्याबद्दल फिरोजशहा मेहता यांनी गौरवद्गार काढले होते. त्यांच्या म्हणण्याचा मतितार्थ असा की चंदावरकर यांच्या कार्यामुळे ब्रिटिशांच्या अंतरंगात कुठेतरी भारताविषयी एक ठिणगी पडली आहे. भविष्यात तिचे विधायक परिणाम दिसून येतील.

१८८५ मध्ये स्थापन झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय सभेच्या कार्यात त्यांनी आजीव सभासद या नात्याने मोलाचा सहभाग दिला. एखाद्या कामात स्वतःला झोकून देण्याची वृत्ती, विविध भाषांवर प्रभुत्व, नम्र वागणूक,पत्रकारितेतील योगदान, व्यावसायिक यशस्वी कारकीर्द यामुळे ते समाजकारण आणि न्यायव्यवस्था अशा दोन्ही क्षेत्रात ते यशस्वी झाले. १९०० मध्ये ते काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. १९०१ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. १९१२ पर्यंत ते या पदावर राहिले. पुढे ते इंदौर संस्थानात प्रधानमंत्री झाले. या पदावरील त्यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी झाली. त्यांनी पद सोडताना इंदौरचे संस्थानिक त्यांना म्हणाले की, 'आमची प्रजा तुमच्या प्रधानमंत्री पदाच्या काळात अत्यंत सुखी आणि आनंदी होती.'

यामुळे त्यांना आणखी एक संधी मिळाली. १९१९ च्या कायद्यानुसार मुंबई प्रांतात स्थापन झालेल्या 'बॉम्बे लेजीस्लेटीव्ह काऊन्सिल' चे ते बिनसरकारी अध्यक्ष झाले. आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते या पदावर कायमच होते. लखनौच्या अधिवेशना नंतर ते अखिल भारतीय नेमस्तवादी गटाकडे झुकले. सुरेंद्रनाथ


जालियनवाला बाग हत्याकांड

बॅनर्जी, दिनशा वाच्छा यांच्या बरोबरीने ते मवाळांस मार्गदर्शन करू लागले.

१९२० मध्ये मुंबईत जालियनवाला बाग हत्याकांड संदर्भात आणि हंटर समितीच्या विरोधात त्यांनी लोकजागृती केली. सरकारी जुलमी धोरणांना विरोध केला. याच दरम्यान चंदावरकरांचा गांधीजींशी संबंध आला. गांधीजींचे गुरु गोपाळ कृष्ण गोखले आणि गोखले यांचे गुरु न्यायमूर्ती रानडे यांच्याशी चंदावरकरांचे स्नेहाचे संबंध होते. न्यायमूर्ती रानडे यांनी स्थापन केलेल्या 'इंडियन नॅशनल सोशल कॉन्फरन्स'चे (भारतीय राष्ट्रीय सामाजिक परिषद) चंदावरकर हे आघाडीचे कार्यकर्ते होते. न्यायमूर्ती रानडे यांच्या अकाली निधनानंतर चंदावरकर हे या परिषदेचे जनरल सेक्रेटरी झाले. या पदावरून काम करताना त्यांनी कायम सामान्यांच्या हिताकडे लक्ष दिले. सुमारे दोन दशके ते या कामाशी संबंधित होते. कामगारांच्या हितासाठीसुद्धा त्यांनी प्रयत्न केले.

आयुष्यभर त्यांनी अनेक संस्थांना मार्गदर्शन केले. यात बॉम्बे (प्रेसिडेन्सी) सोशल रिफॉर्म असोसिएशन, डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया, सोशल सर्व्हिस लीग, रॉयल एशियाटिक सोसायटी (बॉम्बे) अध्यक्ष, प्रार्थना समाज, स्टुडंट्स ब्रदरहुड, मुंबई विद्यापीठाचे ४ वर्षे कुलगुरू या महत्त्वाच्या संस्थांचा समावेश आहे. १९०१ ते आयुष्याच्या अंतिम श्वासापर्यंत ते प्रार्थना समाजाशी कटिबद्ध होते. प्रार्थना समाजाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष विकासावर त्यांनी भर दिला. ते युवकांना कायमच 'मास्टर्स ऑफ माय कंट्रीज फ्युचर' (माझ्या देशाच्या भविष्याचे शिल्पकार) म्हणत. मुंबईत दर रविवारी स्टुडंट्स ब्रदरहुड संस्थेच्या व्यासपीठावरून ते युवकांशी संवाद साधत असत. रवींद्रनाथ टागोर यांचे गीतांजली काव्य,वर्डस्वर्थ आणि टेनिसन यांच्या कविता हे सुद्धा त्यांच्या व्याख्यानाचे विषय होते. दैनिक ध्यानधारणा आणि अभ्यास त्यांनी कधीच चुकविला नाही. ज्ञानेश्वरी, श्रीमद् भगवद्गीता, पवित्र बायबल, वड्र्स्वर्थच्या कविता हे त्यांच्या नित्य अभ्यासाचे विषय होते. संत तुकाराम महाराज यांना त्यांनी आपले अध्यात्म आणि साहित्य क्षेत्रातले गुरु मानले होते. १४ मे १९२३ रोजी त्यांनी बंगलोर मुक्कामी अखेरचा श्वास घेतला.

सुसंस्कृत राजकारणी, काँग्रेसचे ध्येयनिष्ठ कार्यकर्ते आणि विद्वान कायदेपटू म्हणून ते ख्यातकीर्त पावले.


## काँग्रेसची स्थापना :

**पार्श्वभूमी :** भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना ही स्वातंत्र्यचळवळीतील १८५७ नंतरची निर्णायक घटना होय. देशव्यापी संघटन असलेली ही पहिलीच संघटना होय. या संस्थेपूर्वी काही तुरळक, प्रातिनिधिक प्रयत्न भारतीय आणि महाराष्ट्रीय पातळीवर झाले. त्याची नोंद घेऊन आपण पुढे जाऊ.

**संस्थात्मक प्रयत्न :** १८३७ मध्ये द्वारकानाथ टागोर यांनी 'लॅण्ड होल्डर्स असोसिएशन' संस्था जमीनदार वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी काढली. त्यांचे स्नेही जॉर्ज थॉम्पसन यांनी१८३९ मध्ये इंग्लंडमधे 'ब्रिटिश इंडिया सोसायटी' काढून कार्य सुरू केले. १८५१ मध्ये दोन्ही संस्था एकत्र करून 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन' संस्था काढण्यात आली. याच संस्थेने १८५२ मध्ये हरीशचंद्र मुखर्जी यांच्या पुढाकाराने भारतीयांच्या तक्रारी पार्लमेंटकडे पाठविल्या.

'बॉम्बे असोसिएशन' व 'पुणे सार्वजनिक सभा' यांचे कार्य आपण पाहिलेच आहे. १८५२ मध्ये स्थापल्या गेलेल्या 'मद्रास नेटिव्ह असोसिएशन' ने सुद्धा इंग्रजांच्या विरोधात प्रारंभिक सूर आळवायला सुरुवात केली. १८६६ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या सहकार्याने 'ईस्ट इंडिया असोसिएशन' संस्था लंडन येथे सुरू करून जागृतीचे प्रयत्न सुरू केले. बंगालमधील 'इंडिया लीग' संस्थेचे काम जोरदारपणे १८७५ सालापासून चालूच होते. पुढे 'इंडियन असोसिएशन' संस्था सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी स्थापली. १८७६ मध्ये बॅनर्जींनी समान राजकीय हितसंबंधांच्या व आशा आकांक्षांच्या जाणिवेद्वारा भारतातील भिन्न वंशीय व भिन्न जातीच्या लोकांची एकी घडवून आणण्यासाठी ही संस्था प्रयत्न करेल असे सांगितले. याच संस्थेने १८८३ मध्ये कलकत्ता येथे भारतातील विविध प्रांतांच्या प्रतिनिधींची परिषद घेतली. या सगळ्यांचा परिणाम होऊन मुंबईत इंग्रजी विद्येचे आणि नवसुधारणांचे वारे वाहू लागताच जानेवारी


रामकृष्ण भांडारकर


सुरेंद्रनाथ बॅनर्जी


न्या.मा.गों. रानडे


काशिनाथ तेलंग


फिरोजशहा मेहता

१८८५ मध्ये न्या. तेलंग, फेरोजशहा मेहता यांनी 'बॉम्बे 'प्रेसिडेन्सी असोसिएशन' संस्था स्थापली. त्याच्या अगोदर १८८४ मधील 'मद्रास महाजन सभा' सुद्धा महत्त्वाची संस्था होती.

**काँग्रेसच्या स्थापनेची कारणे–** 'काँग्रेस' या शब्दाचा अर्थच मुळी एकत्र १ येणे! त्यामुळे या देशव्यापी संघटनेचे नाव अगदी यथार्थ ठेवण्यात आले. इंग्रजांविरुद्धची अप्रीती, सत्तेचे केंद्रीकरण, इंग्रजी विद्येचे परिणाम, मध्यम वर्गाच्या वाढलेल्या आकांक्षा, वृत्तपत्रांचे कार्य, येथील समाजात घडून येत असलेले प्रबोधन, आर्थिक भारतीयांस देण्यात येणारी हीन वागणूक, भारतीय साहित्यात या बदलांचे उमटत असलेले चित्र, दळणवळणाच्या साधनांमुळे लोकांच्या भेटीगाठी आणि विचारांचा प्रसार या कारणांमुळे काँग्रेसच्या स्थापनेला चालना मिळाली.

## काँग्रेस आणि महाराष्ट्र

१८१८ ते १८८५ या कालखंडात सामाजिक व राजकीयदृष्ट्या बंगाल आणि महाराष्ट्र प्रांत आघाडीवर होते. त्यामुळे काँग्रेसच्या स्थापनेचा शुभारंभ महाराष्ट्रात व्हावा ही गोष्ट इतिहासाला धरूनच होती. काँग्रेसच्या इतिहासातील अत्यंत महत्वाचे टप्पे येथेच उदयाला आले. २८ डिसेंबर १८८५ रोजी सोमवारी दुपारी १२ वाजता मुंबईच्या सर गोकुळदास तेजपाल संस्कृत विद्यालयाच्या सभागृहात इंडियन नॅशनल काँग्रेस उर्फ हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. या अधिवेशनात ७२ प्रतिनिधि एकत्र आले होते. या प्रतिनिधींमध्ये मुंबईचे १८, पुण्याचे ९, विरमगावचा १, सुरतेचे ६ आणि अहमदाबादचे २ असे मुंबई इलाख्यातीत ३८ जण होते. मद्रास–८, कलकत्ता–३, लखनौ –३, तंजावर–२, आग्रा–२, तर लाहोर, अंबाला, बनारस, अलाहाबाद, बेहरामपूर, मच्छलिपट्टण, चिंगलपेट, मदुरा, तिनेवल्ली, कोईमतूर, कुंभकोणम, सालेम, कडाप्पा, अनंतपूर, बेल्लारी, सिमला येथून प्रत्येकी एक प्रतिनिधि उपस्थिती होता.

या अधिवेशनात एकूण नऊ ठराव पास करण्यात आले, ते सारांश स्वरूपात पुढीलप्रमाणे– राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमण्यात यावा, त्यात योग्य त्या प्रमाणात हिंदी प्रतिनिधि घेतले जावेत, मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळात मोठ्या प्रमाणावर लोकनियुक्त प्रतिनिधि असावेत, नोकरशाहीत हिंदी लोकांस वाव द्यावा, सनदी नोकरीच्या परीक्षा इंग्लंडप्रमाणे हिंदुस्थानात घ्याव्यात, लष्करी खर्च वाढवू नये, हत्यार कायदा रद्द करावा, उच्च शिक्षणावर अधिक खर्च करावा, तांत्रिक शिक्षणाची सोय करावी या मागण्या करण्यात आल्या.

या अधिवेशनात भाषण करणाऱ्या प्रत्येक वक्त्याने ब्रिटिश शासन व राणीच्या चरणी स्वतःची निष्ठा व्यक्त केली. इंग्लंडमधील लंडन टाइम्सला मात्र ही घटना धोकादायक वाटली. काँग्रेसचा जन्म झाला आणि तिने बाळसे धरायला पहिल्याच वर्षात सुरुवात केली. दुसरे अधिवेशन कलकत्त्याला दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षते– खाली भरले. उपस्थित असणाऱ्या प्रतिनिधींची संख्या ३०० च्या घरात होती. सामाजिक प्रश्नांना व जातीच्या प्रश्नांना हात घातल्यास काँग्रेसच्या अखंडत्वाला बाधा पोहोचेल म्हणून काँग्रेसने राजकारणाच्या क्षेत्रात काम करावे असे ठरले. या अधिवेशनात मागण्या ठामपणे व्यक्त करण्यात आल्या. तिसरे अधिवेशन १८८७ ला तय्यबजींच्या नेतृत्त्वाखाली भरले. १८८८ चे चौथे अधिवेशन अलाहाबाद येथे ब्रिटिश व्यापारी जॉर्ज यूल यांच्या अध्यक्षतेखाली भरले. अधिवेशनाअगोदर काँग्रेसचे सचिव ह्यूम यांनी शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्याया संदर्भात, ब्रिटिश शासनाच्या दुष्परिणामासंबंधी पत्रके काढून समस्येवर उपाय म्हणून प्रातिनिधिक शासनाची मागणी केली. एक ब्रिटिश अधिकारी आपल्याच बांधवांविरुद्ध बोलतो आहे, हे पाहून गव्हर्नर जनरल डफरीन याने काँग्रेसवर रोष जाहीर केला. अधिवेशनाला जागा मिळू नये असा प्रयत्न शासकांनी केला. इंग्लंडमध्ये भारताविषयी खरीखुरी माहिती जावी म्हणून १८८९



**१९३८ मध्ये हरिपुरा अधिवेशनात महात्मा गांधी, राजेन्द्र प्रसाद, सुभाषचन्द्र बोस आणि वल्लभ भाई पटेल**

पासून लंडन येथे काँग्रेसची एक कायमस्वरूपी शाखा सुरू करण्यात आली.

## मुंबई अधिवेशन

१८८९ मुंबईचे अधिवेशन सर विल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनास १८८९ प्रतिनिधि उपस्थित होते. १८९० कलकत्ता, १८९१ – नागपूर, १८९२– लाहोर येथे पुढील अधिवेशने भरली.

## मवाळ कालखंड

काँग्रेस स्थापनेच्या कार्यात अग्रेसर असणारे जे नेतृत्व होते त्यांच्या विचार– प्रणालीत वा कार्य करण्याच्या पद्धतीस मवाळ वा नेमस्त असे नाव पडले. सुरुवातीच्या काळात काँग्रेस नेत्यांनी संघर्षाऐवजी समन्वय, वादाऐवजी चर्चा, आग्रहाऐवजी विनंती अशा मार्गांचा वापर केला. चर्चा करणे, ठराव करणे व ते शासनाकडे पाठविणे एवढेच. काम चाले. पुढील अधिवेशनात तेच ठराव कमी जास्ती स्वरूपात पास करवून घ्यायचे. मात्र मागील ठरावांचे काय झाले? सरकार दरबारी खेपा मारणे, ठरावांच्या अंमलबजावणीचे प्रयत्न करणे; यासंबंधी कोणीच फारसे प्रयत्न केले नाहीत. भारतमंत्र्यांचे इंडिया कौन्सिल रद्द करा, केंद्र व प्रांत विधिमंडळात भारतीयांचा समावेश करा, मीठ कर रद्द करा, आयात कापडावर कर वाढवा, लष्कर खर्चात कपात करा, जमीन महसूल पद्धतीत सुधारणा करून शेतकऱ्यांवरील कराचा बोजा कमी करा, न्यायदानासंदर्भात अधिकारांचे केंद्रिकरण रद्द करा, शासकीय सेवेत अधिक संख्येने भारतीयांस प्रवेश द्या, इंग्लंडबरोबर भारतातही स्पर्धा परीक्षा घ्या असे ठराव झाले. यातील ४–५ ठरावांचाच फक्त सर्वसामान्य जनतेच्या रोजच्या जीवनाशी संबंध होता. उर्वरित ठराव झाले काय किंवा नाही झाले काय, काहीच फरक पडणार नव्हता.

या कालखंडातील नेतृत्व हे प्रामुख्याने बुद्धिजीवी वर्गातील मध्यमवर्गीय व सुशिक्षित नेतृत्व होते. प्राध्यापक, वकील, पत्रकार, उच्चवर्गीय शेतकरी, डॉक्टर अशा व्यवसाय गटातील हे लोक होते. सामान्यातला सामान्य माणूस अजूनही काँग्रेसपासून दूरच होता. यामुळेच महात्मा फुले यांनी काँग्रेसवर असा आक्षेप घेतला. की 'जो पर्यंत काँग्रेसचे नेते, महार, मांग आणि शेतकरी यांच्या हिताची कळकळ बाळगीत नाहीत आणि त्यांच्या मानवी व्यक्तिमत्वाविषयी आदर बाळगीत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय सभा ही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय होऊ शकत नाही, 'एकमय लोक होऊ (Nation) शकत नाही. म. फुले यांनी हिंदी राज्यकारभार चालविणाऱ्या शासनसंस्थेत हिंदी लोकांना काही अधिकाराच्या जागा मिळाव्या अशी मागणी केली. इंग्रज राजवटीच्या विरुद्ध म. फुले यांची मुख्य तक्रार अशी होती की महार, मांग, शेतकरी, कामगार यांच्या हिताकडे सरकार दुर्लक्ष करते. कनिष्ठ वर्गाच्या हिताकडे काँग्रेसने लक्ष दिले नाही तर काँग्रेसही राष्ट्रीय होऊ शकणार नाही.

या कालखंडातील राष्ट्रीय सभेच्या नेत्यांना ब्रिटिश राज्य हे ईश्वरी वरदान वाटे, काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात ब्रिटनचे राष्ट्रगीत गायिले जाई. ब्रिटिशांचा युनियन जॅक अधिवेशन ठिकाणी उभारण्यात येई. भारतात प्रस्थापित केलेली शांतता, शिक्षण व रेल्वे वा सुधारणा आणि कायद्यासमोर सर्व समान यांमुळे भारतीय सर्वसामान्य मानस भारावून गेले होते.

काँग्रेसचे नेतृत्व इंग्रजी शिक्षणामुळे इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवणारे होते. इंग्रजांचे उदारमतवादी तत्त्वज्ञान त्यांनी आत्मसात केलेले होते. लोकशाही व्यवस्थेचे जनक असणाऱ्या इंग्लंडमध्ये काही जण राहून आल्यामुळे त्यांचा विश्वास अधिकच दृढ झाला होता. राणीच्या जाहीरनाम्यावर त्यांचा विश्वास २७वर्षे उलटून गेल्यावर सुद्धा कायमच होता. ब्रिटिश राज्य उलथवून टाकण्याची कल्पना यांच्यापैकी कोणाच्याही स्वप्नात नव्हती. ब्रिटिशांनी थोड्या–थोड्या सुधारणांचे हप्ते देत राहावे एवढीच त्यांची माफक अपेक्षा होती. पार्लमेंटच्या कानावर आपले गाऱ्हाणे घातले की, आपले प्रश्न आज ना उद्या सुटतील असा या मवाळ नेत्यांचा प्रांजळ विश्वास होता. इंग्लंडमधील लोकशाही परंपरांचा स्वीकार करूनच आपले प्रश्न सुटू शकतील असे त्यांना पूर्णपणे वाटत होते. सशस्त्र क्रांतीचा मार्ग अशक्य आणि तात्त्विकदृष्ट्या विरोधी होता. त्यामुळे लेखी ठराव करावेत, शासनाला विचाराप्रीत्यर्थ पाठवून द्यावेत एवढा सोपा मार्ग त्यांनी अनुसरला होता. हे ठराव प्रांतिक पातळीवर विभिन्न वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केले, की काँग्रेस पुढारी आश्वस्त होत असत. अन्याय करणारास सारखी त्याची आठवण करून दिल्यास तो अन्याय कमी करेल असे त्यांना वाटत होते.

## लंडन शाखा

भारतीयांच्या प्रश्नांच्या संदर्भात दादाभाई नवरोजींना शोषक साम्राज्यशाहीचे अंतरंग समजलेले होते. त्यामुळे भारतीय प्रश्नांचा तपशीलवार अभ्यास करावयाचा, आकडेवारी गोळा करायची आणि ब्रिटिशांपुढे हा सारा अभ्यास मांडावयाचा, प्रसंगी भारतीय शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविणे असे या कार्यप्रणालीचे स्वरूप होते. भारतप्रेमी खासदार व ब्रिटिश अधिकारी यांच्या मदतीने पार्लमेंटमधे भारतीय प्रश्न उपस्थित करावयाचे त्यावर चर्चा करायची असेच सुरुवातीला स्वरूप होते. या शाखेसाठी भारतीय काँग्रेस वर्षाला ३००० पौंड निधी खर्च करी. यात इंग्लंडमधे व्याख्याने आयोजित करणे, परिपत्रके छापणे, १८९० पासून 'इंडिया' नियतकालिकाचा खर्च, यांचा समावेश होता. १८८५ ते ९३ या सात वर्षात केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पार्लमेंटमधे

भारताविषयी सहानुभूती असणारे ११४ खासदार तयार झाले. या खासदारांच्या दबाव गटातूनच वेल्बी कमिशन नेमण्यात आले. या लंडन शाखेमुळेच दादाभाई 'हाऊस ऑफ कॉमन्स' मधे निवडून आले. या शाखेच्या कार्याचा प्रभाव लंडन पुरता मर्यादित न राहता युरोपीय राष्ट्रांमधेही वाढला. १९०४ मधे मस्टरडॅम येथील सोशालिस्ट काँग्रेसमधे दादाभाईंनी 'भारतीय समस्या व ब्रिटिश शोषणाचा' अहवाल मांडला.

परिणाम – या सगळ्या कार्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम पुढील – सुधारणा होण्यात झाला. ब्रिटिश पार्लमेंटमधे १८९२ मध्ये प्रांतिक विधिमंडळाच्या सुधारणेचा कायदा केला गेला. १८९३ मध्ये इंग्लंडप्रमाणे भारतात मुलकी सेवा स्पर्धा परीक्षा घेण्याचे तत्त्वतः मान्य करण्यात आले. काँग्रेसचे अधिवेशन दरवर्षी निश्चितपणे भरणारच हा विश्वास निर्माण झाला. लोकांना गाऱ्हाणी मांडण्याचे हक्काचे व्यासपीठ तयार झाले.

'लंडन टाईम्स', 'इंग्लिशमन', 'पायोनिअर' या वृत्तपत्रांनी इंग्रजांना धोक्याचा इशारा दिला. काँग्रेसच्या कार्यात त्यांना संभाव्य क्रांतीची बीजे दिसू लागली. त्यामुळे काँग्रेसला विरोध करण्याचा सल्ला देण्यात आला. पहिल्या तीन अधिवेशनांना ब्रिटिश अधिकारी निमंत्रित व भोजनास आमंत्रित असत. १८८८ च्या पुढे ही परिस्थिती बदलली. सरकारने अलाहाबाद अधिवेशनासाठी जागा देण्यास विरोध केला. इंग्रज सरकारने काँग्रेस कार्यकर्त्यांकडून जामीन मागितला. गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरीन याने याच काळात काँग्रेसला गर्भित धमक्या दिल्या. काँग्रेसच्या मागण्या अवास्तव असून, प्रातिनिधिक शासनासाठी देश परिपक्व नाही, राष्ट्रीय सभा हीच देशाची एकमेव प्रातिनिधिक संस्था नाही असे सांगितले. 'राजकारण' हाच केंद्रीय विषय ठेवणाऱ्या काँग्रेसवर टीका केली. या टीकेची अंतिम परिणती भारतीय वृत्तपत्रांच्या प्रतिबंधात झाली. यातूनच पुढे ग्रामीण भागात काँग्रेसचे अधिवेशन घेण्याची कल्पना आली.

## फैजपूर अधिवेशन

काँग्रेसचे ५० वे अधिवेशन शहरांऐवजी खेड्यात घ्यावे, हा मूळ विचार म. गांधी यांचा. ही कल्पना शंकरराव देव यांनी तत्काळ उचलली. चर्चेच्या अनेक फेऱ्या होऊन खानदेशातील फैजपूर येथे ग्रामीण भागातील पहिले अधिवेशन घेण्याचे ठरले. स्वागत समिती अध्यक्ष शंकरराव देव, सरचिटणीस धनाजी चौधरी यांनी जबाबदारी घेण्याचे ठरविले. काँग्रेसचे सुवर्णमहोत्सवी अधिवेशन व ग्रामीण भागातील पहिले अधिवेशन महाराष्ट्रात व्हावे हा योगायोग अर्थपूर्ण होता.


काँग्रेसच्या फैजपूर अधिवेशनामध्ये पंडित नेहरू बोलताना.

महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी जीवाचे रान करण्याचे ठरविले. रावसाहेब व अच्युतराव पटवर्धन बंधू, सानेगुरूजी, काकासाहेब गाडगीळ, एस. एम. जोशी, केशवराव जेधे यांनी कंबर कसली. साने गुरूजींनी खानदेश पिंजून काढला. विनोबा खानदेशात आले. अधिवेशन 'टिळक नगरात' भरणार होते तर मुख्य दरवाज्याला ('छत्रपती शिवाजीमहाराज दरवाजा') नाव देण्यात आले. या अधिवेशनाला चालत येण्यासाठी भोरहून कार्यकर्ते ३०० मैल चालत निघाले. या सगळ्याचे सूत्र संचालन विनायकराव भुस्कुटे, लालजी पेंडसे, गोपीनाथपंत पोतनीस यांनी केले.

या अधिवेशनात पहिल्यादांच धावती ध्वजज्योत निघाली. गोकुळदास तेजपाल पाठशाळेत के.एफ. नरिमन यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली. मैलामैलावर धावणारे स्वयंसेवक उभे करण्यात येऊन मुंबई ते फैजपूर हा प्रवास १७ डिसेंबर पर्यंत चालला. हंबर्डी येथे सानेगुरूजींनी २७ तारखेला सकाळी शंकरराव देव यांच्या हाती ज्योत दिली. ती त्यांनी पं. नेहरूंच्या हाती दिली. २५ बैलजोड्यांच्या रथातून नेहरूंची मिरवणूक काढण्यात आली. देव व नेहरु यांच्या भाषणानंतर शेतकरी व कामगार यांच्या वर्गीय संघटनांना सामुदायिक सदस्यत्व देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. शेती व्यवस्थेत सुधारणा घडविण्यास काँग्रेस कटिबद्ध असल्याचे सांगण्यात आले. तसेच सांगण्यात आले. तसेच संस्थानी प्रजेतील लोकशाही हक्कांसाठी काँग्रेसने लढा देण्याचा निश्चय केला. अशारीतीने महाराष्ट्राने फैजपूरचे अधिवेशन यशस्वी केले.

■■

Nanded City, Pune
The Maximum City
Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by
MAGARPATTA CITY
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2
CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

सरकारला अनुकूल किंवा सरकारधार्जिण्या व्यक्तींनाच न्यायाधीशपदी नेमण्यासाठी अडवाअडवी करण्याचा सरकारचा पवित्रा लोकशाहीला व स्वतंत्र – स्वायत्त न्यायसंस्थेला घातक आहे. हा प्रकार २०१४ पूर्वी नव्हता असे नाही. परंतु त्याचे प्रमाण अल्प होते आणि सार्वजनिक टीकेला भीड घालण्याची प्रवृत्ती तत्कालीन राज्यकर्त्यांमध्ये होती. आता भीड न बाळगता बेमुर्वतखोरपणा आणि अत्युच्च कोडगेपणाचा काळ आला आहे. राज्यकर्त्यांनी नैतिकतेची चाड न बाळगण्याचा विडाच उचललेला दिसतो. त्यामुळे हा सुरु झालेला संघर्ष देशाला कुठे नेणार आहे हे कळेनासे झाले आहे.




# कार्यपालिका VS न्यायपालिका पुन्हा संघर्ष?

त्रिनेत्र दास

न्यायाधीशांच्या नेमणुका व बदल्यांच्या मुद्यावरुन न्यायालये आणि सरकार यांच्यात पुन्हा संघर्षाची स्थिती निर्माण होऊ पहात आहे. संसदीय लोकशाही रचनेत कायदेमंडळ किंवा संसद ही सर्वोच्च मानली जाते. त्यांनी केलेल्या कायद्यांचा अर्थ लावण्याची आणि केलेले कायदे घटना व न्यायसुसंगत आहेत की नाहीत याचे आकलन, त्यांचा सुयोग्य अन्वयार्थ लावण्याची जबाबदारी न्यायसंस्थेची असते. कार्यकारी मंडळ, कार्यपालिका किंवा कार्यकारी संस्था म्हणजे सरकार याचे स्थान विशेष महत्वाचे आहे. तात्विकदृष्ट्या सरकार हे संसदेला जबाबदार मानले जाते. वास्तवात परिस्थिती वेगळी आहे. वास्तवात कार्यकारी संस्था म्हणजेच सरकार हे लागली आहेत त्यामागे सरकारच्या वरचष्म्याची बाब विशेषत्वाने पुढे आली आहे. त्यामुळेच यासंबंधीच्या वादात न्यायालयांनी निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीत एकांगीपणा येऊ नये आणि सरकारला अनुकूल नेमणुका केल्या जाऊ नयेत यासाठी निवड समितीत सर्वोच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तींच्या समावेशाची शिफारस केली होती. आता जो नवा वाद चिघळू पहात आहे त्यामध्ये न्यायसंस्था आणि सरकार थेट एकमेकांसमोर संघर्षाच्या पवित्र्यात उभ्या ठाकल्याचे दिसून येत आहे. हा वादही नेमणुकांच्या संदर्भातच आहे. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या नेमणुकांच्या अधिकारावरुन हा संघर्ष सुरु झाला आहे.

**ऑगस्ट २०१४ मध्ये संसदेत विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर नेमण्यात आलेला राष्ट्रीय न्यायिक नियुक्त आयोग**





सर्वशक्तिमान असते. या सरकारकडून लोकशाहीच्या अन्य दोन संस्था - स्तंभ - यांच्यावर वर्चस्व गाजविली जात असते हे वास्तव आहे. अनेक घटनात्मक व स्वायत्त संस्थांवरील नेमणुकांमध्ये सरकारची भूमिका निर्णायक मानली गेली आहे. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था असली तरी निवडणूक आयुक्तांची नेमणूक ही कार्यकारी संस्था म्हणजे सरकारतर्फेच राष्ट्रपति करीत असतात. त्यामुळेच २०१४ नंतर या स्वायत्त व घटनात्मक संस्थेच्या निःपक्षतेबद्दल जी प्रश्नचिन्हे ठळकपणे

२०१४ मध्ये केंद्रात झालेल्या सत्ताबदलानंतर नव्याने सत्तेत आलेल्या राज्यकर्त्यांनी लगेचच न्यायाधीश, विधि अधिकारी आणि विधि सेवेतील अधिकाऱ्यांच्या भरती, नेमणुका आणि बदल्यांसाठी 'राष्ट्रीय न्यायिक नियुक्ति आयोग' (नॅशनल ज्युडिशियल अपॉइंटमेंट्स कमिशन - एनजेएसी) स्थापना विधेयक ऑगस्ट-२०१४ मध्ये संसदेत सादर करुन लगोलग संमतही करवून घेतले. त्यावर राष्ट्रपतींची सही झाल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतरही झाले. त्यांची नियमावलीही तयार करण्यात

आली. यानुसार न्यायाधीशांच्या नियुक्ति आयोगाचे अध्यक्ष म्हणून देशाच्या सरन्यायाधीशांकडे जबाबदारी देण्यात आली होती. आयोगाच्या अन्य सदस्यांमध्ये सरन्यायाधीशांच्या खालोखाल सेवाज्येष्ठता असलेले दोन न्यायमूर्ति, केंद्रीय कायदामंत्री आणि दोन प्रतिष्ठित व्यक्ती यांचा समावेश करण्यात आला होता. प्रतिष्ठित व्यक्तींमध्ये एका व्यक्तीच्या निकषांमध्ये ती व्यक्ती अनुसूचित जाति-जमाती(एससी-एसटी), अन्य मागासवर्गीय(ओबीसी) किंवा महिला, अल्पसंख्यक समाजातील असावी अशी तरतूद करण्यात आली होती. या दोन प्रतिष्ठित व्यक्तींच्या नेमणुकीसाठीही

न्यायमूर्ति जे.एस.केहर, मदन लोकूर, कुरियन जोसेफ, आदर्शकुमार गोयल या चार न्यायमूर्तींनी हा कायदा घटनाबाह्य असल्याचा निर्णय दिला. न्यायमूर्ति जे. चेलमेश्वर यांनी मात्र हा कायदा वैध असल्याचा निर्णय दिला होता. नियुक्ति आयोगाचा हा कायदा ९९वी घटनादुरुस्ती म्हणून ओळखला गेला होता. हा कायदा फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांच्या नेमणुका-बदल्यांच्या संदर्भात प्रचलित 'कॉलेजियम' किंवा 'निवड समिती' प्रणालीवर शिक्कामोर्तब केले. न्यायाधीश नियुक्त्यांची पध्दत किंवा प्रणाली अनेक वर्षे चालू आहे. परंतु न्यायालयीन सक्रियता किंवा




एका समितीची तरतूद करण्यात आली होती व त्या समितीत सरन्यायाधीश, पंतप्रधान, संसदेतील प्रमुख विरोधी पक्षनेता यांचा समावेश करण्यात आला होता. हा कायदा संमत होण्यापूर्वी न्यायाधीशांच्या नेमणुका व बदल्यांसाठी 'कॉलेजियम' प्रणालीचा अवलंब केला जात असे. मात्र या आयोगाच्या स्थापनेसंबंधीचे विधेयक संमत होऊन त्याचे कायद्यात रुपांतर झाल्यावर त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान मिळाले व सर्वोच्च न्यायालयाने तो कायदा फेटाळून लावला. पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर यासंबंधी सुनावणी झाली. चार विरुध्द एक अशा बहुमताने हा कायदा फेटाळण्यात आला.

'ॲक्टिव्हिजम'च्या काही प्रसंगांमुळे सरकार म्हणजेच कार्यकारी संस्थेला व कायदेमंडळाला म्हणजे संसदेला देखील न्यायसंस्थेला चापात ठेवण्याची व एकप्रकारे त्यांच्यावर अंकुश ठेवण्याची इच्छा होणे स्वाभाविक होते. न्यायसंस्था



पुरस्कृत 'कॉलेजियम प्रणाली' ही पारदर्शक नाही आणि त्यामध्ये अनेक दोष असल्याची टीका होऊ लागली होती आणि त्यातूनच नेमणुकांसाठी आयोगाची निर्मिती करण्याचा प्रस्ताव पुढे आला आणि तसा कायदा करण्यात आला. न्यायसंस्थेला हा कायदा म्हणजे त्यांच्या स्वायत्ततेवर आक्रमण वाटणे स्वाभाविक होते व त्यातूनच हा कायदा फेटाळण्याचा निर्णय न्यायसंस्थेकडून करण्यात आला. कॉलेजियम पध्दती चालू ठेवण्यात आली. मात्र या निमित्ताने निर्माण झालेल्या संघर्षात न्यायसंस्थेने किंचितशी माघार घेऊन त्यांच्या कॉलेजियम प्रणालीत अधिक पारदर्शकता आणण्याचे मान्य केले. यामध्ये कॉलेजियमने शिफारस केलेल्या एखाद्या न्यायाधीशाबाबत सरकारला काही हरकत असल्यास त्यांनी तसे कळविणे आणि कॉलेजियमने त्या हरकतींच्या आधारे आणखी छाननी करणे असे मान्य करण्यात आले. मात्र या छाननीनंतरही कॉलेजियमला संबंधित हरकतींमध्ये तथ्य न आढळल्यास ते संबंधित न्यायाधीश नियुक्तीची फेरशिफारस करु शकतील आणि दुसऱ्यादा शिफारस झाल्यानंतर मात्र सरकारला ते मान्य करण्याचे बंधन घालण्यात आले होते. ज्याप्रमाणे राष्ट्रपति किंवा राज्यपाल सरकारच्या एखाद्या निर्णयाबद्दल हरकती घेऊ शकतात, परंतु खुलासा व छाननी होऊन पुन्हा तो निर्णय मंजुरीसाठी पाठविल्यानंतर त्यावर स्वाक्षरी करण्याचे बंधन आहे तसाच हा प्रकार होता. परंतु येथूनच खऱ्या अर्थाने वादाला सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. कारण सरकारला अडचणीच्या ठरणाऱ्या एखाद्या न्यायाधीशांच्या नेमणुकीची शिफारस झाल्यानंतर त्याबाबतची मंजुरी देण्यास सरकारतर्फे अक्षम्य दिरंगाई करण्याचे प्रकार सुरु झाले. याचे कारण न्यायसंस्थेच्या कॉलेजियम प्रणालीत न्यायाधीश म्हणून कुणाला नियुक्त करायचे हे ठरविण्याचा अधिकार असला तरी प्रत्यक्षातील नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्याची बाब प्रशासनिक म्हणजेच सरकारी अधिकारक्षेत्रातील असते आणि राष्ट्रपतींच्या सहीने नियुक्ति केली जाते. त्यामुळे नियुक्तीची शिफारस केलेल्या न्यायाधीशांच्या नावांना वेळेवर मंजुरी देण्याच्या टप्प्यावर सरकारकडून म्हणजेच कार्यकारी संस्थेकडून अडवाअडवीचे प्रकार सुरु करण्यात येऊ लागले. संघर्ष सुरु झाला आणि तो पुढे चिघळत राहिला. बहुतेक प्रकरणांमध्ये कॉलेजियमने शिफारस केलेल्या न्यायाधीशांच्या नावांच्या यादीपैकी काहीच नावांना मंजुरी देणे, बाकीच्या शिफारशी अनिर्णित ठेवणे असे या अडवाअडवीचे स्वरुप होऊन गेले.







नेमणुकांच्या संदर्भातील हा संघर्ष अस्तित्वात असूनही त्याचा उद्रेक झाला नव्हता. परंतु अलीकडच्या काळापासून असे एक चित्र निर्माण होत आहे की कार्यकारी संस्थेकडून म्हणजेच सरकारकडून हा संघर्ष चिघळविण्याचा प्रकार सुरु आहे. विशेषतः वर्तमान केंद्र सरकारमधील कायदामंत्री किरण रिजुजु हे सातत्याने न्यायसंस्थेविरुध्द ज्या प्रकारे टीका करीत आहेत ते पाहता सरकार हा वाद वाढवू इच्छित आहे की काय अशी शंका यावी. किरण रिजुजु हे स्वतः खूप मोठे कायदेपंडित आहेत अशी स्थिती नाही. ते कायद्याचे पदवीधर आहेत एवढेच. मात्र वादग्रस्त विधान करणे ही त्यांची जुनी सवय असावी. रोहिंग्या निर्वासितांबाबत त्यांनी केलेल्या विधानावर गदारोळ झाला होता. भारतात जगातले सर्वाधिक निर्वासित सामावलेले असल्याचे विधानही त्यांनी केले होते. सध्याच्या ताज्या विवादात त्यांनी कॉलेजियम पध्दतीने शिफारस करण्यात आलेल्या न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या फायली सरकारने दाबून ठेवल्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या नापसंती व्यक्त करणाऱ्या निरीक्षणावर टिप्पणी करताना, 'सरकार फायलींवर नुसते बसून राहिले आहे असे म्हणायचे असेल तर (नियुक्तीच्या शिफारशीच्या) फायली सरकारकडे पाठवू नका, तुम्हीच निर्णय करा आणि तुम्हीच नेमणूक करा'(यू रन द शो) असे म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या या टिप्पणीवर तीव्र हरकत घेऊन नाराजी व्यक्त केली होती. सध्याच्या राज्यकर्त्यांच्या विशेष मर्जीतले कायदेतज्ञ हरीश साळवे यांनी देखील रिजुजु यांच्या टिप्पणीवर बोलताना त्यांनी, 'लक्ष्मणरेषा ओलांडली आहे' असे मत व्यक्त केले. 'सर्वोच्च न्यायालयाने केवळ सरकारचे बोट धरुनच चालले पाहिजे, सरकारच्या दयेवर अवलंबुन राहिले पाहिजे असे मंत्र्यांना वाटत असेल तर ती त्यांची घोड चूक आहे' असेही साळवे यांनी म्हटले आहे.

नोव्हेंबर महिन्यात कॉलेजियमने उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाशी संबंधित एकवीस न्यायाधीशांच्या नेमणुका निश्चित करुन संबंधित फाईल मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवली होती. केंद्र सरकारने त्यातील केवळ दोन नावांना मंजुरी देऊन बाकीच्या सर्व नावांचा फेरविचार करावा असे मत त्यावर व्यक्त केले. या प्रकारामुळे सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त करुन सरकारचे आचरण उचित नसल्याचे म्हटले. न्यायसंस्थेने सरकारने पुरस्कृत केलेला राष्ट्रीय न्यायिक नियुक्ति आयोग फेटाळल्यामुळे

नाराज झालेले सरकार या नियुक्त्या रोखून धरत असल्याची टीकाही सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात केली. रिजुजु यांची ही टीका दुर्लक्ष करण्यासारखी नाही कारण बोलणारे रिजुजु असले तरी त्यामागील मेंदू आणि त्यांना तसे बोलायला लावणारी बुध्दी त्यांची स्वतःची नाही. या वक्तव्याचे सूत्रधार आणि बोलविते धनी वेगळेच आहेत. याचा अर्थ सरळ आणि स्पष्ट आहे की न्यायसंस्थेला देखील गुडघ्यावर बसायला लावून त्यांनी सरकार नावाच्या सर्वशक्तिमान-सामर्थ्यशाली सत्तेपुढे शरणागत झाले पाहिजे असे रिजुजु यांच्या वक्तव्यांमधून सूचित केले जात आहे, न्यायसंस्थेला गर्भित इशारे व संकेत दिले जात आहेत की फार उड्या मारु नका ! न्यायाधीशांच्या नेमणुकांच्या सरकारी दिरंगाईला आव्हान आणि त्यामुळे न्यायालयांचा अवमान झाल्याबद्दल करण्यात आलेल्या याचिकेवरुन हा गदारोळ सध्या सुरु करण्यात आला आहे. त्यामुळेच सरकारी गोटातून जे टीकास्त्र सोडण्यात येत आहे त्याचा हेतु न्यायसंस्थेचे महत्व नष्ट करण्याबरोबरच त्यांची वैधताच नाहीशी करण्याचा असावा की काय अशी शंका आल्यास ते फार चुकीचे होणार नाही. याठिकाणी हेही नमूद करावे लागेल की कॉलेजियम पध्दतीत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी न्यायालयाने केलेल्या शिफारशींवर फेरविचाराची सूचना करण्याचा सरकारला अधिकार देण्यात आलेला आहे आणि त्यानुसार न्यायसंस्थेने फेरविचार करुन व अधिक छाननी करुन संबंधित नावांवर फेरशिक्कामोर्तब केल्यास सरकारला ती शिफारस मान्य करण्याचे बंधन आहे. सरकारचा विरोध त्यालाच आहे आणि या एकवीसपैकी दहा नावे या श्रेणीत समाविष्ट होणारी होती. त्यांची फेरछाननी करुन न्यायालयाने पुन्हा ती सरकारकडे मंजुरीसाठी पाठविली व त्यामुळे बहुधा सरकार डिवचले गेले असावे आणि त्यांनी नावे अनिर्णित ठेवण्याचा आडमुठा पवित्रा घेतला असावा असे दिसून येत आहे. सरकारच्या या दिरंगाईवर न्यायालयाने टीकाही केली आहे. देशात न्यायाधीशांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. देशाच्या उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ११०० च्या आसपास आहे. परंतु उपलब्ध माहितीनुसार ३३५ न्यायाधीशांची पदे रिक्त आहेत म्हणजे सुमारे तीस टक्के पदे रिक्त आहेत. सर्वोच्च न्यायालयात तीन न्यायमूर्तींच्या जागा रिकाम्या आहेत. कनिष्ठ कोर्टांमध्ये २४६३१ पदांपैकी ५३४२ पदे रिक्त आहेत.एकीकडे प्रलंबित किंवा अनिर्णित न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या समस्येबद्दल सातत्याने लक्ष वेधले जाते. त्यामुळे लोकांना न्याय मिळण्यात होणाऱ्या अक्षम्य विलंबाबद्दलही सातत्याने ओरड होत असते. त्यासाठी ही रिक्त पदे वेळेवर भरुन न्यायदान सुरळीत व सुलभ करण्याची आवश्यकता असताना सरकारने त्यांना नापसंत असलेल्या न्यायाधीशांच्या नेमणुका अडवून धरायच्या ही खचितच उचित बाब नव्हे. सुरळीत न्यायप्रक्रियेला खीळ घालण्याचा हा प्रकार ठरतो. केवळ सरकारला अनुकूल किंवा सरकारधार्जिण्या व्यक्तींनाच न्यायाधीशपदी नेमण्यासाठी अडवाअडवी करण्याचा सरकारचा पवित्रा लोकशाहीला व स्वतंत्र - स्वायत्त न्यायसंस्थेला घातक आहे. हा प्रकार २०१४ पूर्वी नव्हता असे नाही. परंतु त्याचे प्रमाण अल्प होते आणि सार्वजनिक टीकेला भीड घालण्याची प्रवृत्ती तत्कालीन राज्यकर्त्यांमध्ये होती. आता भीड न बाळगता बेमुर्वतखोरपणा आणि अत्युच्च कोडगेपणाचा काळ आला आहे. राज्यकर्त्यांनी नैतिकतेची चाड न बाळगण्याचा विडाच उचललेला दिसतो. त्यामुळे हा सुरु झालेला संघर्ष देशाला कुठे नेणार आहे हे कळेनासे झाले आहे. हा संघर्ष मिटविला जाऊ शकतो परंतु त्यासाठी दोन्ही बाजूंना आपापले आग्रह-दुराग्रह बाजूला ठेवावे लागतील. वर उल्लेख केल्याप्रमाणे कॉलेजियमने एखाद्या न्यायाधीशाच्या नावावर सरकारची आलेली हरकत विचारात घेऊन व पुन्हा पुरेशी छाननी करुन तेच नाव पुन्हा पाठविल्यास सरकारवर त्यास मंजुरी देण्याचे बंधन असते. परंतु कॉलेजियमने



अशी नावे दोनदाच नव्हे तर तीन वेळेस पुन्हा पाठवून देखील सरकारने ती मंजूर न केल्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा राग व नाराजी समजण्यासारखी आहे. परंतु त्याचबरोबर न्यायाधीशांच्या नियुक्त्यांसाठी नावे निश्चित करण्यापूर्वी कॉलेजियमने सरकारबरोबरही सल्लामसलतीची एखादी फेरी केल्यास त्यातून संघर्ष टाळणे शक्य होईल असे काही तज्ज्ञांचे मत आहे. यामुळे कॉलेजियम प्रणाली अपारदर्शक व अस्पष्ट असल्याचा जो आरोप किंवा टीका केली जाते त्याचे निराकरण करणे शक्य होईल आणि यामुळे देखील संघर्ष टाळता

येऊ शकेल. थोडक्यात दोन्ही बाजूंनी एकेक पाऊल मागे घेण्याने संघर्षाऐवजी समन्वय साधणे शक्य होईल.

न्यायालयांना आपल्या मुठीत ठेवण्याचा प्रयत्न करणे हा काही नवा प्रकार नाही. हे प्रकार पूर्वी देखील झाले होते. विशेषतः राजसत्ता ही एकाधिकारवादी असेल तर हा प्रकार घडतो. १९७०च्या दशकात आणीबाणी व त्या कालखंडात हा प्रकार घडला आहे. त्यावेळी तीन न्यायमूर्तींची सेवाज्येष्ठता डावलून तुलनेने कनिष्ठ असलेल्या न्यायमूर्तींना सरन्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली होती. त्या निषेधार्थ त्या तीन न्यायाधीशांनी राजीनामेही दिले होते. त्या एकाधिकारशाहीच्या काळात न्यायसंस्थेची, न्यायिक स्वायत्तता व स्वतंत्रता या मूल्यांची सरसकट पायमल्ली करण्यात आली होती. वर्तमान काळात भारताची वाटचाल तशाच एकाधिकारी किंवा सर्वंकष व्यवस्थेकडे सुरु झाली आहे की काय अशी साधार शंका येणे स्वाभाविक आहे. संसदीय लोकशाही रचनेत संसदेच्या सर्वोच्चतेवर नेहमीच भर दिला गेला आहे. परंतु सर्वोच्चता याचा अर्थ संपूर्ण वर्चस्व नव्हे. संसदेचा अधिकार कायदे करण्याचा असला तरी तो निरंकुश नाही. त्यामुळेच आणीबाणीनंतर ४२वी घटनादुरुस्ती रद्द करताना राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीला धक्का पोहोचविणाऱ्या घटनादुरुस्त्या करता येणार नाहीत असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने देऊन एका लक्ष्मणरेषेची मर्यादा घालून दिली. परंतु गेल्या सात-आठ वर्षांपासून या मर्यादेचा भंग करण्याचे प्रकार सुरु आहेत. राजसत्तेला धार्जिणी (अनुकूल ही संज्ञा फार सौम्य झाली) न्यायसंस्था ठेवणे, तिच्यावर अंकुश ठेवणे हे प्रकार कायदेमंडळ म्हणून संसद आणि कार्यकारी संस्था म्हणून राजसत्ता किंवा सरकारने केलेले आहे. न्यायालयाने सरकारच्या विरोधात न्यायसंगत भूमिका घेतली तरी त्यावरुन न्यायसंस्थेवर डूख धरणे हा हुकुमशाही प्रकार आहे. इंदिरा गांधी यांच्या काळात 'कमिटेड ज्युडिशियरी' म्हणजेच 'विशिष्ट विचारबध्द न्यायसंस्थे'ची संकल्पना चर्चिली गेली होती. सोव्हिएत युनियन किंवा चीनमध्ये या प्रकारच्या न्यायसंस्थेचे अस्तित्व आढळते. भारत हा लोकशाही देश असल्याने त्याची कल्पना करता येणार नाही. परंतु एकाधिकारशाहीकडे झुकणाऱ्या मनोवृत्तीचे राज्यकर्ते असल्यास हा धोका संभवतो. त्यामुळेच न्यायसंस्थेवर सरकारकडून म्हणजेच राजसत्तेकडून वर्चस्ववादी भूमिका घेण्यास सुरुवात झाल्यास लोकशाहीचा संकोच होऊ लागतो.

सध्या न्यायालयात अनेक अशी प्रकरणे आहेत ज्यामध्ये सरकारला बचावाचा पवित्रा घ्यावा लागू शकतो. नोटाबंदी, निवडणूक बाँड्स, निवडणूक आयोगाची स्वायत्तता ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. न्यायसंस्थेला दुखावणे सरकारला वाटते तेवढे शक्य नाही. त्यामुळेच न्यायाधीश नेमणुकांच्या संदर्भात सरकारला समज देताना न्यायालयाने 'सरकारला कोर्टाच्या अवमाननेची नोटिस देण्याची पाळी आणू नका' असा इशाराही दिलेला आहे.

राज्यघटनेने संसदीय लोकशाही प्रणालीच्या तिन्ही प्रमुख स्तंभांदरम्यानच्या सत्ता किंवा अधिकार संतुलनाचे निकष नमूद केलेले आहेत. एकेकाळी संसद आणि कार्यकारी संस्था म्हणजे सरकार किंवा राजसत्ता ही काहीशी दुर्बळ किंवा भीड व नैतिकता पाळणारी असताना न्यायालयांनी अवाजवी सक्रियता दाखविण्याचे प्रकार केले होते आणि सरकारच्या अधिकारक्षेत्रातही ढवळाढवळ करण्याचे अनेक प्रकार केले होते. एखाद्या प्रकरणात न्यायालयांनी थेट व परस्पर सीबीआयला आदेश देऊन तपास करण्यास सांगणे आणि त्याचे अहवाल फक्त न्यायालयासच सादर करण्याचा आदेश जारी करण्यापर्यंत न्यायालयांची मजल गेलेली होती. तत्कालीन राज्यकर्त्यांनी न्यायसंस्थेबद्दल आदर राखून मर्यादाभंग केला नव्हता व न्यायालयीन सक्रिय आक्रमकता सहन केली होती. आता जेव्हा एकाधिकारवाद व सर्वंकषतेकडे झुकलेली राजसत्ता असताना न्यायालये एकतर्फी सीबीआय किंवा अन्य तपाससंस्थांना तपासाचे आणि त्याचे अहवाल फक्त न्यायालयासच सादर करण्याचे आदेश देण्याचे उदाहरण फारसे ऐकिवात नाही. त्यामुळे अधिकार संतुलनाचे तारतम्य लोकशाही व्यवस्थेतील प्रत्येक स्तंभाने किंवा अंगाने पाळणे अपेक्षित आहे. अन्यथा एकदा हा समतोल बिघडल्यास तो सावरणे अवघड होईलच परंतु लोकशाही व्यवस्थेचे होणारे नुकसान अपरिमित असेल. लोकशाही संस्थांची मोडतोड सुरु असतानाच प्रमुख अशा लोकशाहीच्या स्तंभाला दुर्बळ व कमकुवत करण्याचे प्रयत्न झाल्यास लोकशाहीचा डोलाराही कोसळू शकतो. याची जाणीव सर्वांनीच ठेवणे अपेक्षित आहे!

■■


## शरद पवार यांच्या आत्मचरित्राची जनआवृत्ती

**गेली सहा दशकं देशाच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण सहभाग असणाऱ्या नेत्यानं घेतलेला आपल्या राजकीय वाटचालीचा विश्लेषक वेध. आदरणीय लोकनेते शरद पवार यांच्या आत्मचरित्राची जनआवृत्ती त्यांच्या वाढदिवसानिमित्त १२-१२-२०२२ रोजी मधुश्री पब्लिकेशन प्रकाशित करत आहे, हे पुस्तक वाचकांना १५०/- रुपयांत मिळेल. पुस्तकं विकत घेण्यासाठी लिंक-**

https://madhushreepublication.com/
https://vaachan.com/product/lok-maajhe-sangati-sharad-pawar/






# गुजरातमध्ये घबराट??

गुजरात विधानसभा निवडणुकीत कोणत्याही प्रकारे विजय मिळावा यासाठी देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री आणि त्यांचे सर्व मंत्रिमंडळ सहकारी, सत्तापक्षाचे सर्व मुख्यमंत्री यांनी जोर एकवटलेला आहे.

खरे तर ज्या राज्यात भाजपला तोलामोलाचे आव्हान देणारा विरोधी पक्ष अस्तित्वात नाही, देशाचे सर्वशक्तिमान असलेले दोन नेते - पंतप्रधान व गृहमंत्री यांचे ते गृहराज्य असताना भाजपच्या मनात भयगंड का असा स्वाभाविक प्रश्न उपस्थित होतो.

कारण स्पष्ट आहे.

कुठेतरी त्यांच्या मनात पाल चुकचुकली असावी.

२०१७च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला काठावरचे बहुमत मिळविण्यासाठी विलक्षण धडपड करावी लागली होती. त्याची पुनरावृत्ती नको म्हणूनही अति-खबरदारी घेतली जात असावी.

आता गुजरातमध्ये भाजप विरुध्द काँग्रेस अशी सरळ लढत नसून त्याला तिसरा 'आम आदमी पार्टी' - 'आप'चा कोन निर्माण झाला आहे. अरविंद केजरीवाल यांनी यावेळी गुजरातमध्ये शिरकाव करण्याची तयारी केली आहे आणि त्यासाठी जोर लावलेला आहे.




गुजरात मॉडेल, गुजरातचे विकासाचे मॉडेल याच्या चर्चा अनेक वर्षे करण्यात आल्या. परंतु जेव्हाजेव्हा निवडणुका होतात तेव्हा हे विकासाचे मॉडेल गायब - अदृष्य होऊन तेथे सांप्रदायिक, धार्मिक ध्रुवीकरणाचे आक्रमक बहुसंख्यकवादाचा आणि मुस्लिम विरोधाचा टोकाचा पुरस्कार करणारे मॉडेल अस्तित्वात येते. त्या बहुसंख्यकवादाच्या आधारे मते मागितली जातात आणि दहशतवाद व मुख्यतः इस्लामी दहशतवादाचा बागूलबोवा उभा करणे आणि विरोधी पक्ष - काँग्रेस असो किंवा आप असो - या दहशतवादाला कसे मदत करतात असा निगरगट्ट खोटा प्रचार सुरु केला जातो. वरपासून खालपर्यंतचे सर्व भाजपनेते एकसुरात तो करतात.

खुद्द पंतप्रधानांनीच गुजराती अस्मितेचा मुद्दा उपस्थित करताना देशात गुजराती लोकांच्या विरोधात

वातावरण निर्माण केले जात असल्याचा कांगावा केला आहे. कोण हे वातावरण निर्माण करत आहे? महाराष्ट्राचे प्रकल्प गुजरातला पळवून नेल्यावर अशीच भावना होणार ना?

आता हे मुद्दे कमी पडले म्हणून की काय पंतप्रधानांच्या जिवाला धोका असल्याचा आणखी एक कांगावा केला जात आहे.

संबंधित मेल किंवा ट्विटर संदेशाचा माग मुंबईपर्यंत पोहोचल्याचे सांगण्यात आले. या सगळ्या गोष्टींचा सारांश काय?



निवडणुकीत एक उन्मादाचे वातावरण तयार करायचे, बहुसंख्यकवादाला खतपाणी घालून मुस्लिमांबद्दल संशय व द्वेष निर्माण करायचा आणि त्यातून धार्मिक ध्रुवीकरण करुन बहुसंख्यक समाजाला भडकवून त्यांचे मते लाटायचा हा धंदा आहे. हेच खरे गुजरात मॉडेल आहे आणि आता राष्ट्रीय पातळीवर देखील ते वापरले जात आहे. या त्यांच्या मॉडेलमध्ये एमआयएम - मजलिस इत्तहादूल मुसलमीन - या पक्षाचे प्रमुख असदुद्दिन ओवैसी यांची भूमिकाही महत्वाची ठरते. त्यांच्या उमेदवारांमुळे विरोधी पक्षांना मिळणाऱ्या मुस्लिम मतांची विभागणी होते आणि त्याचा फायदा भाजपला मिळतो.

अलीकडेच बिहारमध्ये गोपालगंज जागेवर झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत ओवैसी यांच्या पक्षाच्या उमेदवाराने १२ हजार मते मिळवली आणि राष्ट्रीय जनता दलाचा उमेदवार केवळ १८०० मतांनी पराभूत झाला.

गुजरातमध्ये हाच खेळ सुरु आहे.

त्यात ओवैसी यांनी अरविंद केजरीवाल हे 'छोटे मोदी' असल्याचा प्रचार सुरु केला आहे आणि त्यामुळे मुस्लिमांमध्ये संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. ओवैसी केजरीवाल आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांची अल्पसंख्यक मते फोडतील पण ते स्वतः किती जागा जिंकतील यापेक्षा काँग्रेस व आप च्या किती पाडतील हे पहावे लागेल. तेवढाच भाजपच्या विजयाचा मार्ग सोपा होईल.

प्रश्न एवढाच आहे की गुजरात मॉडेल ते हेच आहे का???

## पळा पळा कोण पुढे पळे तो.....!

कोणत्याही सर्वंकष किंवा एकाधिकारवादी व्यवस्थेत दुय्यम स्तरावरचे नेते आपल्या सर्वशक्तिमान नेत्याची मर्जी संपादन करण्यासाठी चापलूसी आणि चाटुकारितेचे किळसवाणे प्रदर्शन करीत असतात.

चमचेगिरी हा या प्रकारच्या सर्वंकष राज्यपध्दतीचा अविभाज्य भागच झालेला असतो. यामध्ये सर्वशक्तिमान नेत्याला दैवत्व बहाल केले जाते. लोकसभा निवडणुकीत 'हर हर मोदी' म्हणून दिली गेलेली घोषणा याचाच एक आविष्कार होता.

त्याचबरोबर त्या सर्वशक्तिमान नेत्याला आवडणाऱ्या गोष्टींमध्ये स्वतः किती अग्रेसर आहोत हे दाखविण्यासाठी या दुय्यम स्तरावरील नेत्यांमध्ये स्पर्धा -अहमहिका लागलेली असते.

सध्या हे चित्र विशेषत्वाने पाहण्यास मिळू लागले आहे.





सत्तापक्षाच्या प्रचारकी टोळ्यांनी पूर्वीच सुरु केली होती.

आता त्या मालिकेतच भर टाकताना हिमांत बिश्श शर्मा यांनी राहूल गांधी यांना 'सद्दाम हुसेन' म्हटले आहे.

भारत जोडो यात्रेत राहूल गांधी यांचे वाढलेल्या दाढीतील फोटो सर्वत्र झळकले आहेत. त्या फोटोंचा उल्लेख करुन शर्मा यांनी दाढी वाढवलेले राहूल गांधी हे सद्दाम हुसेन यांच्यासारखे दिसतात अशी टिप्पणी केली.

शर्मा हे त्यांच्या असल्या 'गरळओकू वाणी' बद्दल कुविख्यात आहेतच. त्यांनी मुस्लिमांविरुध्द केलेल्या वादग्रस्त टिप्पण्या याच प्रकारच्या होत्या. त्यांची ही बेताल वाणी बहुधा त्यांच्या केंद्रीय नेत्यांना आवडत असल्यानेच त्यांना गुजरातमध्ये प्रचारासाठी पाठविण्यात आले.

काँग्रेसवर व विशेषतः राहूल गांधी यांच्यावर निशाणा साधताना गुजरातमध्येच त्यांनी राहूल गांधी यांना 'सद्दाम हुसेन' यांची उपमा दिली.

याच मालिकेत त्यांनी आणखी एक गरळ ओकली.

मुंबईच्या श्रध्दा वालकर या

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या पहिल्या कारकिर्दीत आक्रमक बहुसंख्यक वर्चस्ववादाच्या आधारे राजकारण करुन अल्पसंख्यक समाजाला जरब बसवली होती. नुसत्या तक्रारी होताच त्यांच्या घरादारांवर बुलडोझर फिरवून त्यांनी दहशत निर्माण केली होती. बहुसंख्यकवादी राजकारण करणाऱ्यांसाठी ते आदर्श झाले. त्यांचा कित्ता मध्य प्रदेशातील त्यांच्या पक्षाचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी गिरविण्यास सुरुवात केली.


कर्नाटकचे अजुनही अस्थिर असलेले मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी देखील जाहीरपणे उत्तर प्रदेशातील राज्यकारभाराच्या 'योगी मॉडेल'चे अनुकरण करण्याची घोषणा केली होती. त्यामध्ये त्यांच्या बुलडोझरनीतीचा विशेष उल्लेख होता.

आता या माळेत आणखी एक मणि जोडला गेला आहे.

आसामचे मुख्यमंत्री हिमांत बिश्श शर्मा हे ते नवे 'मणि' !

सर्वशक्तिमान नेत्याकडे आपला टक्का वाढावा यासाठी त्यांनी आपणच कसे आक्रमक हिंदुत्ववादी नेते आहोत हे दाखविण्याचे प्रकार सुरु केले आहेत. अशी मंडळी आपली छाप पाडण्यासाठी प्रसंगी बेताल वक्तव्येही करीत असतात. विरोधी पक्षांना शत्रु क्रमांक एक मानून त्यांच्यावर वाटेल तशा टिप्पण्या करण्याची एक विकृत मनोवृत्ती सत्तापक्षातील नेत्यांनी जोपासली आहे.

यामध्ये राहूल गांधी हे त्यांचे सर्वात आवडते 'टार्गेट' आहे. त्यांना पप्पू म्हणून हिणविण्याची सुरुवात






मुलीच्या आफताब पूनावाला नावाच्या नराधमाने केलेल्या हत्येचा उल्लेख त्यांनी 'लव्ह जिहाद'चा प्रकार म्हणून केला. हे ते गुजरातमध्ये निवडणूक प्रचारात जाऊन बोलले. म्हणजेच गुजरातमध्ये निवडणुका जिंकण्यासाठी विकास व प्रगती नव्हे तर असल्या गलिच्छ व तिरस्कार निर्माण करणाऱ्या राजकारणाचा वापर केला जातो हे शर्मा यांनी सिध्द केले.

यापूर्वीही त्यांनी आसाममध्ये हिंदू अल्पसंख्य असून मुस्लिम बहुसंख्यक असल्याचे विधान केले होते.

आसाममध्ये काही जिल्ह्यात हिंदूंपेक्षा मुस्लिम अधिक असल्याने जिल्हा हा घटक मानून राज्यात अल्पसंख्यक व बहुसंख्यक समूहांची वर्गवारी करायला हवी अशी विकृत व अभिनव कल्पना त्यांनी मांडली.

हा असा मुस्लिमद्वेष टोकाच्या पध्दतीने का व्यक्त होतो? तोही या दुय्यम नेत्यांकडून याचे कारण काय?

याचे कारण एकच की सर्वोच्च नेत्याच्या मनात व नसानसात हा द्वेष भरलेला असल्याने आपण त्यात मागे पडताना दिसू नये अशी या दुय्यम नेत्यांची तीव्र इच्छा असते आणि मग त्यांच्यात कोण जास्त आक्रमक व तीव्र बोलेल अशी स्पर्धा सुरु होते.

हे आसामचे मुख्यमंत्री काँग्रेसमध्ये होते. त्यांना मुख्यमंत्रीपद हवे होते परंतु त्यासाठी त्यांची थांबायला तयारी नव्हती.

ते भाजपमध्ये गेले. पाच वर्षे मंत्री राहिले आणि त्यानंतरच्या निवडणुकीत मुख्यमंत्रीपद न दिल्यास पुन्हा पक्ष फोडण्याची धमकी देऊन त्यांनी हे पद मिळविले. आता ते आपण कसे आक्रमक हिंदुत्ववादी आहोत हे दाखविण्यासाठी बेताल वक्तव्ये करीत असतात. कानोकानी आलेल्या खबरीनुसार त्यांना सर्वोच्च नेत्यांपैकी क्रमांक दोनच्या नेत्याचा म्हणे आशीर्वाद प्राप्त आहे.

हिंदुत्वाबाबत आपण योगी आदित्यनाथा यांना तोडीसतोड नव्हे तर काकणभर अधिकच आहोत हे दाखविण्यासाठी ते अशी वक्तव्ये करीत असतात. कारण योगी आदित्यनाथ यांनी स्वतःची अशी प्रतिमा निर्माण केली आहे की बहुधा 'मोदींनंतर तेच पंतप्रधान' अशी चर्चा सुरु आहे.

या चर्चेमुळे साहजिकच 'क्रमांक दोन'च्या पोटात गोळा उठणे स्वाभाविक आहे. कारण त्यांची काकदृष्टी पंतप्रधानांच्या खुर्चीवर आहेच.

मग योगी आदित्यनाथांचे महत्व कमी करण्यासाठी कुणीतरी हाताशी नको का?

मग असे हिमांत बिश्श शर्मा यांच्यासारखे सवंग दुय्यम नेते त्यांच्या तालावर नाचले नाहीत तरच नवल !

म्हणजे लक्षात आले ना? राजकारणात राजकारण!

म्हणून मग 'पळा पळा कोण पुढे पळे तो...............'चा खेळ सुरु करुन देण्यात आला आहे !


## पकड सुटतीय??

हिमाचल आणि गुजरातमधील विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने अभेद्य समजल्या जाणाऱ्या सत्तापक्षातल्या फटी नजरेत येऊ लागल्या. गुजरातवर सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या जोडगोळीची विलक्षण पकड आहे कारण दोघेही गुजरातचेच आहेत. त्यामुळेच गुजरातमधल्या राजकारणात ते त्यांना पाहिजे तेव्हा त्यांच्या मनाप्रमाणे राजकीय पत्ते पिसत असतात.

विजय रुपानी मुख्यमंत्री होते त्यांना एका रात्रीत घरी बसवून प्रथमच आमदार झालेल्या भूपेंद्र पटेल यांना मुख्यमंत्रीपदावर बसविण्यात आले.

आता विजय रुपानी आणि त्यांच्या काळात उपमुख्यमंत्री असलेले नितिन पटेल यांना कायमचे घरी बसविण्यात आले आहे.

गुजरातच्या निवडणुकीत त्यांना





उमेदवारी नाकारण्यात आली आहे.

हे दोन्ही नेते तसे तालेवार आहेत परंतु आपली नाराजी न दाखवता मुकाट्याने त्यांनी ही सक्तीची निवृत्ती मान्य केली.

गुजरातमध्ये जोडगोळीची अशी दहशत आहे की कुणी बंडखोरी करण्याचे धारिष्ट्य दाखवण्याच्या स्थितीतच नाही. परंतु हे राजकीय दहशतीचे 'गुजरात मॉडेल' ते इतरत्र लागू करण्यात अद्याप यशस्वी झालेले दिसत नाहीत.

आता हिमाचल प्रदेशाचेच उदाहरण घ्या. हिमाचल प्रदेशातही या जोडगोळीने तरुणांना संधी देण्याच्या नावाखाली जुन्या मातब्बरांना बाजुला काढण्यास सुरुवात केली.

पण झाले भलतेच !

हिमाचलमधील मातब्बरांनी चक्क बंडाचे निशाण फडकविले.

कृपाल परमार हे हिमाचलमधील एक मातब्बर भाजप नेते व प्रदेश भाजपचे उपाध्यक्ष ! ते राज्यसभेत देखील होते.



त्यांना विधानसभा निवडणूक लढवायची होती व त्यांनी पक्षाकडे तिकिट मागितले होते. परंतु त्यांना तिकिट मिळाले नाही. त्यांनी चक्क बंडखोरी करुन त्यांना हव्या असलेल्या फत्तेपूर मतदारसंघातून अपक्ष म्हणऊन उमेदवारी अर्ज भरुन टाकला.

त्यांनी बंडखोरी करु नये आणि अर्ज मागे घ्यावा यासाठी साक्षात पंतप्रधानानी त्यांना फोन केला होता.

परंतु परमार यांनी पंतप्रधानांचे ऐकले तर नाहीच पण वर त्यांना हिमाचल प्रदेशात जे राजकारण सुरु करण्यात आले आहे

त्याबाबत खरी-खोटी सुनावली.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा हे स्वतः हिमाचल प्रदेशाचे आहेत. त्यांनीही परमार यांना फोन केला असता

त्यांनी त्यांच्यावरही तोफ डागली. 'तुम्ही माझा अपमान केला आहे' अशा शब्दात त्यांनी नड्डा यांना सुनावले.

या त्यांच्या संभाषणाच्या ध्वनिफिती कुणीतरी उघडकीस आणल्या आणि हिमाचल निवडणूक प्रचारात त्यांचा विरोधी पक्षांनी भरपूर वापर केला. हिमाचलमध्ये भाजपपुढे खरे आव्हान त्यांच्या बंडखोरांकडूनच आहे. परमार यांच्या बरोबरीने चार माजी आमदारांना देखील निलंबित करण्यात आले आहे.


थोडक्यात सांगायचे झाले तर एखाद्या राज्यात दादागिरी खपवून घेतली याचा अर्थ दुसऱ्या राज्यातही ती खपवून घेतली जाईल असे नव्हे !

## इतरांच्या रेवड्या आणि तुम्ही काय वाटता??

एखाद्या नेत्याच्या अंगात सत्ता भिनली की त्याचे ताळतंत्र सुटते.

आता पहा ना, सामान्यजनांसाठी एखादा कल्याणकारी कार्यक्रम किंवा योजना राबविणे हा काही अपराध नाही.

किंबहुना कल्याणकारी राज्याच्या



संकल्पनेत त्याचा समावेश होतो. विशेषतः गरीब आणि वंचित वर्गांना तर आर्थिक न्याय देण्यासाठी अशा योजनांची आवश्यकताच असते.

परंतु मोकाट आणि अनियंत्रित खासगीकरण आणि केवळ मूठभरांच्या हाती आर्थिक सत्ता एकवटण्याचे पुरस्कर्ते असणाऱ्या पंतप्रधानांना हे मान्य नाही. ते याला 'रेवडी संस्कृति' म्हणतात. लोकांना फुकटेगिरीची सवय लावण्याचा प्रकार म्हणतात.

हे 'सद्विचार' त्यांना सुचतात




कारण ते 'सूट-बूट संस्कृती'चे रक्षक आणि पुरस्कर्ते आहेत. म्हणूनच त्यांचे सरकार मोकाटपणे रेल्वेपासून सर्व सेवांचे खासगीकरण करीत सुटले आहे. एकेकाळी रेल्वेने गरीब लोक जायचे पण आज रेल्वे अशी महाग करुन ठेवली आहे की रेल्वेप्रवास करण्याबद्दल सामान्यजनांना दोनदा विचार करावा लागतो. परंतु ज्याठिकाणी मतांची भीक - जोगवा मागायचा असतो तेथे मात्र या रेवडी-वाटपाचा कार्यक्रम बिनाधास्तपणे राबवला जातो.

गुजरातच्या भाजप जाहीरनाम्यात रेवड्यांचा नुसता पाऊस आहे.

ते जाऊ द्या ! ओडीशात घडलेले उदाहरणच पहा.

ओडीशात पदमपूर या मतदारसंघात विधानसभेची पोटनिवडणूक आहे. ५ डिसेंबरला मतदान !

हा सर्व शेतीचा व ग्रामीण असा भाग आहे. यंदा तेथे भयंकर दुष्काळ पडलेला आहे.

शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री फसल बीमा योजनेखाली भरपाईसाठी अर्ज केले आहेत परंतु त्यांना कोणतीही मदत मिळू शकली नाही.

याचा फायदा ओडीशात सत्तारूढ बिजु जनता दलाने घेतला नाही तरच नवल ! त्यांनी या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी दोनशे कोटि रुपयांची मदतयोजना जाहीर करुन टाकली.

यामुळे या मतदारसंघात भाजपच्या विरोधात असे काही वातावरण निर्माण झाले की भाजपचा उमेदवार आपला उमेदवारी अर्ज देखील भरु शकला नाही. त्याला जागोजागी संतप्त शेतकऱ्यांचा असा काही विरोध झाला की उमेदवारी अर्ज न भरताच त्याला माघारी जावे लागले.

यानंतर ओडीशा प्रदेश भाजपच्या नेत्यांनी तसेच केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या प्रकरणाचे गांभीर्य केंद्रीय भाजपनेत्यांच्या कानावर घातले.

गांभीर्य ओळखून कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर यांनी तत्काळ या भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पीकविम्याचे पैसे तातडीने शेतकऱ्यांना देण्याचे आदेश दिले.

परंतु एवढा आटापिटा का ?

केवळ निवडणूक जिंकण्यासाठी ?

जर निवडणूक नसती तर या शेतकऱ्यांना विम्याचे पैसे मिळाले नसते हाच यातून अर्थ निघतो ना ? ? ?

म्हणे रेवडी संस्कृति !

## ममतादीदींच्या मनात आहे तरी काय?

राजकारणात काहीही होऊ शकते. कालचे प्रतिस्पर्धी उद्याचे मित्र व सहकारी होऊ शकतात.

पश्चिम बंगालमध्ये सध्या असाच काहीसा खेळ सुरु आहे. या राज्यात नुकत्याच काही सहकारी सोसायट्यांच्या निवडणुका झाल्या.

एका सोसायटीच्या एका जागेसाठी एकमेकांचे हाडवैरी समजले जाणारे भाजप आणि मार्क्सवादी





कम्युनिस्ट पक्ष हे चक्क एकत्र आले आणि त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या विरोधात ती एक जागा जिंकून धक्का दिला.

यानंतर या दोन पक्षांनी परस्परांबरोबरचे राजकीय सहकार्य सुरु ठेवून आणखी एका सोसायटीच्या निवडणुकीसाठी हातमिळवणी केली परंतु तेथे मात्र त्यांची युति यशस्वी होऊ शकली नाही आणि तृणमूलने प्रचंड बहुमताने त्यांचा सफाया केला.

परंतु, भाजप, पंतप्रधान व गृहमंत्री यांच्या विरोधात सतत आग ओकणाऱ्या ममतादीदी अलीकडच्या काळात काहीशा शांत व सौम्य झालेल्या आढळत आहेत. विनाकारण भाजपवर तोंडसुख घेण्याचे त्यांनी जवळपास बंद केले आहे. एवढेच नव्हे तर राज्याचे कार्यकारी राज्यपाल गणेशन यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी त्या चेन्नईला गेल्या होत्या.

भाजप आणि पंतप्रधानांवर सतत टीका केल्यास बहुसंख्यक हिंदू मतदार नाराज होतात आणि ते घडू नये यासाठी त्यांनी आपला पवित्रा बदलला आहे असे सांगण्यात येते.

पश्चिम बंगालमधील मुस्लिम मतदारांची संख्या उल्लेखनीय आहे परंतु तूर्तास त्यांना तृणमूलशिवाय अन्य राजकीय पर्याय उपलब्ध नसल्याने त्यांची मते खिशातच असल्याची खात्री असल्याने आता ममतादीदींनी हिंदूंची मते कशी मिळतील यासाठी रणनीती आखली आहे. त्यामुळे भाजप, पंतप्रधान यांच्यावरील टीका त्यांनी बंद करुन टाकली आहे.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाने अनुपस्थित राहून भाजपला मदत केली.

आता संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु होतानाच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात दिल्लीला जाऊन त्या पंतप्रधानांना भेटणार आहेत.

सर्वात महत्वाचे म्हणजे पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि भाजपनेते शुभेंदू अधिकारी यांना त्यांनी अलीकडेच चहाला बोलावून त्यांच्याशी चर्चा केली. मागाहून बोलताना त्यांनी शुभेंदू त्यांना भावासारखे असल्याचेही सांगितले.

शुभेंदू अधिकारी यांनी ममतादीदींनी विधानसभा निवडणुकीत नंदीग्राम येथून पराभूत केले होते. त्यांच्याबद्दल दीदींच्या मनात विलक्षण राग होता कारण तृणमूल सोडून ते भाजपमध्ये गेले आणि वर त्यांनी त्यांचा पराभवही केला होता. त्यामुळे बराच काळ ते त्यांच्या रागाचे धनी ठरले. मात्र आता बहुधा दीदींचा राग निवळला असावा. राज्याचे



नवे राज्यपाल आनंदा बोस यांच्या शपथविधीला आसनव्यवस्था योग्य न केल्याच्या निषेधार्थ शुभेंदू अधिकारींनी कार्यक्रमाचा बहिष्कार केला होता.

परंतु तो प्रकार मनात न ठेवता दीदींनी त्यांना चहाला बोलावून चर्चा केली हे विशेष उल्लेखनीय मानले जाते.

भाजपच्या विरोधात विरोधी पक्षांच्या एकजुटीबद्दल देखील दीदी अलीकडे फारसे मतप्रदर्शन करताना आढळत नाहीत किंवा त्याबद्दल फारसे बोलतही नाहीत.

दीदींच्या मनात नक्की काय घोळते आहे???

म्हणूनच राजकारणात काहीही घडू शकते म्हणतात तेच खरे !


## या तपास यंत्रणा आहेत की खेळ??

शिवसेना नेते संजय राऊत यांना जामीन देताना कोर्टाने त्यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या आरोपांच्या पुष्टीसाठी कोणतेही पुरावे उपलब्ध करुन दिले नसल्याचे आणि खऱ्या दोषींना

अटक करण्याऐवजी त्यांना अटक केल्याबद्दल तपासयंत्रणांवर ताशेरे ओढले. त्याचीच पुनरावृत्ति दिल्लीच्या उपमुख्यमंत्र्यांबाबत झाली.

दिल्ली सरकारने मद्य परवाने वितरणात विशिष्ट ठेकेदारांना झुकते माप दिल्याचा आरोप करुन आणि त्यापोटी मोठी लाच घेतल्याचा गंभीर आरोप करुन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यावर भाजपच्या बड्याबड्या नेत्यांनी शरसंधान केले होते.

सिसेदिया यांनी हे सर्व आरोप नाकारले होते परंतु केंद्र सरकारच्या हातात तपास यंत्रणांची सूत्रे असल्याने



सिसोदिया यांना बचावाचा पवित्रा घ्यावा लागला होता आणि त्यांच्या अटकेची टांगती तलवार राहिली होती.

या पार्श्वभूमीवरच सीबीआयने या प्रकरणात पहिले आरोपपत्र सादर केले आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्यात सिसोदिया यांचा समावेश नाही.

याचा अर्थ काय? सिसोदिया यांना 'स्वच्छ प्रमाणपत्र' – 'क्लीन चिट' मिळाली काय?

खरोखरच सिसोदिया यांचा त्या प्रकरणाशी काहीही संबंध नव्हता काय? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी काहीकाळ थांबावे लागेल. कारण सीबीआयतर्फे 'सप्लिमेंटरी चार्जशीट'




म्हणजेच 'पुरवणी आरोपपत्र'ही दाखल केले जाऊ शकते आणि त्यामध्ये सिसोदिया यांचा समावेश केला जाऊ शकतो. त्यामुळेच तत्काळ निष्कर्षावर येणे अयोग्य ठरेल.

या प्रकरणी सीबीआयने एकंदर तेराजणांना आरोपी केलेले आहे आणि हे पहिले आरोपपत्र सातजणांविरुध्द आहे. त्यामुळे उर्वरित सहाजणांचा नंबर – ज्यामध्ये सिसोदिया पण आहेत – नंतरच्या आरोपपत्रात लागू शकतो.



यात आता राजकारण सुरु झाले आहे. आम आदमी पार्टीने याप्रकरणी भाजपकडून माफीची मागणी केली आहे. काँग्रेसने आम आदमी पार्टी आणि भाजप एकच असून सिसोदिया यांना सोडून लहानसहान माणसांना यात गोवण्यात आले आहे. आम आदमी पार्टी ही भाजपची 'बी टीम' असल्याचा आरोपही काँग्रेसची मंडळी करीत आहेत. सिसोदिया यांना सीबीआयने चौकशीसाठी पाचारण केले होते आणि त्या चौकशीनंतर सिसोदिया यांनी त्यांच्याविरुध्द गंभीर आरोप केला होता. या चौकशीत सीबीआयचे अधिकारी आपल्याला भाजपमध्ये सामील होण्याचे आणि त्याबदल्यात मुख्यमंत्रीपद देण्याचे आमिषय दाखवून दबाव आणत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला होता.

सिसोदिया यांचा पहिल्या आरोपपत्रात समावेश न होणे याचा अर्थ वरील 'ऑफर'वर काम सुरु झाले आहे असा लावायचा काय?

थांबा आणि वाट पहा !!!

■■





## || पाऊले चालती ||

हि कुणाची पाऊले
न थकणारी, न थांबणारी
ऐशींचा टप्पा ओलांडून
आजही चालतच आहेत.
लोकसेवेचा हा व्रतस्थ वाटसरु
दिवस उजाडल्यापासून मावळेपर्यंत
लहानांपासून थोरांपर्यंत
सगळ्यांच्या व्यथा अडचणी ऐकत
त्या सोडविण्यासाठी मदत करत
हा प्रवास असाच पुढे निघालाय
विश्रांती हा शब्दच माहीत नसलेला
हा अवलिया शारीर व्याधींवर मात करत
समाज परिवर्तनासाठी वाटचाल करतोय
अनेकांच्या टीकेचे प्रहार हसत हसत झेलणारा
कुणाच्यासाठी कटुता न मनात ठेवता
चुकलेले परत येतांना त्यांना माया देणारा
आपण सगळे ह्या पावलांना
साहेबांची पाऊले म्हणून जाणतो
कधीतरी थोड दमान घ्या म्हणतो
पण ही पायपीटच माझी ऊर्जा आहे
अस म्हणत निघालाय शतकाकडे
नमस्कार त्या पावलांना
विठूरायाची पावलेच अवतरलीयत
'देव' शोधायला नको तो 'साहेबांतच' आहे.

